The WITNESS FOR THE PROSECUTION

साक्षीदार

AGATHA CHRISTIE

वृषाली जोशी

साक्षीदार

लेखक- अगाथा ख्रिस्ती

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

साक्षीदार

लेखक - अगाथा ख्रिस्ती

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ३० नोव्हेंबर २०२५

©esahity Pratishthan®2025

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक इतर वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादिकेची ओळख

डॉ. वृषाली जोशी

B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे एकोणसाठ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.

कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.

संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५

अगाथा ख्रिस्ती

अगाथा ख्रिस्ती ही जगातील पुस्तक खपाचा उच्चांक गाठलेली व जिच्या लिखाणावर आधारित असे अनेक नाटक व सिनेमे निघाले, अशी प्रसिद्ध इंग्लिश लेखिका होती. सुमारे शंभर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झाले.

पहिल्या महायुद्धात ती परिचारिका म्हणून काम करत होती. तिची पहिली कादंबरी 'The Mysterious Affair of Styles' ही १९२० मध्ये प्रकाशित झाली. त्यात तिने हर्क्युल पायरो या गुप्तहेराची निर्मिती केली. पुढे २५ कादंबऱ्यांमध्ये तेच पात्र रहस्ये सोडवत राहिले. 'The Murder of Roger Ackroyd' या १९२६ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीपासून मिस जेन मार्पल ही स्त्री गुप्तहेर पुढे आली व त्यापुढील ७५ कादंबऱ्यांमध्ये तीच रहस्ये सोडवत

राहिली. Mousetrap [१९५२] हे तिचे नाटक पहिल्यांदा एका थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २१ वर्षे चालले व त्याचे ८८६२ प्रयोग झाले. तर दुसऱ्या थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २०२० सालापर्यंत चालू होते व त्याचे २८००० प्रयोग झाले. 'And then There Were None' यावर आधारित हिंदी सिनेमा 'गुमनाम' तुम्हाला नक्कीच माहिती असेल. तिने लिहिलेले 'witness for the procucution' हे नाटक यु ट्युब वर आहे. त्याचा अनुवाद प्रस्तुत पुस्तकात केला आहे.

साक्षीदार

अंक पहीला

दृश्य – सर विल्फ्रिड रोबर्ट्स, क्यू.सी. यांचे दालन

हे दृष्य सर विल्फ्रिड यांच्या खासगी कार्यालयाचे आहे. खोली अरुंद आहे. डावीकडे दार आहे आणि उजवीकडे खिडकी. खिडकीला खोल बैठक आहे आणि ती एका उंच, साध्या विटांच्या भिंतीकडे तोंड करून आहे. मागील भिंतीच्या मध्यभागी एक झरोका आहे, दोन्ही बाजूंना जड कायदेशीर ग्रंथांनी भरलेली कपाटं व उजव्या बाजूस मध्यावर एक बाक आहे, त्याच्या उजवीकडे फिरणारी खुर्ची आणि डावीकडे चामड्याच्या कव्हरची सरळ पाठ असलेली खुर्ची आहे. आणखी एक खुर्ची झरोक्याच्या डाव्या बाजूला असलेल्या कपाटांजवळ उभी आहे. वर उजव्या कोपऱ्यात उंच वाचन बाक आहे, आणि डाव्या कोपऱ्यात भिंतीला काही कोट लावण्याचे हुक्स आहेत. रात्री खोलीतील प्रकाश झरोक्याच्या दोन्ही बाजूंना असलेल्या विजेच्या दिव्यांद्वारे आणि बाकावरील अँगल-लॅम्पद्वारे होतो. लाईटचा स्विच डावीकडील दाराखाली आहे. झरोक्याच्या डावीकडे एक घंटी आहे. बाकावर एक टेलिफोन आहे आणि त्यावर कायदेशीर कागदपत्रांचा पसारा आहे. तसेच काही डीड बॉक्सवर [महत्वाची कागदपत्रे ठेवायची बळकट पेटी] आणि खिडकीच्या सीटवरही कागदपत्रांचा पसारा आहे.

पडदा वर जाताच दुपार असते आणि खिडकीतून उन्हाची किरणं खोलीत पडत असतात. कार्यालय रिकामं आहे. **ग्रेटा**, सर विल्फ्रिड यांची टायपिस्ट, लगेचच प्रवेश करते. ती ॲडिनॉइडल (नाक बंद असल्यासारखी बोलणारी)

असून स्वतःबद्दल खूप चांगलं मत असलेली मुलगी आहे. ती झरोक्या जवळ जाऊन स्क्वेअर डान्सच्या पद्धतीने चालत शेकोटीवरील बॉक्स-फाईलमधून एक कागद काढते. **कार्टर**, मुख्य लिपिक, प्रवेश करतो. तो काही पत्रं घेऊन येतो. ग्रेटा वळते, कार्टरला पाहते आणि पटकन बाहेर निघून जाते. कार्टर बाकाकडे जाऊन पत्रं ठेवतो. टेलिफोन वाजतो. कार्टर रिसीव्हर उचलतो.

कार्टर (टेलिफोनवर) – सर विल्फ्रिड रोबर्ट्स यांचे दालन... ओह, चार्ल्स तुम्ही?... नाही, सर विल्फ्रिड सध्या कोर्टात आहेत... लगेच परत येणार नाहीत... हो, शटलवर्थ केस... काय? मायर्स सरकारी वकील आणि बॅटर खटला चालवतोय? ... त्यांना निकाल द्यायला जवळजवळ दोन तास लागलेत... नाही, आज संध्याकाळी शक्य नाही. सगळ्या भेटीच्या वेळा संपलेल्या आहेत. उद्याची वेळ देऊ शकतो... नाही, अजिबात शक्य नाही. मी मेह्यू (मेह्यू आणि ब्रिन्सकिल) यांची वाट बघतोय, कोणत्याही क्षणी येतील... ठीक आहे, ठीक आहे. (रिसीव्हर ठेवतो आणि बाकावरील कागदपत्रं लावतो.)

ग्रेटा (प्रवेश करते. ती नखं रंगवत असते.) – मी चहा बनवू का, मिस्टर कार्टर?

कार्टर (घड्याळ पाहत) – अजून वेळ झालेली नाही, ग्रेटा.

ग्रेटा – माझ्या घड्याळानुसार वेळ झालीय.

कार्टर – मग तुझं घड्याळ चुकतंय.

ग्रेटा (मध्यभागी येत) – मी रेडिओवर वेळ पाहून घड्याळ लावलंय.

कार्टर – मग रेडिओ चुकतोय.

ग्रेटा (चकित होऊन) – ओह, रेडिओ चुकतो असं नाही हो, मिस्टर कार्टर. असं होऊ शकत नाही.

कार्टर – हे घड्याळ माझ्या वडिलांचं आहे. कधी पुढे नाही जात, कधी मागे राहात नाही. आजकाल अशी घड्याळं बनवत नाहीत. (डोकं हलवतो, आणि अचानक रागाने एका टाईप केलेल्या कागदाकडे पाहतो.) खरंच, तुझं टायपिंग... कायम चुका! (तो ग्रेटाच्या उजवीकडे जातो.) तू एक शब्द सोडलास.

ग्रेटा – ओह, एकच तर शब्द... कुणाकडूनही चूक होऊ शकते.

कार्टर – तू सोडलेला शब्द म्हणजे "नाही". तो शब्द नसल्यामुळे वाक्याचा अर्थ पूर्णपणे बदलतो.

ग्रेटा – ओह, खरंच का? विचार केला तर गंमतच वाटते. (हसते.)

कार्टर – यामध्ये काहीही गंमत नाही. (पत्र फाडून तिला देतो.) परत टाइप कर. मी तुला गेल्या आठवड्यात 'ब्रायंट आणि हॉर्सफॉल' या प्रसिद्ध प्रकरणाबद्दल सांगितलं होतं. मृत्युपत्र आणि ट्रस्ट फंड प्रकरण होतं, एका लिपिकाच्या निष्काळजी कॉपीमुळे...

ग्रेटा (खोडून) – चुकीच्या बायकोला पैसे मिळाले, आठवतंय.

कार्टर – एक स्त्री जिला पंधरा वर्षांपूर्वी घटस्फोट दिला होता. मृत व्यक्तीच्या

इच्छेविरुद्ध. पण शब्दशः कायद्याने तेच मान्य केलं. काही करता आलं नाही. (बाकाच्या उजवीकडे जातो.)

ग्रेटा – मला तरी ते ही मजेशीर वाटतं. (हसते.)

कार्टर – वकिलांचं दालन हे गमतीचं ठिकाण नाही. कायदा, ग्रेटा, एक गंभीर गोष्ट आहे आणि ती तशीच हाताळायला हवी.

ग्रेटा – पण काही न्यायाधीश जे विनोद करतात ते ऐकलं की तसं वाटत नाही.

कार्टर – असा विनोद फक्त न्यायमूर्तींनाच शोभतो.

ग्रेटा – आणि वृत्तपत्रात तर कायम लिहिलेलं असतं "दालनातीत हास्य".

कार्टर – जर तो विनोद न्यायमूर्तीने केला नसेल, तर न्यायालय रिकामं करीन असा इशारा लगेच दिला जातो.

ग्रेटा (दाराकडे जात) – किती खडूस आहेत. (वळते आणि डेस्कच्या डावीकडे येते.) तुम्हाला माहिती आहे का, मिस्टर कार्टर, मी दुसऱ्या दिवशी काय वाचलं? (गंभीरपणे.) "कायदा म्हणजे गाढव." मी उदाहरण देतेय, उद्धटपणा करत नाही.

कार्टर (थंडपणे) – विनोदी स्वरूपाचं उदाहरण. गंभीरपणे घेऊ नये. (घड्याळ पाहतो.) ग्रेटा, आता, तू चहा करू शकतेस—(तो थांबतो, नेमक्या सेकंदाची वाट पाहतो)— **ग्रेटा** (आनंदाने) – ओह, धन्यवाद मिस्टर कार्टर. (लवकरच दाराकडे जाते.)

कार्टर – 'मेह्यू आणि ब्रिन्सकिल' यांचे, मिस्टर मेह्यू, लवकरच येतील. श्री. लिओनार्ड व्होल हे ही अपेक्षित आहेत. ते दोघं एकत्रही येऊ शकतात किंवा वेगवेगळेही.

ग्रेटा (उत्साहाने) – लिओनार्ड व्होल? (बाकाकडे येते.) अरे, हेच नाव... वृत्तपत्रात होतं...

कार्टर (गंभीरपणे) – चहा, ग्रेटा.

ग्रेटा – पोलिसांशी संपर्क साधावा असं म्हटलं होतं, त्यांच्याकडे उपयुक्त माहिती असण्याची शक्यता आहे.

कार्टर (आवाज वाढवतो) – चहा!

ग्रेटा (दाराकडे जात, वळते) – अलीकडेच होतं ते...

(कार्टर तिच्याकडे रागाने बघतो.)

ग्रेटाः मिस्टर कार्टर, चहा [**ग्रेटा** लाजते पण असमाधानाने निघून जाते.]

कार्टरः [चिडून स्वतःशीच काहीतरी बोलत, कागदपत्र नीट लावत रहातो**.]** या मुली, भावनाप्रधान आणि चुकीच्या. मला माहिती नाही, की टेम्पल कशासाठी येतो आहे. [तो टंकलिखित केलेला कागद बघतो. रागाने पेन घेऊन, चूक दुरुस्त करतो.]

ग्रेटाः [आत येत**] मिस्टर मेह्यू**

[**मिस्टर मेह्यू** आणि **लिओनार्ड व्होल** प्रवेश करतात. मिस्टर **मेह्यू** एक सर्वसामान्य, मध्यमवयीन, गर्विष्ठ जरा कोरडा आणि जेवढ्यास तेवढे वागणारा वकील आहे. लिओनार्ड साधारण सत्तावीस वर्षांचा, आवडेल असा, मित्रत्वाने वागणारा तरूण आहे. तो जरा दुःखीकष्टी दिसतो आहे. **मेह्यू**च्या हातात बॅग आहे.]

मेह्यू :[**ग्रेटाला** टोपी देत] मिस्टर व्होल, बसा. [तो काही अंतर ओलांडून बाकाशी जातो.] **कार्टर**, शुभ दुपार [हातातील बॅग बाकावर ठेवतो.]

[ग्रेटा लिओनार्डची टोपी घेऊन दारावर टांगते. मग **लिओनार्ड**कडे बघत निघून जाते.]

कार्टरः मिस्टर मेह्यू, शुभ दुपार. सर विल्फ्रीड एवढ्यात येतीलच, तरीपण न्यायाधीश बँटर यांचे काही सांगता येत नाही. मी सरळ कपडे बदलायच्या खोलीत जाऊन, तुम्ही इथे आल्याचे सांगतो. [थोडे हो नाही करतो.]

[बाक ओलांडून लिओनार्डच्या उजवीकडे जातो.]

मेह्यूः कार्टर, मिस्टर लिओनार्डबरोबर मी तुमचाही आभारी आहे. मला वाटते आपली भेट फार घाईने ठरवली गेली. पण या केसच्या कामाची तातडी आहे.

[कार्टर दरवाजा ओलांडतो.]

तुझी पाठीच्या स्नायूंची वेदना कशी आहे?

कार्टर: [वळून बघत] फक्त पूर्वेकडून वारा येतो, तेव्हाच, मला ते जाणवते. आठवणीने विचारल्याबद्दल धन्यवाद.

[**कार्टर** घाईने निघून जातो.]

[**मेह्यू** बाकावर डावीकडे बसतो**. लिओनार्ड** अस्वस्थ हालचाल करतो.]

मेह्यू: मिस्टर व्होल, खाली बसा.

लिओनार्ड: आभारी आहे, पण मी जरा चालतो. ही गोष्ट मला जरा अस्वस्थ करते. [तो डावीकडे जातो]

ग्रेटा: [आत येते व लिओनार्डबद्दल रुची घेत, व टक लावून बघत, मेह्युशी बोलते] मिस्टर मेह्यू, तुम्हाला एक कप चहा आणू का? मी तो आताच केला आहे.

लिओनार्ड: [कौतुक करत] आभारी आहे. मला चालेल.

मेह्यू: नाही, मला नको.

[ग्रेटा वळून जाते]

लिओनार्ड: माफ करा. [ग्रेटाकडे बघून हसतो व उजवीकडे जात थोडासा घाबरलेला असा तो बाहेर पडतो. शांतता.] माझ्या बाबतीत हे घडते आहे, यावर माझा विश्वासच बसत नाही. कदाचित हे स्वप्न असावे आणि मी त्यातून आता जागा होतो आहे.

मेह्यू: हो, असे एखाद्याला वाटू शकते.

लिओनार्ड: [बाकाच्या उजवीकडे सरकत] म्हणजे मला म्हणायचे आहे, हे सर्व मूर्खपणाचे वाटते आहे.

मेह्यू: [कडकपणे] मूर्खपणाचे?

लिओनार्ड: मी नेहमी लोकांशी व सगळ्यांशीच मित्रत्वाने वागणारा माणूस आहे. म्हणजे माझ्यात आक्रमकता नाही. म्हणजे जो गुन्हा तुम्ही केलाच नाही, त्याबद्दल तुम्हाला या देशात शिक्षा होत नाही ना?

मेह्यू: माझ्या मते इंग्लिश न्यायपद्धती ही जगातील सर्वात उत्तम न्यायपद्धती आहे.

लिओनार्ड: [त्याचे फारसे समाधान झालेले नाही. तो बाक ओलांडून, डावीकडे जातो.] अर्थात तिथे, ॲडॉल्फ बेकची केस होती. मी कालच ती वाचली. त्याने अनेक वर्षे तुरुंगवास भोगल्यावर त्यांना कळलं की गुन्हेगार दुसराच एक स्मिथ नावाचा माणूस होता. मग त्यांनी ॲडॉल्फ बेकला माफी दिली. ही गोष्ट मला फार विचित्र वाटते — ज्या गोष्टीसाठी तू दोषी नाहीस, त्यासाठी तुला "माफी" देणं.

लिओनार्ड : (शेकोटीच्या डावीकडून खुर्ची आणून मध्यभागी ठेवतो) बरं, मला तरी ते बरोबर वाटत नाही.

मेह्यू : महत्त्वाचं म्हणजे बेकला मुक्त करण्यात आलं.

लिओनार्ड : हो, त्याच्यासाठी तर सगळं ठीक झालं. पण जर तो खून असता — (तो मधोमध ठेवलेल्या खुर्चीवर उलट बसतो) — जर तो खून असता, तर खूप उशीर झाला असता. त्याला आधीच फाशी दिली गेली असती.

मेह्यू: (कोरड्या पण सौम्य आवाजात) आता, मिस्टर व्होल, इतकं— म्हणजे—भयभीत होण्याची गरज नाही.

लिओनार्ड: (थोडा उदासपणे) माफ करा, सर. पण खरं सांगायचं तर मी खरंच घाबरलोय.

मेह्यू: बरं, शांत राहा. सर विल्फ्रिड रोबर्ट्स लगेचच येतील. आणि मला हवयं की तुम्ही तुमची गोष्ट अगदी जशी मला सांगितली, तशीच त्यांना सांगा. [त्याच्या ब्रीफकेसमधून काही टंकलिखित कागद काढतो.] असे दिसते आहे, की या केसमध्ये घाई करण्याची गरज आहे. पण मला वाटते आता वेळ आहे तर, मी तुमची पूर्वपीठीका थोडी समजावून घेतो. मला वाटते, आता तुमच्याकडे काही काम नसून तुम्ही बेकार आहात. त्यापूर्वी तुम्ही काय करत होतात?

लिओनार्ड:[लाजत] तसे आहे, पण मी थोडे पैसे साठवून ठेवलेले आहेत. ते फार नसले, तरी ---

मेह्यू: नाही मी वकिलाच्या फीबद्दल बोलत नाही आहे. मी फक्त तुमच्या बद्दलचे चित्र स्पष्ट करतो आहे. तुमची पार्श्वभूमी आणि परिस्थिती. तुम्ही किती काळ बेकार आहात?

लिओनार्ड:[मित्रत्वाने/स्वखुशीने सांगतो.] गेले काही महिने.

मेह्यू: त्यापूर्वी तुम्ही काय करत होतात?

लिओनार्ड: मी मोटारी दुरुस्त करायच्या गॅरेजमध्ये मेकॅनिक म्हणून काम करत होतो.

मेह्यू: तिथे किती काळ काम केहोतात?

लिओनार्ड: साधारण तीन महिने.

मेह्यू: तुम्हाला काढून टाकले गेले का?

लिओनार्ड: नाही. मीच ते काम सोडले. फोरमनशी माझे भांडण झाले. तो म्हातारडा ---- [मध्येच थांबतो.] तो मोठा कंजूष मनुष्य होता. माझ्यावर नेहमी ओरडायचा.

मेह्यू: हं --- आणि त्यापूर्वी?

लिओनार्ड: एका पेट्रोल पंपावर काम करत होतो, तिथे थोडे लाजीरवाणे काही घडले.

मेह्यू: लाजीरवाणे? कशा प्रकारचे?

लिओनार्ड: [शरम वाटत] बॉसची मुलगी --- ती लहान होती. तिला मी आवडू लागलो --- खरे तर आमच्यात तसे काहीच नव्हते. पण त्या म्हाताऱ्याला ते आवडले नाही. त्याने मला जायला सांगितले. पण तो

माझ्याशी चांगला वागला. त्याने मला चांगले अनुभवाचे पत्र दिले. मी अंडी फेटायची यंत्रे कमिशनवर विकत होतो. [तो शेकोटीच्या डावीकडील खुर्चीवर बसतो.]

मेह्यू: खरे का ?

लिओनार्ड:[बाक ओलांडत व त्यावर पोरकटपणे उभे रहात] आणि ही भिकार कामे होती .मी यापेक्षा चांगले अंडी फेटायचे यंत्र शोधून काढले असते.

[मेह्यूची मनस्थिती पकडत] सर ,तुम्ही असे समजत असाल, की मी धरसोड वृत्तीचा आहे पण खरे तर मी तसा नाही .सैन्यातील नोकरीने मी थोडासा अस्थिर झालो .मी परदेशी जर्मनीत होतो .तिथे मी माझ्या अभिनेत्री असलेल्या बायकोला भेटलो .मी इथे परत आल्यावर नीट स्थिरस्थावर होऊ शकलो नाही .मला काय करायचे आहे ,हेच मला कळत नाही आहे .मलाा गाड्यांवर काम करायला सर्वात आवडते. त्यात नवी वेगळ्या प्रकारची उपकरणे शोधून काढायचा प्रयत्न मी करत असतो. ते रुचीपूर्ण आहे आणि असे बघा ---

[सर विल्फ्रिड रोबर्ट्स क्यू.सी. प्रवेश करतो त्याच्या मागोमाग त्याचे जाकीट, विग, बो, टाय आणि गाऊन घेतलेला कार्टर येतो.]

सर विल्फ्रिड: हॅलो, जॉन.

मेह्यू : [उठत] ओहो, विल्फ्रिड

सर विल्फ्रिड: [विग व गाऊन कार्टरला देत] मी कोर्टात असल्याचे कार्टरने सांगितले असेल. बॅंटरने फारच वेळ घेतला आणि हे मिस्—ट र व्होल आहेत? [तो लिओनार्डच्या डावीकडे जातो**.]**

मेह्यू :हो, हे **लिओनार्ड व्होल** आहेत.

मेह्यू:**लिओनार्ड,** नमस्कार, सर.

[मेह्यू शेकोटीकडे सरकतो**.]**

सर विल्फ्रिड: काय कसे काय, **व्होल?** तुम्ही बसणार नाही का?

[**लिओनार्ड** बाकाच्या डावीकडे बसतो.]

[कार्टरला ओलांडत] जॉन, तुझ्या घरची मंडळी कशी काय, कार्टर?

[कार्टर सर **विल्फ्रिडला** जाकीट आणि बो बदलण्यासाठी मदत करतो.]

मेह्यू: गेल्या चोवीस तासात मॉलीला फ्लू झाला आहे.

सर विल्फ्रिड: अरेरे!

मेह्यू: हो ना, हे नुकसानकारक आहे.. **विल्फ्रिड,** तुम्ही केस जिंकलात का? मायर्सला हरवल्याचे तुम्हाला नेहमीच समाधान मिळते, नाही का?

सर विल्फ्रिड: मला कुणालाही हरवल्याचे नेहमीच समाधान मिळते.

मेह्यू: पण विशेषतः मायर्सला.

सर विल्फ्रिड: [कार्टर कडून बो आणि टाय घेत] विशेषतः मायर्स. आपल्या कामाला लागू या. [आरशाच्या उजवीकडे जात].तो चिरडीस आणणारा सभ्य माणूस आहे.

[त्याचा बो आणि टाय घालतो.] तो नेहमी माझ्यातले वाईट तेवढे बाहेर काढतो.

मेह्यू: तुमचे दोघांचेही एकमेकांशी तसेच आहे. तुम्ही त्याला त्याचे वाक्य क्वचितच पूर्ण करून देता.

[कार्टर जाकीट, गाऊन, बो आणि विग घेऊन निघून जातो.

सर विल्फ्रिड: त्याच्या तशा वागण्याने**,** तो मला नेहमीच चिरडीस आणतो. मला तो रो बार्टस रो बार्टस असे म्हणून माझे चित्त विचलित करतो. तो सक्षम वकील आहे. पण जर त्याने हे लक्षात

ठेवले, तर की त्याने अतिशय सुयोग्य प्रश्न विचारणे बरोबर नाही. पण आपण आपल्या कामाला लागुया.

मेह्यू: [बाकाकडे सरकत] हो. मी **व्होलला** इथे आणले आहे. कारण त्याने मला त्याची गोष्ट जशी सांगितली तशीच त्याने ती तुम्हाला सांगावी, याबद्दल मी आग्रही आहे. [तो त्याच्या बॅगेतून काही टंकलिखित कागद काढतो.] असे दिसते आहे की या प्रकरणाची तड लवकरच लावावी लागेल. [तो सर **विल्फ्रडला** ते कागद देतो**.]**

सर विल्फ्रड: ओहो!

लिओनार्डः माझ्या बायकोला वाटते आहे ,की मला अटक होणार. [तो लाजीरवाणा दिसतो] ती माझ्यापेक्षा खूप हुशार आहे .त्यामुळे तिचे खरे असावे.

सर विल्फ्रड: पण कुठल्या कारणासाठी अटक होणार?

लिओनार्ड: [अजून लज्जित होत] खुनासाठी.

[सर विल्फ्रड बाकाच्या कोपऱ्यावर उजवीकडे जातो.]

मेह्यू: [मध्यभागी येत] ही मिस एमिली फ्रेंचची केस आहे. बहुधा तुम्ही वृत्तपत्रातील अहवाल वाचले असतील.

[सर विल्फ्रड होकारार्थी मान हलवतात.]

ती अविवाहित तरूण बाई होती. ती तिच्या वयस्क नोकराणीबरोबर हँपस्टेड येथील घरात रहात होती. चौदा ऑक्टोबरच्या रात्री ती नोकराणी रात्री अकरा वाजता आली, तेव्हा तिने मालकिणीला डोक्याच्या मागील बाजूस जाड

काठीने मारले गेले असल्याचे व त्यामुळे ती मेली असल्याचे पाहीले. [लिओनार्डकडे बघत] बरोबर?

लिओनार्ड: बरोबर. अलीकडे अशा गोष्टी सर्रास घडतात. मग दुसऱ्या

ह्यू बरोबर नेत्रपल्लवी करतात आणि लिओनार्डपेक्षा मेह्यूशी

बोलतात.]

सर विल्फ्रिड: [उठत] ठीक आहे. जे झाले ते झाले. [ते बाकावरून डावीकडे

जातात.]

लिओनार्ड: ते मला खूप मूर्खपणाचे वाटले. मी मला सांगता येईल, ते सगळे

सांगितले. त्यांनी खूप नम्रपणे सर्व ऐकून घेतले व त्यांचे समाधान झालेले दिसले. मी घरी येऊन हे सगळे माझ्या बायकोला सांगितले.त्या दिवशीच्या वृत्तपत्रात पोलिसांनी मला भेटायची इच्छा व्यक्त केली, कारण त्या संध्याकाळी मी तिला भेटायला गेलो होतो. त्याना वाटले की लिओनार्डकडून त्यांना महत्वाची माहिती मिळेल. त्यांनी मला खूप प्रश्न विचारले.

सर विल्फ्रिड: त्यांनी तुला सावध केले का?

लिओनार्ड: ते काही मला समजले नाही. त्यांनी मला काही प्रश्न विचारले व मी सांगितलेली उत्तरे लिहून घेतली. ती कोर्टात वापरली जातील, असे ते म्हणाले. हेच सावध करणे का?

[सर विल्फ्रिड मे, रोमेनला सांगितले, तेव्हा ती

घाबरून गेली. तिने असा विचार केला, की त्याना वाटेल, मीच ते केले.

[सर विल्फ्रिड मेह्यूसाठी खुर्ची डावीकडून शेकोटीजवळ मध्यभागी हलवतात.

मेह्यू त्यात बसतो.] त्यामुळे मला वाटले, की एक चांगला वकील

मिळवायलाच पाहिजे. मी आता काय करावे, ते तुम्ही मला सांगा. [तो

मोठ्या अपेक्षेने एकाकडून दुसऱ्याकडे बघतो.]

सर विल्फ्रिड: [डावीकडे सरकत] तुम्हाला मिस फ्रेंच चांगली माहिती होती

का?

[लिओनार्ड उठतो पण विल्फ्रिड त्याला परत खाली बसवायला लागतो]

लिओनार्ड: हो, सर. ती माझ्याशी फारच दयाळूपणे वागायची. [लिओनार्ड बसतो] ती माझ्यात इतकी रुची घेत असे, की कधीकधी मी कंटाळून जात असे. पण तिचा दृष्टीकोन चांगलाच होता. जेव्हा मी वृत्तपत्रात तिच्या खुनाबद्दल वाचले, तेव्हा मी उदास झालो कारण मला तीच लळा लागला होता.

मेह्यू: तुमची तिच्याशी ओळख कशी झाली, ते तुम्ही मला सांगितलेत, तेच सर विल्फ्रिड यांना देखील सांगा.

लिओनार्ड: [आज्ञाधारकपणे सर विल्फ्रिडकडे वळत] ऑक्सफर्ड रस्त्यावर एक दिवस मी एका म्हाताऱ्या बाईला बरेच सामान घेऊन रस्ता ओलांडतांना पाहिले आणि रस्त्याच्या मध्यभागी सामान पडले. मी ते गोळा केले व मागून येणाऱ्या बसपासून तिला वाचवले.

[सर विल्फ्रिड सगळ्यांना ओलांडत बाकाच्या उजवीकडे जातात.]

मी ते जेमतेमच करू शकलो. मी सामान उचलून, झटकून, त्याची सुटलेली दोरी बांधून, तिला परत दिले व तिचे सांत्वन केले. तुम्हाला माहिती असेल, असे कधीकधी होते.

सर विल्फ्रिड: ती त्याबद्दल ऋणी होती का?

लिओनार्ड: ओहो, हो. ती फारच ऋणी होती. तिने माझे खूप आभार मानले. जणू मी सामानाऐवजी, तिचे प्राणच वाचवले होते.

सर विल्फ्रिड: खरे तर तिचे प्राण वाचवण्याचा काही प्रश्न नव्हता?

[खणातून सिगरेटचे पाकीट काढतो]

लिओनार्ड: ओहो, नाही त्यात काही फार मोठी नायकगिरी नव्हती. ती मला परत कधी भेटेल, अशी अपेक्षादेखील मी करत नव्हतो.

सर विल्फ्रिड: सिगरेट?

लिओनार्ड: नाही नको. मी सिगरेट कधीच ओढत नाही. पण दोन दिवसांनी असामान्य योगायोगाने मी सिनेमागृहात तिच्यामागे बसलो होतो. तिने

इकडेतिकडे बघतांना मला ओळखले व माझ्याशी बोलू लागली. शेवटी तिने मला तिला भेटायला घरी बोलावले.

सर विल्फ्रिड: आणि तू गेलास?

लिओनार्ड: तिने मला मी कुठल्या दिवशी येईन ते विचारून येण्याची विनंती केली. तिला नकार देऊन तोडून टाकणे मला न जमल्याने मी तिला शनिवारी येतो असे म्हणालो.

सर विल्फ्रिड: आणि मग तू तिच्या घरी गेलास --- [वृत्तपत्र बघतो]

मेह्यू: हॅम्पस्टेडला.

लिओनार्ड: हो.

सर विल्फ्रिड: तू पहिल्यांदा तिच्या घरी गेलास, तेव्हा तुला तिच्याबद्दल किती माहिती होती?

[तो बाकाच्या उजव्या कोपऱ्यात जातो.]

लिओनार्ड: खरे तर काही नाही. पण तिने मला काहीसे असे सांगितले, की ती एकटी रहाते आणि तिला कुणी मित्र नाहीत.

सर विल्फ्रिड: ती फक्त एका नोकराणीबरोबर रहाते?

लिओनार्ड: बरोबर. तिच्याकडे आठ मांजरे आहेत. घरात छान फर्निचर आहे. पण मांजरांचा थोडा वास येतो.

सर विल्फ्रिड: [उठून बाकासमोर फिरत] ती श्रीमंत होती, असे तुझ्या लक्षात आले का?

लिओनार्ड: ती तसे असल्यासारखे, बोलली.

सर विल्फ्रिड: आणि तू?

लिओनार्ड: मला बरेच दिवस नोकरीच नाही. त्यामुळे माझे तितकेसे बरे चाललेले नाही. थोडेफार पैसे मी राखून आहे, एवढेच.

सर विल्फ्रिड: हे दुर्दैव आहे.

लिओनार्ड: हो, तसे आहे खरे. ओहो, तुमची अशी समजूत झाली आहे का, की लोक मला मी त्या बाईच्या पैशामागे आहे असे म्हणतील?

सर विल्फ्रिड: [बेसावधपणे] खरे तर मी तसा विचार केला नसता. पण लोक तो तसा करू शकतील.

लिओनार्ड: पण हे खरे नाही. खरे तर मला तिची कीव येत होती. मला ती एकाकी वाटत होती. मला माझ्या म्हाताऱ्या बेट्सीमावशीने लहानाचे मोठे केले. त्यामुळे मला म्हाताऱ्या बायकांचे प्रेम आहे.

सर विल्फ्रिड: तू म्हाताऱ्या बायका म्हणतोस, पण तुला मिस फ्रेंचचे वय काय होते, माहिती आहे का?

लिओनार्ड: नाही मला माहिती नव्हते. पण तिच्या खुनानंतर मी वृत्तपत्रात ते

छपन्न असल्याचे वाचले.

सर विल्फ्रिड: म्हणजे मिस्टर व्होले, तू तिला म्हातारी समजतोस? पण मला शंका आहे, की मिस फ्रेंच स्वतःला म्हातारी समजत होती का.

लिओनार्ड: पण तुम्ही तिला लहान पिल्लू तर समजू शकत नाही.

सर विल्फ्रिड: [बाक ओलांडून, उजवीकडे बसत] ठीक आहे. आपण पुढे जाऊ.तू मिस फ्रेंचला भेटायला बरेच वेळा जात होतास?

लिओनार्ड: हो. कदाचित आठवड्यातून एक दोन वेळा.

सर विल्फ्रिड: बायकोला बरोबर नेत होतास का?

लिओनार्ड: [थोडेसे वरमून] नाही नेत नव्हतो.

सर विल्फ्रिड: का नेत नव्हतास?

लिओनार्ड: अं अं मोकळेपणे सांगायचे तर, ते फारसे ठीक झाले नसते.

सर विल्फ्रिड: कोणाच्या दृष्टीने? तुमच्या बायकोच्या की मिस फ्रेंचच्या?

लिओनार्ड: ओहो! मिस फ्रेंचच्या दृष्टीने.

मेह्यू: बोल. बोल.

लिओनार्ड: असे बघा. तिला माझ्याबद्दल काही वाटत होते.

सर विल्फ्रिड: म्हणजे, ती तुझ्या प्रेमात पडली होती?

लिओनार्ड: अरे देवा, तशा प्रकारचे प्रेम नव्हे. ती माझे कौतुक करून मला बिघडवत होती.

सर विल्फ्रिड: [थोडा वेळ थांबून] असे बघ मिस्टर व्होल, पोलीस तुझ्यावर केस गुदरणार, हे नक्की. पण अजून तरी यासाठी काही विशिष्ट कारण दिसत नाही. पण तुमच्यात काहीच गोष्टी समान नसतांना, तुझ्यासारख्या तरूण, दिसायल्या चांगल्या माणसाने इतका वेळ एका वयाने मोठ्या बाईला द्यावा, हे कसे काय?

लिओनार्ड: हो मला माहिती आहे, ते असे म्हणतील की मी पैशासाठी तिच्यामागे होतो आणि कदाचित ते एक प्रकारे खरेही आहे.

सर विल्फ्रिड: [थोडे बेसावधपणे] ठीक आहे, मिस्टर व्होल, तू हे मोकळेपणे सांगितलेस. तू हे जरा स्पष्ट करशील का?

लिओनार्ड: [उठून शेकोटीकडे जात] ती पैशात लोळत असल्याचे तिने काही माझ्यापासून लपवून ठेवले नाही. मी तुम्हाला सांगितले तसे, रोमेन म्हणजे माझी बायको आणि मी दोघेही पैशाच्या अडचणीतून जात होतो. ती मला काही पैसे उसने देईल, अशी आशा मी करत होतो. मी हे प्रामाणिकपणे सांगतो आहे.

सर विल्फ्रिड: तू तिच्याकडे कर्ज मागितले होतेस का?

लिओनार्ड: नाही, मी ते कधीच मागितले नव्हते. म्हणजे तशी वेळ आली

नव्हती. [तो अचानक गंभीर होतो] अर्थात ते माझ्यासाठी वाईट दिसेल, हे मला कळत **होते.** [तो त्याच्या जागेवर बसतो]

सर विल्फ्रिड: मिस फ्रेंचला हे माहिती होते का, की तू विवाहित आहेस?

लिओनार्ड: हो माहिती होते.

सर विल्फ्रिड: पण तिने कधी तू बायकोला बरोबर आणावेस, असे सुचवले नाही?

लिओनार्ड: [थोडे लज्जित होऊन] नाही. तिला बहुधा असे वाटत होते, की आमचे पटत नाही.

सर विल्फ्रिड: तुम्ही मुद्दाम तिला असे वाटायला लावलेत का?

लिओनार्ड: नाही, तसे नाही. ती तसे धरूनच चालली. आणि मला असे वाटले, की मी रोमेनला यात ओढले, तर तिची माझ्यातली रुची कमी होईल. मला तिच्याकडून नक्कीच पैसा काढायचा नव्हता .पण मी गाडीसाठी उपयुक्त असे एक उपकरण शोधून काढले होते. त्याच्यासाठी पैसा पुरवण्यासाठी मी तिचे मन वळवू शकलो असतो. पण तिने ते केलेच पाहीजे, असा माझा आग्रह नव्हता.

सर विल्फ्रिड: तुला मिस फ्रेंचकडून किती पैसे मिळाले?

लिओनार्ड: काही नाही. शून्य.

सर विल्फ्रिड: मला घरच्या नोकराणीबद्दल सांग.

लिओनार्ड: जॅनेट मॅकेंझी? ती दुष्ट आणि छळवादी हुकुमशहा होती. मिस फ्रेंच तिच्यापुढे गरीब गाय होती. जेनेट तिला चांगले सांभाळत असे, पण जेव्हा ती आजूबाजूला असे, तेव्हा मालकिणीचे काही चालत नसे. जॅनेटला मी अजिबात आवडत नसे.

सर विल्फ्रिड: का आवडत नसे?

लिओनार्ड: माझा अंदाज आहे, ती माझा हेवा करत असावी. मिस फ्रेंचच्या कामात मी मदत केलेली तिला आवडत नसे.

सर विल्फ्रिड: म्हणजे तुम्ही तिला व्यावसायिक कामात मदत करत होतात?

लिओनार्ड: तिला तिच्या काही गुंतवणुकींबद्दल व काही विशिष्ट गोष्टींबद्दल काळजी वाटत असे. काही फॉर्म्स वगैरे भरायला तिला त्रास होत असे. हो, तशा प्रकारच्या गोष्टींमध्ये मी तिला मदत करत असे.

सर विल्फ्रिड: मिस्टर व्होल, मी आता तुम्हाला एक गंभीर प्रश्न विचारणार आहे आणि तो महत्वाचा असल्याने मला त्याचे खरेखुरे उत्तर हवे आहे. तिच्या गुंतवणुकींबद्दल काम करताना, तुम्ही त्यातील काही स्वतःच्या फायद्यासाठी वापरायचा विचार केलात का?

लिओनार्ड: [रागाने ते बोलणे झटकून टाकायच्या विचारात होता.]

सर विल्फ्रिड: मिस्टर व्होल, एक मिनिट थांबा. असे बघा, की यात दोन दृष्टीकोन आहेत. एक तर तुमचा प्रामाणिकपणा दिसेल किंवा तुम्ही त्या बाईला फसवत असाल, तर आम्ही समजू की तुम्ही खून केलेला

नव्हता. कारण तुम्हाला आधीच तिच्याकडून पैसे मिळवायचा चोरटा मार्ग सापडला होता. कुठलाही दृष्टीकोन घेतला, तरी तुमचा फायदाच होता. मला खरे उत्तर पाहिजे. मग त्याला वेळ लागला, तरी मला चालेल.

लिओनार्ड: मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो, मी अगदी सरळपणे वागलो. तुम्हाला त्यात काहीच लबाडी सापडणार नाही. शंभर टक्के सरळ!

सर विल्फ्रिड: मिस्टर व्होल, मी आभारी आहे. तुम्ही माझी सुटका केली. अशा महत्वाच्या बाबतीत तुम्ही योग्य तऱ्हेने वागल्याबद्दल तुमचे अभिनंदन.आणि आता आपण ऑक्टोबरच्या त्या रात्री मिस फ्रेंचने ---- [तो अडखळतो]

मेह्यू: चौदा

सर विल्फ्रिड: चौदा ऑक्टोबर. त्या रात्री मिस फ्रेंचने तुम्हाला बोलावले होते का?

लिओनार्ड: नाही. पण खरे तर मला एक नवीन वस्तू मिळाली. म्हणजे मी ती विकत घेतली. मला वाटले तिला ती आवडेल. म्हणून मी तिथे गेलो आणि पावणेआठपर्यंत तिथे बसलो. त्या दिवशी जॅनेट मॅकेंझीचा रात्री उशीरापर्यंत बाहेर जायचा वार होता. मला माहिती होते, की मिस फ्रेंच एकाकी असेल.

सर विल्फ्रिड: तो जॅनेट मॅकेंझीचा रात्री उशीरापर्यंत बाहेर जायचा वार होता

आणि हे तुम्हाला माहिती होते.

लिओनार्ड: [आनंदाने] हो. **जॅनेट** दर शुक्रवारी बाहेर जाते, हे मला माहिती होते.

सर विल्फ्रिड: हे तितकेसे चांगले नाही.

लिओनार्ड: का? मी त्या संध्याकाळी तिथे जाणे हे अगदी सहजपणे केलेली गोष्ट होती.

सर विल्फ्रिड: मिस्टर व्होल, कृपया पुढे सांगा.

लिओनार्ड: मी तिथे पावणेआठला पोचलो. तिचे जेवण झाले होते. मी तिच्याबरोबर एक कप कॉफी घेतली. मग आम्ही डबल डेमन नावाचा खेळ खेळलो. मग नऊ वाजता, मी तिला शुभ रात्र म्हणून घरी गेलो.

[**सर विल्फ्रिड** सर्वांच्या अंगावरून डावीकडे जातात]

मेह्यू: तुम्ही मला सांगितलेत, की त्या संध्याकाळी **जॅनेट** नेहमीपेक्षा लवकर घरी आली.

लिओनार्ड: हो पोलिसांनी मला सांगितले, की ती काही विसरल्यामुळे घरी आली व तिने मिस फ्रेंचला कुणातरी बरोबर बोलतांना ऐकले. पण तो कुणीही असला, तरी तो मी नव्हतो.

सर विल्फ्रिड: पण तुम्ही हे सिद्ध करू शकता का?

लिओनार्ड: हो, अर्थात मी हे सिद्ध करू शकतो. मी घरी माझ्या बायकोबरोबर होतो. तेच मला पोलीस विचारत राहीले, की मी साडेनऊ वाजता कुठे होतो. काही वेळेला असे होते की आपल्याला काही आठवत नसते. पण त्या रात्री मी सरळ घरी गेल्याचे मला आठवत होते. रोमेन आणि मी नंतर कुठे बाहेर गेलो नाही.

सर विल्फ्रिड: [मध्यातून चालत जात] तुम्ही सदनिकेत रहाता?

लिओनार्ड: युस्टन स्टेशनच्या मागे एका दुकानावरील दुसऱ्या मजल्यावर आमची सदनिका आहे.

सर विल्फ्रिड: [लिओनार्डच्या डावीकडे उभे रहात] त्या सदनिकेत परत येतांना कुणी तुम्हाला पाहीले का?

लिओनार्ड: मला नाही असे वाटत. मला कोण कशाला बघेल?

सर विल्फ्रिड: जर कुणी पाहिले असते, तर ते फायदेशीर ठरले असते.

लिओनार्ड: पण तुम्ही असा विचार करू नका. ती खरोखर साडेनऊला मारली गेली असेल; तर माझी बायको जे सांगेल की मी त्यावेळेस घरी होतो, एवढा पुरावा पुरेसा आहे, नाही का?

[सर विल्फ्रिड.आणि मेह्यू एकमेकांकडे बघतात सर विल्फ्रिड डावीकडे उभे रहातात.]

मेह्यू: आणि तुमची बायको सांगेल की तुम्ही त्यावेळी घरी होतात.

लिओनार्ड अर्थात, ती तसे सांगेल.

मेह्यूः [उठून शेकोटीकडे जात] तुमची बायको तुमची खूप आवडती आहे आणि तुम्ही तिचे आवडते आहात का?

लिओनार्ड: [चेहरा मवाळ होत] रोमेन माझ्याशी पूर्णपणे एकनिष्ठ आहे. एखाद्या माणसाची पत्नी जेवढी स्वामिनिष्ठ असू शकेल, तेवढी ती आहे.

मेह्यूः अस्स! म्हणजे तुमचे लग्न आनंदी आहे.

लिओनार्ड: कुठलेही लग्न याहून जास्त आनंदी असू शकत नाही. रोमेन नवलपूर्ण आहे. खूपच नवलपूर्ण!

[दारावर टकटक होते]

सर विल्फ्रिड: [मोठ्याने] आत या.

ग्रेटाः [आत येते, तिच्या हातात वृत्तपत्र आहे.] सर, हे वृत्तपत्र. [ती त्यातील एका परीच्छेदाकडे निर्देश करते]

सर विल्फ्रिड: ग्रेटा, आभारी आहे.

ग्रेटाः तुम्हाला एक कप चहा घ्याला आवडेल का?

सर विल्फ्रिड: नाही आभारी आहे. तुम्हाला चहा हवा आहे का, व्होल?

लिओनार्ड: नाही सर, आभारी आहे.

सर विल्फ्रिड: ग्रेटा, ठीक आहे. [सर्वांच्या अंगावरून बाकाच्या उजवीकडे

जातो]

[**ग्रेटा** बाहेर पडते]

मेह्यू: तुमच्या बायकोला एकदा भेटणे श्रेयस्कर ठरेल.

लिओनार्ड: म्हणजे एक परिषद घ्यायची.

[**सर विल्फ्रिड** बाकावर उजवीकडे बसतात]

मेह्यू: **मिस्टर लिओनार्ड,** तुम्ही हे सगळे गंभीरपणे घेत आहात, की नाही?

लिओनार्ड: [उदास होत] हो, घेतो आहे. पण मला ते एखाद्या दुःस्वप्नासारखे वाटते. मी खून केला आहे? हे पुस्तकात किंवा वृत्तपत्रात ठीक आहे. पण माझ्या बाबतीत? म्हणून मला हा विनोद वाटतो आहे. पण खरे तर हा विनोद नाही.

मेह्यू: नाही, मला भीती आहे, हा विनोद नाही.

लिओनार्ड: तर मग ठीक आहे, नाही का? कारण जर त्यांना असे वाटते आहे, की मिस फ्रेंचचा खून साडेनऊला झाला, तर तेव्हा मी रोमेनबरोबर घरी होतो.

मेह्यू: तुम्ही घरी कसे गेलात? बसने की जमिनीखालील रेल्वेगाडीने?

मेह्यू: मी चालत गेलो. मला घरी पोचायला पंचवीस मिनिटे लागली. ती

थोडासा वारा सुटलेली छान रात्र होती.

मेह्यू: तुमच्या ओळखीचे कुणी रस्त्यात भेटले का?

लिओनार्ड: नाही, पण त्याचे काय एवढे? म्हणजे रोमेन ---

सर विल्फ्रिड: दुसरा कुणीही देवू शकणार नाही, असा एकनिष्ठ पत्नीचा पुरावा तितकासा पटणारा नाही, मिस्टर व्होले.

लिओनार्ड: म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे, की रोमेन खोटे बोलेल.

सर विल्फ्रिड: मिस्टर व्होले, असे पूर्वी झालेले आहे.

लिओनार्ड: ओहो, या केसमध्ये मला खात्री आहे, की रोमेन खोटे बोलणार नाही, याची खात्री बाळगा.

सर विल्फ्रिड: मी तुमच्यावर विश्वास ठेवतो. तुम्हाला माझी खात्री पटवायची नाही, तर कोर्टाची खात्री पटवायची आहे. मिस फ्रेंचने तिच्या मृत्युपत्राद्वारे सगळे पैसे तुम्हाला दिल्याचे तुम्हाला माहिती होते की नव्हते?

लिओनार्ड: [पूर्णपणे आश्चर्यचकित होत] तिने तिचे सगळे पैसे मला दिले? तुम्ही विनोद करत आहात!

[त्याच्या जागेवर बसतो]

सर विल्फ्रिड: मी विनोद करत नाही. आज संध्याकाळच्या वर्तमानपत्रात हे

छापून आले आहे.

[तो बाकावरून वर्तमानपत्र त्याला देतो.]

मेह्यू: याबद्दल तुमची खात्री आहे, मिस्टर व्होले?

लिओनार्ड: नक्कीच खात्री आहे. एक प्रकारे, मी तिचे खूप आभार मानतो. पण तिने असे करायला नको होते. सर, हे जरा दुर्दैवी वाटते आहे, नाही का?

लिओनार्ड: एकदा ती जॅनेटला म्हणाली होती, की तुला भीती वाटते आहे का, की मी माझे मृत्युपत्र परत बदलेन? पण त्याचे माझ्याशी काही देणेघेणे नव्हते. हे त्यांच्यात्यांच्यात चालले होते.

[त्याचा चेहरा बदलतो] तुम्हाला खरेच असे वाटते का, की ते मला अटक करतील?

मला वाटते, अशी शक्यता असल्याने, तुम्ही त्याची तयारी ठेवली पाहीजे.

लिओनार्ड: [उठत] सर, तुम्ही माझ्यासाठी तुम्हाला करता येईल, तेवढे कराल ना?

[मित्रत्वाने] भरवसा ठेवा. माझ्या प्रिय मिस्टर व्होले, माझ्या हातात असेल, तेवढी सगळी मदत मी तुम्हाला करेन. काळजी करू नका.

सर विल्फ्रिड: माझ्या हातात सर्व काही सोपव. तुम्ही रोमेनची काळजी घ्याल ना? कारण ती भयानक स्थितीत सापडून, घाबरून जाईल.

सर विल्फ्रिड: काळजी करू नको, माझ्या मुला, धीर धर.

लिओनार्ड: [आपली जागा घेत, मेह्युला उद्देशून] आणि पैशाची बाजू, तीदेखील मला काळजी उत्पन्न करते आहे. माझ्याकडे फार नाहीत पण काही पौंड आहेत. कदाचित मी तुम्हाला माझ्यासाठी काही करायला सांगणे योग्य ठरणार नाही.

मेह्यू: मला वाटते, आम्ही पुरेसे संरक्षण पुरवू शकू. तुम्हाला माहिती आहे, कोर्टात त्याची व्यवस्था केली जाते.

लिओनार्ड: [उठून बाकाच्या आसपास चालत] माझा विश्वास बसत नाही. माझा विश्वास बसत नाही, की मी लिओनार्ड व्होल, कोर्टात उभे राहून म्हणतो आहे, की मी दोषी नाही. लोक माझ्याकडे बघत आहेत. [हे एखादे दुःस्वप्न असल्यासारखा थरथर कापतो आहे आणि तो **मेह्यू** कडे वळतो.] मला समजत नाही की तिचा खून चोराने केल्याचे, ते का म्हणत नाहीत. कारण खिडकी जोराने उघडून तिची तोडफोड केली होती आणि वस्तूंची फेकाफेक करून त्या इतस्तः पसरलेल्या होत्या, असे कागदपत्रांवरून दिसते आहे. [स्वतःच्या जागेवर बसतो] म्हणजे मला अशी शक्यता वाटते आहे.

मेह्यू: हे चोरीचे प्रकरण नाही, असे पोलिसांना वाटत असल्याचे दिसते आहे.

लिओनार्ड: ठीक आहे. मला वाटले ---

[**कार्टर** आत येतो]

सर विल्फ्रिड: कार्टर, काय?

कार्टर: [कार्टर बाक ओलांडत] सर, मला माफ करा. इथे दोन सद्गृहस्थांना मिस्टर व्होल यांना भेटायचे आहे.

सर विल्फ्रिड: पोलीस का?

कार्टर: हो, सर.

[**मेह्यू** उठतो]

सर विल्फ्रिड: [उठून दरवाज्याकडे जात] ठीक आहे. मी जाऊन त्यांच्याशी बोलतो. [**सर विल्फ्रिड** बाहेर पडतो आणि **कार्टर** त्याच्या मागोमाग जातो]

मेह्यू: अरे मुला, हो, ते आलेले दिसतात. आता स्वस्थ रहा. धीर सोडू नकोस. [लिओनार्डच्या खांद्यावर थोपटतो] आता काही बोलू नकोस, सर्व काही आमच्या हातात सोपव.

लिओनार्ड: [तो त्याची खुर्ची शेकोटीच्या डावीकडे करतो] पण मी इथे असल्याचे त्यांना कसे समजले?

मेह्यू: मला वाटते, त्यांनी तुझ्या मागावर माणूस ठेवला असावा.

लिओनार्ड: [अजूनही विश्वास बसत नसल्यासारखा] म्हणजे त्यांना खरेच

माझा संशय आहे.

[**सर विल्फ्रिड**, गुप्तहेर **इन्स्पेक्टर हर्न** आणि साध्या वेषात असलेला गुप्तहेर आत येतात.]

इन्स्पेक्टर दिसायला चांगला व उंच असलेला ऑफिसर आहे.]

इन्स्पेक्टर: [आत येत **सर विल्फ्रिडला** उद्देशून] मी तुम्हाला त्रास देतो आहे, पण माफ करा.

सर विल्फ्रिड: मला कधीच त्रास होत नाही. [डावीकडे उभे रहात] हे मिस्टर व्होल.

लिओनार्ड: [उभा रहातो. इन्स्पेक्टर त्याच्या अंगावरून जात] तुम्ही मिस्टर व्होल आहात का? मी गुप्तहेर इन्स्पेक्टर हर्न आहे. चौदा ऑक्टोबरला मिसेस फ्रेंचचा खून केल्याबद्दल तुम्हाला पकडण्याचे अटक वॉरंट माझ्याकडे आहे. मी तुम्हाला ताकीद देतो की याउपर तुम्ही काही बोललात, तर ते लिहून घेतले जाईल व तुमच्याविरुद्ध पुरावा म्हणून वापरले जाईल.

लिओनार्ड: ठीक आहे. [उदासीनतेने सर विल्फ्रिडकडे बघतो. मग त्याला प्लांडून डावीकडील स्वतःची टोपी घेतो] मी तयार आहे

मेह्यू: शुभ दुपार, इन्स्पेक्टर हर्न मी मिस्टर व्होलचा वकील आहे.

इन्स्पेक्टर: मिस्टर शुभ दुपार,**मिस्टर मेह्यू.** आज छान हवा आहे. परत भेटूच. सर विल्फ्रिड, मला आशा आहे, की मी तुमची काही गैरसोय केली नाही.

सर विल्फ्रिड: सर विल्फ्रिड: तसे काही नाही.

[**इन्स्पेक्टर** नम्रपणे हसून, दार लावत बाहेर पडतो.]

सर विल्फ्रिड: मला म्हणायला हवं, जॉन, त्या तरुणाची अडचण त्याला वाटते, त्यापेक्षा खूपच मोठी आहे.

मेह्यू: नक्कीच आहे. तुला तो कसा वाटला?

सर विल्फ्रिड: (**मेह्यू**च्या डावीकडे जातो) अत्यंत भोळसर. पण काही बाबतीत शिताफीने वागणारा. बुद्धिमान, असं म्हणायला हवं. पण आपली स्थिती किती धोकादायक आहे हे त्याला अजिबात कळलेलं नाही.

मेह्यू: तुला वाटतं ते त्यानेच केलंय?

सर विल्फ्रिड: मला काही कल्पना नाही. एकंदरीत पाहता, मला वाटतं त्याने नाही केलं. (धारदारपणे) तुला काय वाटतं?

मेह्यू: (खिशातून पाइप काढत) मी सहमत आहे.

(**सर विल्फ्रिड** शेकोटीच्या वरील भागावरून तंबाखूची बरणी उचलतो आणि **मेह्यू**ला देतो. **मेह्यू** टेबलाच्या वरच्या बाजूला जाऊन पाइप भरतो.)

सर विल्फ्रिड: बरं, आपल्याला दोघांनाही तो चांगलाच वाटला, हे खरं. पण का वाटला, हे समजत नाही. मी इतकी कमकुवत गोष्ट कधी ऐकली नव्हती. देव जाणे आपण याचं काय करणार!

मेह्यू: त्याच्या बाजूने एकच पुरावा आहे—त्याच्या बायकोचा—आणि कोण बायकोच्या बोलण्यावर विश्वास ठेवणार?

सर विल्फ्रिड: (कोरड्या विनोदाने) काही वेळा ठेवला गेलेला आहे. तीही परदेशी आहे. ज्यूरी बॉक्समधले बारा पैकी नऊ लोक समजतात की परदेशी माणूस खोटं बोलतोच. ती भावनावश होईल, अस्वस्थ होईल, आणि सरकारी वकिल तिला काय विचारतोय तेच समजणार नाही. तरीसुद्धा, आपल्याला तिची मुलाखत घ्यावी लागेल. तू बघ, माझ्या चेंबर्समध्ये ती भावनेने प्रक्षोभक होईल.

मेह्यू: कदाचित तुला हे काम नाकारावं असं वाटत असेल.

सर विल्फ्रिड: मी कधी म्हटलं की मी काम नाकारतो? कारण मी हे सांगतोय

की त्या मुलाकडे एकदम मूर्खपणाची गोष्ट सांगण्यासारखी आहे, म्हणून काय?

मेह्यू: (तंबाखूची बरणी **सर विल्फ्रिड**ला परत देत) पण खरी आहे.

सर विल्फ्रिड: (बरणी शेकोटीवरील जागी ठेवतो) खरीच असली पाहिजे. इतकी मूर्ख गोष्ट खोटी असूच शकत नाही. सगळी तथ्यं काळ्या-पांढऱ्या अक्षरात मांडली, तर ही गोष्ट पूर्णपणे दोषी ठरेल.

(**मेह्यू** खिशात काडेपेटी शोधतो.) पण तरीसुद्धा, जेव्हा त्या मुलाशी बोलतो,

आणि तो ही दोषारोप करणारी तथ्यं तशीच सांगतो, तेव्हा जाणवतं की ही गोष्ट अगदी त्याच्या म्हणण्याप्रमाणेच घडू शकते. झणझणीत, माझ्याकडेही एक "आण्टी बेट्सी" सारखी व्यक्ती होती. मी तिला खूप मानत होतो.

मेह्यू: त्याचा स्वभाव चांगला वाटतोय. सहानुभूती मिळवणारा.
(खिशातून काडेपेटी काढून **मेह्यू**ला देतो)

सर विल्फ्रिड: हो, ज्यूरीसमोर त्याचा प्रभाव चांगला पडेल. पण न्यायाधीशाला त्याचं काही पडलेलं नसतं. आणि तो असा साधा माणूस आहे की साक्षीच्या वेळी गडबडून जाईल.

(**मेह्यू** लक्षात घेतो की काडेपेटी रिकामी आहे आणि तो ती कचऱ्याच्याटोपलीत फेकून देतो.)

सर विल्फ्रिड: खूप काही त्या मुलीवर अवलंबून आहे.

(दारावर **ठकठक** होते.)
(तो हाक मारतो.)
ये आत.

सर विल्फ्रिड: हो, , काय झालं?

ग्रेटा : (हळू आवाजात) मिसेस लिओनार्ड व्होल इथे आहेत

मेह्यू: मिसेस व्होल.
सर विल्फ्रिड: इकडे ये. तू त्या तरुणाला पाहिलंस ना? त्याला खुनासाठी अटक करण्यात आली आहे.

ग्रेटा : (**सर विल्फ्रिड**च्या डावीकडे जाते) हो, मला माहीत आहे. किती रोमांचक आहे ना!
सर विल्फ्रिड: तुला वाटतं त्याने ते केलंय?

ग्रेटा : अरे नाही हो, मला खात्री आहे, त्याने नाही केलं.
सर विल्फ्रिड: का बरं?
ग्रेटा : तो खूपच चांगला वाटतो.
सर विल्फ्रिड: (**मेह्यू**कडे पाहत) म्हणजे आपण तिघेही एकाच मताचे आहोत. (**ग्रेट** कडे पाहत) मिसेस **व्होल**ला आत घे.
(निघून जाते.)
सर विल्फ्रिड: आणि कदाचित आपण तिघेही भोळसट मूर्ख आहोत—(तो डावीकडील खुर्चीकडे जातो.) एका मनमिळावू तरुणाच्या व्यक्तिमत्त्वाने फसवले गेलेले. (तो **रोमेन**साठी खुर्ची तयार करतो.)

(**कार्टर** आत येतो आणि बाजूला उभा राहतो. घोषणा करतो) **मिसेस व्होल.**

(**रोमेन** आत येते. ती परदेशी असून तीव्र व्यक्तिमत्त्व असलेली स्त्री आहे, पण खूप शांत आहे. तिच्या आवाजात एक उपरोधिक लहर असते.)

मेह्यू: (**रोमेनच्या** उजवीकडे जात) प्रिय **मिसेस व्होल**. (तो तिला

सहानुभूतीने सामोरा जातो, पण तिच्या व्यक्तिमत्त्वामुळे थोडासा अडखळतो.)

(**कार्टर** निघून जातो आणि दार बंद करतो.)
रोमेन: आह! तुम्ही मिस्टर मेह्यू आहात.

मेह्यू: हो. आणि हे **सर विल्फ्रिड रोबर्ट्स** आहेत. ते तुमच्या नवऱ्याचा खटला हाताळायला तयार झाले आहेत.
रोमेन: (मध्यभागी येत) कसे आहात, **सर विल्फ्रिड**?
सर विल्फ्रिड: छान आहे. तुम्ही कशा आहात?
रोमेन: मी नुकतीच तुमच्या ऑफिसमधून आले आहे, मिस्टर **मेह्यू.** तिथे त्यांनी सांगितलं की तुम्ही माझ्या नवऱ्यासोबत इथे आहात.
सर विल्फ्रिड: अगदी बरोबर.
रोमेन: मी येताना पाहिलं, मला वाटलं **लिओनार्ड** गाडीत बसतोय. त्याच्यासोबत दोन पुरुष होते.
सर विल्फ्रिड: माझ्या प्रिय मिसेस व्होल, तुम्ही स्वतःला अस्वस्थ करू नका.

(रोमेन अजिबात अस्वस्थ दिसत नाही. तो थोडा गोंधळल्यासारखा वाटतो.)
सर विल्फ्रिड: तुम्ही बसणार का, इथे?
रोमेन: धन्यवाद. (ती डावीकडील खुर्चीत बसते.)
सर विल्फ्रिड: (टेबलच्या वरून उजवीकडे जातो) सध्या तरी चिंतेचं काही कारण नाही, आणि तुम्ही खचून जाऊ नका. (तो टेबलाखाली जातो.)
रोमेन: (थोड्या थांबून) नाही, नाही, मी खचून जाणार नाही.
सर विल्फ्रिड: तर मग मी तुम्हाला सांगतो, कदाचित तुमच्या मनात शंका आलीही असेल, तुमच्या नवऱ्याला अटक झाली आहे.
रोमेन: मिस एमिली फ्रेंचच्या खुनासाठी?

सर विल्फ्रिड: मला भीती आहे की हो, तसंच आहे. पण कृपया अस्वस्थ

होऊ नका.

रोमेन: तुम्ही वारंवार हेच सांगत आहात, सर विल्फ्रिड, पण मी अजिबात अस्वस्थ नाही.

सर विल्फ्रिड: हो. हो, मी बघतो आहे—तुमच्यात खूप धैर्य आहे.

रोमेन: तुम्हाला तसंच म्हणायचं असेल, तर चालेल. या सगळ्या परिस्थितीला शांतपणे आणि समजूतदारपणाने तोंड देणं, हेच सगळ्यात महत्त्वाचं आहे.

सर विल्फ्रिड:: ते मला अगदी योग्य वाटतं. रोमेन, पण तुम्ही काहीही गोष्ट माझ्यापासून लपवू नका. त्याला वाचवायचा प्रयत्न करू नका. मला,सर विल्फ्रिडला, सर्व काही माहीत असायला हवं. (थोड्या वेगळ्या लकेरीत) मला सगळ्यात वाईट गोष्ट माहीत हवी आहे.

रोमेन: छान. अतिशय छान. गोष्टींना सामोरे जाण्याची हीच योग्य पद्धत आहे. (तो टेबलच्या उजवीकडे जातो.)

सर विल्फ्रिड: तर मग, प्रिय महिला, आपण आता घाबरणार नाही किंवा निराश होणार नाही. आपण परिस्थितीला समजून घेऊन, शांतपणे आणि थेटपणे या केसकडे पाहणार आहोत. (तो टेबलच्या उजवीकडे बसतो.) तुमच्या नवऱ्याची मिस फ्रेंचशी मैत्री सुमारे सहा आठवड्यांपूर्वी झाली. तुम्हाला त्या मैत्रीबद्दल माहीत होतं ना?

रोमेन: त्याने मला सांगितलं होतं की एका दिवशी गर्दीच्या रस्त्यात त्याने एका वृद्ध महिलेला आणि तिच्या सामान उचलायला मदत केली. तिने त्याला तिच्या घरी बोलावलं, असं त्याने सांगितलं.

सर विल्फ्रिड: हे सर्व मला अगदी नैसर्गिक वाटतं. आणि तुमच्या नवऱ्याने तिच्याकडे भेट द्यायला सुरुवात केली.

रोमेन: हो.

सर विल्फ्रिड: आणि दोघं चांगले मित्र झाले.

रोमेन: तसं दिसतय.

सर विल्फ्रिड: तुम्ही कधीही तुमच्या नवऱ्यासोबत तिच्या घरी गेलात का?

रोमेन: लिओनार्डला वाटलं की तसं न करणं चांगलं.

सर विल्फ्रिड: (तिच्याकडे पटकन पाहून) त्याला वाटलं की तसं न करणं चांगलं. हो. आपल्या दोघांमध्येच विचारतो — त्याला असं का वाटलं?

रोमेन: त्याला वाटलं की मिस फ्रेंचला तेच अधिक पसंत पडेल.

सर विल्फ्रिड: (थोडासा अस्वस्थ होत विषय बदलतो) हो, हो, नक्कीच. बरं, आपण ते पुढच्या वेळी पाहू. तुमच्या नवऱ्याने मग मिस फ्रेंचशी मैत्री केली, तिला छोटीशी मदत केली, ती एकटी वृद्ध महिला होती, वेळ भरपूर होता, आणि तिला तुमच्या नवऱ्याची साथसंगत आवडायला लागली.

रोमेन: लिओनार्ड फार मोहक असू शकतो.

सर विल्फ्रिड: हो, मला खात्री आहे. त्याला वाटलं असेल की एका वृद्ध महिलेला आनंदी करण्यासाठी त्याचा हा एक दयाळूपणा आहे.

रोमेन: कदाचित.

सर विल्फ्रिड: तुम्हाला, स्वतःला, नवऱ्याच्या या वृद्ध मैत्रीणीसोबतच्या मैत्री विषयी काही हरकत नव्हती?

रोमेन: मला वाटतं मी हरकत घेतली नव्हती.

सर विल्फ्रिड: अर्थातच, तुमचा तुमच्या नवऱ्यावर पूर्ण विश्वास आहे, मिसेस व्होल. तुम्ही त्याला इतकं चांगलं ओळखता...

रोमेन: हो, मी लिओनार्डला खूप चांगलं ओळखते.

सर विल्फ्रिड: तुमचं शांतपण आणि धैर्य पाहून मला खूप आदर वाटतो, मिसेस व्होल. आणि मला माहीत आहे की तुम्ही त्याच्यावर किती प्रेम

करता...

रोमेन: म्हणजे तुम्हाला माहीत आहे मी त्याच्यावर किती प्रेम करते?

सर विल्फ्रिड: अर्थातच.

रोमेन: पण माफ करा, मी परदेशी आहे. मला तुमचे इंग्रजी वाक्प्रचार सर्व वेळा माहीत नसतात. पण असं एक वाक्य नाही का—"of your own knowledge"—म्हणजे स्वतःच्या अनुभवावरून माहीत असणं? तुम्हाला असं स्वतःच्या अनुभवावरून ठाऊक आहे का, की मी लिओनार्डवर फार प्रेम करते, सर विल्फ्रिड? (ती हसते.)

सर विल्फ्रिड: (थोडा गडबडलेला.) नाही, नाही, हे तर खरंच आहे. पण तुमच्या नवऱ्याने मला सांगितलं.

रोमेन: लिओनार्डने तुम्हाला सांगितलं की मी त्याच्यावर किती प्रेम करते?

सर विल्फ्रिड: हो, त्याने तुमच्या प्रेमभावनेचा उल्लेख खूप हळव्या शब्दांत केला.

रोमेन: पुरुष, मला वाटतं, बऱ्याचदा खूप मूर्ख असतात.

सर विल्फ्रिड: क्षमा करा.

रोमेन: काही नाही. कृपया पुढे बोला.

सर विल्फ्रिड: (उठून टेबलाच्या वरून मध्यभागी जातो.) ही मिस फ्रेंच एक बरीच श्रीमंत महिला होती. तिचे जवळचे नातेवाईक नव्हते. खूपशा हट्टी आणि विचित्र वयस्कर महिलांसारखी तिलाही वारंवार मृत्युपत्र करायची सवय होती. तिने आयुष्यात अनेक वेळा मृत्युपत्र केलं होतं. तुमच्या नवऱ्याची भेट झाल्यानंतर काही दिवसांत तिने नवीन मृत्युपत्र केलं. काही लहानशा देणग्यांनंतर, तिने तिची सर्व संपत्ती तुमच्या नवऱ्याच्या नावावर केली.

रोमेन: हो.

सर विल्फ्रिड: तुम्हाला हे माहीत होतं?

रोमेन: मी ते आज संध्याकाळच्या वर्तमानपत्रात वाचलं.

सर विल्फ्रिड: हो, बरोबर. पण त्याआधी, तुम्हाला या गोष्टीची कल्पनाही नव्हती? तुमच्या नवऱ्यालाही याची कल्पना नव्हती?

रोमेन: (थोडे थांबून.) त्याने तुम्हाला तसंच सांगितलं का?

सर विल्फ्रिड: हो. तुम्ही वेगळं काही सूचित करत आहात का?

रोमेन: नाही. अरे, नाही. मी काहीही सूचित करत नाही.

सर विल्फ्रिड: (टेबलाच्या वरून उजवीकडे जातो आणि बसतो.) असं दिसतं की मिस फ्रेंचने तुमच्या नवऱ्याकडे एका मुलासारखं – किंवा फार आवडत्या भाच्यासारखं – पाहिलं.

रोमेन: (ठाम उपहासाने.) तुम्हाला वाटतं की मिस फ्रेंचने लिओनार्डकडे मुलासारखं पाहिलं?

सर विल्फ्रिड: (गोंधळलेला.) हो, मला तसं वाटतं. नक्कीच तसं वाटतं. त्या परिस्थितीत ते अगदी नैसर्गिक, सामान्य मानलं जाऊ शकतं.

रोमेन: किती ढोंगी लोक आहात तुम्ही या देशात.

(**मेह्यू** शेकोटीजवळ असलेल्या खुर्चीवर बसतो.)

(उघडपणे उपहासाने) आणि समजा, त्या वेळी तुम्ही मला विचारलंत— (ती एका पुरुषाच्या आवाज नक्कल करते.) "त्या रात्री लिओनार्ड व्होल कधी घरी आला?" आणि मी असं म्हणाले तर...

सर विल्फ्रिड: हो, मग?

रोमेन: मी खूप काही गोष्टी सांगू शकते.

सर विल्फ्रिड: मिसेस व्होल, तुम्ही तुमच्या नवऱ्यावर प्रेम करता का?

रोमेन: (आपला उपहासात्मक कटाक्ष मॅथ्युकडे वळवत) लिओनार्ड म्हणतो की मी करते.

मेह्यू: लिओनार्ड व्होलला तसं वाटतं.

रोमेन: पण लिओनार्ड फार बुद्धिमान नाही.

सर विल्फ्रिड: मिसेस व्होल, तुम्हाला माहित आहे ना, कायद्याने तुम्हाला तुमच्या नवऱ्याच्या विरोधात साक्ष द्यायला भाग पाडता येत नाही?

रोमेन: किती सोयीचं आहे ना ते!

सर विल्फ्रिड: आणि तुमचा नवरा...

रोमेन: (मधूनच अडवून) तो माझा नवरा नाही.

सर विल्फ्रिड: काय?

रोमेन: लिओनार्ड व्होल माझा नवरा नाही. बर्लिनमध्ये त्याने माझ्याशी केवळ लग्नाचा एक औपचारिक प्रकार पार पाडला. त्याने मला रशियन विभागातून बाहेर काढून या देशात आणलं. मी त्याला सांगितलं नाही, पण त्या वेळी माझा एक पती जिवंत होता.

सर विल्फ्रिड: त्याने तुम्हाला रशियन क्षेत्रातून बाहेर काढून सुरक्षितपणे इथे आणलं? तुम्ही त्याची फार ऋणी असायला हवे होते. (तिखटपणे) आहात का?

रोमेन: कधी कधी कृतज्ञतेचा कंटाळा येतो.

सर विल्फ्रिड: लिओनार्ड व्होलने कधी तुम्हाला कुठल्याही प्रकारे इजा केली आहे का?

रोमेन: (उपहासाने) लिओनार्ड? मला इजा करतो? तो तर माझ्या पायाखालची माती पूजतो.

सर विल्फ्रिड: आणि तुम्ही?

(पुन्हा एकदा त्यांच्यात नजरेचा संघर्ष होतो, मग ती हसते आणि तोंड दुसरीकडे वळवते.)

रोमेन: तुम्हाला खूप काही जाणून घ्यायचं आहे. (ती दरवाजाकडे जाते.)

मेह्यू: मला वाटतं आपण इथून पुढे...

सर विल्फ्रिड: तुम्ही संपूर्णपणे स्पष्ट करा. तुमची विधानं थोडीशी गोंधळात टाकणारी होती. चौदा ऑक्टोबरच्या संध्याकाळी नेमकं काय घडलं होतं?

रोमेन: (एकसुरी आवाजात) लिओनार्ड सव्वा नऊ वाजता घरी आला आणि पुन्हा बाहेर गेला नाही. मी त्याला एक पुरावा दिला आहे, नाही का?

सर विल्फ्रिड: (उठत) हो, दिला आहे. (तो तिच्याकडे जातो.) मिसेस व्होल... (तो तिच्या नजरेला भिडतो आणि थांबतो.)

रोमेन: हो?

सर विल्फ्रिड: तुम्ही एक विलक्षण स्त्री आहात, मिसेस व्होल.

रोमेन: आणि तुम्ही समाधानी आहात, अशी आशा आहे. (रोमेन बाहेर जाते.)

सर विल्फ्रिड: मी तर अजिबात समाधानी नाही.

मेह्यू: मीही नाही.

सर विल्फ्रिड: ती बाई काहीतरी करते आहे—पण नेमकं काय? मला हे अजिबात आवडत नाही, जॉन.

मेह्यू: निदान ती कुठेही हाय-हाय करत रडायला लागली नाही.

सर विल्फ्रिड: अगदी थंड—जसं काही काहीच झालं नाही.

मेह्यू: (डावीकडील खुर्चीत बसत) आपण तिला साक्षीपटलावर बसवलं तर काय होईल?

सर विल्फ्रिड: देव जाणे!

मेह्यू: जर मायर्सने खटला चालवला, तर तिचं मनोधैर्य फार काळ टिकणार नाही.

सर विल्फ्रिड: ॲटर्नी जनरल नसेल, तर कदाचित तोच असेल.

मेह्यू: मग तुमची रणनीती काय?

सर विल्फ्रिड: नेहमीची—जास्तीत जास्त हरकत घेऊन त्यात अडथळा आणायचा.

मेह्यू: मला सगळ्यात आश्चर्य वाटतं ते म्हणजे त्या तरुण व्होलला तिच्या निष्ठेवर इतका ठाम विश्वास आहे.

सर विल्फ्रिड: त्यावर विश्वास ठेवू नकोस. कोणतीही स्त्री एखाद्या पुरूषाला फसवू शकते—जर तिने ठरवलं आणि तो तिच्या प्रेमात असेल, तर!

मेह्यू: तो तिच्या प्रेमात आहे, यात शंका नाही. आणि तिच्यावर पूर्ण विश्वास ठेवतो.

सर विल्फ्रिड: मूर्खपणा आहे. स्त्रीवर कधीही पूर्ण विश्वास ठेवू नका.

पडदा पडतो

अंक दुसरा

दृष्य पहीले

[मध्यवर्ती गुन्हेगारी कोर्ट, ओल्ड बेली म्हणून सुपरिचित असलेले]

रोमेन: (उघडपणे उपहासाने) आणि समजा, त्या वेळी तुम्ही मला विचारलंत—

(ती एका पुरुषाच्या आवाजात नक्कल करते.) "त्या रात्री लिओनार्ड व्होल कधी घरी आला?"आणि मी असं म्हणाले तर...

सर विल्फ्रिड: हो, मग?

रोमेन: मी खूप काही गोष्टी सांगू शकते.

अंक दुसरा

दृष्य दुसरे

— जे "ओल्ड बेली" म्हणून अधिक प्रसिद्ध असलेले, सेंट्रल क्रिमिनल कोर्ट, लंडन
सहा आठवड्यांनी. सकाळची वेळ.

कोर्टरूमचा जो भाग दिसतो आहे, त्यामध्ये एक उंच व्यासपीठ आहे — म्हणजे न्यायाधीश, त्यांचे लिपिक आणि आल्डरमन यांच्यासाठी खुर्च्या व बाक असलेली जागा — जी उजव्या बाजूपासून मधोमध चाललेली आहे.

न्यायाधीशांच्या खुर्चीच्या मागे भिंतीवर शाही निशाण आणि "सॉर्ड ऑफ जस्टीस" (न्यायाची तलवार) लावलेली आहे. या व्यासपीठाच्या खाली कोर्ट लिपिक आणि कोर्ट लघुलेखकासाठी लहान बाके व खुर्च्या आहेत. बाकाच्या उजव्या बाजूला दारवानासाठी एक स्टूल आहे. साक्षीदाराचा पिंजरा व्यासपीठाच्या मागील मधल्या टोकाच्या खाली आहे. व्यासपीठाच्या मागे डावीकडे बॅरिस्टरसाठी ड्रेसिंग रूमकडे जाणारे दरवाजे आहेत. डाव्या मधल्या भागात काच लावलेले दुहेरी दरवाजे आहेत जे इमारतीतील इतर भागांकडे नेतात. दरवाज्यांमधील जागेत दोन बाक आहेत जे बॅरिस्टरांसाठी आहेत. त्यांच्या खाली तीन खुर्च्यांसह एक टेबल आणि एक स्टूल आहे.

आरोपींसाठी असलेला पिंजरा डावीकडे आहे आणि तिकडे प्रवेश एक भिंतीतील दरवाजा आणि वरच्या बाजूच्या कठड्यातील फाटक यांद्वारे होतो. त्या जागेत लिओनार्ड आणि त्याच्याबरोबर असलेल्या वॉर्डरसाठी खुर्च्या आहेत. ज्यूरी बॉक्स उजव्या हाताला खाली आहे, आणि प्रेक्षकांना फक्त शेवटच्या तीन खुर्च्यांचा मागचा भाग दिसतो.

पडदा वर जातो तेव्हा कोर्टाची प्रक्रिया सुरू झालेली आहे.

न्यायाधीश **मि. जस्टिस वेनराइट** आपल्या खुर्चीत बसले आहेत. त्यांच्या

उजवीकडे लिपिक आणि डावीकडे आल्डरमन बसले आहेत. कोर्ट लिपिक आणि स्टेनोग्राफर हे त्यांच्या जागी व्यासपीठाखाली बसले आहेत.

मायर्स, सर विल्फ्रिड क्यू.सी. (फौजदारी बाजूने वकील) उजव्या समोरील ओळीत बसले आहेत आणि त्यांच्या डावीकडे त्यांचे सहाय्यक आहेत.

सर विल्फ्रेड (बचाव पक्षातर्फे) डावीकडे समोरील ओळीत आहेत आणि त्यांच्या उजवीकडे सहाय्यक आहेत. चार बॅरिस्टर्स मागच्या ओळीत बसले आहेत, त्यातील एक स्त्री आहे. लिओनार्ड पिंजऱ्यात उभा आहे आणि त्याच्या शेजारी वॉर्डर आहे. **डॉ. वायट** टेबलाच्या उजव्या बाजूला स्टूलावर बसले आहेत. **इन्स्पेक्टर** टेबलाच्या उजव्या टोकावरच्या खुर्चीत बसले आहेत. **मेह्यू** टेबलाच्या डावीकडील खुर्चीत बसले आहेत. एक पोलीस अधिकारी काचेतून दिसणाऱ्या दुहेरी दरवाज्यांजवळ उभा आहे.**ज्यूरीचे** तीन सदस्य दिसतात:

1. एक स्त्री
2. एक पुरुष
3. पुरुष, फोरमन

दारवान स्त्री ज्यूरी सदस्याला शपथ देत उभी आहे.

स्त्री ज्यूरर: (बायबल आणि शपथपत्र कार्ड धरून)

"... आमच्या महाराणी आणि आरोपी यांच्यामधील खटल्यात मी प्रामाणिक व साक्षीनुसार न्याय्य निर्णय देईन."

(ती बायबल व शपथपत्र कार्ड दारवानाकडे परत देते आणि बसते.**दारवान** बायबल व कार्ड फोरमनकडे देतो.)

फोरमन: (उठून) "मी सर्वशक्तिमान देवाच्या नावाने शपथ घेतो की मी आमच्या महाराणी आणि आरोपी यांच्यामधील खटल्यात प्रामाणिक आणि सत्य निर्णय देईन."

(तो बायबल व कार्ड दारवानाकडे देतो आणि बसतो. दारवान कार्ड ज्यूरी बॉक्सच्या कडेवर ठेवतो आणि उजव्या बाजूच्या स्टूलावर बसतो.)

कोर्ट लिपिक: (उठून) "लिओनार्ड व्होल, तुमच्यावर आरोप आहे की चौदा ऑक्टोबर रोजी लंडनमध्ये एमिली जेन फ्रेंच यांची तुम्ही हत्या केलीत. तुम्ही दोषी आहात का?"

लिओनार्ड: "मी निर्दोष आहे."

कोर्ट लिपिक: "ज्यूरी सदस्यांनो, आरोपीवर एमिली जेन फ्रेंच यांच्या खुनाचा आरोप ठेवण्यात आलेला आहे. आरोपीने दोष नाकारलेला आहे. आता तुम्हाला साक्षी ऐकून ठरवायचं आहे की तो दोषी आहे की नाही."
(तो लिओनार्डकडे बसण्याची खूण करतो आणि स्वतःच्या जागी बसतो.)

(लिओनार्ड आणि वॉर्डर बसतात. मायर्स उभे राहतात.)

न्यायाधीश: "एक क्षण थांबा, मिस्टर मायर्स."

(मायर्स न्यायाधीशांकडे मान झुकवतात आणि पुन्हा बसतात.)

(न्यायाधीश ज्यूरींकडे वळतात.)

“ज्यूरी सदस्यांनो, साक्षीचे सार आणि कायद्याविषयीचे निर्देश मी तुम्हाला

शेवटी देईन..."

सर विल्फ्रिड: अहो बाई, मिसेस व्होल!

रोमेन: मी तुम्हाला धक्का दिला का? मला खरंच वाईट वाटतं.

सर विल्फ्रिड: हो, हो, समजलं. याबाबतीत तुमचा एका खंडातील (युरोपीय) दृष्टिकोन आहे. पण मी तुम्हाला खात्री देतो, मिसेस व्होल, ही योग्य पद्धत नाही. असं काहीही सूचित करणं की मिस फ्रेंचच्या—म्हणजे—लिओनार्ड व्होलबद्दलच्या भावना या एका आईसारख्या किंवा—चला, म्हणूया—मावशीसारख्या नसून काही वेगळ्या होत्या, हे अत्यंत अयोग्य ठरेल.

रोमेन: हो, तुम्हाला योग्य वाटत असेल, तर आपण आत्यासारख्या म्हणूया.

सर विल्फ्रिड: आपल्याला या सगळ्याचा ज्यूरीवर काय परिणाम होईल, याचा विचार करावा लागेल, मिसेस व्होल.

रोमेन: हो. मलाही त्याचा विचार करायचा आहे. मी खूप वेळ याचाच विचार करत होते.

सर विल्फ्रिड: अगदी बरोबर. आपल्याला एकत्र काम करावं लागेल. आता आपण चौदा ऑक्टोबरच्या संध्याकाळकडे येऊया. म्हणजे अगदी आठवडाभरापूर्वीची गोष्ट. तुम्हाला ती संध्याकाळ आठवते?

रोमेन: ती मला खूप चांगली आठवते.

सर विल्फ्रिड: त्या संध्याकाळी लिओनार्ड व्होल मिस फ्रेंचला भेटायला गेला

होता. नोकराणी, जेनेट मॅकेंझी, घरी नव्हती. मिस्टर व्होलने मिस फ्रेंचसोबत डबल डेमन नावाचा एक खेळ खेळला आणि साधारणतः नऊच्या सुमारास तिथून निघाला. तो चालत घरी परतला, असं त्याने मला सांगितलं, आणि

साधारणतः नऊ वाजून पंचवीस मिनिटांनी घरी पोहोचला. (तो प्रश्नार्थक नजरेने तिच्याकडे पाहतो.)

(रोमेन उठते आणि शेकोटीकडे जाते. **सर विल्फ्रिड** आणि **मेह्यू** दोघंही उठतात.)

रोमेन: (कोणत्याही भावाविना; विचारात.) नऊ वाजून पंचवीस मिनिटांनी.

सर विल्फ्रिड: नऊ वाजून तीस मिनिटांनी नोकराणी घरात परत आली, कारण तिचे काहीतरी विसरले होते. बसण्याच्या खोलीच्या दाराजवळून जाताना तिने मिस फ्रेंचचा आवाज ऐकला—ती एका पुरुषाशी बोलत होती. तिला वाटलं की तो पुरुष म्हणजे लिओनार्ड व्होल असावा, आणि इन्स्पेक्टर हेर्न म्हणतो की तिच्या ह्याच विधानामुळे तुमच्या नवऱ्याला अटक झाली आहे. पण मिस्टर व्होलने मला सांगितलं की त्याच वेळेचा त्याचा ठाम पुरावा आहे—कारण तो त्या वेळेस घरी तुमच्यासोबत होता, म्हणजे नऊ वाजून तीस मिनिटांनी.

(थोडा वेळ शांतता. **रोमेन** काही बोलत नाही, जरी **सर विल्फ्रिड** तिच्याकडे बघतो.)

सर विल्फ्रिड: बरोबर आहे ना? तो नऊ वाजून तीस मिनिटांनी तो तुमच्यासोबतच होता ना?

(**सर विल्फ्रिड** आणि **मेह्यू** तिच्याकडे पाहतात.)

रोमेन: लिओनार्ड असंच म्हणतो? की तो नऊ वाजून तीस मिनिटांनी माझ्यासोबत घरी होता?

सर विल्फ्रिड: (कडकपणे) ते खरं नाही का?

(खूप वेळ शांतता.)

रोमेन: (टेबलच्या डावीकडील खुर्चीकडे जाऊन; थोड्यावेळाने.) पण अर्थातच. (ती बसते.)

सर विल्फ्रिड: (हळूसा सुटकेचा निःश्वास सोडतो आणि टेबलाच्या उजवीकडे बसतो.) कदाचित पोलिसांनी तुम्हाला ह्या मुद्द्यावर आधीच विचारले असेल?

रोमेन: हो, काल संध्याकाळी ते मला भेटायला आले होते.

सर विल्फ्रिड: आणि तुम्ही काय सांगितलं...?

रोमेन: (जणू काही पाठ करून घेतलेलं उत्तर देत आहे अशा स्वरात) मी सांगितलं की लिओनार्ड त्या रात्री नऊ वाजून पंचवीस मिनिटांनी घरी आला आणि पुन्हा बाहेर गेला नाही.

मेह्यू: (थोडासा अस्वस्थ होत) तुम्ही सांगितलं...? ओह! (तो शेकोटीजवळील खुर्चीवर बसतो.)

रोमेन: ते बरोबर होतं ना?

सर विल्फ्रिड: तुम्ही ह्याचा अर्थ काय घेतलात, मिसेस व्होल?

रोमेन: (गोड आवाजात) मी म्हणते, तेच लिओनार्डला हवं आहे ना?

सर विल्फ्रिड: ती तर खरी गोष्ट आहे. तुम्ही आत्ताच सांगितलंत.

रोमेन: मला समजून घ्यावं लागेल—मी खात्री करून घ्यायला हवी. जर मी हो

म्हणाले, की हो, लिओनार्ड नऊ वाजून तीस मिनिटांनी माझ्यासोबत फ्लॅटमध्येच होता—तर ते त्याला निर्दोष ठरवतील का?

(**सर विल्फ्रिड** आणि **मेह्यू** तिच्या वागणुकीमुळे गोंधळलेले दिसतात.)

रोमेन: ते त्याला सोडतील का?

मेह्यू : (उठतो आणि तिच्या डावीकडे जातो) जर तुम्ही दोघंही खरं बोलत असाल, तर मग—म्हणजे—त्याला निर्दोष ठरवलं जाईल.

रोमेन: पण जेव्हा मी—ते—पोलिसांना सांगितलं, तेव्हा मला वाटतं त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला नाही. (ती अस्वस्थ नाही; उलट ती थोडी समाधानी वाटते.)

सर विल्फ्रिड: तुम्हाला असं का वाटतं की त्यांनी विश्वास ठेवला नाही…?

रोमेन: (अचानक कटुतेने.) कदाचित मी ते फारसं विश्वासार्हपणे सांगितलं नसेल?

(**सर विल्फ्रिड** आणि **मेह्यू** एकमेकांकडे पाहतात. **मेह्यू** परत आपल्या

जागेवर बसतो. **रोमेन**चा थंड, धीट कटाक्ष **सर विल्फ्रिड**च्या नजरेला भिडतो. दोघांमध्ये स्पष्ट वैरभाव जाणवतो.)

सर विल्फ्रिड: (स्वभावात बदल करून) मिसेस व्होल, मला खरं सांगायचं तर तुमचा ह्या सगळ्यातला दृष्टिकोन मला समजत नाही.

रोमेन: तुम्हाला समजत नाही? बरं, कदाचित ते अवघड असेल.

सर विल्फ्रिड: कदाचित तुमच्या नवऱ्याची परिस्थिती तुम्हाला पूर्णपणे

समजलेली नाही?

रोमेन: मी आधीच सांगितलं आहे, की मला हे पूर्णपणे समजून घ्यायचं आहे की माझ्या—नवऱ्यावरचा आरोप किती गंभीर आहे. मी पोलिसांना सांगते, लिओनार्ड नऊ वाजून तीस मिनिटांनी माझ्यासोबत घरी होता—आणि ते माझ्यावर विश्वास ठेवत नाहीत. पण कदाचित कुणीतरी त्याला ---

(ती **सर विल्फ्रिड** आणि **मेह्यू** दोघांकडेही एक तीव्र आणि थोडीशी चलाख नजर टाकते.)

(**सर विल्फ्रिड** चौकस नजरेने **मेह्यू**कडे पाहतो.)

मेह्यू: (उठून मधोमध येतो; अनिच्छेने) तुमच्या नवऱ्याला असं काही आठवत नाही, किंवा त्याच्याजवळ असा काही उपयुक्त पुरावा नाही.

रोमेन: मला शपथ घ्यावी लागेल ना—सत्य सांगण्याची, पूर्ण सत्य, आणि केवळ सत्य? (ती यावर थोडी हसलेली वाटते.)

सर विल्फ्रिड : हो, तीच शपथ असते.

रोमेन: (टेबलच्या डावीकडील खुर्चीवर येऊन उभी राहते; आता सरळसरळ चिडवल्यासारखे करत,)जेव्हा तुम्ही मला विचारले [पुरुषाच्या आवाजात]

"त्या रात्री लिओनार्ड व्होल कधी घरी आला?" तर मी म्हणेन,

सर विल्फ्रिड : काय?

रोमेन: मी खूप प्रकारे उत्तर देऊ शकते.

सर विल्फ्रिड : मिसेस व्होल, तुमचे तुमच्या नवऱ्यावर प्रेम आहे का?

[तिचा चिडवल्यासारखा कटाक्ष मेह्यूकडे टाकत] लिओनार्ड तसे म्हणतो.

मेह्यू: लिओनार्डचा तसा विश्वास आहे.

रोमेन: पण लिओनार्ड फारसा हुशार नाही.

सर विल्फ्रिड : मिसेस व्होल, तुम्हाला ठाऊक आहे का, की कायद्यानुसार तुमच्या नवऱ्याला नुकसानकारक अशी साक्ष तुम्ही देऊ शकत नाही.

रोमेन: किती सोयीस्कर आहे.

सर विल्फ्रिड : आणि तुमचा नवरा ---

रोमेन:[मध्येच] तो माझा नवरा नाही.

सर विल्फ्रिड : काय?

रोमेन: लिओनार्ड व्होल माझा नवरा नाही. त्याने बर्लिनमध्ये माझ्याबरोबर लग्नाचा एक विधी पार पाडला आणि रशियन त्रासातून मला इथे आणले.पण माझा आधीचा नवरा जिवंत असल्याचे मी त्याला सांगितले नाही.

सर विल्फ्रिड : त्याने तुम्हाला रशियन त्रासातून इथे आणले नाही का? त्याबद्दल तुम्ही त्याचे ऋण मानले पाहिजेत.

रोमेन: एखादे वेळी ऋणाचे ओझे वाटू लागते.

सर विल्फ्रिड : लिओनार्ड व्होलेने तुम्हाला कधी काही दुखापत केली आहे का?

रोमेन: [**रागाने]** लिओनार्ड? आणि दुखापत? तो तर माझ्या पायाखालची जमीन पुजतो.

सर विल्फ्रिड : आणि तुम्ही?

[पुन्हा त्यांची नजरानजर होते. ती हसून निघून जाते.]

रोमेन:तुम्ही फारच चौकशा चालवल्या आहेत.[ती दार ओलांडते]

मेह्यू: मला वाटते, यात पुरेशी स्पष्टता नाही. तुमची विधाने काहीशी संदिग्ध आहेत. चौदा ऑक्टोबरच्या संध्याकाळी नक्की काय झाले?

रोमेन: लिओनार्ड नऊ वाजून पंचवीस मिनिटांनी आला आणि मग कुठेही बाहेर गेला नाही. मी हा पुरावा दिलेला आहे, नाही का?

सर विल्फ्रिड : [उठत] हो, दिला आहे.[तिला ओलांडून पुढे जातो. मिसेस व्होल --- [तिच्या डोळ्याला डोळा भिडवून थांबतो.]

रोमेन: बोला.

सर विल्फ्रिड : मिसेस व्होले, तुम्ही अगदी उल्लेखनीय बाई आहात.

रोमेन: मला अशी आशा आहे, की तुमचे समाधान झाले असेल. [ती निघून

जाते]

सर विल्फ्रिड : माझे मुळीच समाधान झालेले नाही.

मेह्यू: माझेही नाही.

सर विल्फ्रिड : ती काही छक्के पंजे खेळते आहे. पण काय? जॉन, मला हे आवडत नाही आहे.

मेह्यू: तिचा प्रतिसाद सातत्याने अती टोकाचा आहे.

सर विल्फ्रिड : ती फारच थंड आहे.

[बाकाच्या डावीकडी **मेह्यू**:ल खुर्चीवर बसत] साक्षीदाराच्या पिंजऱ्यात तिचे काय होणार आहे, कुणास ठाऊक!

सर विल्फ्रिड : देव जाणे.

मेह्यू:सरकारी वकील मायर्स असेल, तर तिला क्षणार्धात नामोहरम करेल.मग तुमची चाल काय असेल?

सर विल्फ्रिड : नेहमीचीच. जमतील तेवढ्या हरकती आणून त्याच्या बोलण्यात बाधा आणायची.

मेह्यू:मला कसली मजा वाटते तर तो तरूण व्होल तिच्यावर पूर्ण विश्वास टाकतो आहे.

सर विल्फ्रिड : तो फारच मूर्ख आहे. स्त्रीवर कधीही विश्वास टाकू नये.

पडदा

अंक दोन

दृष्य दोन

लंडन येथील *सेंट्रल क्रिमिनल कोर्ट* — ज्याला ओल्ड बेली या नावाने अधिक ओळखले जाते.

सहा आठवड्यांनंतर. सकाळचा वेळ.

न्यायालयातील जे दृश्य दिसते, त्यात उजवीकडून वर मध्यापर्यंत पसरलेला एक उंच असा मंच आहे — बाक — ज्यावर न्यायाधीश, त्यांचे कारकून आणि आल्डरमन यांच्यासाठी आरामखुर्च्या व टेबल ठेवलेले आहे. न्यायालयाच्या मजल्यावरून या बेंचकडे जाण्यासाठी उजव्या वरच्या बाजूला (वर उजवीकडे) एक दार आहे. न्यायाधीशांच्या खुर्चीच्या मागील भिंतीवर *राजचिन्ह* आणि 'न्यायाची तलवार' लटकवलेली आहे.

बेंचच्या खाली न्यायालयाचे कारकून आणि स्टेनोग्राफर (टंकलेखक) यांच्यासाठी छोटे टेबल आणि खुर्च्या आहेत. टेबलांच्या उजवीकडे *उशर* (न्यायालयातील परिचर) साठी एक छोटी खुर्ची आहे.

साक्षीदाराचा पिंजरा (witness box) बेंचच्या वरच्या मध्य भागाखाली आहे.वरच्या मध्यभागी एक दार आहे, जे *बॅरिस्टरांच्या वस्त्रगृहाकडे* जाते. डाव्या वरच्या मध्यभागी काचेच्या पॅनेल असलेली दुहेरी दारे आहेत, जी

कॉरिडॉर आणि इमारतीच्या इतर भागांकडे नेतात. या दोन दरवाजांमधील जागेत बॅरिस्टरांसाठी.दोन बाके आहेत —त्यांच्या खाली एक टेबल असून तीन खुर्च्या आणि एक स्टूल आहे.

डॉक (आरोपी बसण्याची जागा) डावीकडे आहे, ज्यात प्रवेश डाव्या भिंतीतील एका दरवाजातून आणि मागच्या रेलिंगमधील एका दरवाज्यातून होतो. डॉकमध्ये *लेनर्ड* आणि *वार्डर* यांच्यासाठी खुर्च्या आहेत.ज्युरी बॉक्स उजव्या बाजूला आहे (खाली उजवीकडे) — त्यातील तीन मागच्या सीट्सचा फक्त मागचा भागच प्रेक्षकांना दिसतो.

पडदा उघडतो तेव्हा न्यायालयाचे कामकाज सुरू झालेले असते.*न्यायमूर्ती

श्री. जस्टिस वेनराइट* आपल्या आसनावर बसलेले असतात. त्यांच्या उजवीकडे *क्लर्क ऑफ द कोर्ट* आणि डावीकडे *अल्डरमन* बसलेला असतो. ‘क्लर्क ऑफ द कोर्ट’ आणि ‘स्टेनोग्राफर’ आपल्या जागी असतात.श्री. मायर्स, **सर विल्फ्रिड** क्यू.सी., (अभियोजन पक्षाचे वकील) हे बॅरिस्टरांच्या पहिल्या रांगेत उजवीकडे बसलेले आहेत; त्यांच्या डावीकडे त्यांचे *सहाय्यक* आहेत.

सर विल्फ्रिड (बचाव पक्षाचे वकील) हे पहिल्या रांगेत डावीकडे बसलेले आहेत; त्यांच्या उजवीकडे त्यांचे *सहाय्यक* आहेत.मागील रांगेत चार बॅरिस्टर बसलेले आहेत — त्यापैकी एक महिला आहे.

लिओनार्ड डॉकमध्ये उभा आहे, त्याच्या शेजारी *वार्डर* आहे.डॉ. वायट टेबलच्या उजव्या बाजूच्या स्टूलवर बसलेले आहेत. इन्स्पेक्टर टेबलच्या

उजव्या टोकावरील खुर्चीवर बसलेला आहे. मेह्यू टेबलच्या डाव्या बाजूला बसलेला आहे. दुहेरी दरवाजांजवळ एक पोलीस उभा आहे.

ज्युरीचे तीन सदस्य दिसतात — पहिला एक पुरुष, फोरमन, दुसरी एक महिला, आणि तिसरा एक पुरुष.

दारवान त्या महिला ज्युरी सदस्याला शपथ देत आहे, जी उभी आहे.

महिला ज्युरी सदस्य: (बायबल आणि शपथपत्र हातात धरून)

"... आपल्या महाराणी आणि न्यायालयातील आरोपी यांच्याविषयी, मला सोपवलेल्या जबाबदारीनुसार मी सत्य निर्णय देईन, पुराव्याच्या आधारे."

(ती बायबल आणि शपथपत्र दारवानाकडे परत देते आणि बसते.)

(दारवान बायबल आणि शपथपत्र फोरमनकडे देतो.)

फोरमन: (उभा राहून)

"मी सर्वशक्तिमान देवाच्या नावाने शपथ घेतो की, मी आपल्या महाराणी आणि न्यायालयातील आरोपी यांच्या प्रकरणाचा प्रामाणिकपणे विचार करून पुराव्याच्या आधारे सत्य निर्णय देईन."

(तो बायबल आणि शपथपत्र दारवानाकडे परत देतो आणि बसतो.)

(दारवान बायबल आणि शपथपत्र ज्युरी बॉक्सच्या कडेला ठेवतो आणि उजवीकडील स्टूलवर बसतो.)

कारकून : (उभा राहून)

" लिओनार्ड व्होल, तुमच्यावर या आरोपपत्रानुसार लंडन शहरात चौदाव्या ऑक्टोबर रोजी एमिली जेन फ्रेंच हिची हत्या केल्याचा आरोप आहे.

काय म्हणता तुम्ही, लिओनार्ड व्होल — तुम्ही दोषी आहात की निर्दोष?"

लिओनार्ड: मी निर्दोष आहे.

सर विल्फ्रिड: (**कार्टर**कडून बो व टाय घेत) हो, खासकरून मायर्सला. (तो उजव्या आरशाकडे जातो.) तो खूप त्रासदायक माणूस आहे. (तो बो व टाय घालतो.) तो नेहमी माझ्यातलं वाईट बाहेर काढतो.

मेह्यू: ते परस्पर होतं बहुतेक. तुम्ही त्याला वाक्य पूर्ण करू देत नाहीत, म्हणून तो वैतागतो.

(**कार्टर** विग, गाउन, कोट आणि बो घेऊन बाहेर जातो.)

सर विल्फ्रिड: मला त्याची एक सवय खूप त्रासदायक वाटते. (तो उजवीकडे टेबलाशेजारी उभा राहतो.)—(घसा साफ करतो आणि काल्पनिक विगची सेटिंग करतो)— हे मला वेड लावतं. आणि तो मला म्हणतो "रो-बार्ट्स... रो-बार्ट्स". पण जेव्हा त्याला सगळे काही माहित असते, तेव्हा त्याने थेट प्रश्न न विचारण्याचे लक्षात ठेवले, तर तो हुशार वकील आहे...

मेह्यू: [बाकावर हालचाल करत] हो मी व्होलेला इथे आणले कारण त्याने मला जशी त्याची गोष्ट सांगितली, तशीच त्याने तुम्हाला सांगावी, म्हणून. [तो त्याच्या (**ग्रेटा** लिओनार्डची टोपी घेऊन दोन्ही टोप्या दरवाजाजवळ

असलेल्या खिळ्यांवर लटकवते. मग ती लिओनार्डकडे एक नजर टाकत बाहेर जाते.)

कार्टर: शुभ दुपार, मिस्टर मेह्यू. सर विल्फ्रिड लवकरच येतील, पण मिस्टर जस्टीस बॅटरबरोबर असल्यामुळे नेहमीसारखं काही सांगता आले नाही. मी

लगेच कपडे बदलायच्या खोलीमध्ये जाऊन सांगतो की तुम्ही आला आहात—

(थोडासा थांबतो.) ...यांच्यासोबत.
(तो टेबलाच्या खाली लिओनार्डच्या उजवीकडे जातो.)

मेह्यू: हे आहेत लिओनार्ड व्होले.

लिओनार्ड: नमस्कार, सर.

(**मेह्यू** शेकोटीजवळ जातो.)

सर विल्फ्रिड: नमस्कार, मिस्टर व्होले. बसा.

(**लिओनार्ड** टेबलाच्या डावीकडे बसतो.)

कसं आहे, जॉन, घरचं? (तो **कार्टर**कडे वळतो.)

(**कार्टर** त्यांना कोट बदलण्यास आणि काढण्यास मदत करतो.)

मेह्यू: मॉलीला थोडं फ्लू झालाय—२४ तासापासून..

सर विल्फ्रिड: वाईटच!

ग्रेटा: (प्रवेश करत) मिस्टर मेह्यू आले आहेत.

(**ग्रेटा** लिओनार्डची टोपी घेऊन दोन्ही टोपी दरवाजाजवळ असलेल्या खिळ्यांवर लटकवते. मग ती लिओनार्डकडे एक नजर टाकत बाहेर जाते.)

कार्टर: शुभ दुपार, मिस्टर मेह्यू. सर विल्फ्रिड लवकरच येतील, पण मिस्टर जस्टीस बॅटरबरोबर असल्यामुळे नेहमीसारखं काही सांगता येत नाही. मी लगेच रोबिंग रूममध्ये जाऊन सांगतो की तुम्ही आला आहात—
(थोडासा थांबतो.)

(तो टेबलाच्या खाली लिओनार्डच्या उजवीकडे जातो)

मेह्यू: मिस्टर लिओनार्ड व्होल यांच्यासोबत. धन्यवाद, कार्टर. आमची अपॉइंटमेंट अचानक ठरली.

खरी, पण या प्रकरणात वेळ—थोडा तातडीचा आहे.

मेह्यू: बसा, मिस्टर व्होले.

लिओनार्ड: नाही, मी उभा राहीलेलाच बरा. अशा गोष्टींमध्ये माणूस थोडा बेचैन होतो. (तो डावीकडे फिरतो.)

मेह्यू: हो, हो, अगदी शक्य आहे.

(**ग्रेटा** बाहेर जाते.)

लिओनार्ड: (ग्रेटाला) माफ करा. (तो हसतो.)

(**ग्रेटा** त्याच्याकडे बघून हसते आणि बाहेर जाते. थोडा वेळ शांतता.)

(तो वर उजवीकडे फिरतो. थोड्या गोंधळलेल्या पण आवडत्या स्वरात.) म्हणजे,

मला विश्वासच बसत नाही की हे सगळं माझ्यासोबत घडतंय. सारखं वाटतं—हे

सगळं स्वप्न आहे, आणि मी लगेचच जागा होईन.

मेह्यू: हो, हो, तसं वाटणं अगदी स्वाभाविक आहे.

लिओनार्ड: (टेबलाच्या उजवीकडे येतो.) मला म्हणायचंय—हे सगळं अगदी मूर्खपणाचं वाटतंय.

मेह्यू: (कडकपणे) मूर्खपणाचं, मिस्टर व्होले?

लिओनार्ड: हो. म्हणजे, मी नेहमी लोकांशी मिळून-मिसळून राहणारा आहे—सगळ्यांशी जमवून घेतो. म्हणजे मी काही हिंसक माणूस नाही. (तो थांबतो.) पण मला वाटतं सगळं ठीक होईल—होईल ना? म्हणजे, या देशात अशा गुन्ह्याला शिक्षा मिळत नाही ना जो माणसाने केलाच नाहीये?

मेह्यू: माझ्या मते इंग्लिश न्यायव्यवस्था ही जगातली सर्वोत्तम आहे.

लिओनार्ड: (खूपसं समाधान न झाल्यागत) पण त्याच दिवशी मी एक प्रकरण

वाचलं—एक अडॉल्फ बेक नावाचा. तुरुंगात वर्षानुवर्षं घालवल्यावर कळलं की खरा गुन्हेगार दुसराच—स्मिथ नावाचा. मग त्याला "माफी" दिली. मला हेच विचित्र वाटतं—जे काही केलंच नाही त्याबद्दल "माफी" दिली.

मेह्यू: तो एक कायदेशीर शब्द आहे—आवश्यक असतो.

लिओनार्ड: (शेकोटीजवळची खुर्ची घेऊन मधोमध ठेवतो) पण मला तरी तो योग्य वाटत नाही.

मेह्यू: महत्त्वाचं म्हणजे बेकला मोकळं केलं गेलं.

लिओनार्ड: हो, त्याच्यासाठी ते योग्य झालं. पण जर तो खूनाचा खटला असता तर—(तो मध्यभागी उलट्या खुर्चीवर बसतो)—तर फार उशीर झाला असता. त्याला फाशी झाली असती.

मेह्यू: (कोरड्या पण सौम्य आवाजात) आता, मिस्टर व्होले, इतकं—म्हणजे—भयभीत होण्याची गरज नाही.

लिओनार्ड: (थोडा उदासपणे) माफ करा, सर. पण खरं सांगायचं तर मी खरंच घाबरलोय.

मेह्यू: बरं, शांत राहा. सर विल्फ्रिड रॉबर्ट्स लगेचच येतील. आणि मला हवयं की तुम्ही त्यांना तुमची गोष्ट अगदी जशी मला सांगितली तशीच सांगा.

लिओनार्ड: हो, सर.

मेह्यू: पण तोपर्यंत आपण काही तपशील भरून काढूया—तुमची पार्श्वभूमी. सध्या तुम्ही बेरोजगार आहात ना?

लिओनार्ड: (सहजपणे आणि सुस्वभावीपणे) हो, पण थोडे पैसे साठवून ठेवले आहेत. फार नाही, पण जर तुम्हाला वाटलं की...

मेह्यू: हे आहेत लिओनार्ड व्होले.

लिओनार्ड: नमस्कार, सर.

मेह्यू:. धन्यवाद, कार्टर. आमची भेटीची वेळ अचानक ठरली. खरं तर, पण या प्रकरणात वेळ—थोडा तातडीचा आहे. मिस्टर **लिओनार्ड,** आपण बसा.

लिओनार्ड: नाही, मी उभा राहिलेलाच बरं. अशा गोष्टींमध्ये माणूस थोडा बेचैन होतो. (तो डावीकडे फिरतो.)

मेह्यू: हो, हो, अगदी शक्य आहे.

ग्रेटा: (प्रवेश करते. ती **मेह्यू**शी बोलते, पण लिओनार्डकडे उत्सुकतेने पाहत असते

(**ग्रेटा** बाहेर जाते.)

लिओनार्ड: (ग्रेटाला) माफ करा. (तो हसतो.)

(**ग्रेटा** त्याच्याकडे बघून, हसते आणि बाहेर जाते. थोडा वेळ शांतता.)

(तो वर उजवीकडे फिरतो. थोड्या गोंधळलेल्या पण आवडत्या स्वरात.)
म्हणजे,

माझा विश्वासच बसत नाही की हे सगळं माझ्यासोबत घडतंय. सारखं वाटतं—हे सगळं स्वप्न आहे, आणि मी लगेचच जागा होईन.

मेह्यू: हो, हो, तसं वाटणं अगदी स्वाभाविक आहे.

लिओनार्ड: (टेबलाच्या उजवीकडे येतो.) मला म्हणायचंय—हे सगळं अगदी मूर्खपणाचं वाटतंय.

मेह्यू: (कडकपणे) मूर्खपणाचं, मिस्टर व्होले?

लिओनार्ड: हो. म्हणजे, मी नेहमी लोकांशी मिळून-मिसळून राहणारा आहे—सगळ्यांशी जमवून घेतो. म्हणजे मी काही हिंसक माणूस नाही. (तो थांबतो.) पण मला वाटतं सगळं ठीक होईल—होईल ना? म्हणजे, या देशात अशा गुन्ह्याबद्दल शिक्षा मिळत नाही ना जो माणसाने केलाच नाहीये?

मेह्यू: माझ्या मते इंग्लिश न्यायव्यवस्था ही जगातली सर्वोत्तम आहे.

लिओनार्ड: (खूपसं समाधान न झाल्यागत) पण त्याच दिवशी मी एक प्रकरण वाचलं—एक अडॉल्फ बेक नावाचा. तुरुंगात वर्षानुवर्षं घालवल्यावर कळलं की खरा गुन्हेगार दुसराच—स्मिथ नावाचा. मग त्याला "माफी" दिली गेली. मला हेच विचित्र वाटतं—जे काही केलंच नाही त्याबद्दल "क्षमा" केली गेली.

मेह्यू: तो एक कायदेशीर शब्द आहे—आवश्यक असतो.

लिओनार्ड: (शेकोटीजवळची खुर्ची घेऊन मधोमध ठेवतो) पण मला तरी ते योग्य वाटत नाही.

मेह्यू: महत्त्वाचं म्हणजे बेकला मोकळं केलं गेलं.

लिओनार्ड: हो, त्याच्यासाठी ते योग्य झालं. पण जर तो खूनाचा खटला

असता तर—(तो मध्यभागी खुर्चीवर दोन्हीकडे पाय टाकून बसतो.)—तर फार उशीर झाला असता. त्याला फाशी झाली असती.

मेह्यू: (कोरड्या पण सौम्य आवाजात) आता, मिस्टर व्होले, इतकं—म्हणजे—भयभीत होण्याची गरज नाही.

लिओनार्ड: (थोडा उदासपणे) माफ करा, सर. पण खरं सांगायचं तर मी खरंच घाबरलोय.

मेह्यू: बरं, शांत राहा. सर विल्फ्रिड रॉबर्ट्स लगेचच येतील. आणि मला हवयं की तुम्ही त्यांना तुमची गोष्ट अगदी जशी मला सांगितली तशीच सांगा.

लिओनार्ड: हो, सर.

मेह्यू: पण तोपर्यंत आपण काही तपशील भरून काढूया—तुमची पार्श्वभूमी. सध्या तुम्ही बेरोजगार आहात ना?

लिओनार्ड: (सहजपणे आणि सुस्वभावीपणे) हो, पण थोडे पैसे साठवून ठेवले

आहेत. फार नाही, पण जर तुम्हाला वाटलं की...

मेह्यू: (थोडा खजील होत) ओह, मी काही फीबद्दल विचार करत नव्हतो. फक्त संपूर्ण चित्र स्पष्ट करायचं आहे. तुमचं वातावरण, परिस्थिती वगैरे

(**मेह्यू** शेकोटीजवळ जातो.)

सर विल्फ्रिड: नमस्कार, मिस्टर व्होले. बसा.

(**लिओनार्ड** टेबलाच्या डावीकडे बसतो.)

सर विल्फ्रिड: पण असो, आता आपण मुख्य मुद्यावर येऊ.

मेह्यू (डेस्कच्या वर सरकत) – हो. मी व्होल यांना इथे आणलं कारण मला तुम्ही त्यांची कहाणी, त्यांनी जशी मला सांगितली तशीच, ऐकावी अशी इच्छा आहे. (तो आपल्या ब्रीफकेसमधून काही टाईप केलेले कागद काढतो.) या प्रकरणात काहीशी तातडी असल्यासारखी वाटते. (तो हे कागद सर विल्फ्रिड यांना देतो.)

सर विल्फ्रिड – ओ?

लिओनार्ड – माझ्या बायकोला वाटतंय की मला अटक होणार आहे. (तो

लाजलेला दिसतो.) ती माझ्यापेक्षा खूपच हुशार आहे—म्हणून ती बरोबर असू

शकते.

सर विल्फ्रिड – अटक कशासाठी?

लिओनार्ड (अधिकच संकोचलेला) – म्हणजे—खून केल्याबद्दल.

(सर विल्फ्रिड बाकाच्या उजव्या कोपऱ्यावर बसतो.)

मेह्यू (मध्यभाग ओलांडून, पुढे जात,) – मिस एमिली फ्रेंचच्या खटल्याबद्दल आहे हे. तुम्ही कदाचित वृत्तपत्रांत या संदर्भातील बातम्या वाचल्या असतील?

(सर विल्फ्रिड मान डोलावतो.)

एक वृद्ध अविवाहित महिला एका वृद्ध स्त्री सहाय्यकासह , हम्पस्टेडमध्ये राहात

होती. चौदा ऑक्टोबरच्या रात्री अकरा वाजता तिच्या गृह सहाय्यिकेने घरी परत येताना लक्षात घेतलं की, घरात कुणीतरी जबरदस्तीने प्रवेश केला आहे आणि तिच्या मालकिणीला डोक्यावर आघात करून तिला ठार मारण्यात आलं आहे. (लिओनार्डकडे पाहून) बरोबर ना?

लिओनार्ड – होय, अगदी बरोबर. सध्या अशा गोष्टी नेहमीच ऐकायला मिळतात. आणि मग काही दिवसांनी वर्तमानपत्रांमध्ये छापून आलं की पोलिसांना मिस्टर लिओनार्ड व्होल यांच्याशी बोलायचं आहे, कारण त्यांनी त्या दिवशी संध्याकाळी

मिस फ्रेंच यांची भेट घेतली होती आणि त्यांच्याकडून काही उपयुक्त माहिती मिळू शकते. त्यामुळे मी लगेच पोलीस स्टेशनला गेलो आणि त्यांनी माझ्यावर बऱ्याच प्रश्नांचा भडिमार केला.

सर विल्फ्रिड (कडकपणे) – त्यांनी तुम्हाला काही सूचना (caution) दिली का?

लिओनार्ड (निरर्थकपणे) – मला नीटसं माहीत नाही. म्हणजे त्यांनी विचारलं की मला काही निवेदन करायचं आहे का आणि ते लिहून ठेवतील, आणि नंतर ते न्यायालयात वापरलं जाऊ शकतं—हीच सूचना असते का?

(सर विल्फ्रिड मेह्यूकडे नजर टाकतो आणि त्याच्याशी बोलल्यासारखं बोलतो.)

सर विल्फ्रिड (उठून) – असो, आता त्याचं काही करता येणार नाही. (तो बाकाच्या मागून डावीकडे जातो.)

लिओनार्ड – मला तरी ते सगळं अगदी मूर्खासारखं वाटलं. मी त्यांना मला जे काही माहीती होतं ते सांगितलं, ते खूप सभ्य होते आणि समाधान झाल्यासारखं वागले. पण जेव्हा मी घरी गेलो आणि हे सगळं रोमेन—म्हणजे माझ्या बायकोला—सांगितलं, तेव्हा तिला खूपच चिंता वाटायला लागली. तिला वाटायला लागलं की पोलिसांना असा संशय आलाय की—म्हणजे मीच खून केला असावा.

(सर विल्फ्रिड शेकोटीजवळील खुर्ची मधोमध आणतो, मेह्यू तिथे बसतो.)

म्हणून मग मला वाटलं की मी एखाद्या सॉलिसिटरचा सल्ला घ्यावा—(मेह्यूकडे पाहून) म्हणून मी तुमच्याकडे आलो. मला वाटलं तुम्ही मला योग्य काय ते सांगू शकाल. (तो चिंतेने सर विल्फ्रिड व मेह्यूकडे पाहतो.)

सर विल्फ्रिड (डावीकडे सरकत) – तुम्ही मिस फ्रेंच यांना चांगलं ओळखत होतात?

(लिओनार्ड उभा राहतो, पण सर विल्फ्रिड त्याला बसायला सांगतो.)

लिओनार्ड – होय, त्या माझ्याशी फारच चांगल्या वागत होत्या. (तो परत बसतो.) कधी कधी ते त्रासदायकही वाटायचं—त्या अगदी माझ्याभोवती घोटाळायच्या, पण त्यांचा हेतू चांगलाच होता आणि जेव्हा मी वर्तमानपत्रात वाचलं की त्यांचा खून झाला आहे, तेव्हा मला खूप वाईट वाटलं. कारण, खरं सांगायचं तर, मला त्यांच्याबद्दल आपुलकी वाटायला लागली होती.

मेह्यू: जसं तुम्ही मला सांगितल की तुम्ही मिस फ्रेंच यांची ओळख कशी झाली ते – जसं तुम्ही मला सांगितलं तसंच सर विल्फ्रिड यांना सांगा.

लिओनार्ड (सर विल्फ्रिडकडे वळून) – म्हणजे, एकदा ऑक्सफर्ड स्ट्रीटवर असताना मी पाहिलं की एक वृद्ध महिला रस्ता ओलांडत होती आणि तिच्या हातात बरंच सामान होतं. रस्त्याच्या मधोमध तीचं एक खोक खाली पडलं, ती ते उचलायला झुकली आणि तेवढ्यात एक बस जवळ आली.

(सर विल्फ्रिड हळूहळू बाकाच्या उजव्या बाजूला जातो.)

सुदैवाने ती फुटपाथवर पोहोचली. मग मी तिचे सामान उचलले, त्यावरील चिखल पुसला, एक खोकं --- जे उघडून गेलं होतं ते दोऱ्याने पुन्हा बांधलं, आणि तिचं सांत्वन केलं—तुम्हाला माहितीच आहे, अशा प्रसंगी काय केलं जातं ते.

सर विल्फ्रिड – आणि तिला तुमचे आभार मानण्यासारखं ते वाटलं?

लिओनार्ड – होय, तिला ते तसं खूपच वाटलं. तिनं मला अनेक वेळा धन्यवाद दिले. एखाद्याने तिचे प्राण वाचवलं असावे, अशा प्रकारे तिनं प्रतिक्रिया दिली.

सर विल्फ्रिड – पण प्रत्यक्षात तुम्ही तिचा प्राण वाचवला नव्हता, हो ना? (तो बाकाच्या खणामधून सिगारेटचं पाकीट काढतो.)

लिओनार्ड – हो, हे काही वीरश्रीसारखं नव्हतं. मला काही परत तिची भेट होईल असं वाटलंच नव्हतं.

सर विल्फ्रिड – सिगारेट?

लिओनार्ड – नाही, धन्यवाद सर, मी सिगारेट पित नाही. पण विचित्र योगायोगाने, दोन दिवसांनी मी थिएटरमध्ये तिच्याच मागे बसलो होतो. तिनं मला ओळखलं आणि आमचं बोलणं सुरू झालं, आणि शेवटी तिनं मला घरी यायला सांगितलं.

सर विल्फ्रिड – आणि तुम्ही गेलात?

लिओनार्ड – हो. तिनं अगदी आग्रहानं एखादा दिवस ठरवायला सांगितलं, आणि नकार देणं काहीसं उद्धट वाटलं असतं. म्हणून मी म्हटलं पुढच्या शनिवारी येईन.

सर विल्फ्रिड – आणि तुम्ही तिच्या घरी गेलात—(तो एक कागद पाहतो.)

मेह्यू – हँम्पस्टेड इथे?

लिओनार्ड – हो.

सर विल्फ्रिड – जेव्हा तुम्ही पहिल्यांदा तिच्या घरी गेलात, तेव्हा तिच्याबद्दल

काय माहिती होती तुम्हाला? (तो पुन्हा बाकाच्या उजव्या कोपऱ्यावर बसतो.)

लिओनार्ड – खरं सांगायचं तर, जे काही तिनं सांगितलं तेवढंच—ती एकटी राहते आणि तिचे फारसे मित्र नाहीत—इतकंच.

सिर विल्फ्रिड: ती फक्त तिच्या गृहव्यवस्थापकिणीसोबतच राहत होती का?

लिओनार्ड: हो, अगदी तसं. पण तिच्याकडे आठ मांजरी होत्या. आठ! घर छान सुसज्ज होतं आणि

सगळं काही सुरेख होतं, पण मांजरींचा वास यायचा.

सिर विल्फ्रिड (डेस्कच्या वर उभं राहत आणि चालत): तुम्हाला असं वाटण्यास काही कारण होतं का की ती श्रीमंत होती?

लिओनार्ड: हो, तिचं बोलणं ऐकलं, की तशीच वाटायची.

सिर विल्फ्रिड: आणि तुम्ही स्वतः? (तो पुढे जातो आणि लिओनार्डच्या डाव्या बाजूला उभा राहतो.)

लिओनार्ड (आनंदात): मी तर अक्षरशः खिसेकंगाल आहे, आणि बऱ्याच काळापासून तसा आहे.

सिर विल्फ्रिड: दुर्दैव आहे.

लिओनार्ड: हो, खरंच आहे. ओह, तुम्हाला वाटतं लोक म्हणतील की मी तिच्या पैशासाठी तिच्याशी जवळीक वाढवत होतो?

सिर विल्फ्रिड (थोडासा गोंधळलेला): मी तसं थेट म्हणणार नव्हतो, पण मुळात, हो, लोक तसं म्हणू शकतात.

लिओनार्ड: खरं सांगायचं तर, तसं नव्हतं. मला तिची कीव आली होती. ती एकटी वाटायची. मला माझ्या वयस्कर काकीनं—बेट्सी काकी—जिवंत ठेवलं, आणि म्हणून मला वृद्ध बायका आवडतात.

सिर विल्फ्रिड: तुम्ही म्हणता वृद्ध बायका. तुम्हाला माहीत होतं का की मिस फ्रेंच वयाने किती होत्या?

लिओनार्ड: नाही, माहीत नव्हतं. पण तिच्या खुनानंतर वृत्तपत्रात वाचलं—ती छप्पन्न वर्षांची होती.

सर विल्फ्रिड: छप्पन्न. तुम्हाला ते वय फार वाटलं, मिस्टर व्होल, पण मला

शंका आहे की मिस एमिली फ्रेंच स्वतःला वयस्क समजत असतील का.

लिओनार्ड: पण तुम्ही तिला "लहानसे पिल्लू" तर म्हणू शकत नाही, बरोबर?

सिर विल्फ्रिड (डेस्कच्या वरून जात उजव्या बाजूला बसतो): बरं, पुढे जाऊ. तुम्ही मिस फ्रेंचला वारंवार भेटत होतात?

लिओनार्ड: हो, आठवड्यातून एकदा, कधीकधी दोनदा.

सिर विल्फ्रिड: तुम्ही तुमच्या पत्नीला सोबत नेत होतात का?

लिओनार्ड (थोडासा संकोचलेला): नाही, नाही, नेत नव्हतो.

सिर विल्फ्रिड: का नेत नव्हतात?

लिओनार्ड: बरं—खरं सांगायचं तर, मला वाटलं की ती गोष्ट फारशी चांगली ठरणार नाही.

सिर विल्फ्रिड: म्हणजे तुमच्या पत्नीला, की मिस फ्रेंचला?

लिओनार्ड: ओह, मिस फ्रेंचला. (तो थांबतो.)

मेह्यू: पुढे बोला, पुढे बोला.

लिओनार्ड: बघा, ती माझ्यावर बहुधा प्रेम करायला लागली होती.

सिर विल्फ्रिड: तुम्ही म्हणता, ती तुमच्यावर प्रेमात पडली होती?

लिओनार्ड (धक्क्यात): अरे देवा, नाही नाही, तस काही नव्हतं. फक्त थोडेसे लाड करायची,एवढच.

सिर विल्फ्रिड (थोडा वेळ थांबून): मिस्टर व्होल, हे लक्षात घ्या, की जर तुमच्यावर पोलिसांनी एखादा खटला चालवायचा ठरवलाच, तर एक प्रश्न

असणार की का एक तरुण, देखणा, विवाहित पुरुष एका वयस्क स्त्रीकडे वेळ घालवत होता, जिला त्याच्याशी फारसं गम्य नव्हतं?

लिओनार्ड (गंभीर होत): हो, लोक म्हणतील की मी तिच्याकडे पैशासाठी जात होतो. आणि काही अंशी कदाचित ते खरंही आहे. पण फक्त काही अंशी.

सिर विल्फ्रिड (थोडे नरमावत): निदान तुम्ही प्रामाणिक आहात, मिस्टर व्होल.

थोडं स्पष्ट सांगू शकाल का?

लिओनार्ड (उठून शेकोटीकडे जात): बघा, तिनं कधीच लपवलं नाही की तिच्याकडे भरपूर पैसा होता. जसं मी सांगितलं, मी आणि रोमेन—म्हणजे माझी पत्नी—आम्ही खूप अडचणीत आहोत. (तो आपल्या खुर्चीच्या मागे उभा राहतो.) मी कबूल करतो की जर परिस्थिती खूप बिकट झाली असती, तर तिनं मला थोडे पैसे उधार द्यावेत अशी माझी आशा होती. मी प्रामाणिकपणे सांगतोय.

सिर विल्फ्रिड: तुम्ही तिला कधी पैसे उधार देण्याची विनंती केली होती?

लिओनार्ड: नाही, केली नाही. म्हणजे, परिस्थिती इतकी वाईट नव्हती. (तो गंभीर होतो, जणू काही त्याला आपल्या परिस्थितीची जाणीव झाली आहे.) अर्थात, मला समजतं—हे सगळं माझ्यासाठी वाईट चित्र उभं करतं. (तो परत खुर्चीत बसतो.)

सिर विल्फ्रिड: मिस फ्रेंचला माहिती होतं की तुम्ही विवाहित आहात?

लिओनार्ड: हो, नक्कीच.

सिर विल्फ्रिड: पण तिनं कधी सांगितलं की तुमच्या पत्नीला आणा म्हणून?

लिओनार्ड (थोडा संकोचत): नाही. ती—म्हणजे—तिला वाटायचं की मी आणि माझी बायको आमचं एकमेकांशी जमत नाही.

सर विल्फ्रिड: तुम्ही मुद्दाम असा आभास दिला होतात का?

लिओनार्ड: नाही, नाही. मी तसं कधीच सुचवलं नाही. पण तिला तसंच वाटायचं, आणि मला वाटलं की मी जर सतत रोमेनचा उल्लेख करत राहिलो, तर तिचा माझ्यातला रस कमी होईल. मला तिच्याकडून पैसे मागायचे नव्हते, पण मी एक कारसाठी नवीन यंत्र तयार केलं होतं—खरंच एक चांगली कल्पना होती—आणि जर मी तिला ते गुंतवणुकीसाठी पटवू शकलो असतो, तर ते तिचे पैसे असते, आणि तिला फायदा पण झाला असता. हे सांगणं खूप अवघड आहे—पण मी तिच्यावर उपजीविका करत नव्हतो, सिर विल्फ्रिड, खरंच करत नव्हतो.

सिर विल्फ्रिड: मिस फ्रेंचकडून तुम्ही किती रक्कम घेतली होती?

लिओनार्ड: काहीच नाही. अगदी काहीच नाही.

सिर विल्फ्रिड: गृहव्यवस्थापिकेबद्दल थोडंसं सांगा.

लिओनार्ड: जेनेट मॅकेंझी? ती तर एक सरळसरळ सत्ताधारी होती, अगदी. मिस फ्रेंचला अक्षरशः दमवत असे. नीट काळजी घ्यायची तिची, पण जेनेट

जूबाजूला असेपर्यंत, त्या बिचाऱ्या बाईला स्वतःचं मतही व्यक्त करता येत नव्हतं. (विचारात पडतो.) जेनेटला मी अजिबात आवडत नव्हतो.

सिर विल्फ्रिड: का?

लिओनार्ड: ओह, हेवा असावा, बहुतेक. तिला कदाचित मी मिस फ्रेंचला तिच्या व्यवहारात मदत करत होतो, हे खटकत असावं.

सर विल्फ्रिड: म्हणजे तुम्ही मिस फ्रेंचला तिच्या आर्थिक व्यवहारात मदत करत होता?

लिओनार्ड: हो. ती गुंतवणुकीसंदर्भात चिंतेत होती, आणि अर्ज वगैरे भरायचं काम तिला कठीण जायचं. मी तिला अशा बऱ्याच गोष्टींत मदत केली.

सिर विल्फ्रिड: आता मिस्टर व्होल, मी तुम्हाला एक अतिशय गंभीर प्रश्न विचारणार आहे. आणि मला त्याचं प्रामाणिक उत्तर हवं आहे. तुम्ही आर्थिकदृष्ट्या अडचणीत होतात, आणि त्या बाईच्या व्यवहाराचा काही भाग तुमच्या हातात होता. तर, कधी असा प्रकार झाला का की तुम्ही तिच्या मालमत्तेचा गैरवापर केला?

(लिओनार्ड लगेच चिडून उत्तर द्यायला लागतो.)

सिर विल्फ्रिड: थांबा, मिस्टर व्होल, उत्तर देण्याआधी थोडं विचार करा. कारण याकडे दोन प्रकारे पाहता येईल. एकतर, आम्ही तुमच्या प्रामाणिकपणाचं वैशिष्ट्य म्हणून मांडू शकतो, किंवा जर तुम्ही तिला फसवलं

असेल, तर आम्ही म्हणू शकतो की तुमच्याकडे खून करण्याचं कारण नव्हतं, कारण— ती आधीच एक फायदेशीर उत्पन्नाचा स्रोत होती. तू बघू शकतोस की दोन्ही दृष्टिकोनांमध्ये काही फायदे आहेत. मला हवी आहे ती फक्त सत्यता. तुला हवे असल्यास उत्तर देण्यापूर्वी वेळ घे.

लिओनार्ड: मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो, सर विल्फ्रिड, की मी पूर्ण प्रामाणिकपणे वागलो आहे आणि त्याच्या विरोधात तुम्हाला काहीच सापडणार नाही. पूर्णपणे प्रामाणिक.

सर विल्फ्रिड: धन्यवाद, मिस्टर व्होल. तुमचं उत्तर ऐकून माझ्या मनाला खूप दिलासा मिळाला. मी तुम्हाला इतकं चतुर समजतो की अशा गंभीर गोष्टीबद्दल तुम्ही खोटं बोलणार नाहीत. आणि आता आपण येतो ऑक्टोबरच्या... (तो क्षणभर थांबतो.)

मेह्यू: चौदा तारखेकडे.

सर विल्फ्रिड: चौदाव्या. (तो उठतो.) त्या रात्री मिस फ्रेंचने तुम्हाला भेटायला बोलावलं होतं का?

लिओनार्ड: नाही, खरं सांगायचं तर तिने नाही बोलावलं. पण मला एक नवीन प्रकारचं उपकरण शोधलं होतं आणि मला वाटलं तिला ते आवडेल. त्यामुळे मी संध्याकाळी तिच्याकडे गेलो आणि साडेसातच्या सुमारास पोहोचलो. त्या दिवशी जेनेट मॅकेंझी बाहेर गेली होती आणि मला माहीत होतं ती एकटीच असेल आणि तिला थोडं एकाकी वाटत असेल.

सर विल्फ्रिड: जेनेट मॅकेंझी त्या रात्री बाहेर होती आणि तुला ते माहीत होतं?

लिओनार्ड: (आनंदाने.) हो, हो, मला माहीत होतं. जेनेट नेहमी शुक्रवारच्या रात्री बाहेर जायची.

सर विल्फ्रिड: हे काहीसं अडचणीचं आहे.

लिओनार्ड: का? मला तर हे अगदीच नैसर्गिक वाटतं, की मी त्याच दिवशी तिला भेटायला गेलो.

सर विल्फ्रिड: पुढे सांगा, मिस्टर व्होल.

लिओनार्ड: तर मी साडेसातला तिथे पोहोचलो. तिने तिचं जेवण उरकलेलं होतं, पण मी तिच्याबरोबर कॉफी घेतली आणि आम्ही "डबल डेमन" नावाचा एक खेळ खेळलो. मग नऊ वाजता मी तिला शुभरात्र म्हटलं आणि घरी गेलो.

(**सर विल्फ्रिड** इतरांच्या अंगावरून, डावीकडे जातो.)

मेह्यू: तू मला सांगितलं होतस की नोकराणी म्हणाली की त्या रात्री ती नेहमीपेक्षा लवकर घरी आली.

लिओनार्ड: हो, पोलिसांनी मला सांगितलं की ती काही विसरली म्हणून परत आली होती आणि तिने—किंवा ती असं म्हणते—की तिने मिस फ्रेंचशी कोणीतरी बोलताना ऐकलं. पण जो कोणी होता, तो मी नव्हतो.

सर विल्फ्रिड: तू हे सिद्ध करू शकतोस का, मिस्टर व्होल?

लिओनर्ड: हो, नक्कीच सिद्ध करू शकतो. मी तेव्हा घरी माझ्या पत्नीबरोबर होतो. पोलिस वारंवार तेच विचारत होते—की साडेनऊ वाजता मी कुठे होतो.

काही वेळा तर माणसाला स्वतःलाच आठवत नाही की तो कुठे होता. पण मला

छान आठवतं, की मी त्या दिवशी सरळ रोमेनकडे, म्हणजे माझ्या बायकोकडे, घरी गेलो होतो आणि आम्ही पुन्हा बाहेर गेलोच नाही.

सर विल्फ्रिड: (वर जातो.) तुम्ही सदनिकेत राहता?

लिओनार्ड: हो. आम्ही युस्टन स्टेशनमागे एका दुकानाच्या वर दुसऱ्या मजल्यावरील छोट्याशा सदनिकेत राहतो.

सर विल्फ्रिड: (लिओनार्डच्या डावीकडे उभा राहून) त्या वेळी कोणीतरी पाहिलं का...

लिओनार्ड: मला वाटत नाही. त्यांना पाहण्याची काय गरज होती?

सर विल्फ्रिड: पण त्यांनी पाहिलं असतं तर कदाचित ते तुमच्यासाठी फायदेशीर ठरलं असतं.

लिओनार्ड: पण तुम्हाला खरंच असं वाटतं का—म्हणजे जर ती खरंच साडेनऊ वाजता मारली गेली असेल, तर माझ्या बायकोच्या साक्षीपुरावा पुरेसा नाही का?

(**सर विल्फ्रिड** आणि **मेह्यू** एकमेकांकडे पाहतात. सर विल्फ्रिड लिओनार्डला ओलांडून डावीकडे उभा राहतो.)

मेह्यू: आणि तुझी पत्नी नक्की सांगेल की त्या वेळी तू घरी होतास?

लिओनार्ड: अर्थातच सांगेल.

(**मेह्यू** उठतो आणि शेकोटीकडे जातो.)

मेह्यू: तुला तुझी पत्नी खूप आवडते आणि तुझी पत्नीही तुझ्यावर खूप प्रेम

करते का?

लिओनार्ड: (चेहरा सौम्य होत जातो) रोमेन माझ्यावर जीवापाड प्रेम करते. कोणत्याही पुरुषाला जशी पत्नी हवी असते, तशीच ती आहे.

मेह्यू: समजलं. म्हणजे तुम्ही सुखी वैवाहिक जीवन जगता.

लिओनार्ड: त्याहून जास्त काही असू शकत नाही. रोमेन अप्रतिम आहे, खरंच अप्रतिम. मला तुमची तिच्याशी ओळख करून द्यायला आवडेल, मिस्टर मेह्यू.

(दारावर **ठकठक** होते.)

सर विल्फ्रिड: (आवाज देतो) या आत.

ग्रेटा: (प्रवेश करते. तिच्या हातात संध्याकाळचं वृत्तपत्र आहे.) संध्याकाळचं वृत्तपत्र, सर विल्फ्रिड. (ती एक परिच्छेद दाखवते आणि वृत्तपत्र, त्यांना देते.)

सर विल्फ्रिड: धन्यवाद, ग्रेटा.

ग्रेटा: तुम्हाला एक कप चहा हवा आहे का, सर?

सर विल्फ्रिड: नाही, धन्यवाद. ओह, व्होल, तुला हवा आहे का एक कप?

लिओनार्ड: नाही, धन्यवाद, सर.

सर विल्फ्रिड: नाही, धन्यवाद, ग्रेटा. (तो इतरांच्या पुढून जाऊन बाकाच्या उजवीकडे उभा राहतो.)

(**ग्रेटा** बाहेर जाते.)

मेह्यू: मला वाटतं आपल्यासाठी तुमच्या बायकोबरोबर एक बैठक घेणं योग्य ठरेल...

लिओनार्ड: म्हणजे, आपण इथे बाकावर चर्चा घेणार आहोत का?

(सर विल्फ्रिड बाकाच्या उजव्या बाजूला बसतो.)

मेह्यू: मला आश्चर्य वाटतं, मिस्टर व्होल, की तुम्ही हे प्रकरण पुरेसं गंभीरतेने

घेत आहात का?

लिओनार्ड: (थोडासा गोंधळून.) मी घेतो, खरंच घेतो. पण हे सगळं—म्हणजे हे सगळं इतकं विचित्र वाटतंय, जणू एखादं वाईट स्वप्न. म्हणजे, हे सगळं माझ्यासोबत घडावं—खून. ही अशी गोष्ट आहे जी आपण फक्त पुस्तकांमध्ये किंवा वर्तमानपत्रांत वाचतो, पण असं काही खरंच स्वतःच्या आयुष्यात घडेल असं वाटत नाही. कदाचित म्हणूनच मी पुन्हा पुन्हा यावर विनोद करतोय, पण खरंच, हे काही विनोद नाहीत.

मेह्यू: नाही, मलाही वाटतं हे खरंच विनोदाचं कारण नाही.

लिओनार्ड: पण तरीही, सर्व काही ठीक आहे ना? कारण जर त्यांना वाटत असेल की मिस फ्रेंचचा खून साडेनऊ वाजता झाला, आणि मी त्या वेळी रोमेनसोबत घरी होतो, तर…

मेह्यू: तुम्ही घरी कसे गेलात? बसने की जमिनीखालील रेल्वेने?

लिओनार्ड: मी चालत गेलो. सुमारे पंचवीस मिनिटे लागली. पण हवामान छान होतं—थोडं वाऱ्याचं.

मेह्यू: वाटेत तुम्हाला ओळखीचं कोणी भेटलं का?

लिओनार्ड: नाही, पण त्याने काही फरक पडतो का? कारण रोमेन…

सर विल्फ्रिड: एका समर्पित पत्नीचा पुरावा, जर त्याला दुसरं कोणतंही समर्थन नसेल, तर तो फारसा विश्वासार्ह मानला जाऊ शकणार नाही, मिस्टर व्होल.

लिओनार्ड: तुम्हाला म्हणजे असं वाटतं का, की रोमेन माझ्यासाठी खोटं बोलेल?

सर विल्फ्रिड: असं घडलं आहे, मिस्टर व्होल.

लिओनार्ड: ओह, मी खात्रीने म्हणू शकतो की ती खोटं बोलेल, पण या प्रकरणात तिला खोटं बोलायचं कारणच नाही. कारण मी खरंच घरी होतो. तुमचा माझ्यावर विश्वास आहे, नाही का?

सर विल्फ्रिड: हो, माझा तुमच्यावर विश्वास आहे, मिस्टर व्होल. पण तुम्हाला न्यायालयाला पटवावं लागेल, मला नाही. तुम्हाला माहिती आहे ना, की मिस फ्रेंचने एक मृत्युपत्र केले होते, ज्यामध्ये सगळं धन तुम्हाला दिलं आहे?

लिओनार्ड: (पूर्णपणे हादरलेला.) सगळं मला दिलं? हा काहीतरी विनोद आहे ना!

(**मेह्यू** पुन्हा मधल्या खुर्चीवर बसतो.)

सर विल्फ्रिड: मी विनोद करत नाही. हे आजच्या संध्याकाळच्या वर्तमानपत्रात आहे. (तो वर्तमानपत्र बाकावरून त्याच्याकडे देतो.)

लिओनार्ड: (परिच्छेद वाचतो.) हे खरंच पटत नाही.

सर विल्फ्रिड: तुम्हाला याबद्दल काहीच माहिती नव्हती?

लिओनार्ड: अजिबात नाही. तिनं कधीही याचा उल्लेखही केला नाही. (तो वर्तमानपत्र **मेह्यू**ला देतो.)

मेह्यू: तुम्ही पूर्ण खात्रीने हे सांगू शकता, मिस्टर व्होल?

लिओनार्ड: पूर्ण खात्रीने. मी तिचा खूप आभारी आहे—पण तरीही आता असं वाटतं की तिनं असं केलं नसतं तर बरं झालं असतं. म्हणजे—सध्याच्या परिस्थितीत हे थोडं अडचणीचं ठरतंय, नाही का, सर?

सर विल्फ्रिड: यामुळे तुमच्याकडे एक पुरेसं ठोस कारण निर्माण होतं. अर्थात,

जर तुम्हाला याची आधीच कल्पना असती—ज्याचं तुम्ही राजकरण करताआहात. मिस फ्रेंचने कधी तुम्हाबरोबर मृत्युपत्र करण्याबाबत बोलणं केलं नव्हतं?

लिओनार्ड: तिनं एकदा जेनेटला म्हटलं होतं, "तुला वाटतंय मी पुन्हा मृत्युपत्र करेन," पण त्याचा माझ्याशी काही संबंध नव्हता. म्हणजे, त्यांच्यात थोडा वाद झाला होता, एवढंच. (त्याचा स्वर बदलतो.) खरंच तुम्हाला वाटतं की... ते मला अटक करणार आहेत का?

सर विल्फ्रिड: मला वाटतं, मिस्टर व्होल, तुम्ही त्या शक्यतेसाठी स्वतःला तयार ठेवलं पाहिजे.

लिओनार्ड: (उठत) तुम्ही—तुम्ही माझ्यासाठी शक्य तितकं सर्व काही कराल ना,

सर?

सर विल्फ्रिड: (मायाळूपणे) माझ्या प्रिय मिस्टर व्होल, मी माझ्या क्षमतेनुसार तुमच्या मदतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करेन, याची खात्री बाळगा. काळजी करू नका. सर्व काही माझ्यावर सोडून द्या.

लिओनार्ड: तुम्ही रोमेनची काळजी घ्याल ना? म्हणजे, तिचं काही खरं नाही—

तिच्यासाठी हे फारच भयानक असेल.

सर विल्फ्रिड: काळजी करू नकोस, मुला. काळजी करू नकोस.

लिओनार्ड: (पुन्हा खुर्चीत बसतो; मेह्यूकडे पाहून) आणि पैशाचा भागसुद्धा. तोही मला काळजीत टाकतो. माझ्याकडे थोडेसे पैसे आहेत, पण पुरेसे नाहीत. कदाचित मी तुम्हाला काही करायला सांगणं योग्य नव्हतं.

मेह्यू: मला वाटतं आपण योग्य प्रकारे बचाव उभा करू शकू. अशा खटल्यांमध्ये कोर्ट मदत करतं,तुम्हाला माहितेय.

लिओनार्ड: (उठतो आणि टेबलाच्या वर फिरतो) माझा विश्वासच बसत नाही. मी—लिओनार्ड व्होल—मी न्यायालयात असे म्हणत उभा असेन, "गुन्हा कबूल नाही." लोक माझ्याकडे पाहतील. (तो स्वतःला हलवतो, जणू काही वाईट स्वप्नातून जागा झाला असेल, आणि मेह्यूकडे वळतो.) मला कळत नाही की त्यांना समजलं कसं नाही की तो चोर होता. म्हणजे, बातम्यांनुसार खिडकी जबरदस्तीने उघडली गेली होती, काच फोडली गेली होती, आणि अनेक वस्तू अस्ताव्यस्त होत्या. (तो परत बसतो.) मला ती शक्यता जास्त खरी वाटते.

मेह्यू: पोलिसांकडे ही चोरी नव्हतं असं मानण्याचं काहीतरी ठोस कारण

असणार.

लिओनार्ड: पण मला वाटतं की...

(**कार्टर प्रवेश करतो.**)

सर विल्फ्रिड: ओहो, कार्टर?

कार्टर: (टेबलाच्या वरून जात) माफ करा, सर, दोन गृहस्थ इथे आले आहेत,

मिस्टर व्होलला भेटायचंय म्हणतायत.

सर विल्फ्रिड: पोलिस आहेत का?

कार्टर: हो, सर.

(**मेह्यू उठतो.**)

सर विल्फ्रिड: (उठतो आणि दरवाज्याकडे जातो) ठीक आहे, जॉन, मी जाऊन त्यांच्याशी बोलतो.

(सर विल्फ्रिड बाहेर जातो आणि कार्टर त्याच्या मागोमाग जातो.)

लिओनार्ड: देवा! हेच का—ते?

मेह्यू: मला वाटतं, हो, मुला. आता शांत रहा. धीर सोडू नकोस.
(तो लिओनार्डच्या खांद्यावर हात ठेवतो.) अजून काही बोलू नकोस—सर्व काही आमच्यावर सोड.

(तो आपली खुर्ची शेकोटीजवळ ठेवतो.)

लिओनार्ड: पण त्यांना कसं कळलं की मी इथे आहे?

मेह्यू: असं वाटतंय की त्यांनी तुमच्यावर नजर ठेवायला एखादा माणूस ठेवलेला असावा.

लिओनार्ड: (अजूनही विश्वास बसत नाही.) म्हणजे त्यांना खरंच माझ्यावरसंशय आहे.

(सर विल्फ्रिड, डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर हेर्न आणि साध्या कपड्यातला एक गुप्तहेर प्रवेश करतात. इन्स्पेक्टर उंच आणि देखणा अधिकारी आहे.)

इन्स्पेक्टर: (प्रवेश करताना; सर विल्फ्रिडकडे) क्षमस्व, सर, तुम्हाला त्रास द्यावा लागतोय.

सर विल्फ्रिड: (उठत) हे मिस्टर व्होल आहेत.

(**लिओनार्ड उठतो.**)

इन्स्पेक्टर: (लिओनार्डकडे जात) तुमचं नाव लिओनार्ड व्होल आहे का?

लिओनार्ड: होय.

इन्स्पेक्टर: मी गुप्तहेर इन्स्पेक्टर हेर्न आहे. माझ्याकडे तुमच्या अटकेसाठी वॉरंट आहे — चौदा ऑक्टोबर रोजी तुमच्यावर एमिली फ्रेंचच्या खुनाचा आरोप आहे. तुम्हाला खबरदारी म्हणून सांगतो की तुम्ही काही बोललात, तर ते नोंदवलं जाऊ शकतं आणि पुरावा म्हणून वापरलं जाऊ शकतं.

लिओनार्ड: ठीक आहे. (तो घाबरलेल्या नजरेने सर विल्फ्रिडकडे पाहतो, आणि मग डावीकडे लावलेल्या हुकावरून आपली टोपी घेतो.) मी तयार आहे.

मेह्यू: (इन्स्पेक्टरच्या डावीकडे जात) शुभ दुपार, इन्स्पेक्टर हेर्न. माझं नाव मेह्यू आहे. मी मिस्टर व्होलचं प्रतिनिधित्व करतो.

इन्स्पेक्टर: शुभ दुपार, मिस्टर मेह्यू. ठीक आहे. आम्ही त्याला घेऊन जातो आणि त्याच्यावर आता आरोप ठेवतो.

(लिओनार्ड आणि गुप्तहेर बाहेर जातात.)

(इन्स्पेक्टर सर विल्फ्रिडकडे येतो.) आजकाल खूपच योग्य हवामान आहे. काल रात्री थोडासा गारठा जाणवला. पुढे पुन्हा भेटूच, सर, अशी अपेक्षा आहे. (तो दरवाज्याकडे जातो.) आशा आहे की आम्ही तुम्हाला फारसा त्रास दिला नसेल, सर विल्फ्रिड.

सर विल्फ्रिड: मला त्रास होत नाही.

(इन्स्पेक्टर सौम्य हसतो आणि बाहेर जातो.)

(तो दरवाजा बंद करतो.) मला असं म्हणावं लागेल, जॉन, की हा तरुण त्याला वाटतं त्यापेक्षा खूपच मोठ्या अडचणीत आहे.

मेह्यू: नक्कीच. तुम्हाला तो कसा वाटला?

सर विल्फ्रिड: (मेह्यूच्या डावीकडे जात) विलक्षण भोळा. पण काही बाबतीत चतुरसुद्धा. मी म्हणेन, तो हुशार आहे. पण त्याला आपली परिस्थिती किती धोकादायक आहे हे अजिबात कळलेलं नाही.

मेह्यू: तुम्हाला वाटतं त्याने खून केला?

सर विल्फ्रिड: काहीच कल्पना नाही. एकंदरीत, मला नाही वाटत. (धारदार बोलतो.) तुम्ही सहमत आहात?

मेह्यू: (खिशातून आपली पाईप काढत) मी सहमत आहे.

(सर विल्फ्रिड शेकोटीवरचं तंबाखूचं भांड मेह्यूला देतो. मेह्यू टेबलजवळ उभा राहतो आणि पाईप भरतो.)

सर विल्फ्रिड: असो, त्याने आपल्या दोघांवरही चांगला प्रभाव टाकलाय, असं दिसतं. असं कस झालं, तेच समजत नाही. मी यापेक्षा दुबळं समर्थन कधी ऐकलं नव्हतं. देव जाणे आपण त्याचं काय करायचंय. त्याच्याच बाजूने असलेला एकमेव पुरावा त्याच्या पत्नीचा आहे—आणि कोण विश्वास ठेवणार आहे पत्नीच्या बोलण्यावर?

मेह्यू: (कोरड्या विनोदात) असं घडलेलं आहे पूर्वी.

सर विल्फ्रिड: ती परदेशी आहे. बाराच्या खंडपीठातले नऊ लोक समजतात की परदेशी माणसं खोटं बोलतात. ती भावनाविवश होईल, अस्वस्थ होईल, आणि सरकारी वकिलांनी तिला काय विचारलं ते तिला समजणारही नाही. पण तरीसुद्धा आपल्याला तिची मुलाखत घ्यावीच लागेल. तू बघ, ती माझ्या कार्यालयात वेड्यासारखा हंबरडा फोडेल.

मेह्यू: कदाचित तुम्हाला हे खटल्याचं काम घ्यायचं नसेल.

सर विल्फ्रिड: असं कुणी म्हणालं का? मी फक्त हे म्हणतोय की त्या मुलाचं

समर्थन अगदी मूर्खपणाचं आहे.

मेह्यू: (तंबाखूचं भांडं सर विल्फ्रिडकडे देत) पण खरं आहे.

सर विल्फ्रिड: (भांड शेकोटीवर ठेवत) ते खरंच असलं पाहिजे. खरं नसतं, तर

इतकं मूर्खपणाचं नसतं. जर सगळी माहिती काळ्या-पांढऱ्या स्वरूपात लिहिली, तर ते अगदीच त्याच्या विरोधात जाते.

(**मेह्यू** आपल्या खिशांत काड्यांसाठी शोधतो**.**)

सर विल्फ्रिड: पण जेव्हा तू त्या मुलाशी बोलतोस, आणि तो स्वतःच हे सगळं

बोलून टाकतो, तेव्हा जाणवतं की हे सगळं त्याचं म्हणणं खरंच खरं असू शकतं. कमाल आहे, माझ्याकडेही एक "आत्याबाई बेट्सी" होती. मी तिच्यावर खूप प्रेम करायचो.

मेह्यू: त्याचा स्वभाव चांगला वाटतो. सहानुभूती मिळवणारा.

सर विल्फ्रिड: (आपल्या खिशातून काडेपेटी काढतो आणि मेह्यूला देतो) हो, त्याने न्यायालयात चांगलं काम केलं पाहिजे. पण न्यायाधीशांना त्याचा काही फरक पडणार नाही. आणि तो खूप साधा वाटतो—न्यायालयात घाबरून गोंधळून जाईल असं वाटतं.

(मेह्यू खोकं उघडतो. ते रिकामं आहे. तो कचऱ्याच्या टोपलीत ते फेकून देतो.)

सर विल्फ्रिड: सगळं या मुलीवर अवलंबून आहे.

रोमेन: ओहो! तुम्ही मिस्टर मेह्यू आहात?

मेह्यू: होय. हे सर विल्फ्रिड रोबर्ट्स आहेत. त्यांनी तुमच्या पतीच्या खटल्यासाठी काम करण्यास सहमती दिली आहे.

रोमेन: (मध्यभागी येत) कसे आहात, सर विल्फ्रिड?

सर विल्फ्रिड: ठीक आहे. तुम्ही कशा आहात?

रोमेन: मी नुकतीच तुमच्या कार्यालयात आले आहे, मिस्टर मेह्यू. यानी सांगितलं की तुम्ही इथे आहात—माझ्या नवऱ्यासोबत.

सर विल्फ्रिड: हो, अगदी तसंच.

रोमेन: मी आल्यावर असं वाटलं की मी लिओनार्डला गाडीत बसताना पाहिलं. त्याच्यासोबत दोन पुरुष होते.

सर विल्फ्रिड: आता, माझ्या प्रिय मिसेस व्होल, तुम्ही स्वतःला अस्वस्थ करू नका.

(रोमेन अजिबात अस्वस्थ दिसत नाही.)

(**सर विल्फ्रिड** आणि **मेह्यू** एकमेकांकडे पाहतात. **मेह्यू** परत आपल्या खुर्चीत बसतो. रोमेनचा शांत, बेधडक कटाक्ष **सर विल्फ्रिड**ला भिडतो. त्यांच्या दोघांमध्ये स्पष्ट विरोधाभास जाणवतो.)

सर विल्फ्रिड: (स्वतःचा स्वर बदलत) श्रीमती व्होल, तुम्ही या सगळ्या

प्रकरणात ज्या प्रकारे वागता आहात, ते मला काहीसं समजत नाही.

रोमेन: म्हणजे तुम्हाला समजत नाही? बरं, कदाचित ते अवघडच आहे.

सर विल्फ्रिड: कदाचित तुमच्या नवऱ्याची परिस्थिती तुम्हाला पुरेशी स्पष्टपणे कळलेली नाही?

रोमेन: मी आधीच सांगितलं आहे की मला हे पूर्णपणे समजून घ्यायचं आहे की—माझ्या नवऱ्यावरचा आरोप किती गंभीर आहे. मी पोलिसांना सांगते की लिओनार्ड साडेनऊला माझ्यासोबत घरी होता—आणि ते माझ्यावर विश्वास ठेवत नाहीत. पण कदाचित कोणीतरी त्याला मिस फ्रेंचच्या घरातून बाहेर पडताना पाहिलं असेल, किंवा घरी जात असताना रस्त्यात?

*(*ती दोघांकडे तीव्र आणि थोड्या चलाख नजरेने पाहते.)

सर विल्फ्रिड चौकसपणे **मेह्यू**कडे पाहतो.)

मेह्यू: *(*उठून आणि केंद्राकडे येत, अनिच्छेने*)* तुमच्या नवऱ्याला असा कोणताही उपयोगी पुरावा आठवत नाही, किंवा तो सांगू शकत नाही.

रोमेन: मला शपथ घ्यावी लागेल, बरोबर ना—की मी सत्य बोलेन, पूर्ण सत्य, आणि फक्त सत्य? *(ती थोडीशी गंमतीने म्हणते.)*

सर विल्फ्रिड:. हो, तीच शपथ घ्यावी लागते.

रोमेन: *(*टेबलच्या डावीकडील खुर्चीमागे जाऊन उभी राहते; आता स्पष्टपणे

उपरोधात्मक पद्धतीने) आणि समजा, मग तुम्ही मला विचारलंत— *(*ती

पुरुषाच्या आवाजाची नक्कल करते*)* "त्या रात्री लिओनार्ड व्होल कधी आला?" — आणि मी म्हटलं...

सर विल्फ्रिड: बरं?

रोमेन: मी खूप गोष्टी सांगू शकते.

सर विल्फ्रिड: श्रीमती व्होल, तुम्ही तुमच्या नवऱ्यावर प्रेम करता का?

रोमेन: (आपली उपरोधिक नजर **मेह्यू**कडे वळवते) लिओनार्ड म्हणतो की मी करते.

मेह्यू: लिओनार्ड व्होलेचा तसा विश्वास आहे.

रोमेन: पण लिओनार्ड फारसा हुशार नाही.

*(*ती दोघांकडे तीव्र आणि थोड्या चलाख नजरेने पाहते.)

(**सर विल्फ्रिड** चौकसपणे **मेह्यू**कडे पाहतो.)

मेह्यू: (उठून आणि मध्यभागी येत, अनिच्छेने*)* तुमच्या नवऱ्याला असा कोणताही उपयोगी पुरावा आठवत नाही, किंवा तो सांगू शकत नाही.

रोमेन: मला शपथ घ्यावी लागेल, बरोबर ना—की मी सत्य बोलेन, पूर्ण सत्य, आणि फक्त सत्य? (ती थोडीशी गंमतीने म्हणते.)

सर विल्फ्रिड: हो, तीच शपथ घ्यावी लागते.

रोमेन: *(टेबलच्या डावीकडील खुर्चीमागे जाऊन उभी राहते; आता स्पष्टपणे उपरोधात्मक पद्धतीने)* आणि समजा, मग तुम्ही मला विचारलंत— *(ती पुरुषाच्या आवाजाची नक्कल करते)* "त्या रात्री लिओनार्ड व्होल कधी घरी आला?" — आणि मी म्हटलं...

सर विल्फ्रिड: बरं?

रोमेन: मी खूप गोष्टी सांगू शकते.

सर विल्फ्रिड: हो?

मेह्यू: *(*टेबलजवळ डाव्या खुर्चीवर बसतो) आपण तिला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात बसवलं तर काय होईल?

सर विल्फ्रिड: *(*मंचाच्या मध्यभागी जातो) देव जाणे!

मेह्यू: विशेषतः जर मायर्स सरकारी वकील असेल, तर तो तिला काही वेळातच पूर्णपणे नामोहरम करेल.

सर विल्फ्रिड: जर ॲटर्नी जनरल नसेल, तर कदाचित तोच सरकारी वकील असेल.

मेह्यू: मग तुमचं धोरण काय?

सर विल्फ्रिड: नेहमीचं—जास्तीत जास्त आक्षेप घ्यायचे, सतत व्यत्यय आणायचा.

मेह्यू: मला हेच कळत नाही की तो तरुण व्होल तिच्या निष्ठेवर इतका विश्वास ठेवतो.

सर विल्फ्रिड: त्या गोष्टीवर फार भर देऊ नकोस. एखाद्या स्त्रीने ठरवले, तर

ती कोणत्याही पुरुषाला मूर्ख बनवू शकते—आणि तो तिच्या प्रेमात असेल तर

तर फारच सोपं आहे.

मेह्यू: तो तिच्या प्रेमात नक्कीच आहे. आणि तो तिच्यावर पूर्ण विश्वास ठेवतो.

सर विल्फ्रिड: मग तो मूर्खच आहे. कधीही एखाद्या स्त्रीवर विश्वास ठेवू नये.

पडदा खाली.

अंक दुसरा

दृष्य: मध्यवर्ती गुन्हेगारी कोर्ट, लंडन—ज्याला *ओल्ड बेली* म्हणून ओळखलं जातं.

सहा आठवड्यांनंतर. सकाळची वेळ.

मध्यवर्ती गुन्हेगारी कोर्टाचा जो भाग दिसतो आहे त्यामध्ये एक उंच व्यासपीठ आहे — न्यायासन — जे उजव्या खालच्या भागापासून मध्यावरील मागच्या भागापर्यंत पसरलेले आहे. त्यावर न्यायाधीश, त्यांच्या लिपिक आणि आल्डरमन [विशिष्ट सरकारी कायदेशीर विभागाचा सभासद] यांच्यासाठी हाताच्या खुर्च्या आणि टेबले आहेत. न्यायासनावर पोहोचण्यासाठी उजव्या मागच्या बाजूला कोर्टाच्या मजल्यावरून एक दार आहे. न्यायाधीशांच्या खुर्चीच्या वरील भिंतीवर राजमुकुटाचे चिन्ह आणि न्यायधर्माची तलवार लावलेली आहे. न्यायासनाच्या खाली कोर्ट लिपिक आणि श्रुतलेखकासाठी लहान टेबले आणि खुर्च्या आहेत. त्याच टेबलांच्या उजव्या बाजूला कोर्ट सेवकासाठी एक छोटे स्टूल आहे.

साक्षीदाराचा पिंजरा (witness box) हे न्यायासनाच्या मागील मध्यभागी लगेच खाली आहे. मागच्या मध्यभागी वकीलांचे वस्त्रपरिवर्तन कक्ष (Barristers' robing room) कडे जाणारे दार आहे, आणि डाव्या मागच्या मध्यभागापाशी काचेच्या फलकांनी बंद केलेले इमारतीतील इतर भागांमध्ये नेणारे दुहेरी दरवाजे आहेत. त्या दरवाज्यांदरम्यान वकीलांसाठी असलेले दोन बाक आहेत त्यांच्या खाली एक टेबल आहे ज्याभोवती तीन खुर्च्या आणि एक स्टूल आहे.

कैदी ठेवण्याची जागा (dock) डाव्या बाजूला आहे, ज्यात प्रवेश डाव्या भिंतीतील दारातून आणि वरच्या रेलिंगमधील फाटकातून होतो. तिथे लिओनार्ड आणि एक पोलीस रक्षकासाठी खुर्च्या आहेत. ज्यूरी बॉक्स उजव्या बाजूला खाली आहे, ज्यातून प्रेक्षकांना शेवटच्या तीन खुर्च्यांचे पाठीचे भागच दिसत आहेत.

पडदा वर जातो, कोर्ट सुरू झाले आहे.
न्यायाधीश **मिस्टर जस्टिस वेनराइट** यांनी आपली जागा घेतली आहे. त्यांच्या उजव्या बाजूला कोर्ट लिपिक आणि डाव्या बाजूला आल्डरमन बसले आहेत. कोर्ट लिपिक आणि श्रुतलेखक न्यायासनाच्या खाली त्यांच्या जागांवर आहेत.

सरकारी वकील असलेले, मिस्टर मायर्स, क्यू.सी. उजव्या समोरच्या वकीलांच्या पहिल्या रांगेत बसले आहेत आणि त्यांच्या डाव्या बाजूला त्यांचे सहाय्यक आहेत. बचाव पक्षाचे वकील **सर विल्फ्रिड** डाव्या बाजूला बसले आहेत आणि त्यांच्या उजव्या बाजूला त्यांचे सहाय्यक आहेत.

चार वकील — त्यापैकी एक महिला — मागच्या रांगेत बसले आहेत. **लिओनार्ड** कैद्याच्या पिंजऱ्यात उभा आहे, आणि रक्षक त्याच्या बाजूला आहे. **डॉ. वायट** टेबलच्या उजव्या बाजूच्या स्टूलवर बसले आहेत. **इन्स्पेक्टर** टेबलच्या उजव्या टोकावरच्या खुर्चीत आहे. **मॅथ्यु** टेबलच्या डाव्या बाजूला बसले आहेत. एक पोलीस दुहेरी दरवाज्याजवळ उभा आहे.

ज्यूरीचे तीन सदस्य दिसत आहेत — एक पुरुष (फोरमन), एक स्त्री, आणि एक पुरुष. **कोर्ट सेवक** (सध्या उभी **असलेली महीला ज्यूरी सदस्याला**

शपथ देत आहे. **महिला ज्यूरी सदस्य.** *(*बायबल आणि शपथपत्र कार्ड हातात घेऊनउभ्या आहेत.)
"...महाराणी आणि या न्यायालयात असलेल्या कैद्याबाबत मी पुराव्यानुसार खरे आणि न्याय्य निर्णय देईन,." *(*ती बायबल आणि शपथपत्र कार्ड सेवकाला परत देते आणि बसते.)

*(*सेवक बायबल आणि कार्ड फोरमनकडे देतो.)

फोरमन. (उठतो) "मी सर्वशक्तिमान परमेश्वराची शपथ घेतो की मी महाराणी आणि या न्यायालयातील कैद्याबाबत , पुराव्यानुसार योग्य आणि सत्य निर्णय देईन." *(*तो बायबल आणि शपथपत्र कार्ड सेवकाला परत देतो आणि बसतो.)

*(*सेवक बायबल आणि कार्ड ज्यूरी बॉक्सवरील शेल्फवर ठेवतो आणि उजव्या स्टूलावर बसतो.)

कोर्ट लिपिक. *(*उठतो) "लिओनार्ड व्होल, आपल्यावर १४ ऑक्टोबर रोजी लंडन शहरात एमिली जेन फ्रेंच यांचा खून केल्याचा आरोप आहे. काय म्हणता, लिओनार्ड व्होल, आपण दोषी आहात की नाही?"

लिओनार्ड. "मी दोषी नाही."

कोर्ट लिपिक: "ज्यूरी सदस्यांनो, आरोपीवर १४ ऑक्टोबर रोजी एमिली जेन फ्रेंच

यांचा खून केल्याचा आरोप आहे. या आरोपावर त्याने 'मी दोषी नाही' अशी कबुली दिली आहे. आता तुम्ही साक्षी-पुरावे ऐकल्यानंतर ठरवायचे आहे की

तो दोषी आहे की नाही."
(तो **लिओनार्ड**ला बसण्याची खूण करतो आणि स्वतःची जागा घेतो.)
(**लिओनार्ड** आणि **पोलीस रक्षक** बसतात. **मायर्स** उभे राहतात.)

न्यायाधीश: "थांबा, मिस्टर मायर्स."
(**मायर्स** न्यायाधीशांकडे मान झुकवून बसतात.)
(न्यायाधीश ज्यूरींकडे वळतात.)
"ज्यूरी सदस्यांनो, साक्षी-पुरावे ऐकून झाल्यावर मी कायद्याच्या अनुषंगाने

तुम्हाला मार्गदर्शन करतो आणि साक्षींचा सारांश सांगतो, तीच खरी योग्य वेळ असते. पण या खटल्याविषयी वर्तमानपत्रांमध्ये बऱ्यापैकी प्रसिद्धी झालेली असल्यामुळे मी तुम्हाला एक गोष्ट आता सांगू इच्छितो.

तुमच्यापैकी प्रत्येकाने शपथ घेतली आहे की तुम्ही हा खटला फक्त साक्षींवरच आधारित ठरवाल. म्हणजे, आता जे काही साक्षीपुरावे तुमच्या समोर मांडले जातील त्यावर. तुम्ही पूर्वी ऐकलेले किंवा वाचलेले काहीही या निर्णयात गृहीत धरू नये. न्यायालयाच्या चार भिंतींच्या आत जे काही होईल तेच तुमच्यासमोरचं सत्य असायला हवं. कोणताही पूर्वग्रह, कोणतंही मत, कोणतीही सहानुभूती किंवा द्वेष—हे सर्व तुम्ही बाजूला ठेवायला हवं. मला खात्री आहे की तुम्ही तुमचं कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडाल."
"हो मिस्टर मायर्स, पुढे चालू ठेवा."

(**मायर्स** उभे राहतात, घसा साफ करतात, आणि आपला केसांचा टोप (विग) जरा

नीटनेटका करतात—पूर्वीच्या दृष्यात सर विलिफ्रड यांनी ज्या प्रकारे नक्कल

केली होती त्या पद्धतीने.)

मायर्स: "माय लॉर्ड, तुमच्या परवानगीने...ज्यूरी सदस्यांनो, या खटल्यात मी आणि माझे सहकारी **मिस्टर बार्टन** हे सरकारी पक्षाचं प्रतिनिधित्व करत आहोत. तर बचाव पक्षात माझे सन्माननीय सहकारी **सर विल्फ्रिड रोबर्ट्स** आणि **मिस्टर ब्रोगन-मूर** आहेत.

हा खटला खुनाचा आहे. घटनाक्रम सोपा आहे आणि एका विशिष्ट बिंदूपर्यंत वादविवादही नाही.

तुम्ही ऐकाल की आरोपी — एक तरुण आणि, कदाचित, आकर्षक दिसणारी व्यक्ती — याची ओळख **मिस एमिली फ्रेंच** या छप्पन्न वर्षीय महिलेशी झाली. ती त्याच्याशी सौजन्याने आणि प्रेमभावाने वागली. त्या प्रेमभावनेचं नेमकं स्वरूप काय होतं, हे तुम्ही स्वतः ठरवा.

डॉ. वायट सांगतील की त्यांच्या मते मृत्यू १४ ऑक्टोबरच्या रात्री साडेनऊ ते दहा या वेळेत घडला.
तुम्ही **जेनेट मॅकेंझी** हिचीही साक्ष ऐकाल — ती मिस फ्रेंचची निष्ठावान आणि प्रेमळ गृहसेविका होती.
१४ ऑक्टोबर — तो शुक्रवार होता — हा तिचा घराबाहेर जाण्याचा दिवस होता. पण त्या दिवशी ती नऊ वाजून पंचवीस मिनिटांनी काही क्षणांसाठी परत आली. तिने तिच्याकडे असलेल्या चावीनं दार उघडलं आणि वरच्या मजल्यावर आपल्या खोलीकडे जाताना तिने बैठक खोलीजवळून जाताना त्या खोलीतून आवाज ऐकले.

ती सांगेल की तिला **मिस फ्रेंच** आणि **आरोपी लिओनार्ड व्होल** यांचे

आवाज ऐकू आले."

लिओनार्ड: *(*उठून ओरडतो) "ते खोटं आहे! तो मी नव्हतो!"

(**पोलीस रक्षक** त्याला थांबवतो आणि परत बसवतो.)

मायर्स: "जेनेट मॅकेंझीला आश्चर्य वाटलं, कारण तिच्या माहितीनुसार त्या दिवशी संध्याकाळी मिस फ्रेंचने लिओनार्ड व्होलेला बोलावले नव्हते.तरी ती परत बाहेर गेली. आणि जेव्हा ती रात्री अकराला परत आली तेव्हा तिला मिस एमिली फ्रेंच मृतावस्थेत सापडली. खोली अस्ताव्यस्त होती, एक खिडकी तुटलेली होती, आणि पडदे जोरात फडफडत होते. घाबरून गेलेल्या जेनेट मॅकेंझीने तात्काळ पोलिसांना फोन केला.हे सांगणं गरजेचं आहे की आरोपीला २० ऑक्टोबर रोजी अटक करण्यात आली.

अभियोजन पक्षाचा दावा असा आहे की मिस एमिली जेन फ्रेंच यांचा खून १४ ऑक्टोबरच्या रात्री साडेनऊ ते दहा या वेळेत एका लोखंडी बारने डोक्यावर प्रहार करून करण्यात आला, आणि तो प्रहार आरोपीनेच केला.

आता मी इन्स्पेक्टरला बोलावतो..."

(इन्स्पेक्टर उभा राहतो. ज्याचा तो या दृष्यात अनेक वेळा संदर्भ घेतो, ती कागदपत्रांची एक फाइल त्याच्या हातात असते, तो एक टाईप केलेला कागद लिपिकाला आणि दुसरा लघुलेखकाला देतो. त्यानंतर तो साक्षीदाराच्या पिंजऱ्यात जातो. लिपिक तो कागद न्यायाधीशांना देतो. दारवान उठतो, रेषा

ओलांडतो आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्याजवळ उभा राहतो. इन्स्पेक्टर साक्षीदाराच्या पिंजऱ्याच्या कडेवरून शपथपत्र आणि बायबल उचलतो.)

इन्स्पेक्टर: "मी सर्वशक्तिमान परमेश्वराची शपथ घेतो, की मी जी साक्ष देणार

आहे ती सत्य असेल, संपूर्ण सत्य असेल आणि फक्त सत्यच असेल. रॉबर्ट हेर्न, डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर, क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन डिपार्टमेंट, न्यू स्कॉटलंड यार्ड."
(तो बायबल आणि शपथपत्र साक्षीदाराच्या पिंजऱ्याच्या कडेला ठेवतो.)

(दारवान रेषा ओलांडून परत आपल्या स्टूलवर बसतो.)

मायर्स: "इन्स्पेक्टर हर्न, १४ ऑक्टोबरच्या संध्याकाळी आपली ड्युटीवर

असताना आपल्याला आपत्कालीन कॉल मिळाला होता का?"

इन्स्पेक्टर: "हो सर."

मायर्स: "त्यानंतर आपण काय केलं?"

इन्स्पेक्टर: "सार्जंट रँडेलसह मी २३, ॲशबर्न ग्रोव्ह येथे गेलो. मला घरात प्रवेश देण्यात आला आणि मी खात्री केली की त्या घरात राहणारी व्यक्ती—जिची ओळख मी नंतर मिस एमिली फ्रेंच अशी केली—ती मृत होती. ती पोटावर पडलेली होती आणि तिच्या डोक्याच्या मागच्या बाजूला तीव्र इजा झाली होती. खिडकी उघडण्याचा प्रयत्न कोणत्या तरी हत्याराने—कदाचित चाकूने—झालेला होता. बिजागरीजवळ खिडकी तुटलेली होती. काचेचे

तुकडे खोलीत सर्वत्र पडलेले होते आणि खिडकीबाहेर जमिनीवरही मला नंतर काचांचे तुकडे सापडले."

मायर्स: "खिडकीच्या आत आणि बाहेर काच सापडणं याचा काही विशेष अर्थ होतो का?"

इन्स्पेक्टर: "खिडकीच्या बाहेर सापडलेली काच ही बाहेरून खिडकी तोडली गेली असती तर जशी असावी तशी नव्हती."

मायर्स: "म्हणजे असं म्हणायचं का की खिडकी आतून फोडून ती बाहेरून फोडल्यासारखी भासवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता?"

सर विल्फ्रिड: *(*उठून) "मी आक्षेप घेतो. माझ्या सन्माननीय सहकाऱ्यांनी

साक्षीदाराच्या तोंडात शब्द घुसवले आहेत. त्यांनी पुराव्याच्या नियमांचं पालन केलं पाहिजे."
(ते बसतात.)

मायर्स: (इन्स्पेक्टरकडे पाहून) "आपण याआधी चोरी आणि घरफोडीच्या अनेक प्रकरणांवर काम केलं आहे का?"

इन्स्पेक्टर: "हो सर."

मायर्स: "आपल्या अनुभवात खिडकी जर बाहेरून फोडली गेली असेल, तर काचा कुठे सापडतात?"

इन्स्पेक्टर: "आतमध्ये."

मायर्स: "इतर कोणत्याही प्रकरणात, जेथे खिडक्या बाहेरून फोडण्यात आल्या होत्या, आपण खिडकीच्या बाहेर, काही अंतरावर, जमिनीवर काच सापडलेली पाहिली आहे का?"

इन्स्पेक्टर: "नाही."

मायर्स: "नाही. पुढे सांगा."

इन्स्पेक्टर: "संपूर्ण परिसराची झाडाझडती घेतली गेली, फोटो काढण्यात आले, ठसे घेतले गेले."

मायर्स: "आपल्याला कोणते ठसे सापडले?"

इन्स्पेक्टर: "मिस एमिली फ्रेंच यांचे स्वतःचे ठसे, जेनेट मॅकेंझी यांचे ठसे, आणि काही ठसे जे नंतर तपासात आरोपी लिओनार्ड व्होल यांचे असल्याचं निष्पन्न झालं."

मायर्स: "इतर कोणी नाही?"

इन्स्पेक्टर: "इतर कोणी नाही."

मायर्स: "आपण नंतर लिओनार्ड व्होल यांची चौकशी केली होती का?"

इन्स्पेक्टर: "हो सर. जेनेट मॅकेंझी त्याचा पत्ता सांगू शकली नाही. पण एका फोननंतर आणि वृत्तपत्रातून केलेल्या आवाहनानंतर मिस्टर लिओनार्ड व्होल स्वतः माझ्याकडे आले."

मायर्स: "२० ऑक्टोबर रोजी जेव्हा त्याला अटक करण्यात आली, तेव्हा त्याने काय सांगितलं?"

इन्स्पेक्टर: "त्याने उत्तर दिलं, 'ठीक आहे. मी तयार आहे."

मायर्स: "आता इन्स्पेक्टर, आपण म्हणता की खोलीची अवस्था अशी होती की जणू चोरी झाली होती?"

सर विल्फ्रिड: *(*उठून) "इन्स्पेक्टरने तसं काही म्हटलंच नाही. (न्यायाधीशांकडे वळून) आपल्या जज्जना आठवत असेल, की ती एक कल्पना माझ्या मित्राने मांडली होती—तीही योग्य रीतीने नव्हे—ज्यावर मी आक्षेप घेतला होता."

न्यायाधीश: "आपण अगदी बरोबर आहात, सर विल्फ्रिड."

(**मायर्स बसतात.**)

याच वेळी, मी याबाबत निश्चितपणे सांगू शकत नाही की इन्स्पेक्टरला अशा गोष्टींचा पुरावा देण्याचा अधिकार नाही का, ज्या दाखवू शकतात की खोलीतील गोंधळ हा बाहेरून चोरीसाठी आलेल्या एखाद्या व्यक्तीने केला नव्हता.

सर विल्फ्रिड: "माय लॉर्ड, आपल्या माननीय जज्ज यांनी जे सांगितले त्याच्याशी मी आदरपूर्वक सहमत आहे. — हो. पण अशी मते नव्हेत, ज्यामागे कोणतीही तथ्ये नाहीत, किंवा ज्या आधारावर ती मतं आहेत ती

माहितीही नाहीत."
(ते बसतात.)

मायर्स: (उठून) "कदाचित, माय लॉर्ड, मी माझा प्रश्न थोड्या वेगळ्या पद्धतीने विचारल्यास माझे मित्र समाधानी होतील.
इन्स्पेक्टर: आपण आपल्या निरीक्षणावरून सांगू शकता का की घरात बाहेरून कोणीतरी खरोखरच जबरदस्तीने शिरले होते की नव्हते?"

सर विल्फ्रिड: *(उठून)* "माय लॉर्ड, मला माझा आक्षेप कायम ठेवावा लागेल. माझे सन्माननीय मित्र पुन्हा एकदा या साक्षीदाराकडून मत मांडून घेण्याचा प्रयत्न करत आहेत."
(ते बसतात.)

न्यायाधीश: "हो. मिस्टर मायर्स, मला वाटतं आपण यापेक्षा थोडं चांगलं करू शकता."

मायर्स: "इन्स्पेक्टर, आपल्याला अशा कोणत्या गोष्टी सापडल्या की ज्या

बाहेरून जबरदस्तीने घरात शिरल्याच्या शक्यतेशी विसंगत होत्या?"

इन्स्पेक्टर: "फक्त काचा, सर."

मायर्स: "इतर काही नाही?"

इन्स्पेक्टर "नाही सर, काहीच नाही."

न्यायाधीश: "मिस्टर मायर्स, असं वाटतं की इथे आपल्याला फारसं काही मिळालं नाही."

मायर्स: "मिस फ्रेंच काही मौल्यवान दागिने घालून होत्या का?"

इन्स्पेक्टर: "हो सर, त्या डायमंडचा ब्रुच, दोन डायमंड रिंग्ज घालून होत्या — अंदाजे नव्वदशे पौंड किंमतीचे."

मायर्स: "आणि ते तसेच ठेवले गेले?"

इन्स्पेक्टर: "हो सर."

मायर्स: "म्हणजे खरोखर काहीतरी चोरलं गेलं होतं का?"

इन्स्पेक्टर: "जेनेट मॅकेंझीच्या म्हणण्यानुसार, काहीही गायब नव्हतं."

मायर्स: "आपल्या अनुभवात, जेव्हा कोणी घरात शिरून चोरी करतो, तेव्हा ते काहीही न चोरता जातात का?"

इन्स्पेक्टर: "जर त्यांना कोणी अडवलं नाही तर नाही, सर."

मायर्स: "पण या प्रकरणात, चोर अडवला गेला होता असं वाटत नाही."

इन्स्पेक्टर: "नाही सर."

मायर्स: "इन्स्पेक्टर, आपण एक जॅकेट सादर करता का?"

इन्स्पेक्टर: "हो सर."

(दारवान उठतो, टेबलजवळ जातो, जॅकेट उचलतो आणि इन्स्पेक्टरकडे देतो.)

मायर्स: "हेच ते?"

इन्स्पेक्टर: "हो सर."
(तो ते जॅकेट दारवानाकडे परत देतो.)

(दारवान **ते जॅकेट परत टेबलावर ठेवतो.**)

मायर्स: "ते आपल्याला कुठे सापडलं?"

इन्स्पेक्टर: "ते मला आरोपीच्या फ्लॅटमध्ये त्याला अटक केल्यानंतर काही वेळाने सापडलं. नंतर मी ते श्री. क्लेग यांच्याकडे लॅबमध्ये रक्ताचे डाग आहेत का हे तपासण्यासाठी दिलं."

मायर्स: "शेवटी, इन्स्पेक्टर, आपण मिस फ्रेंचचे मृत्युपत्र सादर करता का?"

(दारवान टेबलावरून मृत्युपत्र उचलतो आणि देतो...)

(दारवान मृत्युपत्र इन्स्पेक्टरकडे देतो.)

इन्स्पेक्टर: "हो सर."

मायर्स: "तारीख आठ ऑक्टोबरची आहे ना?"

इन्स्पेक्टर: "हो सर."
(तो **मृत्युपत्र** दारवानाकडे परत देतो.)

(दारवान मृत्युपत्र परत टेबलावर ठेवतो, मग आपली जागा घेतो.)

मायर्स: "काही विशिष्ट देणग्यांनंतर, उर्वरित संपत्ती आरोपीस देण्यात आली आहे?"

इन्स्पेक्टर: "होय, सर."

मायर्स: "आणि त्या संपत्तीची निव्वळ किंमत किती आहे?"

इन्स्पेक्टर: आत्ताच्या अंदाजानुसार, सुमारे पंच्याऐंशी हजार पौड्स."

(मायर्स आपली जागा घेतो. सर विल्फ्रिड उठतो.)

सर विल्फ्रिड: "आपण म्हणता की त्या खोलीत फक्त तीन व्यक्तींचेच बोटांचे ठसे आढळले —

मिस फ्रेंच, आरोपी लिओनार्ड व्होल, आणि जेनेट मॅकेंझी. आपल्या अनुभवात, जेव्हा एखादा चोर जबरदस्तीने घरात घुसतो, तेव्हा तो सहसा बोटांचे ठसे ठेवतो का, की हातमोजे घालतो?"

इन्स्पेक्टर: "तो हातमोजे घालतो."

सर विल्फ्रिड: "नेहमीच?"

इन्स्पेक्टर: "बहुतेक वेळा, सर."

सर विल्फ्रिड: "म्हणजेच चोरीच्या प्रकरणात हाताचे ठसे नसणं हे आपल्याला विशेष आश्चर्यकारक वाटत नाही?"

इन्स्पेक्टर: "नाही, सर."

सर विल्फ्रिड: "आता, खिडकीवरील या चाकूच्या खुणा — त्या खिडकीवर होत्या का—"

सर विल्फ्रिड "चाकूच्या खुणा या खिडकीच्या आतल्या भागावर होत्या का बाहेरच्या?"

इन्स्पेक्टर: "बाहेरच्या भागावर, सर."

सर विल्फ्रिड: "म्हणजेच त्या खुणा केवळ बाहेरून जबरदस्तीने घरात घुसण्याच्या प्रयत्नाशी सुसंगत आहेत, बरोबर?"

इन्स्पेक्टर: "तो माणूस आधी घरात असू शकतो आणि नंतर बाहेर जाऊन त्या खुणा करू शकतो, सर — किंवा त्याने त्या आतूनही केलेल्या असू शकतात."

सर विल्फ्रिड: "आतून? इन्स्पेक्टर, ते तो कसा काय करू शकतो?"

इन्स्पेक्टर: "तिथे दोन खिडक्या एकमेकांच्या शेजारी आहेत. दोन्ही 'केसमेंट' प्रकाराच्या आहेत, आणि त्यांचे कॅचेस अगदी जवळ आहेत. खोलीतल्या कोणालाही एका खिडकीतून बाहेर वाकून दुसऱ्या खिडकीचा कॅच जबरदस्तीने उघडणे सहज शक्य आहे."

सर विल्फ्रिड: "मला सांगा, त्या घरात किंवा आरोपीच्या फ्लॅटमध्ये तुम्हाला कुठे चाकू सापडला का?"

इन्स्पेक्टर: "हो सर, आरोपीच्या फ्लॅटमध्ये एक चाकू सापडला."

सर विल्फ्रिड: "असं वाटतं?"

इन्स्पेक्टर: "पण तो खिडकीवरच्या खुणांशी जुळत नव्हता."

सर विल्फ्रिड: "१४ ऑक्टोबरच्या रात्री वारा जोरात होता, बरोबर?"

इन्स्पेक्टर: "मला नक्की आठवत नाही, सर."
(तो आपल्या नोंदी पाहतो.)

सर विल्फ्रिड: "माझ्या सहकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, जेनेट मॅकेंझी म्हणाली, की पडदे उडत होते. कदाचित तुम्ही स्वतःही ते पाहीलं असेल?"

इन्स्पेक्टर: "हो सर, पडदे खरोखरच उडत होते."

सर विल्फ्रिड: "म्हणजेच त्या रात्री वारा जोरात होता हे सूचित होतं. मी असं सुचवतो की, जर एखाद्या चोराने खिडकी बाहेरून उघडली आणि ती परत ढकलली, तर सैल झालेली काच बाहेर पडली असती — विशेषतः जर वाऱ्यामुळे खिडकी जोरात परत उघडली गेली असती. हे शक्य आहे ना?"

इन्स्पेक्टर: "हो सर.

सर विल्फ्रिड: "आपल्याला हे दुर्दैवाने मान्य करावं लागेल की सध्या हिंसक

गुन्ह्यांची संख्या वाढली आहे, बरोबर?"

इन्स्पेक्टर: "थोडीशी सरासरीपेक्षा जास्त आहे, सर."

सर विल्फ्रिड: "चला, समजून घेऊ की काही तरुण गुंड घरात घुसले आणि त्यांचा उद्देश मिस फ्रेंचवर हल्ला करून चोरी करणे हा होता. हे शक्य आहे की, त्यातल्या एखाद्याने तिला मारहाण केली आणि ती जागीच मेली, तर ते घाबरून पळून गेले आणि काहीच घेतलं नाही? किंवा कदाचित ते फक्त रोख रकमेच्या शोधात असतील आणि दागिन्यांना हात लावायला घाबरले असतील?"

मायर्स: *(*उठून) "मी सुचवतो की, इन्स्पेक्टर हेर्न यांना अशा पूर्णपणे काल्पनिक गुन्हेगारांच्या मनात काय चाललं असावं हे सांगणं अशक्य आहे — जे अस्तित्वातही नसतील."
(तो बसतो.)

सर विल्फ्रिड: "आरोपी स्वतःहून पुढे आला आणि त्याने आपली बाजू मोकळेपणाने मांडली, बरोबर?"

इन्स्पेक्टर: "हो सर."

सर विल्फ्रिड: "आणि आरोपीने सुरुवातीपासूनच आपली निर्दोषता ठामपणे मांडली आहे, बरोबर?"

इन्स्पेक्टर: "हो सर."

सर विल्फ्रिड: (मेजावर ठेवलेल्या चाकूंकडे इशारा करत) "इन्स्पेक्टर हेर्न,

कृपया त्या चाकूची तपासणी कराल का?"

(दारवान उठतो, चाकू उचलतो आणि इन्स्पेक्टरला देतो.)

"तुम्ही हा चाकू यापूर्वी पाहिला आहे का?"

इन्स्पेक्टर: "शक्यतो पाहीला असेल."

सर विल्फ्रिड:"हा तोच चाकू आहे जो लिओनार्ड व्होलच्या फ्लॅटमधील स्वयंपाकघराच्या टेबलवरून घेण्यात आला होता आणि जो तुमच्या लक्षात आणून दिला गेला होता — जेव्हा तुम्ही प्रथमच कैद्याच्या पत्नीची भेट घेतली होती."

मायर्स: (उठून) "माझ्या लॉर्ड, कोर्टाचा वेळ वाचावा म्हणून, मी सांगतो की आम्ही मान्य करतो की हा चाकू लिओनार्ड व्होलच्या ताब्यातील आहे आणि मिसेस व्होलने इन्स्पेक्टरला तो दाखवला होता." (तो बसतो.)

सर विल्फ्रिड:"हे बरोबर आहे का, इन्स्पेक्टर?"

इन्स्पेक्टर: "हो सर."

सर विल्फ्रिड: "हा चाकू 'भाजी कापायचा फ्रेंच चाकू' म्हणून ओळखला जातो, बरोबर?"

इन्स्पेक्टर: "बहुधा तसाच आहे, सर."

सर विल्फ्रिड: "कृपया जपून, बोटाने चाकूचा धारेचा भाग तपासा."

(**इन्स्पेक्टर** चाकूची धारेची बाजू जपून तपासतो.)

"तुम्ही मान्य करता की या चाकूची धार आणि टोक दोन्ही अत्यंत तीव्र आहेत?"

इन्स्पेक्टर: "हो सर."

सर विल्फ्रिड: "आणि जर तुम्ही, उदाहरणार्थ, डुक्कर कापत असताना तुमचा

हात चुकून घसरला, तर हा चाकू खोल व्रण देऊ शकतो आणि जोरात रक्तस्राव

होईल — असं शक्य आहे ना?"

मायर्स: (उठून) "मी आक्षेप घेतो. हा विषय मताचा आहे — आणि तोसुद्धा वैद्यकीय मताचा." (तो बसतो.)

(**दारवान** चाकू **इन्स्पेक्टर**कडून घेतो, टेबलावर ठेवतो, आणि परत जागेवर बसतो.)

सर विल्फ्रिड: "ठीक आहे, मी तो प्रश्न मागे घेतो. त्याऐवजी मी तुम्हाला विचारतो, इन्स्पेक्टर — जेव्हा तुम्ही आरोपीच्या जॅकेटवरच्या डागांबाबत विचारणा केली, तेव्हा त्याने तुम्हाला आपल्या मनगटावर नुकताच भरलेला एक व्रण दाखवला आणि सांगितले की तो व्रण त्याने डुक्कर कापताना, घरगुती चाकूने झाला होता?"

इन्स्पेक्टर: त्याने तसंच सांगितलं.

सर विल्फ्रिड: "आणि हेच त्याच्या पत्नीनेसुद्धा तुम्हाला सांगितलं?"

इन्स्पेक्टर: "पहिल्यांदा सांगितलं. नंतर—"

सर विल्फ्रिड: (कडकपणे) "फक्त हो किंवा नाही, कृपया. आरोपीच्या पत्नीने तुम्हाला हा चाकू दाखवला आणि सांगितलं की तिच्या नवऱ्याने डुक्कर कापताना हा व्रण त्याच्या हाताला झाला होता?"

इन्स्पेक्टर: "हो, तिने सांगितलं."

(**सर विल्फ्रिड** परत आपल्या जागेवर बसतो.)

मायर्स: (उठून) "इन्स्पेक्टर, सर्वप्रथम त्या जॅकेटने तुमचं लक्ष कसं वेधून घेतलं?"

इन्स्पेक्टर: "त्या बाहीला नुकतेच धुतल्यासारखं वाटत होतं."

मायर्स: "आणि मग तुम्हाला त्या स्वयंपाकघरातील चाकूच्या अपघाताबाबतची गोष्ट सांगण्यात आली?"

इन्स्पेक्टर: "हो सर."

मायर्स: "आणि तुमचं लक्ष आरोपीच्या मनगटावरच्या व्रणाकडे वेधलं गेलं?"

इन्स्पेक्टर: "हो सर."

मायर्स: "समजा, हा व्रण या विशिष्ट चाकूमुळे झाला असेल, तरी हे सिद्ध होणार नाही की तो अपघात होता की मुद्दाम केला गेला होता?"

सर विल्फ्रिड: (उठून) "खरंच, माय लॉर्ड, जर माझा सहकारी स्वतःच आपल्या प्रश्नांची उत्तरं देणार असेल, तर साक्षीदाराची उपस्थिती नकोच!" (तो बसतो.)

मायर्स: (थकलेल्या स्वरात) "मी माझा प्रश्न मागे घेतो. धन्यवाद, इन्स्पेक्टर."

(**इन्स्पेक्टर** स्टँडवरून खाली उतरतो, डावीकडे वळून निघून जातो. पोलीस कर्मचारी दार बंद करतो.)

मायर्स: "डॉ. वायट."

(**डॉ. वायट** उठतो आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्यात प्रवेश करतो. त्याच्या हातात काही नोंदी असतात. **दारवान** उठतो, पुढे जातो, त्याला बायबल देतो आणि शपथेचे पत्रक धरतो.)

वायट: "सर्वशक्तिमान देवाची शपथ घेतो की मी जी साक्ष देईन, ती खरीच असेल, पूर्ण सत्य असेल आणि फक्त सत्यच असेल."

(**दारवान** बायबल आणि शपथेचे पत्रक परत घेतो.

मायर्स: "डॉ. वायट."

(**डॉ. वायट** उठतो आणि साक्षीपेटीत प्रवेश करतो. त्याच्या हातात काही नोंदी

असतात.दारवान उठतो, पुढे जातो, त्याला बायबल देतो आणि शपथेचे पत्रक धरतो.)

वायट: "सर्वशक्तिमान देवाची शपथ घेतो, की मी जी साक्ष देईन, ती खरीच असेल, पूर्ण सत्य असेल आणि फक्त सत्यच असेल."

(**दारवान** बायबल आणि शपथेचे पत्रक साक्षीदाराच्या पिंजऱ्याच्या कोपऱ्यावर ठेवतो, मग परत आपल्या जागेवर बसतो.)

मायर्स: "तुम्ही डॉ. वायट आहात?"

वायट: "हो."

मायर्स: "तुम्ही हॅम्पस्टेड विभागाशी संलग्न पोलीस सर्जन आहात?"

वायट: "हो."

मायर्स: "डॉ. वायट, कृपया पंचासमोर मिस एमिली फ्रेंचच्या मृत्यूबाबत तुम्हाला काय माहिती आहे ती सांगा."

वायट: (आपल्या नोंदी वाचत) "चौदा ऑक्टोबर रोजी रात्री अकरा वाजता मी एका मृत स्त्रीचे शव पाहिले, जी नंतर मिस फ्रेंच असल्याचे सिद्ध झाले. शवाची तपासणी केल्यानंतर मला असं वाटलं की तिचा मृत्यू डोक्यावर जोरात दिलेल्या एका आघातामुळे झाला होता, जसा एखाद्या भारी वस्तूने—उदाहरणार्थ 'जाड काठी '—ने मारलेला असतो. मृत्यू जवळजवळ तात्काळ झाला असावा.

शरीराचे तापमान व इतर घटक लक्षात घेता, मी मृत्यूचा कालावधी किमान एक तास कमाल सव्वा तास आधीचा ठरवला. म्हणजेच रात्री साडेनऊ ते दहा वाजताच्या दरम्यानचा काळ."

मायर्स: "मिस फ्रेंचने तिच्या हल्लेखोराशी झुंज दिली होती का?"

वायट: "तसा काही पुरावा नव्हता. उलट, मला असं वाटतं की तिच्यावर हल्ला पूर्णतः अनपेक्षितपणे झाला असावा."

(**मायर्स** आपल्या जागेवर बसतो.)

सर विल्फ्रिड: (उठून)"डॉक्टर, डोक्यावर नेमका कुठे हा आघात झाला होता? एकच आघात होता, बरोबर?"

वायट: "फक्त एकच. डाव्या बाजूला, 'अस्टेरिऑन' भागावर."

सर विल्फ्रिड:"माफ करा? कुठे?"

वायट: "'अस्टेरिऑन' — पेरिएटल, ऑक्सिपिटल आणि टेम्पोरल हाडांच्या संयोगाचा बिंदू."

सर विल्फ्रिड: "अहो हो… आणि सामान्य माणसांच्या भाषेत—"

वायट: डाव्या कानाच्या मागे

सर विल्फ्रिड: या आघाताच्या स्थानावरून, हा आघात डावखुऱ्या व्यक्तीने केला असावा, असं म्हणता येईल का?

वायट: असं सांगणं कठीण आहे. आघात थेट मागून केला गेला असावा असं दिसतं, कारण सूज तिरकी नसून सरळ खाली आलेली होती. मला असं वाटतं

की तो उजव्या किंवा डाव्या हाताने केला गेला, हे निश्चित सांगणं अशक्य

आहे.

सर विल्फ्रिड: आपण अजून ठरवलेलं नाही की तो आघात करणारा पुरूषच होता, डॉक्टर. पण तुम्ही हे मान्य कराल का, की आघाताच्या जागेवरून पाहता, डावखुऱ्या व्यक्तीने तो केला असण्याची शक्यता अधिक आहे?

वायट: हो, तसं असू शकतं. पण मी तरी म्हणेन की हे निश्चित सांगता येणार नाही.

सर विल्फ्रिड: जेव्हा आघात केला गेला, त्या क्षणी हातावर किंवा हाताच्या बाहेर रक्त लागले असेल का?

वायट: हो, नक्कीच.

सर विल्फ्रिड: आणि फक्त त्या हातावर किंवा हाताच्या बाहेर?

वायट: बहुधा फक्त त्या हातावर आणि बाहेर, पण यावर निश्चित मत देणं कठीण आहे.

सर विल्फ्रिड: बरोबर आहे, डॉक्टर वायट. आता, असा आघात करण्यासाठी खूप ताकद लागली असती का?

वायट: नाही. जखमेच्या स्थितीवरून पाहता फारशी ताकद लागली नसती.

सर विल्फ्रिड: म्हणजे हा आघात एखाद्या पुरुषानेच केला असावा असं नाही. एखादी स्त्रीसुद्धा सहज करू शकली असती?

वायट: नक्कीच.

सर विल्फ्रिड: धन्यवाद. (तो बसतो.)

मायर्स: (उठून) धन्यवाद, डॉक्टर. (दारवानाकडे बघत) "जॅनेट मॅकेंझीला बोलवा."

(**वायट** स्टँडवरून खाली उतरतो, डावीकडे वर निघून जातो. **पोलीस कर्मचारी** दरवाजा उघडतो. **दारवान** उठतो आणि मध्यभागी येतो.)

दारवान: "जॅनेट मॅकेंझी."

पोलीस: (हाक मारतो) "जॅनेट मॅकेंझी."

(**जॅनेट मॅकेंझी** डावीकडून प्रवेश करते. ती उंच, कठोर चेहऱ्याची स्कॉटिश स्त्री आहे. ती जेव्हा **लिओनार्ड**कडे पाहते, तेव्हा तिच्या चेहऱ्यावर गंभीर भाव असतात.)

तेव्हा ती तिरस्कारानेच पाहते. **पोलीस कर्मचारी** दरवाजा बंद करतो. **जॅनेट** पुढे येते आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्यात प्रवेश करते.)

(**जॅनेट डाव्या हातात बायबल घेते.**)
दारवान: दुसऱ्या हातात, कृपया. (तो शपथेची पाटी पुढे करतो.)
(**जॅनेट** बायबल उजव्या हातात घेते.)
जॅनेट: सर्वशक्तिमान परमेश्वराची शपथ घेते की मी जी साक्ष देईन ते सत्य असेल, संपूर्ण सत्य आणि फक्त सत्य असेल. (ती बायबल दारवानाकडे देते.)

(दारवान बायबल आणि शपथेची पाटी साक्षीदाराच्या पिंजऱ्याच्या कडेला ठेवतो, रस्ता ओलांडतो आणि आपल्या जागी बसतो.)

मायर्स: तुमचं नाव जॅनेट मॅकेंझी आहे का?

जॅनेट: हो—तेच माझं नाव आहे.

मायर्स: तुम्ही दिवंगत मिस एमिली फ्रेंच यांच्या सोबती आणि गृह व्यवस्थापक होतात?

जॅनेट: मी त्यांच्या घराची देखभाल करायचे. मला "सोबती" वगैरे या प्रकारांचा काही उपयोग वाटत नाही—कमकुवत माणसं असतात ती, जरा सुद्धा प्रामाणिक व घरकाम करायची तयारी नसलेली.

मायर्स: हो हो, बरोबर, माझा उद्देश इतकाच होता की मिस फ्रेंच यांनी तुमच्यावर फक्त मालक आणि नोकर अशा नात्यात नव्हे, तर त्यापलीकडे विश्वास टाकला.

जॅनेट: (न्यायाधीशांकडे पाहत) वीस वर्षं मी तिच्याकडे होते आणि तिची काळजी घेतली. ती मला ओळखत होती आणि माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवत होती. कित्येक वेळा मी तिला एखादं मूर्खपणाचं पाऊल उचलण्यापासून रोखलेलं आहे!

न्यायाधीश: मिस मॅकेंझी, कृपया तुमचं म्हणणं न्यायनिर्णायक मंडळाकडे (jury) उद्देशून मांडा.

मायर्स: मिस फ्रेंच कशा स्वभावाच्या होत्या?

जॅनेट: त्या खूप दिलखुलास होत्या—कधी कधी फारच. थोड्याशा उतावळ्या होत्या. कधी कधी तर अगदी काही शहाणपण राहत नसे. कोणी थोडं कौतुक केलं की लगेच खुश व्हायच्या.

मायर्स: कैदी लिओनार्ड व्होलला तुम्ही प्रथम कधी पाहिलं?

ऑगस्ट महिन्याच्या शेवटी तो घरी आला होता, असं आठवतं.

मायर्स: तो किती वेळा घरी येत असे?

जॅनेट: सुरवातीला आठवड्यातून एकदा येत असे. पण नंतर नेहमी येऊ लागला. आठवड्यातून दोनदा किंवा कधी तीनदा सुद्धा. तिथे बसून तिचं

कौतुक करत बसायचा आणि तिच्या नवीन कपड्यांचं निरीक्षण करत — ती किती तरुण दिसते वगैरे म्हणत रहायचा.

मायर्स: (थोडं घाईत) बरं, बरं. मिस मॅकेंझी, आता तुम्ही चौदा ऑक्टोबरच्या

दिवसाबद्दल, तुमच्या शब्दांत काय घडलं ते न्यायनिर्णायक मंडळाला [ज्युरींना] सांगा.

जॅनेट: तो शुक्रवार होता --- माझा बाहेर जायचा दिवस. मी माझ्या काही मित्रमैत्रिणींना भेटायला ग्लेनिस्टर रोडवर गेले होते—ते घर तीन मिनिटांच्या अंतरावरच आहे. मी साडेसात वाजता घरातून बाहेर पडले. माझ्या मैत्रिणीला एक स्वेटर विणायचा नमुना आवडला होता, तो मी घेऊन जाणार होते. पण पोचल्यावर लक्षात आलं की तो मी मागेच विसरले. त्यामुळे रात्रीचं जेवण झाल्यावर मी सांगितलं की मी पटकन घरी जाऊन येते—साडेनऊ वाजता. मी

माझ्या चावीने दरवाजा उघडून आत गेले आणि वर माझ्या खोलीत गेले. जेव्हा मी बसायच्या खोलीच्या दरवाजाजवळून गेले, तेव्हा मी कैदी आणि मिस फ्रेंच यांना बोलताना ऐकलं.

मायर्स: तुम्हाला खात्री आहे की तो आवाज कैद्याचाच होता?

जॅनेट: हो, मला त्याचा आवाज चांगलाच ओळखतो. तो इतक्या वेळा येत होता. गोड आवाज होता त्याचा, नाही म्हणायचं काही कारण नाही. दोघं बोलत होते, हसत होते. पण ते माझ्या हातातलं नव्हतं, म्हणून मी वर गेले, नमुना घेतला, खाली आले आणि परत मैत्रिणीकडे गेले.

मायर्स: आता मला हे वेळांचे तपशील अगदी अचूक हवे आहेत. तुम्ही म्हणता की तुम्ही पुन्हा घरात गेलात तेव्हा वेळ होती नऊ वाजून पंचवीस मिनिटे.

जॅनेट: हो. मी क्लेनिस्टर रोडहून निघाले तेव्हा वेळ होती नऊ वाजून वीस मिनिटे थोडी पुढे.

मायर्स: तुम्हाला हे कसं माहीत, मिस मॅकेंझी?

जॅनेट: माझ्या मैत्रिणीच्या शेल्फवरच्या घड्याळावरून. आणि मी माझ्या

घड्याळाशी तुलना केली— दोन्ही वेळ एकच होती.

मायर्स: तुम्ही म्हणता, तिथून घरापर्यंत तीन-चार मिनिटं लागतात, म्हणजे तुम्ही नऊ वाजून पंचवीस मिनिटांनी घरात पोहोचलात. आणि तिथे तुम्ही...

जॅनेट: मी तिथे दहा मिनिटांपेक्षा कमी वेळ होते. नमुना शोधायला थोडा वेळ लागला, कारण मला आठवत नव्हतं मी तो कुठे ठेवला होता.

मायर्स: आणि मग तुम्ही पुढे काय केलं?

जॅनेट: मी परत क्लेनिस्टर रोडला मैत्रिणीकडे गेले. तिला नमुना फार आवडला, ती अगदी खूश झाली . मी तिथे अकरा वाजायला वीस मिनिटं बाकी असताना निघाले, त्यांना शुभरात्र म्हणाले आणि घरी आले. मग मी बाईसाहेबांना बघायला बसायच्या खोलीत गेले की त्यांना झोपायच्या आधी काही हवंय का.

मायर्स: काय पाहीलंत तुम्ही?

जॅनेट: त्या जमिनीवर पडलेल्या होत्या, बिचारी, डोकं फोडलेलं. आणि टेबलवरील सर्व ड्रॉवर उघडलेले, सर्व वस्तू इकडेतिकडे फेकलेल्या, एक फूलदाणी तुटून खाली पडलेली आणि पडद्यांमधून हवा येत होती.

मायर्स: मग तुम्ही काय केलं?

जॅनेट: मी पोलिसांना फोन केला.

मायर्स: तुम्हाला खरंच वाटलं की चोरी झाली आहे?

सर विल्फ्रेड: (उभा राहत) खरंच, माझी हरकत आहे, माझ्या लॉर्ड. (तो बसतो.)

न्यायाधीश: मी या प्रश्नाचं उत्तर द्यायला परवानगी देणार नाही, मिस्टर मायर्स,

तुम्ही साक्षीदाराला असा प्रश्न विचारायला नको होता.

मायर्स: मग मी तुम्हाला हे विचारतो, मिस मॅकेंझी. तुम्ही पोलिसांना फोन केल्यानंतर काय केलं?

जॅनेट: मी घरभर शोध घेतला.

मायर्स: कशासाठी?

जॅनेट: एखादा घुसखोर आहे का ते पाहण्यासाठी.

मायर्स: काही सापडलं?

जॅनेट: नाही. आणि कोणतीही गडबड झाल्याची किंवा झगड्याची खूण नव्हती—फक्त बसायच्या खोलीतच तसे होते.

मायर्स: तुम्हाला कैदी लिओनार्ड व्होलबद्दल किती माहिती होती?

जॅनेट: मला माहीत होतं की त्याला पैशांची गरज होती.

मायर्स: त्याने मिस फ्रेंचकडे पैसे मागितले का?

जॅनेट: तो इतका मूर्ख नव्हता.

मायर्स: मिस फ्रेंच यांना त्यांच्या व्यवहारांमध्ये—जसं की आयकर भरताना—त्याने मदत केली का?

जॅनेट: हो—पण त्याची काही गरज नव्हती.

मायर्स: "गरज नव्हती" म्हणजे काय?

जॅनेट: मिस फ्रेंच यांना व्यवहाराची चांगली, स्पष्ट समज होती.

मायर्स: मिस फ्रेंच यांनी त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचं धन कसं वाटावं यासाठी काही व्यवस्था केली होती, याची तुम्हाला माहिती होती का?

जॅनेट: त्या आपल्या मनासारखं वेळोवेळी मृत्युपत्र करायच्या. त्या श्रीमंत होत्या आणि त्यांच्या जवळ खूप पैसा होता आणि जवळचे नातेवाईक कोणीच नव्हते. "जिथे त्याचा उपयोग होईल,तिथे तो जावा" असं त्या म्हणायच्या. एकदा त्यांनी तो पैसा अनाथ मुलांसाठी ठेवला होता, एकदा वृद्धाश्रमासाठी, आणि एकदा मांजरं आणि कुत्र्यांसाठी औषध केंद्रासाठी. पण शेवटी नेहमी असंच व्हायचं—त्यांचं त्या लोकांशी भांडण व्हायचं आणि मग त्या घरी येऊन मृत्युपत्र फाडून टाकायच्या आणि नवे तयार करायच्या.

मायर्स: तुम्हाला माहीत आहे का की त्यांनी शेवटचे मृत्युपत्र केव्हा केले?

जॅनेट: आठ ऑक्टोबरला. मी ऐकलं होतं त्यांनी मिस्टर स्टोक्स—वकील—यांच्याशी बोलताना सांगितलं, "उद्या या, मी नवे मृत्युपत्र करणार आहे." त्या वेळी कैदी तिथेच होता—म्हणजे लिओनार्ड व्होल. थोडा विरोध करत होता—म्हणत होता, "नको, नको."

(लिओनार्ड घाईने एक चिठ्ठी लिहितो.)

आणि मालकीणबाई म्हणाल्या, "पण मला करायचंय, बाळा. आठव तू, त्यादिवशी मी जवळजवळ बसखाली येणार होते. कधीही काहीही होऊ शकतं."

(लिओनार्ड कडेला झुकून चिठ्ठी मेह्यूकडे देतो, जो ती सर विल्फ्रेडकडे पास करतो.)

मायर्स: त्याआधी त्यांनी शेवटचे मृत्युपत्र कधी केले होते हे तुम्हाला माहीत आहे का?

जॅनेट: वसंत ऋतुत केले होते.

मायर्स: मिस मॅकेंझी, तुम्हाला माहीत होतं का की लिओनार्ड व्होल विवाहित होता?

जॅनेट: अजिबात नाही. मालकीणबाईलाही माहीत नव्हतं.

सर विल्फ्रेड: (उठत) माझा आक्षेप आहे. मिस फ्रेंच यांना काय माहीत होतं किंवा नव्हतं, हे जॅनेट मॅकेंझीचा केवळ तर्क आहे. (तो बसतो.)

मायर्स: तर हे असं म्हणूया—तुम्हाला असं वाटत होतं की मिस फ्रेंच यांना लिओनार्ड व्होल अविवाहित वाटत होता. या मताला आधार देणारे काही ठोस पुरावे आहेत का?

जॅनेट: त्यांनी लायब्ररीतून मागवलेली पुस्तकं. 'बारोनेस वुर्देट कुट्स' यांचं

चरित्र आणि दुसरं डिझायली आणि त्याच्या पत्नीबद्दल. दोन्ही अशा स्त्रियांबद्दल ज्यांनी आपल्यापेक्षा अनेक वर्षांनी लहान पुरुषांशी लग्न केलं होतं. मला माहीत होतं, त्या काय विचार करत आहेत.

न्यायाधीश: मला भीती आहे की आपण हे स्वीकारू शकत नाही.

जॅनेट: का?

न्यायाधीश: ज्युरी सदस्यांनो, एखाद्या स्त्रीने डिझायलीचं चरित्र वाचणं म्हणजे तिने आपल्यापेक्षा लहान पुरुषाशी लग्न करण्याचा विचार केला आहे, असं समजणं योग्य नाही.

मायर्स: मिस्टर व्होल यांनी कधी त्यांच्या पत्नीचा उल्लेख केला होता का?

जॅनेट: कधीच नाही.

मायर्स: धन्यवाद. (तो बसतो.)

सर विल्फ्रेड: (उठतो. सौम्य आणि सहृदयपणे) आम्हाला हे समजतं की तुम्ही तुमच्या मालकीणबाईंवर खूप प्रेम करत होतात.

जॅनेट: हो—खरंच.

सर विल्फ्रेड: त्यांच्यावर तुमचा मोठा प्रभाव होता?

जॅनेट: हो—कदाचित.

सर विल्फ्रेड: मिस फ्रेंच यांनी गेल्या वसंतात जे मृत्युपत्र केलं होतं—म्हणजे

त्यांच्या शेवटच्या मृत्युपत्रात—तुमच्यासाठी जवळजवळ पूर्ण संपत्ती ठेवली होती. तुम्हाला हे माहीत होतं का?

जॅनेट: तिनेच मला सांगितलं होतं. "ही जी धर्मादाय संस्था आहेत ना, सगळे फसवे लोक असतात," ती म्हणाली होती. "इथे खर्च, तिथे खर्च, आणि ज्यासाठी पैसा दिला जातो, तिथे तो पोचतच नाही. मी तो तुला दिला आहे, जॅनेट, आणि तू जे योग्य वाटेल ते कर."

सर विल्फ्रेड: हे तिच्या प्रचंड विश्वासाचं प्रतिक होत. तिच्या सध्याच्या मृत्युपत्रात, मी असं समजतो की, तिने तुला फक्त एक वार्षिक पेन्शन ठेवले आहे. प्रमुख लाभार्थी आहे कैदी—लिओनार्ड व्होल.

जॅनेट: जर त्याने त्या पैशाला हात लावला, तर ती फार मोठी अन्यायाची गोष्ट असेल.

सर विल्फ्रेड: तुम्ही म्हणता की मिस फ्रेंच यांचे फारसे मित्र किंवा ओळखीचे कुणी नव्हते. असं का?

जॅनेट: त्या फारशा बाहेर जात नसत.

सर विल्फ्रेड: जेव्हा मिस फ्रेंच आणि लिओनार्ड व्होल यांची मैत्री वाढली, तेव्हा तुम्हाला फार त्रास झाला होता, नाही का?

जॅनेट: मला माझ्या प्रिय मालकीणबाईला कुणी फसवावं, हे सहन होत नव्हतं.

सर विल्फ्रेड: पण तुम्ही हे मान्य केलं आहे की मिस्टर व्होल यांनी त्यांना

फसवलं नव्हतं. कदाचित तुम्हाला असं वाटलं असेल, की कुणीतरी दुसरं तुमच्याऐवजी त्यांच्या मनावर प्रभाव टाकू लागलं?

जॅनेट: ती त्याच्यावर खूप अवलंबून राहू लागली होती. मला वाटायचं की हे फारच धोकादायक होतं.

सर विल्फ्रेड: म्हणजे तुमच्या वैयक्तिक दृष्टिकोनातून हे तुम्हाला अजिबात आवडत नव्हतं?

जॅनेट: अर्थातच. मी ते स्पष्टपणे सांगितलं आहे. पण मी तिच्या भल्यासाठी विचार करत होते.

सर विल्फ्रेड: म्हणजेच, कैद्याचा मिस फ्रेंच यांच्यावर खूप प्रभाव होता, आणि त्यांचं त्याच्यावर खूप प्रेम होतं?

जॅनेट: शेवटी तसंच झालं होतं.

सर विल्फ्रेड: म्हणजे, जर कधी कैद्याने तिच्याकडे पैसे मागितले असते, तर तिने त्याला नक्कीच दिले असते, नाही का?

जॅनेट: मी तसं म्हटलं नाहीये.

सर विल्फ्रेड: पण त्याला तिने कधीही पैसे दिले नाहीत?

जॅनेट: कदाचित त्याने प्रयत्न केला नसेल, असं नाही.

सर विल्फ्रेड: चौदा ऑक्टोबरच्या रात्रीच्या प्रसंगाकडे परत येऊ या. तुम्ही

म्हणता की तुम्ही कैद्याचा आणि मिस फ्रेंच यांचा संवाद ऐकला. नेमकं काय ऐकलंत?

जॅनेट: नेमकं काय बोलले ते,मी ऐकलं नाही.

सर विल्फ्रेड: म्हणजे, तुम्ही फक्त आवाज ऐकले—सामान्य बोलण्याचे सूर?

सर विल्फ्रेड: म्हणजे तुमच्या वैयक्तिक दृष्टिकोनातून हे तुम्हाला अजिबात आवडत नव्हतं?

जॅनेट: अर्थातच. मी ते स्पष्टपणे सांगितलं आहे. पण मी तिच्या भल्यासाठी विचार करत होते.

सर विल्फ्रेड: म्हणजेच, कैद्याचा मिस फ्रेंच यांच्यावर खूप प्रभाव होता, आणि त्यांचं त्याच्यावर खूप प्रेम होतं?

जॅनेट: शेवटी तसंच झालं होतं.

सर विल्फ्रेड: पण त्याला तिने कधीही पैसे दिले नाहीत?

जॅनेट: कदाचित त्याने प्रयत्न केला नसेल, असं नाही.

सर विल्फ्रेड: म्हणजे तुम्ही पुरुषाचा आणि स्त्रीचा आवाज ऐकला, आणि ते दोघं... हसत होते—बरोबर?

जॅनेट: हो.

सर विल्फ्रेड: माझं म्हणणं आहे की तुम्ही नेमकं तेच ऐकलं होतं—एका

पुरुषाचा आणि एका स्त्रीचा हसण्याचा आवाज. काय बोललं गेलं ते तुम्ही ऐकलंच नाही. मग तुम्हाला कसं वाटलं की तो पुरुषाचा आवाज लिओनार्ड व्होलचा होता?

जॅनेट: मला त्याचा आवाज अगदी ओळखीचा आहे.

सर विल्फ्रेड: दार बंद होतं, बरोबर?

जॅनेट: हो, बंद होतं.

सर विल्फ्रेड: तुम्ही बंद दरवाज्यातून फक्त आवाज ऐकले—आणि म्हणता की त्यापैकी एक आवाज लिओनार्ड व्होलचा होता. माझं म्हणणं आहे की हे फक्त तुमचं पूर्वग्रहदूषित मत आहे.

जॅनेट: तो लिओनार्ड व्होलच होता.

सर विल्फ्रेड: माझ्या समजुतीनुसार तुम्ही त्या दरवाजाजवळून दोनदा गेलात—एकदा वर तुमच्या खोलीकडे जाताना, आणि दुसऱ्यांदा बाहेर पडताना?

जॅनेट: हो, तसंच आहे.

सर विल्फ्रेड: आणि कदाचित तुम्ही तुमचा नमुना (पॅटर्न) घ्यायला आणि मैत्रिणीकडे परत जायच्या घाईत होतात?

जॅनेट: मला काही विशेष घाई नव्हती. संपूर्ण संध्याकाळ माझ्याकडे होती.

सर विल्फ्रेड: माझं म्हणणं आहे की त्या दोन्ही वेळा तुम्ही त्या दरवाजाजवळून लवकर निघून गेलात.

जॅनेट: मी तिथे पुरेसा वेळ थांबले होते—जे ऐकायला हवं होतं ते ऐकण्यासाठी.

सर विल्फ्रेड: चला, मिस मॅकेंझी, मला खात्री आहे की तुम्ही ज्यूरीसमोर असं सूचित करू इच्छित नाही की तुम्ही लपून ऐकत होतात.

सर विल्फ्रिड: मॅडम मॅकेंझीजी, आपण दोन वसीयतींबाबत साक्ष दिली आहे. जुन्या मृत्युपत्रात (जे नंतर रद्द केलं गेलं), त्यात तुम्हाला श्रीमती फ्रेंच यांच्या संपत्तीचा बहुतांश भाग मिळणार होता, नाही का?
मॅकेंझीजी**:** होय, अगदी खरे आहे.
सर विल्फ्रिड: तर नवीन मृत्युपत्रात तुम्हाला लहान प्रमाणात एक वार्षिकी (वार्षिक पेन्शन) देण्याव्यतिरिक्त, मुख्य लाभार्थी हा आरोपी लिओनार्ड व्होल आहे. जर त्याने त्या पैशाच्या एकही पेनीस हात लावला, तर तो एक भयंकर अन्याय ठरेल. तुम्ही आरोपीशी वैर ठेवण्यास अनेक कारणे असू शकतात, हे पूर्णपणे समजण्यासारखे आहे.
मॅकेंझीजी**::** मी त्याच्याशी वैर धरत नाही. तो एक आळशी आणि धूर्त माणूस आहे. तरीपण, माझे त्याच्याशी कुठलेही वैर नाही.

सर विल्फ्रिड: तुमचे प्रामाणिक बोलणे मला आवडले. आता. १४ ऑक्टोबरच्या रात्री तुम्ही म्हणता, की तुम्ही आरोपी आणि श्रीमती फ्रेंच यांना बोलताना ऐकले. तुम्हाला ते काय बोलताना ऐकू आले?

मॅकेंझीजी:: प्रत्यक्ष काय बोलले ते मी ऐकू शकले नाही.
सर विल्फ्रिड: म्हणजे तुम्ही फक्त त्यांचे आवाज ऐकलेच? आवाजांची कुजबुज? ते दोघे गुदगुल्या करत होतेच ना?
सर विल्फ्रिड: दरवाजा बंद होता, बरोबर ना? होय, अगदी खरे.
सर विल्फ्रिड: तुम्हाला नमुना आणायची घाई असल्याने तुम्ही बंद दरवाजा जवळून झटपट जात होतात. तरीही, तुम्ही खात्रीपूर्वक सांगत आहात की तुम्ही लिओनार्ड व्होलचा आवाजच ऐकला?
मॅकेंझीजी: मी तिथे पुरेसा वेळ थांबले होते, त्यामुळे जे ऐकायला मिळाले ते ऐकू शकले.

सर विल्फ्रिड: बघा, मला खात्री आहे की तुम्हाला ज्यूरीसमोर हे दाखवायचे नाही की तुम्ही दरवाजाजवळ उभे राहून त्यांचे बोलणे चुकून ऐकत होतात.
मॅकेंझीजी: आत तोच होता! दुसरा कोण असू शकणार?
सर विल्फ्रिड: तुम्हाला म्हणायचे आहे ते म्हणजे, तुम्हाला आत तोच हवा होता, त्यामुळे तुमचं मन तसंच काम करत होतं. ठीक आहे. आता सांगा, कधी संध्याकाळी मिसेस फ्रेंच रेडिओ ऐकत असे किंवा दूरदर्शन बघत असे का?
मॅकेंझीजी: हो. तिला चांगली नाटके किंवा संभाषण ऐकायला आवडायचे.
सर विल्फ्रिड: जेव्हा तुम्ही घरी परतलात आणि दाराजवळून जात होतात, तेव्हा खऱ्या अर्थाने जे तुम्ही ऐकले ते दूरदर्शनवर चालू असलेल्या एखाद्या नाटकाचे आवाज होते का? त्या रात्री दूरदर्शनवर *'लव्हर्स लीप"* नावाचं नाटक चालू होतं. खरं तर, तुम्ही ते ऐकताना एक पुरुष आणि स्त्रीची बोलणे आणि त्यांचे हसू ऐकले असेल.
मॅकेंझीजी: ते नव्हते.
सर विल्फ्रिड: अरे, कसे नाही?

मॅकेंझीजी: कारण त्या आठवड्यात दूरदर्शन दुरुस्तीसाठी बाहेर ठेवण्यात आला होता.
सर विल्फ्रिड: परंतु, तुम्ही म्हणता तुम्ही चार इंच जाड ओकच्या दरवाजाजवळून जाताना आवाज ऐकला आणि शपथपूर्वक सांगत आहात की ते कैदी लिओनार्ड व्होलचाच आवाज होता…
मॅकेंझीजी: कोण? कोण?

सर विल्फ्रिड: मॅडम मॅककेन्झी, आपण दोन वसीयतींबाबत साक्ष दिली आहे. जुन्या वसीयतीत (जी नंतर रद्द केली गेली), त्यात तुम्हाला श्रीमती फ्रेंच यांच्या संपत्तीचा बहुसंख्य भाग मिळणार होता, नाही का?
मॅकेंझीजी: होय, अगदी खरे आहे.
सर विल्फ्रिड: तर नवीन वसीयतीत तुम्हाला लहान प्रमाणात एक वार्षिकी (वार्षिक पेन्शन) देण्याबाहेर, मुख्य लाभार्थी हा आरोपी लिओनार्ड व्होल आहे. जर त्याने त्यातील एका पेनीलाही हात लावला, तर तो एक भयंकर अन्याय ठरेल. तुम्ही आरोपीशी वैर ठेवण्यास काही कारणे असू शकतात, हे पूर्णपणे समजण्यासारखे आहे.
मॅकेंझीजी: मी त्याचा वैर धरत नाही. तो एक आळशी आणि धूर्त माणूस आहे. तरीपण, माझे त्याच्याशी कुठलाही वैर नाही.
सर विल्फ्रिड: तुमचे प्रामाणिक बोलणे मनास आवडले. आता. १४ ऑक्टोबरच्या रात्री तुम्ही म्हणता की तुम्ही आरोपी आणि श्रीमती फ्रेंच यांना बोलताना ऐकले. तुम्हाला ते काय बोलताना ऐकू आले?
मॅकेंझीजी: प्रत्यक्ष काय बोलले ते मी ऐकू शकले नाही.

सर विल्फ्रिड: म्हणजे तुम्ही फक्त त्यांचे आवाज ऐकलेच? आवाजांची कुजबुज? ते दोघे हसत होते ना?

सर विल्फ्रिड: दरवाजा बंद होता, बरोबर ना?
मॅकेंझीजी: होय, अगदी खरे. (होय.)
मॅकेंझीजी: आत तोच होता! दुसरा कोण असू शकणार?
मॅकेंझीजी: हो. तिला चांगली नाटके किंवा संभाषण ऐकायला आवडायचे.
मॅकेंझीजी: कोण? कोण?

मायर्स: धन्यवाद, मिस मॅकेंझी.
जॅनेट: (न्यायाधीशांकडे पाहून) शुभ सकाळ.

(ती साक्षीदाराच्या पिंजऱ्यातून खाली उतरते आणि वरच्या डाव्या बाजूच्या दरवाजाकडे जाते.)

मायर्स: थॉमस क्लेगला बोलवा.
(पोलीस दरवाजा उघडतो.)
उशर: (उठून मध्यभागी जाऊन) थॉमस क्लेग.
पोलीस: (बाहेर मोठ्याने हाक मारतो) थॉमस क्लेग.
(जॅनेट बाहेर जाते. थॉमस क्लेग वरच्या डावीकडील दारातून प्रवेश करतो. त्याच्या हातात एक वही आहे. पोलीस दरवाजा बंद करतो. दारवान साक्षीदाराच्या पिंजऱ्यापाशी जाऊन बायबल आणि शपथपत्र उचलतो. क्लेग पुढे येतो आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभा राहून दारवानाकडून बायबल घेतो.)

क्लेग: (शपथ पाठ करून म्हणतो) मी सर्वशक्तिमान देवाची शपथ घेतो की मी जी साक्ष देईन ती खरी, पूर्ण आणि केवळ खरीच असेल.
(तो बायबल साक्षीदाराच्या पिंजऱ्याच्या कडेला ठेवतो.)

(दारवान शपथपत्र साक्षीदाराच्या पिंजऱ्याच्या कडेला ठेवतो, मग परत आपल्या जागेवर जातो.)

मायर्स: तुम्ही थॉमस क्लेग आहात का?
क्लेग: होय, साहेब.
मायर्स: तुम्ही न्यू स्कॉटलंड यार्डच्या फॉरेन्सिक प्रयोगशाळेत सहाय्यक म्हणून काम करता का?
क्लेग: हो, करतो.
मायर्स: (मेजावरच्या कोटाकडे निर्देश करत) तुम्ही हा कोट ओळखता का?
(दारवान उठतो, टेबलजवळ जाऊन कोट उचलतो.)

क्लेग: होय. तो मला इन्स्पेक्टर हेर्न यांनी दिला होता आणि मी त्यावर रक्ताचे काही अवशेष आहेत का यासाठी चाचणी केली होती.

(दारवान कोट क्लेगकडे देतो, तो तो कोट नजरेने ओळखून एकीकडे सारतो. दारवान कोट परत टेबलावर ठेवतो, परत आपल्या जागेवर जातो.)

मायर्स: तुम्ही तुमच्या निष्कर्षांबद्दल सांगाल का?

क्लेग: कोटाच्या बाह्यांचे डाग धुतले गेले होते, पण नंतर व्यवस्थित इस्त्री केलेली नव्हती. काही विशिष्ट चाचण्यांद्वारे मी सांगू शकतो की मनगटांच्या (कफच्या) भागावर रक्ताचे अवशेष होते.

मायर्स: हे रक्त एखाद्या विशिष्ट गटाचे होते का?

क्लेग: होय. (तो आपल्या वहीत पाहतो.) ते रक्त 'ओ' प्रकाराचे होते.

मायर्स: तुम्हाला तपासणीसाठी रक्ताचा नमुना दिला गेला होता का?

क्लेग: मला "मिस एमिली फ्रेंच यांचे रक्त" असे लेबल असलेला एक नमुना दिला गेला होता. त्या रक्ताचा गट देखील 'O' प्रकाराचाच होता.

(मायर्स आपल्या जागेवर बसतो.)

सर विल्फ्रेड: (उठून) तुम्ही म्हणता की कोटाच्या दोन्ही मनगटांवर रक्ताचे अवशेष होते?

क्लेग: बरोबर आहे.

सर विल्फ्रेड: मी म्हणतो की फक्त एका मनगटांवर—डाव्या मनगटावर—रक्ताचे अवशेष होते.

क्लेग: (वहीत पाहतो) हो. क्षमा करा, माझ्याकडून चूक झाली. फक्त डाव्या

मनगटावरच रक्ताचे अवशेष होते.

सर विल्फ्रेड: आणि फक्त डावी बाहीच धुतली गेली होती?

क्लेग: हो, तेच खरे आहे.

सर विल्फ्रेड: तुम्हाला माहिती आहे का की आरोपीने पोलिसांना सांगितले होते की त्याच्या मनगटाला जखम झाली होती, आणि हे रक्त त्या कोटाच्या मनगटावरील आहे?

क्लेग: हो, मला तसे समजले आहे.

(सर विल्फ्रेड आपल्या सहाय्यकाकडून एक प्रमाणपत्र घेतो.)

सर विल्फ्रेड: माझ्याकडे येथे एक प्रमाणपत्र आहे, ज्यात लिहिले आहे की लिओनार्ड व्होल उत्तर लंडन हॉस्पिटलमध्ये रक्तदाता आहे आणि त्याचा रक्तगट 'ओ' आहे. हे त्याच रक्तगटात येते, बरोबर ना?

क्लेग: होय.

सर विल्फ्रेड: म्हणजे हे रक्त त्याच्या जखमेच्या ठिकाणावरून आले असण्याची तेवढीच शक्यता आहे, बरोबर?

सर विल्फ्रेड: म्हणजे ते रक्त कैद्याच्या मनगटावरून आलेले असू शकते?

क्लेग: हो, ते बरोबर आहे.
(सर विल्फ्रेड परत आपल्या जागेवर बसतो.)

मायर्स: (उठून) 'ओ' रक्तगट फारच सामान्य असतो, नाही का?

क्लेग: 'O'? हो, नक्कीच. किमान बेचाळीस टक्के लोकांचा रक्तगट 'O' असतो.

मायर्स: रोमेन हेल्जरला पाचारण करा.

(क्लेग खाली उतरतो आणि डाव्या बाजूच्या दरवाजाकडे जातो.)

दारवान: (उठून आणि मध्यभागी येत) रोमेन हेल्जर.

पोलीस: (दरवाजा उघडतो. हाक मारतो) रोमेन हेल्जर.

(क्लेग बाहेर जातो. रोमेन डावीकडून प्रवेश करते. ती साक्षीदाराच्या पिंजऱ्याकडे जाते तेव्हा कोर्टात कुजबुज होते. पोलीस दरवाजा बंद करतो. दारवान साक्षीदाराच्या पिजऱ्याकडे जातो आणि बायबल व शपथेचा फलक उचलतो.)

दारवान**:** शांतता! (तो रोमेनला बायबल देतो आणि शपथेचा फलक धरतो.)

रोमेन: मी सर्वशक्तिमान देवाच्या नावाने शपथ घेतो की मी जी साक्ष देईन ती खरी, पूर्ण खरी आणि फक्त खरी असेल.

(दारवान बायबल आणि शपथेचा फलक साक्षीदाराच्या पिजऱ्यावर ठेवतो, आपली जागा घेतो.)

मायर्स: तुमचं नाव रोमेन हेल्जर आहे?

रोमेन: हो.

मायर्स: तुम्ही कैदी लिओनार्ड व्होलसोबत पत्नीप्रमाणे राहत होता?

रोमेन: हो.

मायर्स: तुम्ही खरंच त्याची पत्नी आहात का?

रोमेन: मी बर्लिनमध्ये त्याच्यासोबत विवाहसोहळा पार पाडला होता. पण माझा माजी पती अजूनही जिवंत आहे, त्यामुळे हा विवाह... (ती बोलता बोलता थांबते.)

मायर्स: वैध नाही.

सर विल्फ्रेड: (उठून) माय लॉर्ड, मला या साक्षीदाराने साक्ष देणं ही गोष्टच अत्यंत गंभीर आक्षेपार्ह वाटते. या साक्षीदाराचा आणि कैद्याचा विवाह झाल्याचा निर्विवाद पुरावा आहे आणि तथाकथित मागील विवाहाबद्दल कोणताही सबळ पुरावा नाही.

मायर्स: जर माझ्या मित्राने आपली नेहमीची संयमशीलता न गमावता अजून एक प्रश्न विचारायला थांबले असते, तर माय लॉर्ड, तुम्हाला या पुढच्या व्यत्ययापासून वाचता आलं असतं.
(सर विल्फ्रेड परत बसतो. तो एक दस्तऐवज उचलतो.) श्रीमती हेल्जर, हा दस्तऐवज तुमचा आणि ऑटो गर्थे हेल्जर यांच्यात अठराव्या एप्रिल, १९४६ रोजी, लाईपझिगमध्ये झालेल्या विवाहाचा दाखला आहे का?

[दारवान उठतो व लग्नाचा दाखला कारकुनाला देतो.]

रोमेन: हो, तोच आहे.

न्यायाधीश: मला तो दाखला पाहायचा आहे.

(दारवान तो दाखला लिपिकाकडे देतो, जो तो न्यायाधीशाकडे सुपूर्त करतो.)

न्यायाधीश: मला वाटतं, हा पुरावा क्रमांक चार म्हणून नमूद केला जावा.

मायर्स: हो, माय लॉर्ड, तसंच आहे.

न्यायाधीश: (दस्तऐवज पाहिल्यानंतर) मला वाटतं, सर विल्फ्रेड, ही

साक्षीदार साक्ष देण्यास सक्षम आहे.
(तो प्रमाणपत्र लिपिकाकडे परत देतो.)

(लिपिक ते दारवानाकडे देतो, जो ते मेह्यूकडे देतो. पुन्हा दारवान आपल्या जागेवर जातो. मेह्यू सर विल्फ्रेडला दाखवतो.)

मायर्स: काहीही असो, श्रीमती हेल्जर, तुम्ही ज्या व्यक्तीला तुमचे पती म्हणत होता, त्याच्याविरुद्ध साक्ष द्यायला तुम्ही तयार आहात का?

रोमेन: मी पूर्णपणे तयार आहे.

(लिओनार्ड उठतो, पाठोपाठ वॉर्डरही उठतो.)

लिओनार्ड: रोमेन! तू इथे काय करते आहेस?—तू काय बोलते आहेस?

न्यायाधीश: मला शांतता हवी आहे. तुझा वकील तुला सांगेलच, व्होल, तुला लवकरच स्वतःच्या बचावासाठी बोलण्याची संधी मिळणार आहे.

(लिओनार्ड आणि वॉर्डर परत बसतात.)

मायर्स: (रोमेनकडे) कृपया तुझ्या स्वतःच्या शब्दांत सांग, चौदाव्या ऑक्टोबरच्या संध्याकाळी काय घडलं.

रोमेन: मी संपूर्ण संध्याकाळ घरीच होते.

मायर्स: आणि लिओनार्ड व्होल?

रोमेन: लिओनार्ड साडेसात वाजता बाहेर गेला.

मायर्स: तो परत कधी आला?

रोमेन: दहा वाजून दहा मिनिटांनी.

(लिओनार्ड पुन्हा उठतो, वॉर्डरही त्याच्या मागे.)

(लिओनार्ड आणि वॉर्डर परत बसतात.)

मायर्स: (रोमेनकडे) कृपया तुझ्या स्वतःच्या शब्दांत सांग, चौदा ऑक्टोबरच्या संध्याकाळी काय घडलं?

रोमेन: मी संपूर्ण संध्याकाळ घरीच होते.

मायर्स: आणि लिओनार्ड व्होल?

रोमेन: लिओनार्ड साडेसात वाजता बाहेर गेला.

मायर्स: तो परत कधी आला?

रोमेन: दहा वाजून दहा मिनिटांनी.

(लिओनार्ड पुन्हा उठतो, वॉर्डरही त्याच्या मागे.)

लिओनार्ड: हे खरं नाही. तुला माहीत आहे, की हे खरं नाही ते…

नऊ वाजून पंचवीस मिनिटांनी मी घरी आलो.

(मेह्यु उठतो, तो लिओनार्डकडे वळतो आणि शांत राहण्याची खूण करतो.)

तुला हे सगळं बोलायला कोणी लावलंय? मला काही समजत नाही. (तो मागे सरकतो आणि चेहऱ्यावर हात ठेवतो. अर्ध्या आवाजात.) म-मला काही समजत नाही. (तो परत आपल्या जागेवर बसतो.)

(मेह्यु आणि वॉर्डर बसतात.)

मायर्स: तुम्ही म्हणालात की लिओनार्ड व्होल परत आला तो दहा वाजून दहा

मिनिटांनी? मग काय घडलं पुढे?

रोमेन: तो जोरात श्वास घेत होता, फारच अस्वस्थ होता. त्याने कोट काढून फेकला आणि बाह्या तपासल्या. मग त्याने मला सांगितलं की त्या बाह्या धुऊन टाक. त्यावर रक्त होतं.

मायर्स: तो त्या रक्ताबद्दल काही बोलला का?

रोमेन: त्याने म्हटलं, "शापित! यावर रक्त लागलंय."

मायर्स: तुम्ही काय म्हणालात?

रोमेन: मी म्हटलं, "तू काय केलं आहेस?"

मायर्स: कैद्याने त्यावर काय उत्तर दिलं?

रोमेन: त्याने म्हटलं, "मी तिला मारलं."

लिओनार्ड: (उठतो; वेडसरपणे.) हे खरं नाही, मी सांगतोय, हे खरं नाही!

(वॉर्डर उठतो आणि लिओनार्डला आवरतो.)

न्यायाधीश: कृपया स्वतःला सावरा.

लिओनार्ड: या सगळ्यात एकही शब्द खरं नाही! (तो परत बसतो.)

(वॉर्डर उभा राहतो.)

न्यायाधीश: (रोमेनकडे बघून) तुम्हाला कळतंय तुम्ही काय बोलत आहात, श्रीमती हेल्गर?

रोमेन: मी फक्त खरं बोलायचं ना?

न्यायाधीश: तुम्हाला कळलं होतं की तो कुणाबद्दल बोलतोय?

रोमेन: हो, मला माहित होतं. तीच ती म्हातारी बाई, जिच्याकडे तो वारंवार जात होता.

मायर्स: कैद्याने म्हटलं, "मी तिला मारलं."

मायर्स: मग पुढे काय झालं?

रोमेन: त्याने मला सांगितलं की मी पोलिसांना असं सांगायचं, की तो संध्याकाळभर माझ्यासोबत घरी होता. विशेषतः सांगायचं की साडेनऊ वाजता तो घरीच होता. मी त्याला विचारलं, "पोलिसांना माहिती आहे का की तू तिला मारलस?" आणि त्याने उत्तर दिलं, "नाही, त्यांना वाटेल की चोरी

झाली. पण काहीही झालं तरी लक्षात ठेव, साडेनऊ वाजता मी तुझ्याबरोबर घरी होतो."

मायर्स: आणि त्यानंतर पोलिसांनी तुमची चौकशी केली का?

रोमेन: हो.

मायर्स: त्यांनी विचारलं का की साडेनऊ वाजता लिओनार्ड व्होल तुमच्याबरोबर घरी होता का?

रोमेन: हो.

मायर्स: तुम्ही त्यांना काय उत्तर दिलं?

रोमेन: मी सांगितलं की हो, तो होता.

मायर्स: पण आता तुम्ही तुमचं म्हणणं बदललं आहे. का?

रोमेन: (आकस्मिक तावातावाने.) कारण हा खून आहे. त्याला वाचवण्यासाठी, मी सतत खोटं बोलत राहू शकत नाही. मी त्याची आभारी आहे, हो. त्याने माझ्याशी लग्न केलं आणि मला इथे या देशात आणलं. त्याने जे काही सांगितलं ते मी नेहमी केलं, कारण मी ऋणी होते.

मायर्स: कारण तुम्ही त्याच्यावर प्रेम करत होतात?

रोमेन: नाही, मी त्याच्यावर कधीच प्रेम केलं नव्हतं.

लिओनार्ड: रोमेन!

रोमेन: मी त्याच्यावर कधीच प्रेम केलं नव्हतं.

मायर्स: तुम्ही कैद्याची आभारी होता. त्याने तुम्हाला या देशात आणलं. त्याने तुम्हाला एक पुरावा द्यायला सांगितला आणि सुरुवातीला तुम्ही तयार झाला, पण नंतर तुम्हाला वाटलं की त्याने जे सांगितलं ते चुकीचं आहे?

रोमेन: हो, अगदी तसंच.

मायर्स: तुम्हाला असं का वाटलं की ते चुकीचं आहे?

रोमेन: कारण तो खून होता. मी कोर्टात येऊन खोटं बोलू शकत नाही की जेव्हा खून झाला, तेव्हा तो माझ्यासोबत होता, मी असं करू शकत नाही. मी असं करू शकत नाही.

मायर्स: मग तुम्ही काय केलं?

रोमेन: मला काय करावं हेच कळत नव्हतं. मला तुमचा देश माहिती नाही आणि मला पोलिसांची भीती वाटते. म्हणून मी माझ्या राजदूताला एक पत्र लिहिलं आणि त्यात लिहिलं की मला आणखी खोटं बोलायचं नाही. मला खरं बोलायचं आहे.

मायर्स: हेच खरं आहे — की लिओनार्ड व्होल त्या रात्री दहा वाजून दहा मिनिटांनी परत आला. त्याच्या कोटाच्या बाहींवर रक्त होतं, आणि त्याने तुम्हाला सांगितलं, "मी तिला मारलं." हे सगळं देवाशपथ खरं आहे?

रोमेन: हो, हे खरं आहे.

(मायर्स परत आपल्या जागेवर बसतो.)

सर विल्फ्रेड: (उठतो) जेव्हा कैद्याने तुमच्याशी विवाह केल्याचा देखावा केला, तेव्हा त्याला माहिती होतं का की तुमचा पहीला नवरा अजूनही जिवंत आहे?

रोमेन: नाही.

सर विल्फ्रेड: म्हणजे त्याने प्रामाणिकपणे वागणूक दिली?

रोमेन: हो.

सर विल्फ्रेड: आणि तुम्ही त्याचे फार ऋण मानत होतात?

रोमेन: हो, मी त्याची आभारी होते.

सर विल्फ्रेड: आणि तरीसुद्धा तुम्ही इथे येऊन त्याच्याविरुद्ध साक्ष दिलीत — हीच तुमची कृतज्ञता?

रोमेन: मला खरं बोलावंच लागलं.

सर विल्फ्रेड: (क्रोधाने.) खरंच का हे?

रोमेन: हो.

सर विल्फ्रेड: मी सुचवतो की चौदा ऑक्टोबरच्या रात्री, लिओनार्ड व्होल रात्री ज्या वेळी खून झाला तेव्हा साडेनऊ वाजता तुमच्याबरोबर घरी होता — . मी सुचवतो, की तुमचं हे सगळं कथन म्हणजे एक दुष्ट बनावट आहे, आणि

हेच त्याच्याविरुद्ध व्यक्त होण्याचं तुमचं कारण आहे. तुम्हाला कैद्याबद्दल काहीतरी द्वेष आहे.

रोमेन: नाही.

सर विल्फ्रेड: तुम्हाला माहिती आहे की तुम्ही शपथ घेतलेली आहे?

रोमेन: हो.

सर विल्फ्रेड: मी तुम्हाला सावध करतो, श्रीमती हेल्गर, की जर तुमचं कैद्याशी काहीही देणंघेणं नसेल, तरी स्वतःसाठी सावध राहा. खोट्या साक्षीला मोठी शिक्षा आहे.

मायर्स: (उठून मध्ये येतो) खरोखरच, माय लॉर्ड, मला माहिती नाही की या नाटकी स्फोटांचा फायदा ज्यूरीला होणार आहे की नाही, पण मी अत्यंत आदरपूर्वक नम्रपणे सांगू इच्छितो की यामध्ये…

रोमेन: नाही, मी त्याच्यावर कधीच प्रेम केलं नव्हतं.

मायर्स: तुम्ही कैद्याची आभारी होता. त्याने तुम्हाला या देशात आणलं. त्याने तुम्हाला एक पुरावा द्यायला सांगितला आणि सुरुवातीला तुम्ही तयार झाला, पण नंतर तुम्हाला वाटलं की त्याने जे सांगितलं ते चुकीचं आहे?

रोमेन: हो, अगदी तसंच.

मायर्स: तुम्हाला असं का वाटलं की ते चुकीचं आहे?

रोमेन: कारण तो खून होता. मी कोर्टात येऊन खोटं बोलू शकत नाही की तो

माझ्यासोबत होता. जेव्हा खून झाला, तेव्हा मी असं करू शकत नाही. मी असं करू शकत नाही.

मायर्स: मग तुम्ही काय केलं?

रोमेन: मला काय करावं हेच कळत नव्हतं. मला तुमचा देश माहिती नाही आणि मला पोलिसांची भीती वाटते. म्हणून मी माझ्या राजदूताला एक पत्र लिहिलं आणि त्यात लिहिलं की मला आणखी खोटं बोलायचं नाही. मला खरं बोलायचं आहे.

मायर्स: हेच खरं आहे — की लिओनार्ड व्होल त्या रात्री दहा वाजून दहा मिनिटांनी परत आला. त्याच्या कोटाच्या बाहींवर रक्त होतं, आणि त्याने तुम्हाला सांगितलं, "मी तिला मारलं." हे सगळं देवाशपथ खरं आहे?

रोमेन: हो, हे खरं आहे.

(मायर्स परत आपल्या जागेवर बसतो.)

सर विल्फ्रिड: (उठतो) जेव्हा कैद्याने तुमच्याशी विवाह केल्याचा देखावा केला, तेव्हा त्याला माहिती होतं का की तुमचा पहीला नवरा अजूनही जिवंत आहे?

रोमेन: नाही.

सर विल्फ्रिड: म्हणजे त्याने प्रामाणिकपणे वागणूक दिली?

रोमेन: हो.

सर विल्फ्रिड: आणि तुम्ही त्याचे फार आभारी होतात?

रोमेन: हो, मी त्याची आभारी होते.

सर विल्फ्रिड: आणि तरीसुद्धा तुम्ही इथे येऊन त्याच्याविरुद्ध साक्ष दिलीत — हीच तुमची कृतज्ञता?

रोमेन: मला खरं बोलावंच लागलं.

सर विल्फ्रिड: (क्रोधाने.) हे खरंच का?

रोमेन: हो.

सर विल्फ्रिड: मी सुचवतो की चौदा ऑक्टोबरच्या रात्री, लिओनार्ड व्होल साडेनऊ वाजता तुमच्याबरोबर घरी होता —

रोमेन: नाही.

मायर्स: (उठून मध्ये येतो) खरोखरच, माय लॉर्ड, मला माहिती नाही की या

नाटकी स्फोटांचा फायदा ज्यूरीला होणार आहे की नाही, पण मी अत्यंत आदरपूर्वक नम्रपणे सांगू इच्छितो की यामध्ये… ...की या साक्षीदाराने सत्याशिवाय काहीही सांगितले नाही.

न्यायाधीश: मिस्टर मायर्स, हा मृत्युदंडाचा खटला आहे, आणि विवेकाच्या

मर्यादेत मी संरक्षण पक्षाला पूर्ण मोकळीक देऊ इच्छितो. हो, सर विल्फ्रेड.

(**मायर्स** आपल्या जागेवर बसतो.)

सर विल्फ्रिड: बरं तर. तुम्ही म्हणालात — दोन्ही बाह्यांवर रक्त होतं?

रोमेन: हो.

सर विल्फ्रिड: दोन्ही बाह्यांवर?

रोमेन: मी तुम्हाला सांगितलं, तेच लिओनार्डने सांगितलं होतं.

सर विल्फ्रिड: नाही, श्रीमती हेल्गर, तुम्ही असं म्हणालात, "त्याने मला सांगितलं की बाही धुऊन टाक. त्यावर रक्त होतं."

न्यायाधीश: माझ्या टिपणातही नेमकं तेच आहे, सर विल्फ्रिड.

सर विल्फ्रिड: धन्यवाद, माय लॉर्ड. (**रोमेनकडे वळून**) म्हणजे तुम्ही असं

म्हणताय की तुम्ही दोन्ही बाह्या धुतल्या.

मायर्स: (उठतो) आता चुकीचं विधान माझ्या मित्राने केला आहे, माय लॉर्ड. या साक्षीदाराने कुठेही सांगितलं नाही की तिने दोन्ही बाही धुतल्या — अगदी एक बाही धुतली' असंही नाही सांगितलं. (तो बसतो.)

सर विल्फ्रिड: माझा मित्र बरोबर आहे. बरं, श्रीमती हेल्गर, तुम्ही बाह्या धुतल्या होत्या का?

रोमेन: मला आता आठवतंय — मी फक्त एकच बाही धुतली होती.

सर विल्फ्रिड: धन्यवाद. कदाचित तुमच्या इतर कथनांमधील आठवणही

तितकीच अविश्वसनीय असेल. मला वाटतं की तुम्ही पोलिसांना सुरुवातीला

सांगितलं होतं की रक्ताचा डाग डुक्कर कापताना झालेल्या जखमेमुळे आला होता?

रोमेन: हो, मी तसं सांगितलं. पण ते खरं नव्हतं.

सर विल्फ्रिड: मग खोटं का बोललात?

रोमेन: लिओनार्डने मला जे सांगितलं तेच मी सांगितलं.

सर विल्फ्रिड: इतकं की तुम्ही प्रत्यक्षात डुक्कर कापताना वापरलेली सुरीही पोलिसांना दाखवली?

रोमेन: जेव्हा लिओनार्डला कळलं की त्याच्यावर रक्त लागलं आहे, तेव्हा त्याने स्वतःला जखमी केलं — म्हणजे असं वाटावं, की ते रक्त त्याचंच आहे.

लिओनार्ड: (उठतो) मी असं काही केलं नाही!

सर विल्फ्रिड: (लिओनार्डला शांत करत) कृपया, कृपया...

(**लिओनार्ड** परत बसतो.)

(**रोमेनकडे वळून**) म्हणजे तुम्ही कबूल करता की तुम्ही पोलिसांना जे पहिल्यांदा सांगितलं ते सगळं खोटं होतं? तुम्ही खोटं बोलण्यात तरबेज दिसता.

रोमेन: लिओनार्डने मला जे सांगितलं तेच मी बोलले.

सर विल्फ्रिड: प्रश्न हा आहे की, तुम्ही तेव्हा खोटं बोलत होतात की आता?

रोमेन: मला लिओनार्डची भीती वाटत होती.

सर विल्फ्रेड: (लिओनार्डच्या दुःखद स्वरूपाकडे इशारा करत) तुम्हाला लिओनार्ड व्होलची भीती वाटत होती — त्या माणसाची, ज्याचं हृदय...तुम्ही आताच तोडलतं --- ज्युरी ठरवतील की तुमच्यापैकी कुणावर विश्वास ठेवायचा.

मायर्स: (उठतो) रोमेन हेल्गर, मी तुम्हाला पुन्हा एकदा विचारतो — तुम्ही दिलेली साक्ष ही सत्य आहे का, पूर्ण सत्य आणि केवळ सत्य?

रोमेन: हो, आहे.

मायर्स: माय लॉर्ड, हाच आहे फिर्यादी पक्षाचा दावा(तो बसतो.)

(**रोमेन** उभी राहते आणि डावीकडील वरच्या दरवाज्याकडे जाते. **पोलीस कर्मचारी** दरवाजा उघडतो.)

लिओनार्ड: (जशी रोमेन त्याच्याजवळून जाते.) रोमेन!

दारवान: (उठतो) शांतता!

(**रोमेन** बाहेर जाते. पोलीस कर्मचारी दरवाजा बंद करतो. दारवान परत आपल्या जागेवर बसतो.)

न्यायाधीश: सर विल्फ्रेड.

सर विल्फ्रिड: (उठतो) माय लॉर्ड, आणि ज्यूरीचे सदस्यहो, मी तुम्हाला असं म्हणणार नाही, जरी मी सहज म्हणू शकलो असतो, की कैद्याविरुद्ध कोणताही खटला नाही. एक खटला आहे — आणि तो आहे परिस्थितिजन्य पुराव्यांवर आधारित एक बळकट खटला आहे. तुम्ही पोलिसांची आणि इतर तज्ज्ञ साक्षीदारांची साक्ष ऐकली. त्यांनी त्यांच्या कर्तव्याप्रमाणे निष्पक्ष, प्रामाणिक साक्ष दिली. त्यांच्याविरुद्ध मला काहीच म्हणायचं नाही. पण दुसऱ्या बाजूला, तुम्ही जेनेट मॅकेंझी आणि स्वतःला 'रोमेन व्होल' म्हणवणाऱ्या स्त्रीची साक्ष ऐकली. तुम्हाला खरंच वाटतं का, की त्यांची साक्ष पूर्वग्रहमुक्त आहे?

जेनेट मॅकेंझी — जिला तिच्या धनाढ्य मालकीणबाईच्या इच्छापत्रातून वगळण्यात आलं, कारण तिची जागा या दुर्दैवी तरुणाने अनाहूतपणे घेतली.

(थोडा थांबतो.)

रोमेन व्होल – हेल्गर — काहीही नाव लावा — जिने आधीच लग्न झालेलं असूनही तिने हे लपवून ठेवून त्याच्याशी विवाहाचा देखावा केला. ज्याने तिच्यावर अनंत उपकार केले आहेत — जे ती कधीच फेडू शकणार नाही, अशा स्त्रीने, त्याचा उपयोग राजकीय छळापासून स्वतःला वाचवण्यासाठी केला. पण ती मान्य करते की तिचे त्याच्यावर प्रेम नव्हतं. त्याने आपली

उपयोगिता संपवली आहे. — जिला, आपण जितकं जाणतो तितकं, खोटं बोलणं हे स्वतःच्या हितासाठी वापरायचं शस्त्र आहे असं शिकवलं गेलं असावं, — त्या स्त्रीची साक्ष --- मी तुम्हाला विनंती करतो की तुम्ही तिच्या साक्षीकडे खूप सावधगिरीने पाहा

ज्यूरीचे सदस्यहो, मी आता कैद्याला बोलावतो — **लिओनार्ड व्होल.**

(दारवान उठतो आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्याकडे जातो. लिओनार्ड उठतो, पुढे जातो आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभा राहतो. वॉर्डर लिओनार्डच्या मागे उभा राहतो. दारवान बायबल उचलतो, ते लिओनार्डकडे देतो आणि शपथपत्राची पाटी वर धरतो.)

लिओनार्ड: मी सर्वशक्तिमान देवाची शपथ घेतो की मी जी साक्ष देईन ती सत्य असेल, संपूर्ण सत्य आणि केवळ सत्य.
(तो बायबल साक्षीदाराच्या पिंजऱ्याच्या कडेला ठेवतो.)

(**दारवान** शपथपत्राची पाटी साक्षीदाराच्या पिंजऱ्याच्या कडेला ठेवतो आणि टेबलाच्या उजव्या बाजूला बसतो.)

मायर्स: ती कितीही गरीब असती, तरी तू तिच्याकडे भेटायला जात राहिला असतास?

लिओनार्ड: हो, गेलो असतो.

मायर्स: तू स्वतः सध्या आर्थिक अडचणीत आहेस?

लिओनार्ड: तुम्हाला माहीतच आहे, मी आहे.

मायर्स: कृपया फक्त हो किंवा नाही असा उत्तर द्या.

न्यायाधीश: तुम्ही प्रश्नाला हो किंवा नाही असं उत्तरच दिलं पाहिजे.

लिओनार्ड: हो.

मायर्स: तू किती पगार कमावतोस?

लिओनार्ड: खरं सांगायचं तर सध्या माझ्याकडे नोकरीच नाही. काही काळापासून नाहीच आहे.

मायर्स: तुला अलीकडेच तुझ्या नोकरीतून काढून टाकलं गेलं?

लिओनार्ड: नाही, तसं नाही—मी स्वतः नोकरी सोडली.

मायर्स: जेव्हा तुला अटक झाली, तेव्हा तुझ्या बँक खात्यात किती पैसे होते?

लिओनार्ड: खरं सांगायचं तर फक्त काही पौंडच. मला काही पैसे मिळणार होते, आठवड्यात-दोन आठवड्यात.

मायर्स: किती?

लिओनार्ड: फारसे नाही.

मायर्स: माझं म्हणणं आहे की तू आर्थिकदृष्ट्या अगदी असहाय झाला होतास?

लिओनार्ड: असहाय नव्हतो. मी—मी थोडा चिंतेत होतो.

मायर्स: तुला पैशांची चिंता होती, मग तू एका श्रीमंत स्त्रीची ओळख मिळवलीस आणि ती ओळख जपण्यासाठी खूप प्रयत्न केलेस.

लिओनार्ड: तुम्ही ते सगळं फार विकृत करून सांगत आहात. मी तुम्हाला सांगतोय—मला ती खरोखरच आवडायची.

मायर्स: (उभा राहत) तू कधी कोणाकडून पैसे काढण्याचा प्रयत्न केलायस का?

लिओनार्ड: नाही.

मायर्स: मिस फ्रेंचशी ओळख झाल्यानंतर लवकरच तुला हे कळलं होतं का की ती खूप श्रीमंत आहे?

लिओनार्ड: सुरुवातीला मी तिच्याकडे गेलो तेव्हा मला माहीतच नव्हतं की ती श्रीमंत आहे.

मायर्स: पण हे लक्षात आल्यानंतर, तू तिची ओळख पुढे वाढवायचं ठरवलंस?

लिओनार्ड: बहुतेक बघायला तसंच वाटेल. पण मला ती खरोखर आवडायची, खरंच. पैशाचा त्याच्याशी काहीही संबंध नव्हता.

मायर्स: आपण ऐकलं आहे की मिस फ्रेंच तिच्या उत्पन्न कराच्या फॉर्मसाठी तुझा सल्ला घेत असे.

लिओनार्ड: हो, ती घ्यायची. तुम्हाला माहिती आहेच ते फॉर्म कसे असतात.

काही समजतच नाही त्यात—तिला तरी समजत नव्हते.

मायर्स: जॅनेट मॅकेंझीने सांगितलं आहे की मिस फ्रेंच एक उत्तम व्यावसायिक स्त्री होती, आणि स्वतःचे व्यवहार हाताळण्यास पूर्णपणे सक्षम होती.

लिओनार्ड: पण तिने तरी मला तसं काही सांगितलं नव्हतं. तिने सांगितलं होतं, की ते फॉर्म तिला खूप त्रास देतात.

मायर्स: तिचे इन्कमटॅक्स फॉर्म भरताना तुला तिच्या उत्पन्नाचा नेमका अंदाज आला असेल?

लिओनार्ड: नाही.

मायर्स: नाही?

लिओनार्ड: म्हणजे—नैसर्गिकरित्या, हो.

मायर्स: हो, फारच सोयीचं उत्तर. मिस्टर व्होल, असं कसं की तू कधीच तुझ्या पत्नीला मिस फ्रेंचला भेटवायला नेलं नाहीस?

लिओनार्ड: माहीत नाही. तसं काही घडलचं नाही.

मायर्स: तू म्हणतोस की मिस फ्रेंचला माहीत होतं की तू विवाहित आहेस?

लिओनार्ड: हो.

मायर्स: तरीही तिने कधीही तुला पत्नीला सोबत आणायला सांगितलं नाही?

लिओनार्ड: नाही.

मायर्स: का नाही?

लिओनार्ड: अरे, माहीत नाही. मला वाटतं तिला स्त्रिया फार आवडत नव्हत्या.

मायर्स: म्हणजे, असं म्हणूया का, की तिला देखणे तरुण पुरुष आवडत होते? आणि तू कधी तुझ्या पत्नीला नेण्यासाठी आग्रह केला नाहीस?

लिओनार्ड: नाही, अर्थातच नाही केला. बघा ना, तिला माहीत होतं की माझी बायको परदेशी आहे आणि ती—म्हणजे, मला काय माहीत, पण तिला वाटत होतं, की आमचं फारसं पटत नाही.

सर विल्फ्रेड: तू तिला मुद्दाम असा समज होऊ दिलास का?

लिओनार्ड: नाही, बिलकुल नाही. खरंच नाही. पण तिला तसं वाटलं—म्हणजे, ती तसं गृहीत धरत होती असं वाटलं, आणि मला वाटलं की मी जर सतत रोमेनचं नाव घेत राहिलो, तर ती—म्हणजे, माझ्याबद्दलची तिची उत्सुकता कमी होईल. मला तिच्याकडून पैसे उकळायचे नव्हते, पण मी कारसाठी एक उपकरण शोधून काढलं होतं—खरंच एक मस्त कल्पना आहे ती—आणि जर मी तिला त्यात पैसे गुंतविण्यासाठी पटवलं असतं, तर म्हणजे, ते तिचेच पैसे असते आणि कदाचित तिला भरपूर नफा मिळाला असता. हे समजावणं फार कठीण आहे—पण मी तिच्यावर उपजीविका करत नव्हतो, सर विल्फ्रेड, खरंच नव्हतो.

सर विल्फ्रेड: मिस फ्रेंचकडून तुला कधी काही रक्कम मिळाली होती का?

लिओनार्ड: नाही. अजिबात नाही.

सर विल्फ्रेड: त्या गृहप्रमुखाबद्दल काही सांग.

लिओनार्ड: जॅनेट मॅकेंझी? ती अगदी एक जुनी हुकूमशहा होती, माहितेय, जॅनेट म्हणजे खरंच दडपण आणायची. गरीब मिस फ्रेंचवर खूप हुकूमत गाजवायची. तिची नीट काळजी घ्यायची वगैरे सगळं होतंच, पण बिचारी म्हातारी स्वतःच्या इच्छेनं काही करू शकत नव्हती जेव्हा जॅनेट आसपास असायची. (विचारपूर्वक.) जॅनेटला मी फारसा आवडायचो नाही.

सर विल्फ्रेड: तिला तू का नाही आवडायचास?

लिओनार्ड: अहो, हे बघा, मत्सर असावा बहुतेक. माझं मिस फ्रेंचच्या व्यवसायाच्या गोष्टींमध्ये मदत करणं तिला आवडायचं नाही, असं वाटतं.

सर विल्फ्रेड: ओह, म्हणजे तू मिस फ्रेंचच्या व्यवसायिक कामांमध्ये मदत करायचास?

लिओनार्ड: हो. तिचं काही गुंतवणुकीचं प्रकरण होतं, आणि तिला फॉर्म्स भरणं वगैरे थोडं कठीण जायचं. हो, मी अशा बऱ्याच गोष्टींमध्ये तिला मदत केली आहे.

सर विल्फ्रेड: आता, मिस्टर व्होल, मी तुला एक अतिशय गंभीर प्रश्न विचारणार आहे. आणि मला त्याचं खरं उत्तर मिळणं अत्यंत गरजेचं आहे. तू आर्थिकदृष्ट्या अडचणीत होतास, आणि त्या बाईच्या व्यवहारांची जबाबदारी

तुझ्याकडे होती. आता सांग, तू कधी तिच्या मालमत्तेचा गैरवापर करून ती स्वतःसाठी वापरलीस का?

(**लिओनार्ड** संतापून याला नकार देणारच असतो.)

थांब, मिस्टर व्होल, उत्तर देण्याआधी थोडा विचार कर. कारण इथे दोन बाजू आहेत. एक तर आपण तुझ्या प्रामाणिकपणावर भर देऊ शकतो, किंवा जर तू त्या बाईची फसवणूक केली असशील, तर आपण हे मांडू शकतो की तुला तिचा खून करण्याचं काही कारणच नव्हतं, कारण तुला आधीच नफा मिळत होता. तसं पाहीलंस तर दोन्ही बाजूंना काही फायदा आहे. मला हवीय ती केवळ खरी गोष्ट. हवं तर थोडा वेळ घे उत्तर देण्यासाठी.

लिओनार्ड: मी खात्रीपूर्वक सांगतो, सर विल्फ्रेड, की मी अगदी सरळ मार्गानं वागलो आहे, आणि याच्या विरुद्ध काहीच सापडणार नाही. अगदी सरळ.

सर विल्फ्रेड: धन्यवाद, मिस्टर व्होल. तू माझी चिंता खूपच कमी केलीस. मी तुला हे श्रेय देतो की इतक्या महत्त्वाच्या गोष्टीत तू खोटं बोलण्याइतका मूर्ख नाहीस. आणि आता आपण येतो ऑक्टोबरच्या... (तो थोडा थांबतो.)

मेह्यू: चौदा तारखेकडे.

सर विल्फ्रेड: चौदा तारखेकडे. (तो उठतो.) त्या रात्री मिस फ्रेंचने तुला भेटायला बोलावलं होतं का?

लिओनार्ड: नाही, खरं सांगायचं तर नाही. पण मी त्या दिवशी अचानक तिच्याकडे गेलो. मी तयार केलेलं उपकरण दाखवायला.

लिओनार्ड: एक नवीन प्रकारचं उपकरण मी तयार केलं होतं आणि मला वाटलं की तिला ते आवडेल. तिने त्यात पैसे गुंतवले तर माझ्या मते तिला फायदाच झाला असता. म्हणून मी त्या संध्याकाळी तिकडे गेलो, साडेसातच्या सुमारास पोहोचलो. त्या दिवशी जॅनेट मॅकेंझी बाहेर गेलेली असते आणि मला माहीत होतं आणि की ती (मिस फ्रेंच) एकटीच असेल, कदाचित थोडी उदासही.

सर विल्फ्रेड: त्या दिवशी जॅनेट मॅकेंझी बाहेर गेलेली असते आणि तुला ही गोष्ट माहीत होती?

लिओनार्ड: (आनंदीपणे.) हो हो, मला माहीत होतं. जॅनेट नेहमी शुक्रवारी बाहेर जायची.

सर विल्फ्रेड: हे तितकंसं चांगलं नाही.

लिओनार्ड: का नाही? मला त्या दिवशी तिला भेटायला जावस वाटणं अगदी स्वाभाविक आहे की!

सर विल्फ्रेड: पुढे बोला, मिस्टर व्होल.

लिओनार्ड: मी साडेसातला तिथे पोहोचलो. तिने रात्रीचं जेवण संपवलेलं होतं, पण मी तिच्यासोबत एक कप कॉफी घेतली आणि आम्ही *डबल डेमन* नावाचा एक खेळ खेळलो. मग नऊ वाजता मी तिला शुभ रात्री म्हटलं आणि घरी निघून गेलो.

(**सर विल्फ्रेड** इतरांजवळून चालत डावीकडे जातो.)

मेह्यू: तू मला सांगितलं होतंस, की त्या रात्री घरकाम करणारी बाई म्हणाली, की ती नेहमीपेक्षा लवकर घरी परतली होती.

लिओनार्ड: हो, पोलिसांनी मला सांगितलं की ती काहीतरी विसरली होती म्हणून परत आली, आणि ती असं म्हणते की तिने—कोणीतरी मिस फ्रेंचसोबत बोलताना ऐकलं. पण तो मी नव्हतो, हे नक्की.

सर विल्फ्रेड: तू हे सिद्ध करू शकतोस का, मिस्टर व्होल?

लिओनार्ड: हो, हो नक्की करू शकतो. मी तेव्हा घरी परत आलो होतो, माझ्या बायकोसोबत होतो. हेच पोलिस सतत विचारत होते—मी साडेनऊ वाजता कुठे होतो. खरं सांगायचं तर, काही वेळा माणसाला आठवतही नाही की तो कुठे होता. पण त्या दिवशी मात्र मला नीट आठवतं—मी सरळ घरी गेलो होतो, रोमेनकडे, आणि आम्ही पुन्हा बाहेर गेलो नव्हतो.

सर विल्फ्रेड: (मध्यभागी चालत जातो.) तुम्ही सदनिकेत रहाता?

लिओनार्ड: हो. आम्ही युस्टन स्टेशनच्या मागे एका दुकानाच्या वरती एक लहानशी सदनिका घेतली आहे.

सर विल्फ्रेड: (लिओनार्डच्या डाव्या बाजूला उभा राहून.) तुझं सदनिकेमध्ये परतणं कुणी पाहिलं होतं का?

लिओनार्ड: असं वाटत नाही. कुणी पाहीलं असेल असं का धरायचं?

सर विल्फ्रेड: कुणी पाहिलं असतं, तर ते तुमच्यासाठी फायदेशीर ठरलं असतं.

लिओनार्ड: पण तुम्हाला खरंच असं वाटतं का—म्हणजे, जर तिचा खरोखर साडेनऊ वाजता खून झाला असेल, तर माझ्या पत्नीची साक्ष पुरेशी नाही का?

(**सर विल्फ्रेड** आणि **मेह्यू** एकमेकांकडे पाहतात. **सर विल्फ्रेड** चालत जाऊन डावीकडे उभा राहतो.)

मेह्यू: आणि तुझी पत्नी ठामपणे सांगेल की तू त्या वेळी घरी होतास?

लिओनार्ड: अर्थातच सांगेल.

(**मेह्यू उठून शेकोटीकडे जातो.**)

मेह्यू: तुला तुझी पत्नी खूप प्रिय आहे आणि तिलाही तू खूप प्रिय आहेस?

लिओनार्ड: (चेहरा सौम्य होतो) रोमेन मला पूर्ण समर्पित आहे. ती अशी पत्नी आहे जी कोणत्याही पुरुषाला मिळणं म्हणजे भाग्य समजावं.

मेह्यू: म्हणजे तुम्ही खूप आनंदी वैवाहिक आयुष्य जगता?

लिओनार्ड: त्याहून जास्त आनंदी होणं शक्य नाही. रोमेन अद्भुत आहे—अगदीच अद्भुत. (दरवाजावर टकटक होते.)

सर विल्फ्रेड: (आवाज देतो) या आत.

(ग्रेटा प्रवेश करते. तिच्या हातात संध्याकाळचे वर्तमानपत्र आहे.)

ग्रेटा: विल्फ्रेड सर, संध्याकाळचं वर्तमानपत्र. (ती एक परिच्छेद दाखवत पेपर सर विल्फ्रेडकडे देते.)

सर विल्फ्रेड: धन्यवाद, ग्रेटा.

ग्रेटा: तुम्हाला एक कप चहा हवा आहे का, सर?

(**मेह्यू उठून शेकोटीकडे जातो.**)

(**कार्टर** प्रवेश करतो.)

सर विल्फ्रेड: हो, कार्टर?

कार्टर: (टेबलच्या वरून जात) माफ करा, सर, ...

कार्टर: इथे दोन गृहस्थ आले आहेत, मिस्टर व्होलना भेटायचं आहे.

सर विल्फ्रेड: पोलीस?

कार्टर: हो, सर.

(**मेह्यू उठतो.**)

सर विल्फ्रेड: (उठतो आणि दाराकडे जातो) ठीक आहे, जॉन, मी जाऊन त्यांच्याशी बोलतो.

(**सर विल्फ्रेड** बाहेर जातो आणि **कार्टर** त्याच्या मागोमाग.)

लिओनार्ड: देवा! म्हणजे हेच का...?

मेह्यू: मला भीती आहे, होय, मुला. पण शांत रहा. धैर्य सोडू नकोस.

(तो **लिओनार्ड**च्या खांद्यावर हात ठेवतो.)
आता काहीही अधिक बोलू नकोस—सगळी जबाबदारी आमच्यावर सोड.
(तो आपली खुर्ची परत शेकोटीजवळ ठेवतो.)

लिओनार्ड: पण त्यांना कसं कळलं की मी इथे आहे?

मेह्यू: असं वाटतं की त्यांनी तुमच्यावर गुप्त नजर ठेवलेली असावी.

लिओनार्ड: (अजूनही विश्वास बसत नाही.) म्हणजे त्यांना खरंच माझ्यावर संशय आहे.

(सर विल्फ्रेड, डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर हेर्न आणि एक पोशाखी गुप्त पोलिस अधिकारी प्रवेश करतात. इन्स्पेक्टर उंच, देखणा अधिकारी आहे.)

सर विल्फ्रेड: (डावीकडे उभा राहत) हे आहेत मिस्टर व्होल.

(**लिओनार्ड उठतो.**)

इन्स्पेक्टर: (लिओनार्डकडे जातो) तुमचं नाव लिओनार्ड व्होल आहे का?

लिओनार्ड: हो.

सर विल्फ्रेड: हो, मिस्टर व्होल, माझा तुमच्यावर विश्वास आहे, पण तुम्ही मला नाही, तर इतरांनाच पटवायचे आहे.

इन्स्पेक्टर: मी डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर हेर्न आहे. माझ्याकडे तुमच्याविरुद्ध

अटक वॉरंट आहे, एमिली फ्रेंच यांच्या १४ ऑक्टोबर रोजीच्या खुनाच्या

आरोपावरून. मी तुम्हाला इशारा देतो की तुम्ही काहीही बोललात, तर ते लिहून घेतलं जाईल आणि न्यायालयात पुरावा म्हणून वापरलं जाऊ शकेल.

लिओनार्ड: ठीक आहे. (तो चिंतेने **सर विल्फ्रिड**कडे पाहतो, मग डावीकडे जाऊन आपली टोपी उचलतो.) मी तयार आहे.

मेह्यू: (इन्स्पेक्टरच्या डावीकडे जात) शुभ दुपार, इन्स्पेक्टर हेर्न. माझं नाव मेह्यू आहे. मी मिस्टर व्होलचा वकील आहे.

इन्स्पेक्टर: शुभ दुपार, मिस्टर मेह्यू. काही हरकत नाही. आम्ही त्याला घेऊन

जातो आणि त्याच्यावर आरोप करतो.

(लिओनार्ड आणि गुप्त पोलिस अधिकारी निघून जातात.)

(तो सर विल्फ्रिडकडे जातो. मेह्यूकडे बघून,)
सध्या हवामान अगदीच प्रसन्न आहे. काल रात्री थोडासा गारठा पडला होता. नंतर पुन्हा तुमची भेट होईल, असं वाटतंय, सर. (तो दरवाज्याकडे जातो.) आम्ही तुमची काही गैरसोय केली नसेल, हीच आशा आहे, सर विल्फ्रिड.

सर विल्फ्रिड: माझी कधीच गैरसोय होत नाही.

(इन्स्पेक्टर सौम्य हसतो आणि बाहेर जातो.)
(तो दरवाजा बंद करतो.)

माझं असं म्हणणं आहे, जॉन, की त्या तरुण माणसाची स्थिती त्याला वाटते त्यापेक्षा फारच बिकट आहे.

मेह्यू: निश्चितच आहे. तुम्हाला तो कसा वाटला?

सर विल्फ्रिड: (मेह्यूच्या डावीकडे जात) अत्यंत भोळसर. पण काही बाबतीत तर चाणाक्षही.

बुद्धिमान आहे, असं म्हणावं लागेल. पण त्याला आपल्या परिस्थितीचं गांभीर्य अजिबात कळलेलं नाही.

मेह्यू: तुम्हाला वाटतं का, ते त्यानेच केलं आहे?

सर विल्फ्रिड: माहीत नाही. एकंदर विचार केला तर, नाही असंच म्हणावं लागेल. (खटकन.)
तुमचं काय मत?

मेह्यू: (खिशातून आपली पाइप काढत) माझंही तसंच मत आहे.

(सर विल्फ्रिड शेकोटीवरचं तंबाखूचं भांडे घेतो आणि मेह्यूला देतो. मेह्यू टेबलाच्या वर उभा राहून आपला पाइप भरतो.)

सर विल्फ्रिड: बरं, त्याने आपल्याला दोघांवरही चांगली छाप पाडली आहे. असं वाटतंय. का केलं, हे मात्र समजत नाही. इतकी दुर्बळ कथा मी कधीच ऐकलेली नाही. देव जाणे, आपण या प्रकरणाचं काय करणार. त्याच्या बाजूने असलेला एकमेव पुरावा त्याच्या बायकोचा आहे—आणि बायकोवर कोण विश्वास ठेवणार आहे?

मेह्यू: (कोरड्या विनोदाने) असं होणं शक्य आहे, असं इतिहासात दिसून आलंय.

ज्युरी सदस्यांनो, आता मी आरोपीला बोलावतो — लिओनार्ड व्होल.
(दारवान उठतो आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्याकडे जातो. लिओनार्ड उठतो आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्याकडे जातो आणि आत उभा राहतो. वॉर्डर लिओनार्ड मागे उभा राहतो. दारवान बायबल उचलतो, लिओनार्डला देतो आणि शपथेचा फलक उंच धरतो.)

लिओनार्ड**:** मी सर्वशक्तिमान परमेश्वराची शपथ घेतो की, मी देणारी साक्ष खरी असेल, संपूर्ण सत्य असेल आणि केवळ सत्यच असेल.
(तो बायबल साक्षीदाराच्या पिंजऱ्याच्या कडेला ठेवतो.)

(दारवान शपथेचा फलक परत जागेवर ठेवतो आणि टेबलाच्या उजवीकडे बसतो.)

सर विल्फ्रिड: तर, श्रीमान व्होल, आम्ही मिस एमिली फ्रेंचबरोबरच्या तुमच्या मैत्रीविषयी ऐकलं आहे. आता आम्हाला सांगा, तुम्ही तिच्या घरी किती वेळा भेटायला गेलात?

लिओनार्ड**:** बऱ्याच वेळा.

सर विल्फ्रिड: का?

लिओनार्ड**:** ती माझ्याशी खूपच चांगली वागायची, आणि मला तिचा

जिव्हाळा वाटायला लागला. ती माझ्या मावशीसारखी वाटायची—आंटी

बेट्सी.

सर विल्फ्रिड: हीच ती मावशी का, जिने तुमचं पालनपोषण केलं?

लिओनार्ड : हो. ती खूप प्रेमळ होती. मिस फ्रेंच मला तिची आठवण करून द्यायची.

सर विल्फ्रिड: तुम्ही जेनेट मॅकेंझीचं म्हणणं ऐकलंत की मिस फ्रेंच समजत होती की तुम्ही अविवाहित आहात, आणि तिने तुमच्याशी लग्न करण्याचा विचार केला होता. यामध्ये काही तथ्य आहे का?

लिओनार्ड**:** अर्थातच नाही. ही कल्पनाच हास्यास्पद आहे.

सर विल्फ्रिड: मिस फ्रेंचला माहित होतं की तुम्ही विवाहित आहात?

लिओनार्ड**:** हो.

सर विल्फ्रिड: म्हणून तुमच्यात लग्नाचा प्रश्नच नव्हता?

लिओनार्ड**:** अर्थातच नाही. मी सांगितलं ना, ती माझ्याशी एका लाडक्या मावशीसारखी वागत होती — अगदी आईसारखी.

सर विल्फ्रिड: आणि त्याबदल्यात, तुम्ही तिच्यासाठी शक्य तितकं सर्व करत होतात?

लिओनार्ड : (सरळपणे) मला तिच्याबद्दल खूप आपुलकी वाटायची.

सर विल्फ्रिड: तुमच्या स्वतःच्या शब्दांत, ज्युरीला १४ ऑक्टोबरच्या रात्री

नेमकं काय झालं ते सांगा.

लिओनार्ड: तर झालं असं, मी एक नवीन प्रकारचा मांजराचा ब्रश पाहीला होता —तो त्या प्रकारातला अगदी वेगळाच होता — आणि मला वाटलं तो तिला आवडेल. म्हणून मी संध्याकाळी तो तिच्याकडे घेऊन गेलो. मला त्या वेळी काही विशेष काम नव्हतं.

सर विल्फ्रिड: त्या वेळी किती वाजले होते?

लिओनार्ड: सुमारे आठच्या आधी पोचलो. मी तिला तो मांजराचा ब्रश दिला. तिला तो आवडला.

आम्ही तो एका मांजरीवर वापरून पाहिला, आणि तो उपयोगी ठरला. मग आम्ही 'डबल डेमन' नावाचा एक खेळ खेळलो — मिस फ्रेंचला तो खूप आवडायचा — आणि त्यानंतर मी तिथून निघून गेलो.

सर विल्फ्रिड: हो, पण तुम्ही का नाही...

न्यायाधीश: सर विल्फ्रिड, मला हे पुराव्याचं प्रकरण काही केल्या समजत नाही. "कॅट ब्रश" म्हणजे नेमकं काय?

लिओनार्ड : तो मांजरांना ब्रश करण्यासाठी असतो.

न्यायाधीश: ओह!

लिओनार्ड : ते ब्रश आणि कंगवा यांचं मिश्रणच आहे. मिस फ्रेंचकडे मांजरी होत्या — आठ होत्या, आणि घरात थोडासा वास यायचा...

सर विल्फ्रिड: हो, हो.

लिओनार्ड : म्हणून मला वाटलं, हा ब्रश उपयोगी पडेल.

सर विल्फ्रिड:तुम्ही जेनेट मॅकेंझीला पाहिलंत का?

लिओनार्ड : नाही. मिस फ्रेंचने स्वतःच मला आत घेतलं.

सर विल्फ्रिड: तुम्हाला माहित होतं का की जेनेट मॅकेंझी बाहेर गेली होती?

लिओनार्ड : असेल, मी त्या गोष्टीकडे लक्षच दिलं नाही.

सर विल्फ्रिड: तुम्ही तिथून किती वाजता निघालात?

लिओनार्ड : सुमारे नऊच्या थोडं आधी. मी चालत घरी गेलो.

सर विल्फ्रिड: त्यात किती वेळ लागला?

लिओनार्ड : अंदाजे वीस मिनिटं ते अर्धा तास असं म्हणावं लागेल.

सर विल्फ्रिड: म्हणजे तुम्ही घरी पोचलात तेव्हा...?

लिओनार्ड : मी नऊ वाजून पंचवीस मिनिटांनी घरी पोचलो.

सर विल्फ्रिड: आणि तुमची पत्नी—हो, मी तिला तुमची पत्नीच म्हणेन—ती घरी होती?

लिओनार्ड : हो, अर्थातच होती. मी... मला वाटतं ती वेडीच झाली असावी.

मी...

सर विल्फ्रिड: ते नंतर पाहू. फक्त तुमची कहाणी पुढे सांगा. तुम्ही घरी आल्यावर कोट धुतलात का?

लिओनार्ड : नाही, अर्थातच नाही.

सर विल्फ्रिड: मग कोट कोणी धुतला?

लिओनार्ड : रोमेनने, दुसऱ्या दिवशी सकाळी. तिचं म्हणणं होतं की माझ्या मनगटावर जखम झाली होती आणि त्यावरून रक्त लागलं होतं.

सर विल्फ्रिड: तुमच्या मनगटावर जखम?

लिओनार्ड : हो. इथे. (तो आपला हात पुढे करतो आणि मनगट दाखवतो.) अजूनही खूण दिसते.

सर विल्फ्रिड तुम्हाला त्या खुनाविषयी पहिल्यांदा केव्हा कळलं?

लिओनार्ड: दुसऱ्या दिवशी संध्याकाळच्या वर्तमानपत्रात वाचलं, तेव्हा.

सर विल्फ्रिड: आणि तुम्हाला काय वाटलं?

लिओनार्ड : मी सुन्न झालो होतो. विश्वास बसत नव्हता. खूपच अस्वस्थ झालो. वर्तमानपत्रात लिहिलं होतं की ती चोरी होती. मला कधीच दुसऱ्या काही गोष्टीची कल्पनाही नव्हती.

सर विल्फ्रिड: आणि त्यानंतर काय झालं?

लिओनार्ड : मी वाचलं की पोलिसांना माझ्याशी बोलायचं होतं, म्हणून मी लगेच पोलीस ठाण्यात गेलो.

सर विल्फ्रिड: तुम्ही पोलीस ठाण्यात गेलात आणि एक जबाब नोंदवला?

लिओनार्ड : हो.

सर विल्फ्रिड: तुम्हाला काही भीती वाटली नाही? किंवा तसं करण्याची अनिच्छा होती का?

लिओनार्ड : नाही, अगदीच नाही. मला शक्य तितक्या प्रकारे मदत करायची होती.

सर विल्फ्रिड: तुम्हाला मिस फ्रेंचकडून कधी काही पैसे मिळाले का?

लिओनार्ड :नाही.

सर विल्फ्रिड तुम्हाला माहिती होतं का की तिने तिच्या इच्छापत्रात तुमच्या नावावर काही ठेवण्याचं ठरवलं होतं?

लिओनार्ड : इच्छापत्र बनवता का?" तर ती म्हणाली, "कधीमधी करते."

सर विल्फ्रिड: तुम्हाला माहिती होतं का की या नवीन इच्छापत्रात नेमकं काय

असणार होतं?

लिओनार्ड : मी शपथ घेऊन सांगतो, मला काहीच माहिती नव्हतं.

सर विल्फ्रिड: तिने कधीही असा काही संकेत दिला होता का, की ती तिच्या इच्छापत्रात तुम्हाला काही देणार आहे?

लिओनार्ड : नाही.

सर विल्फ्रिड: तुम्ही न्यायालयात ऐकलंय की तुमच्या पत्नीने — किंवा जिला तुम्ही तुमची पत्नी मानता — तिने दिलेली साक्ष काय होती.

लिओनार्ड : हो—मी ऐकलं. मला काहीच समजत नाही—मी...

सर विल्फ्रिड: (त्याला थांबवत) श्रीमान व्होल, मला समजतं की तुम्ही खूप अस्वस्थ आहात, पण मी तुमच्याकडे विनंती करतो की तुम्ही भावना बाजूला ठेवून, सरळ आणि स्पष्ट उत्तर द्या. त्या साक्षीदाराने जे काही सांगितलं, ते खरं होतं का खोटं?

लिओनार्ड : नाही, अर्थातच ते खरं नव्हतं.

सर विल्फ्रिड: त्या रात्री तुम्ही नऊ वाजून पंचवीस मिनिटांनी घरी आलात आणि तुमच्या पत्नीबरोबर जेवण केलंत?

लिओनार्ड : हो.

सर विल्फ्रिड: त्यानंतर तुम्ही पुन्हा बाहेर गेला होता का?

लिओनार्ड : नाही.

सर विल्फ्रिड: तुमचा उजवा हात प्रमुख आहे की डावा?

लिओनार्ड : उजवा.

सर विल्फ्रिड: मी तुम्हाला शेवटचा एकच प्रश्न विचारतो, श्रीमान व्होल — तुम्ही एमिली फ्रेंचचा खून केला का?

लिओनार्ड : नाही, मी केला नाही.

(सर विल्फ्रिड बसतो.)

मायर्स: (उठून) तुम्ही कधी कोणाकडून पैसे काढण्याचा प्रयत्न केला आहे का?

लिओनार्ड : नाही.

मायर्स: मिस फ्रेंचबरोबर ओळख झाल्यावर किती लवकर तुम्हाला तिच्या श्रीमंतीबद्दल माहिती मिळाली?

लिओनार्ड : जेव्हा मी पहिल्यांदा तिच्याकडे गेलो, तेव्हा मला माहीतच नव्हतं की ती श्रीमंत आहे.

मायर्स: पण हे कळल्यावर, तुम्ही तिच्याशी अधिक जवळीक वाढवण्याचा निर्णय घेतला?

लिओनार्ड : बहुतेक तसंच दिसतंय. पण खरंच, मला तिची आवड होती. पैशांशी काहीही संबंध नव्हता.

मायर्स: ती कितीही गरीब असती, तरीही तुम्ही तिच्याकडे जात राहिला

असता?

लिओनार्ड : हो, निश्चितच गेलो असतो.

मायर्स: तुमची स्वतःची आर्थिक स्थिती हलाखीची आहे, बरोबर?

लिओनार्ड : तुम्हाला माहीतच आहे.

मायर्स: कृपया हो किंवा नाही असं उत्तर द्या.

न्यायाधीश: तुम्हाला हो किंवा नाही असं उत्तर द्यावंच लागेल.

लिओनार्ड : हो.

मायर्स: तुमचं पगार किती आहे?

लिओनार्ड : खरं सांगायचं तर, सध्या माझ्याकडे नोकरीच नाही. बऱ्याच काळापासून नव्हती.

मायर्स: तुम्ही अलीकडे...
मायर्स: तुम्हाला तुमच्या नोकरीवरून काढून टाकलं होतं का?

लिओनार्ड : नाही, तसं काही नव्हतं—मी स्वतःच राजीनामा दिला.

मायर्स: तुम्ही अटक होण्याच्या वेळी बँकेत किती पैसे होते?

लिओनार्ड : खरं सांगायचं तर, फार थोडे—काही पौड्स. मला अपेक्षा होती,

की आठवड्यात-दोन आठवड्यात काही पैसे मिळतील.

मायर्स: किती?

लिओनार्ड : जास्त नव्हते.

मायर्स: माझं म्हणणं आहे, तुम्ही आर्थिक अडचणीत होतात?

लिओनार्ड : खूप अडचणीत नव्हतो. पण... हो, थोडी चिंता वाटत होती.

मायर्स: तुम्हाला पैशाची चिंता होती, तुम्ही एका श्रीमंत स्त्रीला भेटलात आणि तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला.

लिओनार्ड : तुम्ही सगळं खूप विकृत पद्धतीने मांडता. मी सांगतोय ना, मला ती आवडायची.

मायर्स: आपल्याला सांगण्यात आलं आहे की मिस फ्रेंच तिच्या इनकम टॅक्सच्या फॉर्मसाठी तुमचा सल्ला घेत असे.

लिओनार्ड : हो, घ्यायची. तुम्हाला माहीत आहे ते फॉर्म्स कसे असतात—काही कळतच नाही त्यातून—तिला तरी नाही कळायचं.

मायर्स: जॅनेट मॅकेंझीने सांगितलं की मिस फ्रेंच खूप हुशार व्यावसायिक स्त्री होती, तिला स्वतःचे व्यवहार चांगलेच हाताळता यायचे.

लिओनार्ड : पण ती मला तसं काही म्हणाली नव्हती. तिचं म्हणणं होतं की

त्या फॉर्म्स...

मायर्स: तिला ती फॉर्म्स भरताना फारच त्रास व्हायचा, होय?

लिओनार्ड : हो.

मायर्स: तिचे मिळकतकर फॉर्म्स भरताना, तुम्हाला तिचे उत्पन्न अचूक किती आहे हे कळले असेलच, नाही का?

लिओनार्ड : नाही.

मायर्स: नाही?

लिओनार्ड : म्हणजे—नैसर्गिकच आहे, हो.

मायर्स: हो, फारच सोयीस्कर. पण मिस्टर व्होल, असं का झालं की तुम्ही कधीच तुमच्या पत्नीला मिस फ्रेंचला भेटायला घेऊन गेला नाहीत?

लिओनार्ड : मला माहीत नाही. तसं काही घडेलसं वाटलंच नाही.

मायर्स: तुमचं म्हणणं आहे की मिस फ्रेंचला माहीत होतं की तुम्ही विवाहित आहात?

लिओनार्ड : हो.

मायर्स: तरीही तिने कधीही तुम्हाला तुमच्या पत्नीला बरोबर घेऊन यायला सांगितलं नाही?

लिओनार्ड : नाही.

मायर्स: का?

लिओनार्ड : मला वाटतं तिला स्त्रिया फारशा आवडत नसाव्यात.

मायर्स: तिला, असं म्हणू या, देखणे तरुण पुरुष जास्त आवडायचे का? आणि तुम्ही कधीही तुमच्या पत्नीला घेऊन जाण्याचा आग्रह केला नाही?

लिओनार्ड :नाही, अर्थातच नाही. बघा, तिला माहीत होतं की माझी पत्नी परदेशी आहे आणि तिला—म्हणजे, मला वाटतं, तिला असं वाटायचं की आमचं एकमेकांशी पटत नाही.

मायर्स: तुम्हीच असा काही संकेत तिला दिला होता का?

लिओनार्ड : नाही, अजिबात नाही. ती—म्हणजे, मला वाटतं ते तिचं मनातलं कल्पनारंजन होतं.

मायर्स: म्हणजे तिचं तुमच्यावर प्रेम होतं?

लिओनार्ड : नाही, प्रेम नव्हतं—पण ती—कधी कधी जसं काही आई मुलाच्या बाबतीत असते तसं...

मायर्स: कसं?

लिओनार्ड : म्हणजे, जसं काही आईला वाटतं की तिच्या मुलाला एखादी मुलगी आवडू नये, किंवा त्याने कोणाशीही लग्न वगैरे करू नयेX **मायर्स:** तुम्ही अशी आशा केली होती, नाही का, की मिस फ्रेंचशी मैत्रीतून

तुम्हाला काही आर्थिक फायदा होईल?

लिओनार्ड : तुमच्या म्हणण्याच्या पद्धतीने नाही.

मायर्स: माझ्या म्हणण्याच्या पद्धतीने नाही? तुम्ही जणू काही मला स्वतःहून चांगलं समजता. मग कोणत्या पद्धतीने तुम्हाला आर्थिक फायदा होईल अशी आशा होती? (थोडा थांबतो.) मी पुन्हा विचारतो—कोणत्या प्रकारे?

लिओनार्ड : पहा, मी एक वस्तू शोधून काढली आहे—हिवाळ्यातही काम करणारा वायपर. मी कुणीतरी त्यासाठी पैसे गुंतवेल का हे पाहत होतो, आणि वाटलं की कदाचित मिस फ्रेंच गुंतवतील. पण हेच एकमेव कारण नव्हतं की मी त्यांच्याकडे जायचो. मला त्या खरंच आवडायच्या.

मायर्स: हो हो, ते आपण अनेकदा ऐकलं आहे—तुम्हाला त्या किती आवडायच्या.

लिओनार्ड : (थोडासा रागाने.) पण ते खरंच आहे.

मायर्स: मिस्टर व्होल, मला असं समजतं की मिस फ्रेंचच्या मृत्यूपूर्वी सुमारे एक आठवडा, तुम्ही एका ट्रॅव्हल एजन्सीकडे परदेशी सहलींबाबत माहिती घेत होतात.

लिओनार्ड : समजा घेतलीच, तरी तो गुन्हा नाही ना?

मायर्स: अजिबात नाही. जर ते पैसे देऊ शकत असतील, तर बरेच लोक सहलींना जातात—पण तुम्ही पैसे देऊ शकत नव्हतात, बरोबर ना मिस्टर व्होल?

लिओनार्ड : मी अडचणीत होतो, हे मी आधीच सांगितलं आहे.

मायर्स: आणि तरीही तुम्ही त्या एजन्सीत एका गोऱ्या स्त्रीसोबत—'स्ट्रॉबेरी ब्लॉन्ड', असं ऐकलं आहे—गेलात आणि…

न्यायाधीश: 'स्ट्रॉबेरी ब्लॉन्ड', मिस्टर मायर्स?

मायर्स: सौम्य लालसर केसांची स्त्री, महाराज.

न्यायाधीश: मला वाटलं होतं की सगळ्या प्रकारच्या ब्लॉन्ड्सबद्दल माहिती आहे, पण ही स्ट्रॉबेरी ब्लॉन्ड… चालू द्या, मिस्टर मायर्स.

मायर्स: (लिओनार्ड कडे पाहत.) काय?

लिओनार्ड : माझी बायको ब्लॉन्ड नाही आणि ती सगळी फक्त गंमत होती.

मायर्स: तुम्ही कबूल करता की तुम्ही स्वस्त सहली नव्हे, तर महागड्या आणि ऐषारामी परदेशी सहलींची माहिती मागितली. अशा सहलीचे पैसे तुम्ही कसे भरणार होतात?

लिओनार्ड : मी भरायचे ठरवलंच नव्हतं.

मायर्स: मी असा आरोप करतो की तुम्हाला माहीत होतं की आठवडाभरात

तुम्हाला एका वृद्ध स्त्रीकडून मोठी रक्कम मिळणार होती.

लिओनार्ड : मला असं काही माहीत नव्हतं. मी फक्त खूप गोंधळलेलो होतो—आणि दुकानाच्या खिडकीत पोस्टर्स होते—नारळाची झाडं, निळा

समुद्र... म्हणून मी आत गेलो आणि विचारलं. त्या कारकुनाने माझ्याकडे वरून खाली पाहिलं—मी थोडासा जुनाट दिसत होतो—मग मला राग आला. म्हणून मी जरा नाटकच केलं—(तो अचानक हसतो, त्या आठवणीने.) आणि सगळ्यात ऐषारामी सहलींबद्दल विचारू लागलो—सगळं 'डिलक्स', आणि बोटीच्या डेकवर केबिन वगैरे.

मायर्स: तुम्हाला खरंच वाटतं की कोर्टातील लोक हे खरं मानतील?

लिओनार्ड : मला कोणी काही मानावं असं वाटत नाही. पण जे घडलं ते घडलं. तो सगळा फसवा खेळ होता—बालिश होतं, असेल—पण मला मजा आली आणि मी त्याचा आनंद घेतला. (अचानक गंभीर होतो.) मी कोणाला मारण्याचा विचार केला नव्हता, किंवा कोणाच्याही पैशाचाही.

मायर्स: म्हणजे ही एक केवळ योगायोगाची गोष्ट होती की मिस फ्रेंचचा खून झाला, आणि काही दिवसांत तुम्ही तिचे वारसदार ठरलात.

लिओनार्ड : मी सांगतोय ना—मी तिला मारलेलं नाही.

मायर्स: तुमची कहाणी अशी आहे की चौदा तारखेच्या रात्री, तुम्ही मिस फ्रेंचच्या घरुन नऊ वाजून चार मिनिटांनी बाहेर पडलात, पायी चालत घरी गेलात, आणि सव्वा नऊला घरी पोचलात आणि उरलेला वेळ घरीच होतात.

लिओनार्ड : हो.

मायर्स: तुम्ही ऐकलंय की रोमेन हायलगर नावाच्या स्त्रीने न्यायालयात तुमच्या त्या गोष्टीचं खंडन केलं आहे...

कोर्ट: तुम्ही ऐकलं आहे की ती म्हणाली तुम्ही सव्वा नऊला नव्हे, तर दहा वाजून दहा मिनिटांनी घरी आला होता.

लिओनार्ड : ते खोटं आहे!

मायर्स: की तुमचे कपडे रक्ताने माखलेले होते, आणि की तुम्ही तिला स्पष्टपणे कबूल केलं होतं की तुम्ही मिस फ्रेंचचा खून केला.

लिओनार्ड : ते खोटं आहे, मी सांगतोय तुम्हाला. एकही शब्द खरा नाही.

मायर्स: अशी कोणतीही कारणं तुम्ही सांगू शकता का, की ही तरुण स्त्री, जिला लोक तुमची बायको समजत होते, ती मुद्दाम खोटी साक्ष देईल—जर ती खोटीच असेल?

लिओनार्ड : नाही, सांगू शकत नाही. हाच सगळ्यात भयंकर भाग आहे. काहीही कारण नाही. मला वाटतं ती वेडी झाली असावी.

मायर्स: तुम्हाला वाटतं ती वेडी झाली असावी? पण ती खूप शहाणी वाटत होती—स्थिर आणि शांत. पण वेडेपणाच एकमेव कारण तुम्ही सुचवू शकता?

लिओनार्ड : मला काहीच कळत नाही. अहो देवा, काय घडलंय? ती इतकी का बदलली?

मायर्स: नक्कीच भावनाप्रधान, पण इथे न्यायालयात आपण केवळ वस्तुस्थितीवर विचार करतो. आणि वस्तुस्थिती अशी आहे, मिस्टर व्होल, की मिस एमिली फ्रेंचच्या घरी तुम्ही कोणत्या वेळी निघालात, आणि सव्वा

नऊला घरी पोचलात आणि पुन्हा बाहेर गेला नाही—या सगळ्याच गोष्टींसाठी फक्त तुमचंच म्हणणं आपल्याकडे आहे.

लिओनार्ड : (आक्रोशात) कोणीतरी पाहिलं असेल मला—रस्त्यावर—किंवा घरात जाताना.

मायर्स: हो, तसं अपेक्षितच आहे. पण एकमेव व्यक्ती जिने तुम्हाला त्या रात्री घरी येताना पाहीलं आणि ती म्हणते की तुम्ही दहा वाजून दहा मिनिटांनी आलात. आणि ती व्यक्ती सांगते की तुमच्या कपड्यांवर रक्त होतं.

लिओनार्ड : माझ्या मनगटाला जखम झाली होती.

मायर्स: प्रश्न विचारले गेले असते, तर सांगायला सोपे कारण आहे.

लिओनार्ड : (खचून) तुम्ही सगळं फिरवता. मी जे काही म्हणतो, त्याचा वेगळाच अर्थ काढता. तुम्ही मला जणू वेगळाच माणूस भासवता…

मायर्स: तुम्ही तुमचं मनगट मुद्दाम कापलं होतं.

लिओनार्ड : नाही, मी तसं काही केलं नाही. पण तुम्ही बोललात की तसं वाटायला लागतं की जणू मी ते केलंच. मलाच तसं ऐकू येतंय.

मायर्स: तुम्ही दहा वाजून दहा मिनिटांनी घरी आला होता.

लिओनार्ड : नाही, मी तेव्हा आलो नव्हतो. तुम्हाला माझ्यावर विश्वास ठेवायलाच हवा. तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवायलाच हवा.

मायर्स: तुम्ही एमिली फ्रेंचचा खून केला.

लिओनार्ड : मी नाही केला.

(**प्रकाश झपाट्याने कमी होतो**, केवळ **लिओनार्ड** आणि **मायर्स** यांच्यावर दोन स्पॉटलाइट राहतात. हेही हळूहळू मावळतात आणि **पडदा पडतो.**)

लिओनार्ड : मी तिचा खून केला नाही. मी कधीच कोणाचा खून केलेला नाही. अरे देवा! हे एक दुःस्वप्न आहे. एखादं भयानक, वाईट स्वप्न.

पडदा पडतो

तिसरा अंक

दृष्य १

सर विल्फ्रिड रॉबर्ट्स, क्यू.सी. यांचे कार्यालय. **त्याच संध्याकाळी.**

[जेव्हा पडदा उघडतो, स्टेज अंधारलेले आहे आणि **मेह्यु** कामात आहे. खिडक्यांचे पडदे उघडे आहेत. **ग्रेटा** लगेच प्रवेश करते आणि दरवाजा धरून ठेवते **व** आणि **सर विल्फ्रिड** आत येतात.]

मायर्स: हो, तसं अपेक्षितच आहे. पण एकमेव व्यक्ती जिने तुम्हाला त्या रात्री घरी येताना पाहिलं, [**मायर्सकडे** त्याचं ब्रीफकेस आहे.]

ग्रेटा: शुभ संध्याकाळ, सर विल्फ्रिड. बाहेर खूप वाईट हवामान आहे, सर. (दरवाजा बंद करत **ग्रेटा** बाहेर जाते.)

सर विलफ्रिड: धूसर कोंदट! (तो दरवाज्याखालील स्विचने भिंतीवरील दिवे चालू करतो आणि खिडकीकडे जातो.)
मेह्यु: आजची रात्र खरंच वाईट आहे. (तो आपली टोपी आणि कोट काढून डाव्या बाजूला लटकवतो.)
सर विल्फ्रिड: (खिडकीचे पडदे बंद करत) न्याय कुठे नाही का? आपण दमट कोर्ट रूममधून बाहेर येतो, ताज्या हवेत श्वास घ्यायला लागते, आणि काय सापडते? धूसर व धुरकट! (तो बाकावरील दिवा चालू करतो.)
मेह्यु: हे धूसर असले तरी, मिसेस हेल्गरच्या कारस्थानांइतके घनदाट नाही. (तो बाकाकडे जातो आणि आपली फाईल डाव्या कोपऱ्यावर ठेवतो.)
सर विल्फ्रिड: ती धूर्त स्त्री! पहिल्यांदा तिला पाहिल्यावरच मला तडजोड

जाणवली होती. मला ठाऊक होतं ती काहीतरी करत आहे. ती पूर्णपणे द्वेषी, डोक्याने खोलवर द्वेष करणारी आहे, आणि ती तर त्या साध्या तरुणावर, तिची खेळी खेळत आहे. जॉन? ती काय करत आहे? मला सांग. (तो डेस्कच्या खाली डावीकडे जातो.)

मेह्यु बहुधा ती तरुण लिओनार्ड व्होल याला खुनाच्या आरोपात दोषी ठरवण्याचा प्रयत्न करत आहे.

सर विलफ्रिड: (उजवीकडे जात) पण का? त्याने तिच्यासाठी काय केलंय बघ.

मेह्यु कदाचित त्याने तिच्यासाठी खूप काही केलं असेल.

सर विल्फ्रिड: (डेस्कच्या उजव्या बाजूला येत) पण तरी ती त्याचा त्यासाठी तिरस्कार करते. हे शक्य आहे. स्त्रिया कृतघ्न असतात. पण त्या का द्वेषी होतात? तिला त्याच्याबरोबर राहायला कंटाळा आला असता तर ती सहज निघून जाऊ शकते. . (तो बाकाच्या वरच्या बाजूला डावीकडे जातो.) त्याच्याबरोबर राहण्यासाठी आर्थिक कारण दिसत नाही.

ग्रेटा: (प्रवेश करून बाकाकडे येते. तिच्या हातात दोन कपांमध्ये चहा असलेली थाळी आहे.) सर **विलफ्रिड**, तुमच्यासाठी आणि मिस्टर **मेह्यु**साठीही चहा आणला आहे. (ती एक कप डेस्कच्या प्रत्येक बाजूला ठेवते.)

सर विल्फ्रिड: (शेकोटीच्या डावीकडे बसत) चहा? आपल्याला जोरदार दारू हवी.

ग्रेटा: ओह, तुम्हाला खरेतर चहा आवडतो, सर. आजचा दिवस कसा गेला?

सर विलफ्रिड: वाईट.

(**मेह्यु** बाकाच्या डावीकडे बसतो.)

ग्रेटा: (सर **विलफ्रिडकडे** येत) ओह, नाही सर, मला आशा नाही आहे, कारण त्याने ते केलेलं नाही. मला खात्री आहे त्याने ते केलेलं नाही. (ती

दरवाजाकडे निघते.)
सर विल्फ्रिड: तुला अजूनही खात्री आहे की त्याने ते केलेलं नाही? (तो विचार करून तिच्याकडे पाहतो.) मग का?
ग्रेटा: (विश्वासाने) कारण तो असा नाही. तो मोकळ्या स्वभावाचा आहे—अत्यंत छान. तो कधीही कोणत्याही वृद्ध स्त्रीच्या डोक्यावर मारणार नाही. पण तुम्ही त्याची सुटका कराल, नाही का सर?
सर विल्फ्रिड: मी त्याची सुटका करेन.
(ग्रेटा बाहेर जाते.)
(तो उभा राहतो. स्वतःशी जवळजवळ) देव जाणे कसे करायचे. ज्युरीत फक्त एक महिला आहे—दुर्दैव—स्त्रिया त्याला आवडतात असं दिसतं—का माहीत नाही—तो विशेष चांगला दिसत नाही. (तो बाकाच्या उजव्या बाजूला जातो.)

शक्यतो त्याच्यात काहीतरी असेल जे स्त्रियांच्यातील मातृत्वाचा भावना जागवते. स्त्रियांना त्याची आई व्हावं असं वाटतं.
मेह्यु: आणि मिसेस हेल्गर... त्या मातृहृदयाच्या प्रकारात येत नाहीत.
सर विल्फ्रिड: (चहा उचलून डावीकडे जातो) नाही, ती भावनाविवश प्रकारची आहे. तिच्या शांत, संयमी स्वभावामागे गरम रक्त आहे. अशी स्त्री जी पुरुषाने फसवलं तर त्याला सुरी खुपसण्यास मागेपुढे पाहणार नाही. देवा, मला तिचा खोटेपणा उघड करायला मिळाला पाहिजे. तिचं खरं रूप जगासमोर आणायला पाहिजे.
मेह्यु: (उठतो आणि खिशातून आपला पाइप काढतो) मला माफ कर, विल्फ्रिड, पण असं वाटत नाही, का की तू हा खटला वैयक्तिक संघर्ष बनवतो आहेस — तुझा आणि तिच्यातला? (तो शेकोटीकडे जातो, शेल्फवरील भांड्यातून पाइप क्लिनर घेतो आणि पाइप स्वच्छ करतो.)

सर विलफ्रिड: काय खरंच? कदाचित खरं असेल. पण ती वाईट स्त्री आहे, जॉन. मला त्याबद्दल पूर्ण विश्वास आहे. आणि एका तरुणाचं आयुष्य त्या संघर्षाच्या निकालावर अवलंबून आहे.

मेह्यु: (विचारपूर्वक) मला वाटतं ज्युरीला ती फारशी आवडली नाही.

सर विल्फ्रिड: हो, बरोबर आहेस, जॉन. मला पण तसंच वाटतं. सुरुवातीलाच, ती परदेशी आहे — आणि लोक परदेशींवर फारसा विश्वास ठेवत नाहीत. शिवाय ती त्याच्या बायकोच्या नात्याने त्याच्यासोबत नसून, उलट बहुपतित्वाची (bigamy) कबुली देत आहे.

(**मेह्यु** पाइप क्लिनर शेकोटीमध्ये टाकतो आणि बाकाच्या डावीकडे जातो.)

हे सगळं लोकांना पसंत पडत नाही. आणि जेव्हा तो संकटात आहे, तेव्हा ती त्या माणसाच्या पाठीशी उभी राहत नाही. आपल्याकडे असं वागणं लोकांना अजिबात आवडत नाही.

मेह्यु: हे आपल्या बाजूनेच आहे.

सर विल्फ्रिड: (बाकाच्यावरून उजव्या बाजूला जातो) हो, पण ते पुरेसं नाही. त्याच्या बोलण्याला कुठलीही पुष्टी मिळत नाही. (तो आपला चहा डेस्कवर ठेवतो.)

(**मेह्यु** डावीकडे जातो.)

तो मान्य करतो की त्या संध्याकाळी तो मिस फ्रेंचसोबत होता, त्याचे हातांचे ठसे सगळीकडे आहेत, कोणीही त्याला घरी जाताना पाहिलं नाही, आणि सगळ्यात मोठं म्हणजे त्या मृत्युपत्राचं प्रकरण आहे — जे त्याच्याविरुद्ध जातं. (तो बाकावर उभा राहतो.)

त्या ट्रॅव्हल एजन्सीच्या प्रकाराने तर परिस्थिती आणखीनच वाईट केली. ती स्त्री त्याच्या नावाने मृत्युपत्र करते आणि लगेच तो आलिशान परदेशी सहलींची चौकशी करतो. याहून वाईट योगायोग असूच शकत नाही.

मेह्यु: (शेकोटीकडे जात) मी पूर्णपणे सहमत आहे. आणि त्याचं स्पष्टीकरणही फारसं विश्वासार्ह वाटलं नाही.

सर विल्फ्रिड: (अचानक आपल्या वागणुकीत पूर्ण बदल करून, अधिक मानवी होत) आणि तरीही, माहीत आहे का, जॉन—माझी बायको हे करते.
मेह्यु: काय करते?
सर विल्फ्रिड: (सौम्य हसू हसत) ट्रॅव्हल एजन्सीकडून परदेशातील मोठ्या प्रवासाचे कार्यक्रम तयार करून घेते. आमच्या दोघांसाठी. (तो शेकोटीवरून तंबाखूचा डबा उचलतो आणि बाकावर ठेवतो.)
मेह्यु: धन्यवाद, विल्फ्रिड. (तो बाकाच्या डावीकडे बसतो आणि आपला पाइप भरतो.)
सर विल्फ्रिड: ती प्रत्येक गोष्ट तपशीलाने आखते, आणि मग चिडचिड करते की बोट बर्म्युडामध्ये कनेक्शन चुकवते. (तो बाकाच्या उजवीकडे जातो.) ती म्हणते, आपण वेळ वाचवू शकतो जर आपण फ्लाइटने गेलो तर, पण मग देश काही पाहायला मिळणार नाही, आणि (तो बाकाच्या उजवीकडे बसतो) विचारते, 'तुला काय वाटतं?' आणि मी म्हणतो, 'माझ्यासाठी काहीही चालेल, प्रिय. तुला हवं तसं ठरव.' आम्हा दोघांना माहिती असतं की हा एक प्रकारचा खेळच आहे — आणि शेवटी नेहमीसारखंच — घरीच थांबतो.
मेह्यु: अहो, माझ्या बायकोसाठी मात्र हे सगळं घरं पाहण्यावर असतं.
सर विल्फ्रिड: घरं?
मेह्यु: हो, घर पाहायला जायचं असतं. कधी कधी वाटतं इंग्लंडमधलं एकही घर विक्रीस निघालं नसेल, जे माझ्या बायकोने पाहिलं नसेल. ती खोल्यांचं वाटप कसं करायचं, काय स्ट्रक्चरल बदल करावे लागतील ते सगळं ठरवते. अगदी पडदे, फर्निचर कव्हर्स आणि रंगसंगतीसुद्धा आखते. (तो उठतो,

तंबाखूचा डबा परत शेकोटीच्यावर ठेवतो आणि खिशात काडेपेटी शोधतो.)
(सर विल्फ्रिड आणि मेहयु एकमेकांकडे पाहतात आणि सौम्य हसतात.)
सर विल्फ्रिड: हं… बरं… (तो पुन्हा **सर विल्फ्रिड Q.C.** अर्थात वकील बनतो.) आपल्या बायकांचे हे स्वप्नरंजन पुराव्यात धरता येत नाही—वाईटच आहे. पण त्यामुळे तरी आपण समजू शकतो की तरुण व्होलने का आलिशान सहलींची माहिती मागितली होती.
मेह्यु: अहो, माझ्या बायकोसाठी मात्र हे सगळं घरं पाहण्यावर असतं. स्वप्नांचे महाल.
सर विल्फ्रिड: (डेस्कच्या ड्रॉवरमधून मॅचबॉक्स काढतो) हे घे, जॉन. (तो काडेपेटी बाकावर ठेवतो.)
(बाकाच्या डावीकडे जातो आणि काडेपेटी उचलतो) धन्यवाद, विल्फ्रिड.
सर विल्फ्रिड: मला वाटतं आपल्याला जॅनेट मॅकेंझीसोबत थोडंसं नशीब लाभलं.
मेह्यु:: पूर्वग्रह, म्हणायचंय का?
सर विल्फ्रिड: बरोबर. तिच्या पूर्वग्रहाचा अतिरेक!**:** (बाकाच्या डावीकडे बसतो) तुझा तिच्या बहिरेपणावरचा मुद्दा खूप प्रभावी होता.
सर विल्फ्रिड: हो, हो, आपण तिथे जिंकलो. पण तिनं दूरदर्शनच्या गोष्टीवरून आपली परत फजिती केली.
मेह्यु: अहो, माझ्या बायकोसाठी मात्र हे सगळं घरं पाहण्यावर असतं.
(तो पाहतो की काडेपेटी रिकामी आहे, तो ती कचऱ्याच्या टोपलीत टाकतो आणि आपला पाइप खिशात ठेवतो.)
सर विल्फ्रिड: धूम्रपान नाही करत का, जॉन?
मेह्यु: नाही, आत्ता नको वाटतं.

सर विल्फ्रिड: जॉन, त्या रात्री खरंच काय घडलं होतं? खरंच एखादी जबरदस्तीची चोरी होती का? पोलीस मान्य करतात की, तसं असण्याची शक्यता आहे.

मेह्यु: पण त्यांना खरंच तसं वाटत नाही, आणि ते फारसा चुकीचा निष्कर्ष काढत नाहीत. तो इन्स्पेक्टर तर ठाम आहे की ही आतूनच घडवलेली गोष्ट आहे—ती खिडकी आतूनच फोडल्याचं त्याचं मत आहे.

सर विल्फ्रिड: (उठून बाकाच्या खाली डावीकडे जातो) पण कदाचित तो चुकत असेल.

मेह्यु: कदाचित.

सर विल्फ्रिड: पण जर तसं असेल, तर मग रात्री साडेनऊ वाजता जॅनेट मॅकेंझीने मिस फ्रेंचशी बोलताना कोणाला ऐकलं? मला वाटतं त्याची दोन उत्तरं असू शकतात.

मेह्यु: आणि ती म्हणजे...?

सर विल्फ्रिड: एक म्हणजे, पोलिसांना हे केवळ चोरी नव्हे हे लक्षात आल्यानंतर, तिने पूर्ण गोष्ट बनवली असेल.

मेह्यु: (धक्का बसल्यासारखा) छे, तिने असं काही केलं असतं का?

सर विल्फ्रिड: (मध्यभागी जातो) मग तिने ऐकलं तरी काय? मला सांगू नकोस की एखादा चोर मिस फ्रेंचसोबत आनंदाने गप्पा मारत असतो —(तो खिशातून रुमाल काढतो) आणि मग तिच्या डोक्यावर प्रहार करतो, तुझ्या जुन्या विदूषकासारखा! (तो रुमालाने **मेह्यु**च्या डोक्यावर हलकसं मारतो.)

मेह्यु: हो, ते खरंच अशक्यच वाटतं.

सर विल्फ्रिड: मला वाटतं ती कठोर आणि कडवट बाई काहीही बनवून सांगू शकते. मला नाही वाटत की ती कुठल्याही गोष्टीपासून परावृत्त होईल. खरंच—(अर्थपूर्णतेणे थांबत) मला वाटतं नाही—ती कुठल्याही गोष्टीपासून—

परावृत्त होईल.

मेह्यु: (घाबरून) देवा रे! याचा अर्थ काय...?

कार्टर: (प्रवेश करत दरवाजा बंद करतो) माफ करा, सर विल्फ्रिड. एक तरुण बाई तुम्हाला भेटायला आली आहे. ती म्हणते, हे लिओनार्ड व्होलच्या खटल्या संदर्भात आहे.

सर विल्फ्रिड: (असंख्य अनुभवांमुळे प्रभावित न होता)ती वेडी आहे का?

कार्टर: नाही हो, सर विल्फ्रिड. मी वेड्यांच्या प्रकाराला लगेच ओळखतो.

सर विल्फ्रिड: (डेस्कवरील चहाचे कप उचलत, वरच्या बाजूने पुढे जातो) कशी बाई आहे? (तो मध्यभागी जातो.)

कार्टर: (सर विल्फ्रिडकडून कप घेतो) अगदी साधी, सर्वसामान्य प्रकारची बाई आहे, पण बोलण्याची पद्धत बिनधास्त आहे.

सर विल्फ्रिड: आणि ती काय म्हणते?

कार्टर: (थोडंसं तुच्छतेने उद्धृत करतो) ती म्हणते, 'माझ्याकडे अशी माहिती आहे जी त्या कैद्याच्या थोडीफार उपयोगाची ठरू शकते.'

सर विल्फ्रिड: (एक दीर्घ उसासा टाकून…)

सर विल्फ्रिड: फारच अशक्य वाटतं. तिला आत घेऊन ये.

(कार्टर कप घेऊन निघून जातो.)

तुला काय वाटतं, जॉन?

मेह्यु: बरं, आपण काहीही दुर्लक्ष करू शकत नाही. प्रत्येक शक्यता तपासून पाहिलीच पाहिजे.

(कार्टर परत येतो आणि एका बाईला आत घेऊन येतो. तिचं वय जवळपास पस्तीस आहे. ती उठावदार पण स्वस्त कपड्यांत आहे. एक बाजूने केस चेहऱ्यावर झुकलेले आहेत. चेहऱ्यावर अतिशय गडद व भडक मेकअप आहे.

तिच्या हातात एक जुनाट हँडबॅग आहे. **मेह्यु** उठतो.)
कार्टर: ही आहे तरुणी. (कार्टर निघून जातो.)
बाई: (सर विल्फ्रिडकडे आणि मेहेवकडे एकसंध कटाक्ष टाकत) हं, काय आहे हे? दोघं आहात? मी तुमच्याशी दोघांशी बोलणार नाही. (ती वळते.)
सर विल्फ्रिड: हे मिस्टर मेह्यु आहेत. लिओनार्ड व्होलचे सॉलिसिटर. मी आहे सर विल्फ्रिड रोबर्ट्स, बचाव पक्षाचा वकील.
बाई: (सर विल्फ्रिडकडे नीट बघत) हो का? ओळखलंच नाही तुम्हाला विगशिवाय. किती छान दिसता सगळे त्या विगमध्ये!
(**मेह्यु** सर विल्फ्रिडला हलकेसे खुणावत वर उभा राहतो.)
बाई: काही चर्चा चालली आहे वाटतं? तर मी तुमचं काहीतरी काम करू शकते—जर तुम्ही मला योग्य मोबदला दिलात तर.
सर विल्फ्रिड: तुम्हाला बाईसाहेब —अं…
बाई: (डावीकडे बाकाशेजारी बसत) नाव सांगायची काही गरज नाही. सांगितलं तरी खरं नसेल, बरोबर ना?
सर विल्फ्रिड: (मध्यभागी उभा राहत) तुम्हाला जसं पाहिजे तसं. पण लक्षात ठेवा, जर तुमच्याकडे काही पुरावा असेल, तर तो समोर मांडणं ही तुमची जबाबदारी आहे.
बाई: अरे देवा, थांबा ना! मी असं काही म्हणाले का, की मला काही माहीत आहे? पण माझ्याकडे *काहीतरी* आहे, हे महत्त्वाचं आहे.
मेहेव: मॅडम, नेमकं काय आहे तुमच्याकडे?
बाई: अहो! मी आज कोर्टात होते. त्या बाईला ऐकलं मी—तीच ना, ती शोभेची बाहुली! किती गर्वाने बोलत होती. ती फार वाईट आहे. एकदम **फसवी हडळ** आहे ती.
सर विल्फ्रिड: ठीक आहे. पण तुमच्याकडे असलेल्या खास माहितीबद्दल…

बाई: (धूर्तपणे) अरे पण मला काय मिळणार त्यात? माझ्याकडे जे आहे ते खूप किमतीचं आहे. मला शंभर पौंड हवेत.
मेहेव: क्षमस्व, पण अशा प्रकाराचं कोणतंही काम आम्ही स्वीकारू शकत नाही. पण तुम्ही जर थोडं तरी सांगितलं, की तुमच्याकडे नेमकं काय आहे…
बाई: आधी वस्तू पाहिली नाही, तर खरेदी करायची नाही—म्हणजे तेच ना?
सर विल्फ्रिड: "वस्तू पाहिली"?
बाई: "बुचर'स हुक"—म्हणजे दिसणं.

सर विल्फ्रिड: फारच अशक्य वाटतं. (कार्टर कप घेऊन निघून जातो.) तुला काय वाटतं, जॉन?

मेह्यु: बरं, आपण काहीही दुर्लक्ष करू शकत नाही. प्रत्येक शक्यता तपासून पाहिलीच पाहिजे.
(**मेहयु** सर **विल्फ्रिड**ला हलकेसे खुणावत वर उभा राहतो.).

सर विल्फ्रिड: ओ हो—होय, नक्कीच.
बाई: तिच्याविरोधात पुरावा आहे माझ्याकडे. (ती तिची हँडबॅग उघडते.) पत्रं आहेत—हेच ते आहे. पत्रं.
सर विल्फ्रिड: रोमेन व्होलने कैद्याला लिहिलेली पत्रं?
बाई: (खवचटपणे हसत) कैद्याला? हसू आलं मला. बिचारा कैदी, त्याला तिने नीट फसवलं आहे. (डोळा मारते.) माझ्याकडे विकण्यासारखं काहीतरी आहे, गड्या, आणि ते विसरू नकोस.
(गुळगुळीतपणे) तुम्ही ही पत्रं आम्हाला दाखवलीत, तर ती कितपत महत्त्वाची आहेत हे आम्ही सांगू शकू.
बाई: फार भारी शब्द वापरताय ना? पण बघा, मी सांगतेय, पाहिल्याशिवाय

खरेदी करायची अपेक्षा नाही मला. पण व्यवहारात प्रामाणिकपणा हवा. ही पत्रं कामी आली, जर त्यांनी त्या मुलाला सोडवायला मदत केली आणि त्या विदेशी पोरीला तिच्या जागी बसवलं, तर मला शंभर पौंड हवेत. बरोबर?

मेह्यु: (आपले पाकीट काढून त्यातून दहा पौंड काढत) जर ही पत्रं बचाव पक्षासाठी उपयोगी ठरली—तुम्ही इथे यायला जो खर्च केला त्यासाठी—तर मी तुम्हाला दहा पौंड देऊ शकतो.

बाई: (जवळपास किंचाळत) अशा पत्रांसाठी फक्त दहा पाउंड? अजून विचार करा.

सर विल्फ्रिड: (मेहयुकडे जाऊन त्याच्याकडून पाकीट घेतो) जर तुमच्याकडे असलेली एखादी तरी चिठ्ठी माझ्या क्लायंटचा निरपराध असल्याचा पुरावा देत असेल, तर वीस पाउंड हा प्रवासखर्चासाठी अयोग्य रक्कम नसेल. (तो डेस्कच्या उजवीकडे जातो, पाकीटातून वीस पौंड काढतो, रिकामं पाकीट मेहयुकडे परत देतो, आणि मेहयुकडून घेतलेले दहा पौंड त्यात घालतो.)

बाई: पन्नास पौड, आणि डील फायनल. तेवढ्यात तुम्हाला पत्रं आवडली तर.

सर विल्फ्रिड: वीस पाउंड. (तो त्या नोटा डेस्कवर ठेवतो.)

(ती बाई त्याच्याकडे बघते आणि ओठ चाटते. ती मोहात पडते.)

बाई: चालेल, हरामखोर. घे रे, ठेव. भरपूर आहेत. (ती हँडबॅगमधून पत्रं काढते.) वरचं पत्र सगळं ठरवेल. (ती पत्रं बाकावर ठेवते आणि मग पैसे उचलायला जाते.)

मेहयु: एक क्षण थांबा. माझ्याकडे मिसेस व्होलचं एक पत्र आहे—इथे नाही, पण माझ्या कार्यालयामध्ये आहे.

सर विल्फ्रिड: बरं, मॅडम, आम्हाला वाटतंय की आत्ता तरी तुमच्यावर

विश्वास ठेवावा लागेल—(तो तिला नोटा देतो.) काही काळापुरता. (तो तिच्याकडून पत्रं घेतो, ती नीट करतो आणि वाचायला सुरुवात करतो.)

(बाई सावकाश नोटा मोजते, आणि दरम्यान इतरांवर नीट नजर ठेवते. **मेहयु** सर **विल्फ्रिड**जवळ येतो आणि त्याच्या खांद्यावरून पत्रं वाचायला लागतो. बाई उठते आणि दरवाजाकडे जाते.)
(मेहयुकडे वळून) हे विश्वास बसणार नाही असं आहे. अगदी अविश्वसनीय.
मेह्यु: (त्याच्या खांद्यावरून वाचत) किती थंड डोक्याने बदला घेतलाय.
सर विल्फ्रिड: (बाईकडे जात) तुला ही पत्रं कुठून मिळालीत?
बाई: ते सांगणं धोक्याचं आहे.
सर विल्फ्रिड: तुला रोमेने व्होलबद्दल इतकं वैर का आहे?

(बाई बाकाजवळ येते, आणि नाट्यमय पद्धतीने तिचं डोकं फिरवते. ती बाकावरील दिवा तिच्या चेहऱ्याकडे फिरवते आणि तिच्या केसांमागचा भाग उघड करते, ज्यामुळे प्रेक्षकांना तिचा चेहरा दिसतो—गाल पूर्णपणे चिरलेला, ओरखडलेला आणि विद्रूप झालेला असतो. सर विल्फ्रिड मागे सरकतो, आश्चर्याने उद्गारतो.)
बाई: बघितलंत?
सर विल्फ्रिड: हे तिनं केलं तुझ्यावर?

बाई: (मध्यभागी येत) नाही, तिच्या हातचं नाही. मी ज्या मुलासोबत होते, त्याचं. आमचं स्थिर नातं होतं. तो थोडा लहान होता माझ्यापेक्षा, पण त्याला माझं खूप प्रेम होतं, आणि माझंही त्याच्यावर खूप प्रेम होतं. मग ही आली. तिला त्याच्यात गोडी वाटली आणि तिनं त्याला माझ्यापासून हिरावून घेतलं. ती लपूनछपून त्याला भेटायला लागली आणि एके दिवशी तो नाहीसा झाला.

मला माहीत होतं तो कुठे गेला आहे. मी शोधायला गेले, आणि त्यांना मी एकत्र पाहीले. (ती बाकाच्या डाव्या बाजूला बसते.) मी तिला खरं खरं सांगितलं काय वाटतं ते, आणि मग तिचे लोक माझ्यावर तुटून पडले. तो कुठल्यातरी रेझर गँगमध्ये होता. त्यानं माझा चेहरा नीटपणे फाडून टाकला.

(सर विल्फ्रिड बाईच्या आधीच चलाखीने पैसे उचलतो. बाई पटकन पत्रं परत उचलते.)

सर विल्फ्रिड: थांबा एक क्षण. ही तिचीच अक्षरं असतील का?

बाई: हो, तिचंच अक्षर आहे. तिनंच लिहिलीत ही पत्रं. सगळं नीट आणि खरं आहे.

सर विल्फ्रिड: तुमच्या शब्दावरच विश्वास ठेवावा लागतोय आम्हाला.

मेह्यु: एक क्षण थांबा. माझ्याकडे मिसेस व्होलचं एक पत्र आहे—इथे नाही, पण माझ्या कार्यालयामध्ये आहे.

सर विल्फ्रिड: बरं, मॅडम, अस वाटतंय की आम्हाला आता तरी तुमच्यावर

विश्वास ठेवावा लागेल—(तो तिला नोटा देतो.) काही काळापुरता. (तो तिच्याकडून पत्रं घेतो, ती नीट करतो आणि वाचायला सुरुवात करतो.)

(बाई सावकाश नोटा मोजते, आणि दरम्यान इतरांवर नीट नजर ठेवते. **मेह्यु** सर विल्फ्रिडजवळ येतो आणि त्याच्या खांद्यावरून पत्रं वाचायला लागतो. बाई उठते आणि दरवाजाकडे जाते.)

(मेह्युकडे वळून**)** हे विश्वास बसणार नाही असं आहे. अगदी अविश्वसनीय.

मेह्यु: (त्याच्या खांद्यावरून वाचत) किती थंड डोक्याने बदला घेतलाय.

सर विल्फ्रिड: (बाईकडे जात) तुला ही पत्रं कुठून मिळालीत?

बाई: ते सांगणं धोक्याचं आहे.
सर विल्फ्रिड: तुला रोमेन व्होलबद्दल इतकं वैर का आहे?

(बाई बाकाजवळ येते, आणि नाट्यमय पद्धतीने तिचं डोकं फिरवते. ती बाकावरील दिवा तिच्या चेहऱ्याकडे फिरवते आणि तिच्या केसांमागचा भाग उघड करते, ज्यामुळे प्रेक्षकांना तिचा चेहरा दिसतो—गाल पूर्णपणे चिरलेला, ओरखडलेला आणि विद्रूप झालेला असतो. सर विल्फ्रिड मागे सरकतो, आश्चर्याने उद्गारतो.)
बाई: बघितलंत? **"हं,"** ती म्हणाली, "आता कुठलाही माणूस माझ्याकडे नजरही टाकणार नाही."
सर विल्फ्रिड: तू पोलीसांकडे गेलीस का यासाठी?
बाई: मी का? शक्यच नाही. आणि खरं सांगायचं तर, त्याचा दोष नव्हता. खरं म्हणजे तीच जबाबदार होती. तिनंच त्याला माझ्यापासून दूर केलं, माझ्याविरुद्ध वळवलं. पण मी वेळ येईपर्यंत वाट पाहिली. मी तिचा पाठलाग करत होते, लक्ष ठेवत होते. ती काय काय करतेय, त्यातलं बरंच काही मला माहीत आहे. ती कधीकधी लपून ज्याच्याकडे जाते, तो माणूस कुठे राहतो, तेही मला माहीत आहे. तिथूनच मला ही पत्रं मिळाली. तर बास, सगळी गोष्ट सांगितली तुम्हाला, साहेब.
(ती उठते, तिचं चेहरा पुढे आणते आणि केस बाजूला करते.)
"चुंबन घ्यायचं आहे का?"

(सर विल्फ्रिड घाबरून मागे सरकतो.)
बाई: मी दोष देत नाही तुम्हाला. (ती डावीकडे जाते.)

आहेत का?

(मेह्यु आपलं रिकामं पाकीट दाखवतो.)

(सर विल्फ्रिड स्वतःचं पाकीट काढतो आणि त्यातून पाच पौंडांची नोट काढतो.)

"घे, अजून पाच पौंड देतो."

बाई: (नोट हिसकावत) माझ्यापासून लपवून ठेवले होते का काय? अजून पाच पौंड द्यायला तयार झाला! (ती सर विल्फ्रिडकडे आक्रमकपणे येते.)

(सर विल्फ्रिड मागे सरकत **मेह्यू**जवळ जातो.)

सर विल्फ्रिड: अरे, मला माहिती होतं, मी तुझ्याशी फारच सौम्य वागतो आहे. ही पत्रंच तर खरी मालमत्ता आहेत, नाही का?

सर विल्फ्रिड: (एक पत्र देत) मला वाटतं ही पत्रं खूप उपयोगी ठरतील. हे बघ, जॉन, यावर एक नजर टाक.

(ती बाई पटकन दरवाजातून निघून जाते.)

मॅह्यू: आपल्या सुरक्षिततेसाठी आपण एका हस्ताक्षर तज्ञाला ही पत्रं दाखवूया. गरज पडल्यास तो साक्ष देऊ शकेल.

सर विल्फ्रिड: आपल्याला त्या माणसाचं आडनाव आणि पत्ता लागेल.

मॅह्यू: (इकडे तिकडे बघत) अरे, ती कुठे गेली? तिने अजून माहिती न देता निघून जाऊ नये.

(तो मध्यभागी जातो.)

सर विल्फ्रिड: (जवळजवळ पळत जातो आणि बाहेरून हाक मारतो) कार्टर! कार्टर!

कार्टर: (बाहेरून) हो, सर विल्फ्रिड?

सर विल्फ्रिड: (बाहेरून) कार्टर, ती तरुण बाई कुठे गेली?

कार्टर: (बाहेरून) ती थेट बाहेर गेली, सर.
सर विल्फ्रिड: (बाहेरून) तुला तिला जाऊ द्यायला नको होतं. ग्रेटाला तिच्यामागे पाठव.
कार्टर: (बाहेरून) ठीक आहे, सर विल्फ्रिड.
(सर विल्फ्रिड परत येतो आणि मेह्यूच्या डावीकडे जातो.)
मेह्यू: ती निघून गेली?
सर विल्फ्रिड: हो. मी ग्रेटाला तिच्यामागे पाठवलंय, पण या धुक्यात काही आशा नाही. धत्ते! आपल्याला त्या माणसाचं आडनाव आणि पत्ता याचा माग लागायलाच हवा.
मेह्यू: आपल्याला ते मिळणार नाही. तिने अगदी नीट विचारपूर्वक सगळं आखलेलं होतं. तिने आपलं नाव दिलं नाही, आणि जसं आपल्याला पत्रांमध्ये गुंतलेलं पाहिलं, तसं ती सरकलीसुद्धा – जणू सापासारखी निसटली. ती साक्षीदार म्हणून उभी राहण्याचा धोका पत्करणार नाही. गेल्या वेळेस त्या माणसाने तिचं काय केलं होतं, ते आठव.
सर विल्फ्रिड: (अविश्वासाने) तिचं रक्षण केलं गेलं असतं.
मॅह्यू: खरंच? किती काळासाठी? शेवटी त्याने तिला गाठलच असता, किंवा त्याचा…

मेह्यू: तिचे काही जुने मित्र असतील. इथं येऊन ती आधीच काहीसा धोका पत्करून आली आहे. तिला त्या माणसाला यात ओढायचं नाहीये. ती रोमेन हायलगरच्या मागे आहे.

सर विल्फ्रिड: आणि आमची रोमेन काय देखणी आहे म्हणायची! पण आता तरी आपल्या हातात काहीतरी आलंय. आता कार्यपद्धतीबद्दल...

पडदा पडतो.

दृष्य दुसरे

दृष्य: *ओल्ड बेली न्यायालय. दुसऱ्या दिवशी सकाळ.*

(पडदा वर जातो तेव्हा न्यायालयात न्यायाधीशांच्या आगमनाची वाट पाहिली जात आहे. **लिओनार्ड** आणि दारवान न्यायालयाच्या आरोपी बाकावर बसलेले आहेत. दोन वकील मागच्या रांगेत डाव्या टोकास बसले आहेत. सर विल्फ्रिड आणि त्यांचे सहाय्यक त्यांच्या जागी आहेत. **मेह्यू** टेबलच्या डाव्या बाजूस उभा आहे आणि सर **विल्फ्रिडशी** बोलतो आहे. कोर्ट लिपिक, **न्यायाधीशां**चे लिपिक आणि शॉर्टहँड लेखक त्यांच्या जागांवर आहेत. तीन ज्युरींमधील सदस्य दृष्यमान असून आपल्या जागांवर बसले आहेत. पोलीस डाव्या वरच्या दरवाज्याजवळ उभा आहे. दारवान उजव्या मध्यभागी असलेल्या जिन्याच्या टोकावर उभा आहे. मायर्स, त्याचा सहाय्यक आणि दोन वकील वरच्या मध्य दरवाज्यातून प्रवेश करतात. मायर्स सर **विल्फ्रिडकडे** जातो आणि रागाने बोलायला लागतो. सहाय्यक आणि वकील त्यांच्या जागांवर बसतात.

(न्यायाधीशाच्या दरवाज्यावर तीन वेळा टकटक होते. दारवान उजवीकडील जिन्यावरून खाली येतो. दारवान टेबलच्या उजव्या बाजूला असलेल्या स्टूलवर बसतो. मेह्यू उठतो, लिओनार्डशी काही बोलतो आणि त्याला शांत करतो. लिओनार्ड नाराज असतो. तो चिंतेने डोकं हलवतो. रोमेन डाव्या बाजूने

प्रवेश करते, पुढे जाते आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्यात शिरते. पोलिस दरवाजा बंद करतो.)

सर विल्फ्रिड: मिसेस हायलगर, तुम्हाला माहिती आहे की तुम्ही अजूनही शपथेखाली आहात?

रोमेन: हो.

न्यायाधीश: रोमेइन हायलगर, तुम्हाला पुन्हा साक्षीदाराच्या पिजऱ्यात बोलावले आहे जेणेकरून सर विल्फ्रिड तुम्हाला आणखी काही प्रश्न विचारू शकतील.

सर विल्फ्रिड: मिसेस हायलगर, तुम्हाला "मॅक्स" नावाचा एक पुरुष माहिती आहे का?

रोमेन: (त्या नावाचा उल्लेख होताच ती दचकते.) मला कळत नाही तुम्ही काय म्हणत आहात.

सर विल्फ्रिड: (सौम्यपणे.) आणि तरीही हा एक अगदी साधा प्रश्न आहे. तुम्हाला "मॅक्स" नावाचा एक पुरुष माहिती आहे का, की नाही?

रोमेन: मुळीच नाही.

सर विल्फ्रिड: तुम्हाला खात्री आहे का?

रोमेइन: मी मॅक्स नावाच्या कुठल्याही व्यक्तीला कधीही जाणलेले नाही. कधीही नाही.

सर विल्फ्रिड: आणि तरीही, तुमच्या देशात हे नाव—किंवा या नावाचे संक्षिप्त रूप—सामान्य आहे, असे मी ऐकले आहे. तुम्ही म्हणत आहात की तुम्ही कधीही हे नाव असलेल्या कुठल्याही व्यक्तीला ओळखलेले नाही?

रोमेन: (साशंकतेने.) जर्मनीमध्ये... हो—कदाचित, पण मला आठवत नाही. खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.

सर विल्फ्रिड: मी तुम्हाला इतकं मागे जायला सांगणार नाही. काही आठवडे पुरेसे आहेत. धरून चालू या — (तो एक पत्र उचलतो आणि उघडतो, मुद्दाम थोडा देखावा करत.) — मागील १७ ऑक्टोबर.

रोमेन: (दचकून.) ते तुमच्याकडे काय आहे?

सर विल्फ्रिड: एक पत्र.

रोमेन: मला अजिबात कळत नाही तुम्ही काय म्हणत आहात.

सर विल्फ्रिड: मी एका पत्राबद्दल बोलतो आहे. १७ ऑक्टोबरला लिहिलेल्या पत्राबद्दल. कदाचित ती तारीख तुम्हाला आठवत असेल.

रोमेइन: तसं काही विशेष नाही, का विचारताय?

सर विल्फ्रिड: माझं म्हणणं आहे की त्या दिवशी तुम्ही एक पत्र लिहिलं — मॅक्स नावाच्या एका पुरुषाला उद्देशून.

रोमेन: मी असं काही केलं नाही. हे सगळं खोटं आहे. मला काही समजत नाही, तुम्ही काय म्हणताय.

सर विल्फ्रिड: ते पत्र म्हणजे अशा पत्रमालिकेतील एक होतं, जी तुम्ही त्या

माणसाला बराच काळ लिहीत होतात.

रोमेन: (अस्वस्थ होत) खोटं — सगळं खोटं!

सर विल्फ्रिड: असं दिसतंय की त्या माणसाशी तुमचं... (अर्थपूर्ण थांबतो) खूप जवळचं नातं होतं.

लिओनार्ड: (उठून) तुम्ही असं काही बोलायची हिंमत कशी केली?

(दारवान उठतो आणि लिओनार्डला थांबवण्याचा प्रयत्न करतो. लिओनार्ड त्याला दूर सारतो.)

लिओनार्ड: हे खरं नाही!

न्यायाधीश: आरोपीने स्वतःच्या हितासाठी शांत राहावं.

(लिओनार्ड आणि वॉर्डर पुन्हा जागेवर बसतात.)

सर विल्फ्रिड: मला या पत्रलेखनाची एकूण दिशा महत्त्वाची नाही. मला फक्त एका विशिष्ट पत्रात रस आहे. (तो वाचतो.) "माय बिलव्हड मॅक्स. एक विलक्षण गोष्ट घडली आहे. मला वाटतं आपल्या सगळ्या अडचणी आता संपतील..."

रोमेन: (खवळून) हे खोटं आहे — मी असं काही लिहिलेलं नाही. तुम्ही ते पत्र कुठून मिळवलं?

कोणी दिलं तुम्हाला?

सर विल्फ्रिड: ते पत्र माझ्याकडे कसं आलं, याचा इथे काही संबंध नाही.

रोमेन: तुम्ही ते चोरलं. तुम्ही फसवे आणि चोर आहात. की कोणीतरी बाईने

तुम्हाला दिलं? बरोबर आहे, नाही का?

न्यायाधीश: कृपया वकीलांनी विचारलेल्या प्रश्नांनाच फक्त उत्तरे द्यावीत.

रोमेन: पण मी ऐकणारच नाही!

न्यायाधीश: पुढे या, सर विल्फ्रिड.

सर विल्फ्रिड: आत्तापर्यंत तुम्ही फक्त त्या पत्राची सुरुवात ऐकली आहे. मी समजू का, की तुम्ही स्पष्टपणे ते लिहिलं नसल्याचं म्हणत आहात?

रोमेइन: अर्थातच मी ते लिहिलेलं नाही. ते बनावट आहे. ही खोटी पत्रं ऐकायला लावणं म्हणजे माझ्यावर अन्याय आहे — एका असूयेने पछाडलेल्या बाईने तयार केलेल्या खोट्या गोष्टी आहेत या.

सर विल्फ्रिड: मला असं वाटतं की खोटं बोलणाऱ्या तुम्हीच आहात. तुम्ही या न्यायालयात, शपथ घेऊन, निर्लज्जपणे आणि सातत्याने खोटं बोललं आहात आणि...

दारवानः उठावे.

(सगळे उभे राहतात. न्यायाधीश आणि नगराध्यक्ष न्यायाधीशाच्या

दरवाज्यातून प्रवेश करतात आणि आपापल्या जागांवर बसतात.)

दारवान: *ज्या सर्व व्यक्तींना महाराणीच्या न्यायाधीशांपुढे "ऑयर अँड टर्मिनर"आणि केंद्रीय फौजदारी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रातील सामान्य गुन्हेगारी सुनावणीसाठी काही करायचं आहे, त्यांनी पुढे यावं आणि आपली उपस्थिती नोंदवावी.*
गॉड सेव्ह द क्वीन.

(न्यायाधीश न्यायालयाला नमस्कार करतो आणि सगळे बसतात. दारवान डाव्या बाजूच्या स्टूलावर बसतो.)

(सर विल्फ्रिड टेबलावर टकटक करून म्हणतो.)

सर विल्फ्रिड: तुम्ही खोटं बोललंत, याचं कारण स्पष्ट केलं जातं—या पत्रामुळे—जे तुम्ही स्वतः काळ्या-पांढऱ्या अक्षरात लिहिलं आहे.

रोमेन: तुम्ही वेडे झाला आहात. मी असलं काही बाष्कळ का लिहीन?

सर विल्फ्रिड: कारण तुमच्यासमोर एक मार्ग खुला झाला होता—स्वातंत्र्याचा मार्ग—आणि तो मार्ग स्वीकारताना एक निरपराध माणूस मृत्युदंडाला सामोरा जाईल, ही गोष्ट तुमच्यासाठी काहीही अर्थाची नव्हती. तुम्ही तर इतकंही लिहिलं की तुम्हीच कसे चुकून लिओनार्ड व्होलला डुक्कर कापायच्या चाकूने जखमी केलं.

रोमेन: (रागाने भरून) मी असं काही लिहिलेलं नाही! मी लिहिलं होतं की

त्यानेच आपल्याच हाताने डुक्कर कापताना त्याचा हात कापला... (तिचा आवाज हळूहळू मंदावतो.)

(कोर्टातले सगळे लोक तिच्याकडे पाहतात.)

सर विल्फ्रिड: (विजयाच्या स्वरात) म्हणजे तुम्हाला पत्रात काय आहे हे आधीच माहिती होतं—मी ते वाचायच्या आधीच.

रोमेन: (नियंत्रण सोडून) शाप लागो तुला! शाप लागो तुला! शाप लागो तुला!

लिओनार्ड: (अर्ज करत) तिला सोडून द्या. त्रास देऊ नका.

रोमेन: (घाबरलेल्या नजरेने आजूबाजूला पाहत) मला इथून बाहेर जाऊ द्या—मला जाऊ द्या! (ती साक्षीदाराच्या पिंजऱ्यातून बाहेर येते.)

(दारवान उठतो आणि रोमेनला थांबवतो.)

न्यायाधीश: दारवान साक्षीदारासाठी खुर्ची द्या.

(रोमेन टेबलच्या उजव्या बाजूला असलेल्या खुर्चीत बसते.)

न्यायाधीश: रोमेन हायलगर, कृपया पुन्हा साक्षीदाराच्या पिंजऱ्यात या.

(रोमेन उठते आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्यात शिरते.)

न्यायाधीश: तुम्ही ते पत्र वाचलेलं ऐकलं. तुम्हाला काही सांगायचं आहे का?

रोमेन: (पराभूत होऊन, निर्विकारपणे) काहीच नाही.

लिओनार्ड: रोमेन, त्याला सांग तू ते लिहिलं नाहीस. मला माहिती आहे, तू ते लिहिलं नाहीस.

रोमेन: (फिरून, तिरस्काराने) अर्थात मी लिहिलं!

सर विल्फ्रिड: माझ्या लॉर्ड, बचाव पक्षाची बाजू यावर संपते.

न्यायाधीश: सर विल्फ्रिड, तुम्हाला हे पत्र कुणाकडून दिलं गेलं होतं, याबाबत काही पुरावे आहेत का?

सर विल्फ्रिड: माझ्या लॉर्ड, हे पत्र मला अज्ञात रीत्या मिळालं, आणि अजूनपर्यंत अधिक माहिती काढायला वेळ मिळालेला नाही. असं वाटतं की हा माणूस बेकायदेशीररीत्या या देशात आला असून, इथे काही विध्वंसक कारवायांमध्ये गुंतलेला आहे...

रोमेन: तुम्हाला कधीच कळणार नाही तो कोण आहे—कधीच नाही. तुम्ही माझ्याशी काहीही करा, पण तो कोण आहे हे तुम्हाला कधीच समजणार नाही.

न्यायाधीश: मायर्स, तुम्हाला पुन्हा साक्षीदाराला प्रश्न विचारायचे आहेत का?

(सर विल्फ्रिड बसतो.)

मायर्स: (थोडासा अस्वस्थपणे उठून) खरं सांगायचं झालं तर, माझ्या लॉर्ड, या अनपेक्षित घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मला थोडंसं कठीण वाटतंय. (रोमेनकडे पाहून) मिसेस हायलगर, मला वाटतं तुम्ही खूप संवेदनशील स्वभावाच्या आहात. एक परदेशी नागरिक म्हणून, इंग्लंडमधील न्यायालयात शपथ घेतल्यावर तुमच्यावर कोणती जबाबदारी येते, हे तुम्हाला कदाचित पूर्णपणे

समजलं नसेल. जर एखाद्या दबावाखाली तुम्ही असं काही कबूल केलं असेल जे खोटं आहे, किंवा जर ते पत्र एखाद्या कल्पनेच्या भरात लिहिलं असेल, तर कृपया आता स्पष्टपणे सांगा.

रोमेन: किती वेळा माझा छळ करणार तुम्ही? मी ते पत्र लिहिलं. आता मला जाऊ द्या.

मायर्स: माझ्या लॉर्ड, मला वाटतं साक्षीदार इतकी अस्थिर झाली आहे की तिला ती काय कबूल करत आहे हेही नीट समजत नाहीये.

न्यायाधीश: मायर्स, तुम्हाला आठवत असेल की, सर विल्फ्रिड यांनी मागच्या साक्षीदरम्यान साक्षीदाराला सावध केलं होतं आणि शपथेचं पावित्र्य स्पष्ट केलं होतं.

(मायर्स बसतो.)

न्यायाधीश: मिसेस हायलगर, मी तुम्हाला सांगतो, की हे प्रकरण इथे संपलेलं नाही. या देशात खोट्या शपथेवर साक्ष देणं म्हणजे गंभीर गुन्हा आहे, आणि मी सांगतो की तुमच्याविरुद्ध लवकरच खोट्या साक्षीबद्दल कारवाई केली जाईल. खोट्या साक्षीला शिक्षा कठोर असू शकते. तुम्ही खाली उतरू शकता.

(रोमेन खाली उतरते. पोलिस दरवाजा उघडतो. रोमेन तिथून निघून जाते. पोलिस दरवाजा बंद करतो.)

न्यायाधीश: सर विल्फ्रिड, आता तुम्ही बचाव पक्षाच्या वतीने पंचांसमोर निवेदन कराल का?

सर विल्फ्रिड: (उठतो) पंचमंडळी, जेव्हा सत्य स्पष्टपणे उघड होतं, तेव्हा ते स्वतः बोलतं. माझ्या शब्दांनी तुमच्यावर जास्त परिणाम होणार नाही, कारण आरोपीने जी सरळ आणि स्पष्ट गोष्ट सांगितली, आणि ज्याप्रकारे त्याच्यावर खोटा आरोप करण्याचा दुष्ट प्रयत्न केला गेला, ते तुम्ही स्वतः पाहिलं आहे...

(सर विल्फ्रिड बोलत असताना प्रकाश मंद होत जातो आणि ब्लॅकआउट होतो. काही सेकंदांनी पुन्हा प्रकाश येतो. पंच बाहेर गेले होते, आता ते परत येत आहेत.)

क्लार्क: (उठून) व्होल, उभे राहा.

(लिओनार्ड उठतो.)

कारकून: पंचमंडळी, तुम्ही सर्वांनी निर्णयावर एकमत साधलं आहे का?

पंचनेता: (उठून) होय.

क्लार्क: आरोपी लिओनार्ड व्होलला तुम्ही दोषी ठरवता का, निर्दोष?

पंचनेता: निर्दोष, माझ्या लॉर्ड.

(कोर्टात समाधानाची कुजबुज होते.)

दारवान: (उठून, मध्यभागी जात) शांतता!

न्यायाधीश: लिओनार्ड व्होल, १४ ऑक्टोबर रोजी एमिली फ्रेंचच्या खुनात

तुम्हाला निर्दोष ठरवण्यात आलं आहे. त्यामुळे तुम्हाला मुक्त करण्यात येत

आहे.

सर विल्फ्रिड: (उठून) *माय लॉर्ड, या खटल्याची मागील वेळी तह झाली तेव्हापासून काही खळबळजनक स्वरूपाचे पुरावे पुढे आले आहेत, जे पुढील तपासात...*हा पुरावा इतका महत्त्वाचा आहे की, मी स्वतः पुढे होत आपल्या लॉर्डशिपकडे विनंती करतो की, सरकारी पक्षाच्या शेवटच्या साक्षीदारास — रोमेन हायलगर हिला — पुन्हा बोलावण्याची परवानगी द्यावी.

(कोर्ट लिपिक उठतो आणि न्यायाधीशाच्या कानात कुजबुजतो.)

न्यायाधीश: सर विल्फ्रिड, हा पुरावा तुम्हाला नेमका केव्हा प्राप्त झाला?
(लिपिक बसतो.)

सर विल्फ्रिड: काल रात्री न्यायालय तह झाल्यानंतर तो माझ्याकडे आणला गेला.
मायर्स: (उठून) माय लॉर्ड, मला माझ्या माननीय मित्राच्या या विनंतीवर हरकत घ्यावी लागेल. सरकारी पक्षाचा खटला पूर्ण झाला आहे आणि...
(सर विल्फ्रिड बसतो.)

न्यायाधीश: मिस्टर मायर्स, मी आपली भूमिका ऐकण्याच्या औपचारिकतेचेपालन न करता या प्रश्नावर निर्णय देणार नव्हतोच., सर विल्फ्रिड, यांना बोलू द्या.
(मायर्स बसतो.)

सर विल्फ्रिड: (उठून) माय लॉर्ड, अशा प्रकरणात जिथे आरोपीच्या बाजूने अत्यंत महत्त्वाचा पुरावा त्याचे कायदेशीर सल्लागार ज्यूरीने निकाल देण्या

पूर्वी कधीही प्राप्त करतात, तिथे असा पुरावा केवळ ग्राह्यच नाही, तर आवश्यक ठरतो. सुदैवाने, माझ्या मांडणीस पाठिंबा देणारा स्पष्ट अधिकारही आहे — *The King v. Stillman* या प्रकरणात, जे १९२६ च्या अपील केसेसमध्ये, पान क्रमांक ४६३ वर नोंदवलेले आहे. (तो समोर असलेले कायद्याचे पुस्तक उघडतो.)

न्यायाधीश: तुम्हाला तो अधिकार दाखवायची गरज नाही, सर विल्फ्रिड. मला त्याची पूर्ण माहिती आहे. मी आता सरकारी पक्षाचं म्हणणं ऐकू इच्छितो. मिस्टर मायर्स?
(सर विल्फ्रिड बसतो व टेबलवर टकटक करून म्हणतो.)

सर विल्फ्रिड: तुम्ही खोटं बोललंत, याचं कारण —या पत्रामुळे—स्पष्ट केलं जातं, जे तुम्ही स्वतः काळ्या-पांढऱ्या अक्षरात लिहिलं आहे.

लिओनार्ड: (अर्ज करत) तिला सोडून द्या. त्रास देऊ नका.

रोमेन: (घाबरलेल्या नजरेने आजूबाजूला पाहत) मला इथून बाहेर जाऊ द्या— मला जाऊ द्या! (ती साक्षीदाराच्या पिंजऱ्यातून बाहेर येते.)

(दारवान उठतो आणि रोमेनला थांबवतो.)

न्यायाधीश: दारवान, साक्षीदारासाठी खुर्ची द्या.

(रोमेन टेबलच्या उजव्या बाजूला असलेल्या स्टूलावर कोसळते, जोरजोराने रडत तिचा चेहरा हातात लपवते. दारवान उजव्या स्टूलवर बसतो.)

न्यायाधीश: वाचा, म्हणजे ते स्पष्ट होईल.

सर विल्फ्रिड: (वाचतो) "माय बिलव्हड मॅक्स, एक विलक्षण गोष्ट घडली आहे. मला वाटतं आपल्यावरच्या सगळ्या अडचणी आता संपतील. मी तुझ्याकडे येऊ शकते, इथे तू करत असलेल्या महत्त्वाच्या कामाला धक्का न लागता. जी म्हातारी बाई मी तुला सांगितली होती ती आता मेली आहे आणि मला वाटतं लिओनार्डवर संशय घेतला जात आहे. त्या रात्री तो तिथे होता आणि त्याचे फिंगरप्रिंट्स सगळीकडे असतील. साडेनऊ वाजतानाची वेळ दिसतेय. लिओनार्ड तेव्हा घरी आला होता, पण त्याचा पुरावा माझ्यावर अवलंबून आहे—फक्त माझ्यावर. समजा मी म्हणाले की तो उशीरा आला आणि त्याच्या कपड्यांवर रक्त होतं—हो, त्याच्या बाहीवर रक्त होतं, कारण जेवताना त्याचं मनगट कापलं होतं, त्यामुळे सगळं फिट बसेल. मी असंही म्हणू शकते, की त्याने मला सांगितलं की त्याने तिला मारलं. ओह मॅक्स, प्रिय! मला सांग की मी पुढे जाऊ शकते—हे किती सुंदर होईल, एक कृतज्ञ आणि प्रेमळ पत्नीचं नाटक करणं संपवता येईल. मला माहित आहे कारण आणि पक्ष महत्त्वाचे आहेत, पण जर लिओनार्डला खुनाबद्दल दोषी ठरवलं गेलं, तर मी तुझ्याकडे सुरक्षितपणे येऊ शकेन आणि आपण कायमसाठी एकत्र राहू शकू. तुझी प्रेमळ, रोमेन."

न्यायाधीश: रोमेन हायलगर, कृपया पुन्हा साक्षीदाराच्या पिंजऱ्यात या.

(रोमेन उठते आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्यात शिरते.)

न्यायाधीश: तुम्ही ते पत्र ऐकलं. तुम्हाला काही सांगायचं आहे का?

रोमेन: (पराभूत होऊन, निर्विकारपणे) काहीच नाही.

लिओनार्ड: रोमेन, त्याला सांग तू ते लिहिलं नाहीस. मला माहिती आहे, तू ते

लिहिलं नाहीस.

रोमेन: (फिरून, तिरस्काराने) अर्थात मी लिहिलं!

सर विल्फ्रिड: माझ्या लॉर्ड, बचाव पक्षाची बाजू यावर संपते.

न्यायाधीश: सर विल्फ्रिड, हे पत्र कुणाला लिहिलं गेलं होतं, याबाबत तुमच्याकडे काही पुरावे आहेत का?

सर विल्फ्रिड: माझ्या लॉर्ड, हे पत्र मला अज्ञात रीत्या मिळालं, आणि अजूनपर्यंत अधिक माहिती काढायला वेळ मिळालेला नाही. असं वाटतं की हा माणूस बेकायदेशीर रीत्या या देशात आला असून, इथे काही विध्वंसक कारवायांमध्ये गुंतलेला आहे...

रोमेन: तुम्हाला कधीच कळणार नाही तो कोण आहे—कधीच नाही. तुम्ही माझ्याशी काहीही करा, पण तो कोण आहे हे तुम्हाला कधीच समजणार नाही.

न्यायाधीश: मायर्स, तुम्हाला पुन्हा साक्षीदाराला प्रश्न विचारायचे आहेत का?

(सर विल्फ्रिड बसतो.)

मायर्स: (थोडासा अस्वस्थपणे उठून) खरं सांगायचं झालं तर, माझ्या लॉर्ड, या अनपेक्षित घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मला थोडंसं कठीण वाटतंय. (रोमेनकडे पाहून) मिसेस हायलगर, मला वाटतं तुम्ही खूप संवेदनशील स्वभावाच्या आहात. एक परदेशी नागरिक म्हणून, इंग्लंडमधील न्यायालयात शपथ घेतल्यावर तुमच्यावर कोणती जबाबदारी येते हे तुम्हाला कदाचित पूर्णपणे समजलं नसेल. जर एखाद्या दबावाखाली तुम्ही असं काही कबूल केलं असेल

जे खोटं आहे, किंवा जर ते पत्र एखाद्या कल्पनेच्या भरात लिहिलं असेल, तर कृपया आता स्पष्टपणे सांगा.

रोमेन: किती वेळा माझा छळ करणार तुम्ही? मी ते पत्र लिहिलं. आता मला जाऊ द्या.

मायर्स: माझ्या लॉर्ड, मला वाटतं साक्षीदार इतकी अस्थिर झाली आहे की तिला काय कबूल करत आहे हेही नीट समजत नाहीये.

न्यायाधीश: मायर्स, तुम्हाला आठवत असेल की, सर विल्फ्रिड यांनी मागच्या साक्षीदरम्यान साक्षीदाराला सावध केलं होतं आणि शपथेचं पावित्र्य स्पष्ट केलं होतं.

(मायर्स बसतो.)

न्यायाधीश: मिसेस हायलगर, मी तुम्हाला सांगतो की हे प्रकरण इथे संपलेलं नाही. या देशात खोट्या शपथेवर साक्ष देणं म्हणजे गंभीर गुन्हा आहे, आणि

मी सांगतो की तुमच्याविरुद्ध लवकरच खोट्या साक्षीबद्दल कारवाई केली जाईल. खोट्या साक्षीला शिक्षा कठोर असू शकते. तुम्ही खाली उतरू शकता.

(रोमेन खाली उतरते. पोलिस दरवाजा उघडतो. रोमेन तिथून निघून जाते. पोलिस दरवाजा बंद करतो.)

न्यायाधीश: सर विल्फ्रिड, आता तुम्ही बचाव पक्षाच्या वतीने पंचांसमोर निवेदन कराल का?

सर विल्फ्रिड: (उठतो) पंचमंडळी, जेव्हा सत्य स्पष्टपणे उघड होतं, तेव्हा ते स्वतः बोलतं. माझ्या शब्दांनी तुमच्यावर जास्त परिणाम होणार नाही, कारण आरोपीने जी सरळ आणि स्पष्ट गोष्ट सांगितली, आणि ज्याप्रकारे त्याच्यावर खोटा आरोप करण्याचा दुष्ट प्रयत्न केला गेला, ते तुम्ही स्वतः पाहिलं आहे...

(सर विल्फ्रिड बोलत असताना प्रकाश मंद होत जातो आणि ब्लॅकआउट होतो. काही सेकंदांनी पुन्हा प्रकाश येतो. पंच बाहेर गेले होते, आता ते परत येत आहेत.)

क्लार्क: (उठून) व्होल, उभे राहा.

(**लिओनार्ड** उठतो.)

क्लार्क: पंचमंडळी, तुम्ही सर्वांनी निर्णयावर एकमत साधलं आहे का?

पंचनेता: (उठून) होय.

क्लार्क: आरोपी लिओनार्ड व्होलला तुम्ही दोषी ठरवता का, निर्दोष?

पंचनेता: निर्दोष, माझ्या लॉर्ड.

(कोर्टभर समाधानाची कुजबुज होते.)

दारवान: (उठून, मध्यभागी जात) शांतता!

न्यायाधीश: लिओनार्ड व्होल, १४ ऑक्टोबर रोजी एमिली फ्रेंचच्या खून

प्रकरणात तुम्हाला निर्दोष ठरवण्यात आलं आहे. त्यामुळे तुम्हाला मुक्त

करण्यात येत आहे.तुम्ही न्यायालयातून मोकळे आहात. (तो उठतो.)
(सगळेजण उठतात. न्यायाधीश न्यायालयाला नमस्कार करतो आणि वरच्या उजव्या बाजूने बाहेर जातो, त्याच्या मागोमाग नगरसेवक आणि न्यायाधीशांचे लिपिक जातात.)

दृष्य दुसरे

स्थळ: ओल्ड बेली (The Old Bailey). दुसऱ्या दिवशी सकाळी.

(पडदा वर येतो तेव्हा न्यायालयात न्यायाधीशांच्या आगमनाची प्रतीक्षा सुरू

आहे. लिओनर्ड आणि पहारेकरी आरोपींच्या बाकावर बसलेले आहेत. मागील रांगेच्या डाव्या टोकाला दोन वकील बसलेले आहेत. सर विल्फ्रिड आणि त्यांचे सहाय्यक आपल्या जागी आहेत. मेह्यू टेबलच्या डावीकडे उभा राहून सर विल्फ्रिडशी बोलत आहे. न्यायालयीन लिपिक, न्यायाधीशांचा लिपिक आणि शॉर्टहँड लिपिक आपल्या जागी आहेत. ज्युरीचे दिसणारे तीन सदस्य बसलेले आहेत. पोलिस अधिकारी वर डाव्या बाजूच्या दरवाजाजवळ उभा आहे. दारवान वर उजव्या मध्यभागी असलेल्या पायऱ्यांवर उभा आहे.)

(मायर्स, त्याचा सहाय्यक आणि दोन वकील मागील मध्य दरवाजातून आत येतात. मायर्स सर विल्फ्रिडकडे जातो आणि रागाने बोलायला लागतो.

सहाय्यक आणि वकील आपापल्या जागा घेतात. न्यायाधीशांच्या दरवाजावर तीन ठोके ऐकू येतात. दारवान पायऱ्यांवरून खाली उतरतो.)

दारवान: सर्वजण उभे राहा.

(सर्वजण उभे राहतात. न्यायाधीश आणि अल्डरमन न्यायाधीशांच्या दरवाजातून प्रवेश करतात आणि आपल्या जागा घेतात.)

दारवान: ज्यांना महाराणीच्या ओयर अँड टर्मिनर न्यायाधिकरणात, तसेच सेंट्रल क्रिमिनल कोर्टाच्या कार्यक्षेत्रातील सर्वसाधारण कैद्यांच्या सुनावणीस उपस्थित रहायचे आहे, त्यांनी पुढे या आणि उपस्थित राहा. देव महाराणीचे रक्षण करो.

(न्यायाधीश न्यायालयाला नमस्कार करतात. सर्वजण बसतात. दारवान उजवीकडच्या खालील बाजूला असलेल्या स्टूलवर बसतो.)

सर विल्फ्रिड: (उठून) माय लॉर्ड, काल न्यायालय तहकूब झाल्यापासून मला काही अत्यंत चकित करणारा पुरावा प्राप्त झाला आहे. हा पुरावा इतका महत्त्वाचा आहे की, मी आपल्या परवानगीने फिर्यादी पक्षाची शेवटची साक्षीदार, रोमेइन हेल्गर हिला पुन्हा बोलावण्याची विनंती करीत आहे.

(लिपिक उठतो आणि न्यायाधीशांच्या कानाशी काही कुजबुजतो.)

न्यायाधीश: सर विल्फ्रिड, हा पुरावा तुम्हाला नेमका केव्हा मिळाला?

(लिपिक बसतो.)

सर विल्फ्रिड: तो मला काल रात्री न्यायालय तहकूब झाल्यानंतर आणून देण्यात आला.

मायर्स: (उठून) माय लॉर्ड, माझ्या शास्त्रज्ञ मित्राच्या या विनंतीला मी हरकत घेतो. फिर्यादी पक्षाचा खटला आता संपलेला आहे आणि...

(सर विल्फ्रिड बसतो.)

न्यायाधीश: मिस्टर मायर्स, या प्रश्नावर निर्णय देण्याचा माझा अजून इरादा नव्हता...

न्यायाधीश:...सर्वप्रथम या विषयावर तुमचे म्हणणे ऐकण्याची औपचारिक पद्धत पार पाडू या. हो, सर विल्फ्रिड?

(मायर्स बसतो.)

सर विल्फ्रिड: (उठून) माय लॉर्ड, जर एखाद्या प्रकरणात आरोपीसाठी अत्यावश्यक असा पुरावा, ज्युरीने आपला निकाल दिल्यापूर्वीच, त्याच्या कायदेशीर सल्लागारांच्या ताब्यात आला, तर असा पुरावा केवळ ग्राह्य धरावा असा नाही, तर न्यायाच्या दृष्टीने आवश्यकच आहे, असा माझा युक्तिवाद आहे.

सुदैवाने माझ्या या युक्तिवादाला न्यायालयीन अधिकाराचे स्पष्ट समर्थन आहे—"दि किंग व्हर्सेस स्टिलमन" या प्रकरणात, जे 1926 सालच्या अपील केसेसमध्ये, पान क्रमांक 463 वर नोंदलेले आहे. (तो समोर असलेले कायद्याचे पुस्तक उघडतो.)

न्यायाधीश: तुम्ही ती संदर्भप्रकरणे सांगायची तसदी घेऊ नका, सर विल्फ्रिड. मला ती पूर्णपणे माहित आहेत. आता मी फिर्यादी पक्षाचे म्हणणे ऐकू इच्छितो. मिस्टर मायर्स.

(सर विल्फ्रिड बसतो.)

मायर्स: (उठून) लॉर्ड, माझ्या नम्र मते माझ्या मित्राने सुचवलेली ही प्रक्रिया, अपवादात्मक परिस्थिती वगळता, पूर्णपणे अभूतपूर्व आहे. आणि कृपया सांगाल का, सर विल्फ्रिड ज्या "चकित करणाऱ्या नव्या पुराव्या"चा उल्लेख करीत आहेत, तो नेमका काय आहे?

सर विल्फ्रिड: (उठून) पत्रे, माय लॉर्ड. रोमेन हेल्गरची पत्रे.

न्यायाधीश: सर विल्फ्रिड, मला ती पत्रे पाहायला आवडतील.

(सर विल्फ्रिड आणि मायर्स बसतात. दारवान उठतो, सर विल्फ्रिडकडे जाऊन पत्रे घेतो, ती न्यायालयीन लिपिकाकडे देतो. लिपिक ती न्यायाधीशांना देतो. न्यायाधीश पत्रांचा अभ्यास करतात. दारवान परत आपल्या जागी बसतो.)

मायर्स: (उठून) माझ्या मित्राने मला या अर्जाबद्दल न्यायालयात येतानाच सांगितले, त्यामुळे मला संबंधित प्रकरणांचा संदर्भ तपासण्याची संधी मिळाली नाही. पण माझ्या आठवणीत, 1930 साली "दि किंग व्हर्सेस पोर्टर" या प्रकरणात—बहुधा तेच असेल...

न्यायाधीश: नाही, मिस्टर मायर्स, "दि किंग व्हर्सेस पॉटर"—आणि ते 1931 मध्ये नोंदवले गेले होते. त्या प्रकरणात मी फिर्यादी पक्षाकडून हजर होतो.

मायर्स: आणि माझ्या आठवणीप्रमाणे, माय लॉर्ड, तुमची त्यावेळची हरकत ग्राह्य धरली गेली होती.

न्यायाधीश: या वेळेस तुमची आठवण तुम्हाला फसवत आहे, मिस्टर मायर्स.माझी ती हरकत तेव्हा मिस्टर जस्टीस स्विंडन यांनी फेटाळली होती— जशी तुमची हरकत मी आता फेटाळत आहे.

(मायर्स बसतो.)

सर विल्फ्रिड: (उठून) रोमेन हेल्गरला बोलवा.

दारवान : (उठतो आणि मध्यभागी पुढे येतो) रोमेन हेल्गर!

पोलिस अधिकारी: (दार उघडून मोठ्याने हाक मारतो) रोमेन हेल्गर!

न्यायाधीश: जर ही पत्रे खरी असतील, तर त्यातून अतिशय गंभीर प्रश्न निर्माण होतात. (तो पत्रे लिपिकाकडे देतो.)

(लिपिक ती पत्रे दारवानाकडे देतो. दारवान ती परत सर विल्फ्रिडकडे आणून देतो. या थोड्याशा प्रतीक्षेदरम्यान लिओनर्ड फारच अस्वस्थ दिसतो. तो पहारेकऱ्याशी काहीतरी बोलतो आणि मग चेहऱ्यावर हात ठेवतो. दारवान टेबलच्या उजव्या बाजूच्या स्टूलवर बसतो. मेह्यू उठून लिओनर्डकडे जाऊन त्याच्याशी बोलतो आणि त्याला शांत करण्याचा प्रयत्न करतो. लिओनर्ड मान हलवतो, पण तो स्पष्टपणे अस्वस्थ आणि चिंतित दिसतो. त्याच वेळी रोमेन डाव्या बाजूने आत येते, ओलांडून साक्षपेटीत प्रवेश करते. पोलिस अधिकारी दरवाजा बंद करतो.)

सर विल्फ्रिड: मिसेस हेल्गर, तुम्हाला माहीत आहे ना की तुम्ही अजूनही शपथेवर आहात?

रोमेन: होय.

न्यायाधीश: रोमेन हेल्गर, तुम्हाला पुन्हा साक्षपेटीत बोलावले गेले आहे, जेणेकरून सर विल्फ्रिड तुम्हाला आणखी काही प्रश्न विचारू शकतील.

सर विल्फ्रिड: मिसेस हेल्गर, तुम्ही 'मॅक्स' या नावाच्या एखाद्या पुरुषाला ओळखता का?

रोमेन: (त्या नावाचा उल्लेख होताच दचकते) मला तुमचा अर्थच कळत

नाही.

सर विल्फ्रिड: (हसत, शांतपणे) आणि तरीही हा प्रश्न अगदी सोपा आहे. तुम्ही 'मॅक्स' नावाच्या एखाद्या पुरुषाला ओळखता का नाही?

रोमेन: नक्कीच नाही.

सर विल्फ्रिड: तुम्हाला याची पूर्ण खात्री आहे?

रोमेन: मी 'मॅक्स' नावाच्या कोणालाच ओळखलेले नाही. कधीच नाही.

सर विल्फ्रिड: आणि तरीही, तुमच्या देशात हे नाव — किंवा एखाद्या लांब

नावाचे लघुरूप — बऱ्यापैकी सामान्य आहे, नाही का? तुम्ही सांगत आहात

की तुम्ही त्या नावाच्या कोणालाच ओळखलेले नाही?

रोमेन: (साशंकपणे) ओह, जर्मनीत—हो—कदाचित, मला नीट आठवत नाही. खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.

सर विल्फ्रिड: मी तुम्हाला एवढ्या जुन्या आठवणीत परत जाण्यास सांगणार नाही. काही आठवड्यांपूर्वीच पुरेसे आहे, असे धरू या—(तो टेबलवरील एक पत्र उचलतो, ते उघडतो, आणि जाणीवपूर्वक थोडे नाट्य करतो)—मागच्या ऑक्टोबरच्या सतराव्या तारखेची.

रोमेन: (चकित होऊन) तुमच्याकडे काय आहे ते?

सर विल्फ्रिड: एक पत्र.

रोमेन: मला माहीत नाही, तुम्ही काय बोलत आहात.

सर विल्फ्रिड: मी एका पत्राबद्दल बोलत आहे. सतरा ऑक्टोबरला लिहिलेल्या पत्राबद्दल. कदाचित तुम्हाला ती तारीख आठवत असेल.

रोमेन: विशेष नाही, का विचारत आहात?

सर विल्फ्रिड: माझे म्हणणे आहे की त्या दिवशी तुम्ही एक पत्र लिहिले होते—'मॅक्स' नावाच्या पुरुषाला उद्देशून.

रोमेन: मी तसं काही केलं नाही. तुम्ही जे बोलत आहात ते सर्व खोटं आहे.

मला काही कळत नाही.

सर विल्फ्रिड: ते पत्र अशा पत्रांच्या मालिकेतील एक होते, जी तुम्ही त्या पुरुषाला काही काळापासून लिहीत होतात.

रोमेन: (अस्वस्थपणे) खोटं—सगळं खोटं!

सर विल्फ्रिड: असं दिसतं की तुम्ही त्या पुरुषाशी—(अर्थपूर्णपणे)—जवळच्या संबंधात होता.

लिओनर्ड: (उठून) तुम्ही असा अपमानास्पद आरोप करण्याचं धाडस कसं केलंत?

(पहारेकरी उठतो आणि **लिओनर्ड**ला आवरायचा प्रयत्न करतो.)

लिओनर्ड: (पहारेकऱ्याला बाजूला सारत) हे खरं नाही!

न्यायाधीश: आरोपीने आपल्या हितासाठी गप्प राहणं उचित ठरेल.

(लिओनार्ड आणि पहारेकरी परत आपल्या जागी बसतात.)

सर विल्फ्रिड: मला या पत्रव्यवहाराचा एकूण आशय महत्त्वाचा नाही. मला

फक्त एका विशिष्ट पत्रात रस आहे. (तो वाचतो.)

"माझ्या प्रिय मॅक्स, एक विलक्षण घटना घडली आहे. मला वाटतं की आता आपल्या सगळ्या अडचणींचा शेवट होऊ शकेल..."

रोमेन: (आवेशाने मध्येच अडवत) हे खोटं आहे—मी ते पत्र लिहिलंच नाही! ते तुमच्याकडे आलं तरी कसं? तुम्हाला ते कोणी दिलं?

सर विल्फ्रिड: ते पत्र माझ्याकडे कसं आलं, हे अप्रासंगिक आहे.

रोमेन: तुम्ही ते चोरलं आहे. तुम्ही खोटारडे आहात, आणि चोरही. की एखाद्या बाईने तुम्हाला ते दिलं? हो, मी बरोबरच आहे, नाही का?

न्यायाधीश: कृपया केवळ वकिलाने विचारलेल्या प्रश्नांचीच उत्तरे द्या.

रोमेन: पण मी ऐकणार नाही!

न्यायाधीश: सर विल्फ्रिड, पुढे चालू ठेवा.

सर विल्फ्रिड: आतापर्यंत तुम्ही त्या पत्राच्या केवळ सुरुवातीच्या काही ओळी ऐकल्या आहेत. तर मी असा अर्थ लावू का की तुम्ही ते पत्र लिहिल्याचे ठामपणे नाकारत आहात?

रोमेन: अर्थातच मी लिहिलेलं नाही! ते बनावट आहे. मला खोट्यांच्या गुंडाळीवर विश्वास ठेवायला भाग पाडलं जातंय, ही फार मोठी लाजीरवाणी गोष्ट आहे—एखाद्या मत्सरी बाईने तयार केलेली खोटी कथा!

सर विल्फ्रिड: माझं म्हणणं असं आहे की खोटं तुम्ही बोललात. तुम्ही या न्यायालयात, शपथेवर असताना, ठामपणे आणि सतत खोटं बोललात. आणि तुम्ही असं का केलंत, हे या पत्रातून स्पष्ट होतं—(तो पत्रावर टकटक करतो)—तुमच्याच हाताने काळ्या अक्षरात लिहिलेल्या या पत्रातून!

रोमेन: तुम्ही वेडे झाला आहात! मी अशी मूर्खपणाची गोष्ट का लिहीन?

सर विल्फ्रिड: कारण तुमच्यासमोर स्वातंत्र्याचा मार्ग खुला झाला होता—

आणि त्या मार्गाने जायच्या नियोजनात, एका निरपराध माणसाला मृत्युदंड होणार आहे, याचं तुम्हाला काहीच सोयरसुतक नव्हतं. तुम्ही तर शेवटचा घातक स्पर्शही दिला आहे—ज्यामध्ये तुम्ही लिहिलं आहे की तुम्हीच चुकून हॅमच्या सुरीने लिओनर्ड व्होलला जखमी केलंत.

रोमेन: (प्रचंड संतापून) मी ते लिहिलं नाही! मी लिहिलं होतं की त्यानेच स्वतः डुक्कर कापताना हात कापला होता... (तिचा आवाज हळूहळू मंदावतो.न्यायालयातील सर्वांची नजर तिच्याकडे वळते.)

सर विल्फ्रिड: (विजयी मुद्रेने) मग तुम्हाला त्या पत्रात काय आहे हे ठाऊक आहे—मी ते वाचण्याआधीच!

रोमेन: (आतापर्यंतचा ताबा गमावून) शाप तुला! शाप तुला! शाप तुला!

लिओनर्ड: (उठून ओरडतो) तिला सोडा! तिच्यावर अत्याचार करू नका!

रोमेन: (वेड्यासारखी आजूबाजूला पाहत) मला इथून बाहेर जाऊ द्या—मला जाऊ द्या! (ती साक्षपेटीतून बाहेर येते.दारवान उठून रोमेनला थांबवतो.)

न्यायाधीश: दारवान , साक्षीदाराला खुर्ची द्या.

(रोमेन टेबलच्या उजव्या बाजूच्या स्टूलावर कोसळते, हिस्टेरिकल रडू लागते आणि चेहऱ्यावर हात ठेवते. दारवान पुढे जाऊन उजवीकडच्या खालील स्टूलावर बसतो.)

न्यायाधीश: सर विल्फ्रिड, कृपया आता ते पत्र मोठ्याने वाचा, जेणेकरून ज्युरी ते ऐकू शकेल.

सर विल्फ्रिड: (वाचत) "माझ्या प्रिय मॅक्स, एक विलक्षण घटना घडली आहे. मला वाटतं की आता आपल्या सगळ्या अडचणी संपुष्टात येतील. आता मी तुझ्याकडे येऊ शकते, आणि तू या देशात जे मौल्यवान काम करत आहेस त्याला धोकाही होणार नाही. मी तुला सांगितलेल्या म्हाताऱ्या बाईचा खून झाला आहे आणि मला वाटतं की लिओनर्डवर संशय आहे. त्या रात्री तो तिथे लवकर गेला होता, आणि त्याचे ठसे सर्वत्र असतील. साडेनऊ वाजताची वेळ दिसते. त्या वेळेपर्यंत लिओनर्ड घरी परतला होता, पण त्याचा पुरावा माझ्यावर अवलंबून आहे—माझ्यावर. जर मी असं सांगितलं की तो घरी खूप उशीरा आला आणि त्याच्या कपड्यांवर रक्त होतं—त्याच्या हातावर खरंच रक्त होतं, कारण जेवताना त्याने मनगट कापलं होतं—तर सगळं अगदी जुळून येईल. मी तर असंही सांगू शकते की त्यानेच तिचा खून केला, असं त्याने मला कबूल केलं. ओह, मॅक्स, प्रिय मॅक्स! मला सांग की मी हे पुढे नेऊ शकते—एवढ्या काळापासून निभावलेला प्रेमळ, कृतज्ञ स्त्रीचा अभिनय संपवून..."

कृतज्ञ पत्नी. मला माहीत आहे की कार्य आणि पक्ष हे प्रथम आहेत, पण जर लिओनार्डला खुनाच्या गुन्ह्यात दोषी ठरवले गेले, तर मी सुरक्षितपणे तुझ्याकडे येऊ शकते आणि आपण कायमचे एकत्र राहू शकतो. — तुझी प्रेमळ रोमेन."

न्यायाधीश : रोमेन हायलगर, कृपया पुन्हा साक्षीपेटीत परत जा.

(**रोमेन** उठते आणि साक्षीपेटीत प्रवेश करते.)

तू ते पत्र वाचलेस. आता तुला काय म्हणायचे आहे?

रोमेन : (पराभूत भावनेने गोठल्यासारखी) काहीच नाही.

लिओनर्ड : रोमेन, त्याला सांग तू ते पत्र लिहिले नाहीस. मला माहीत आहे तू ते लिहिले नाहीस.

रोमेन : (त्याच्याकडे वळून, शब्द फेकल्यासारखे) अर्थातच मीच ते लिहिले!

सर विल्फ्रिड : माझ्या प्रभो, इतक्याने बचाव पक्षाचे सादरीकरण संपते.

न्यायाधीश : सर विल्फ्रिड, या पत्रांचा पत्ता कोणाला होता याबद्दल काही पुरावा आहे का?

सर विल्फ्रिड : माझ्या प्रभो, ही पत्रे मला अज्ञातरीत्या मिळाली, आणि

आतापर्यंत आणखी तपशील शोधण्यास वेळ मिळालेला नाही. असे दिसते की तो व्यक्ती बेकायदेशीररीत्या या देशात आला आणि इथे काही गुप्त कारवायांमध्ये गुंतलेला आहे...

रोमेन : तुम्ही कधीच शोधू शकणार नाही तो कोण आहे. कधीच नाही. तुम्ही माझ्याशी काहीही करा, पण तुम्हाला कधीच समजणार नाही.

न्यायाधीश : श्री. मायर्स, तुम्हाला पुनः परीक्षा घ्यायची आहे का?

(सर विल्फ्रिड बसतो.)

मायर्स : (थोडा अस्वस्थपणे उठत) खरं सांगायचं झालं तर, माझ्या प्रभो, या धक्कादायक घटनांमुळे मला आता काय विचारावे हेच समजत नाही. (रोमेनकडे पाहून) श्रीमती हायल्गर, तुम्ही अत्यंत तणावग्रस्त आणि संवेदनशील स्वभावाच्या आहात असे दिसते. तुम्ही परदेशी असल्यामुळे

इंग्रजी न्यायालयात शपथ घेतल्यावर तिचे किती गांभीर्य असते हे तुम्हाला कदाचित नीट कळत नसेल. जर तुम्हाला खरे नसलेले काही कबूल करण्यास धमकावले गेले असेल, किंवा जर हे पत्र तुम्ही काही तणावाखाली किंवा कल्पनारम्य भावनेत लिहिले असेल, तर आता तसे सांगण्यास अजिबात संकोच करू नका.

रोमेन: तुम्ही अजून किती यातना द्यायच्या आहेत मला? मीच ते पत्र लिहिले. आता मला जाऊ द्या.

मायर्स : माझ्या प्रभो, मी विनंती करतो की ही साक्षीदार स्त्री इतकी अस्वस्थ आहे की तिला स्वतः काय बोलते आहे किंवा कबूल करते आहे याची जाणीवही नाही.

न्यायाधीश : श्री. मायर्स, तुम्हाला आठवत असेल की सर विल्फ्रिड यांनी तिच्या मागील साक्षीवेळी तिला तिच्या शपथेचे पवित्र स्वरूप समजावून सांगितले होते.

(मायर्स बसतो.)

श्रीमती हायलगर, मी तुम्हाला इशारा देतो की ही गोष्ट इथे संपत नाही. या देशात शपथेवर खोटे बोलणे हा गंभीर गुन्हा आहे आणि त्याबद्दल तुमच्यावर लवकरच खोट्या साक्षीचा खटला दाखल होईल यात मला शंका नाही. खोट्या साक्षीबद्दलची शिक्षा कडक असते. तुम्ही आता खाली उतरू शकता.

(रोमेन खाली उतरते. पोलिस अधिकारी दार उघडतो. रोमेन चालत जाऊन बाहेर जाते. पोलिस अधिकारी दार बंद करतो.)

न्यायाधीश: सर विल्फ्रिड, आता तुम्ही बचाव पक्षाच्या वतीने न्यायमंडळाला संबोधित कराल का?

सर विल्फ्रिड: (उठत) न्यायमंडळातील सदस्यांनो, जेव्हा सत्य स्पष्ट दिसते तेव्हा ते स्वतःच बोलते. माझ्या शब्दांनी मी त्यावर काहीही अधिक करू शकत नाही, जी तुम्ही नुकतीच कैद्याच्या प्रामाणिक कथेतून आणि त्याच्याविरुद्ध करण्यात आलेल्या दुष्ट प्रयत्नातून घेतली आहे...

(सर विल्फ्रिड बोलत असताना प्रकाश मंदावत जातो आणि अंधार होतो.

काही सेकंदांनी प्रकाश पुन्हा लागतो. न्यायमंडळ बाहेर गेलेले आहे पण आता पुन्हा जागेवर प्रवेश करत आहे.)

लिपिक : (उठून) व्होल, उभे रहा.

(लिओनार्ड उठतो.)

न्यायमंडळातील सदस्यांनो, तुमचा निर्णय सर्वानुमते झाला आहे का?

मुख्य न्यायमंडळ सदस्य : (उठत) हो, झाला आहे.

लिपिक : तुम्हाला कैदी लिओनर्ड व्होल हा दोषी वाटतो का निर्दोष?

मुख्य न्यायमंडळ सदस्य : निर्दोष, माझ्या प्रभो.

(संपूर्ण न्यायालयात हलकी समाधानाची कुजबुज पसरते.)

दर्जेदार अधिकारी : (उठून, मध्यभागी पुढे येत) शांतता ठेवा!

न्यायाधीश : लिओनर्ड व्होल, १४ ऑक्टोबर रोजी एमिली फ्रेंचच्या खुनाच्या गुन्ह्यात तुम्हाला निर्दोष ठरवण्यात आले आहे. त्यामुळे तुम्हाला आता मुक्त करण्यात येते आणि न्यायालयातून बाहेर पडण्यास परवानगी आहे. (तो उठतो.)

(सर्वजण उठतात. न्यायाधीश न्यायालयाला नमस्कार करून उजवीकडे बाहेर जातो; त्याच्या मागे आल्डरमन आणि न्यायाधीशांचा लिपिक जातात.)

दर्जेदार अधिकारी : ज्यांचे काम आज येथे संपले आहे आणि जे सेंट्रलक्रिमिनल कोर्टाच्या अधिकारक्षेत्रातील ओयेर अँड टर्मिनर व जनरल जेल डिलिव्हरीच्या महाराणीच्या न्यायाधीशांपुढे पुन्हा उपस्थित राहणार आहेत, त्यांनी आता येथून निघावे आणि उद्या सकाळी साडेदहाला पुन्हा येथे हजर राहावे. *गॉड सेव द क्वीन!

(दर्जेदार अधिकारी, न्यायमंडळ आणि शॉर्टहँड लेखक उजवीकडे बाहेर जातात. वकील, त्यांचे सहाय्यक आणि न्यायालयाचा लिपिक मध्यभागी वरच्या दिशेने बाहेर जातात. कारागृह रक्षक आणि पोलिस डावीकडे वरच्या दिशेने निघतात. लिओनर्ड कटघऱ्यातून बाहेर येतो आणि मेह्यूकडे जातो.)

मेह्यू: अभिनंदन, माझ्या मुला!

लिओनर्ड : मी तुमचे पुरेसे आभार मानू शकत नाही.

मेह्यू: (कुशलतेने सर विल्फ्रिडकडे सूचित करत) खरं तर आभार मानायचे असतील तर यांचे माना.

(**लिओनर्ड** मध्यभागी **सर विल्फ्रिड**कडे जातो, पण त्याचा सामना **मायर्स**शी होतो; **मायर्स** त्याच्याकडे कटाक्ष टाकतो आणि वरच्या मध्यभागी बाहेर जातो. **सर विल्फ्रिड लिओनर्ड**च्या उजवीकडे येतो.)

लिओनर्ड: (सर विल्फ्रिडकडे वळून) धन्यवाद, सर. (त्याचा सूर **मेह्यू**पेक्षा थोडा थंड असतो. त्याला **सर विल्फ्रिड** आवडत नाही असे दिसते.) तुम्ही—तुम्ही मला फारच भयंकर अडचणीतून बाहेर काढले.

सर विल्फ्रिड: भयंकर अडचण! ऐकलंस का, जॉन? आता तुझे सगळे प्रश्न संपले, माझ्या मुला.

मेह्यू: (लिओनर्डच्या डावीकडे सरकत) पण फार थोडक्यात वाचलास, हे मान्य करायलाच हवं.

लिओनर्ड : (अनिच्छेने) हो, बहुतेक तसं आहे.

सर विल्फ्रिड: जर आपण त्या बाईला कोलमडवू शकलो नसतो तर...

लिओनर्ड: पण तुम्हाला तिच्यावर त्या पद्धतीने जावे लागले का? ती जशी तुटून गेली ते भयंकर होतं. मला अजूनही विश्वास बसत नाही...

सर विल्फ्रिड: (आपल्या ठाम व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर) ऐक लिओनर्ड, मी अनेक तरुणांना पाहिलंय जे स्त्रियांवर एवढे मोहित झाले की त्यांच्या खऱ्या स्वभावाबद्दल अंध झाले. त्या स्त्रीने तर तुला फाशीच्या दोरीपर्यंत पोहोचवण्यासाठी शक्य ते सगळं केलं.

मेह्यू: आणि हे विसरू नकोस.

लिओनर्ड: हो, पण का? मला कारणच समजत नाही. ती नेहमीच इतकी निष्ठावान वाटायची. मी शपथ घेऊ शकतो की ती माझ्यावर प्रेम करत होती—आणि तरीही ती दुसऱ्या माणसाबरोबर जात होती. (तो डोके हलवतो.) हे अविश्वसनीय आहे—मला काहीतरी समजत नाहीये.

कारागृह रक्षक: (डावीकडून आत येत आणि टेबलाच्या डावीकडे येत) अजून दोन-तीन मिनिटेच, सर. आम्ही तुम्हाला बाजूच्या प्रवेशद्वारातून कारपर्यंत नेऊ.

लिओनर्ड : अजून गर्दी आहे का?

(**रोमेन** पोलिसाच्या सोबत डावीकडून वरच्या दिशेने प्रवेश करते.)

पोलिस: (दारात उभा राहून) बाईसाहेब, इथेच थोडा वेळ थांबा. बाहेरची गर्दी रागात आहे. ती पांगल्याशिवाय बाहेर जाणे योग्य ठरणार नाही.

रोमेन: (टेबलाच्या डावीकडे सरकत) धन्यवाद.

(पोलिस आणि कारागृह रक्षक डावीकडे वरच्या दिशेने बाहेर जातात**. रोमेन लिओनर्ड**कडे सरकते.)

सर विल्फ्रिड: (**रोमेन**च्या वाटेत येत) नाही, तुम्ही नाही.

रोमेन: (थोड्या हसत) तुम्ही लिओनर्डला माझ्यापासून वाचवत आहात का? खरंच, त्याची गरज नाही.

सर विल्फ्रिड : तुम्ही पुरेसं नुकसान केलं आहे.

रोमेन: मला किमान लिओनर्डला मुक्त झाल्याबद्दल अभिनंदन तरी करू देणार

नाही का?

सर विल्फ्रिड: तुमच्यामुळेच तो अडकला होता, त्यामुळे त्याला तुमचे आभार नकोत.

रोमेन: आणि आता तो श्रीमंतही झाला आहे.

लिओनर्ड : (गोंधळून) श्रीमंत?

मेह्यू : होय, माझ्या मते, मिस्टर व्होल, तुम्हाला मोठी संपत्ती वारशाने मिळणार आहे.

लिओनर्ड: (निर्दोषपणे) पैशाचं काही विशेष वाटत नाही आता, मी जे काही सहन केलं त्यानंतर... रोमेन, मला अजूनही समजत नाही...

रोमेन: (शांतपणे) लिओनर्ड, मी ते सगळं समजावू शकते.

सर विल्फ्रिड: नाही!

(**सर विल्फ्रिड** आणि **रोमेन** दोघे एकमेकांकडे प्रतिस्पर्ध्यांसारखे पाहतात.)

रोमेन: मला सांगा, न्यायाधीशांनी सांगितलेले शब्द म्हणजे मी तुरुंगात जाणार आहे का?

सर विल्फ्रिड: नक्कीच तुमच्यावर खोटी साक्ष दिल्याचा आरोप होईल आणि तुम्हाला त्यासाठी खटला भोगावा लागेल. तुम्ही बहुधा तुरुंगात जाल.

लिओनर्ड: (अवघडलेपणाने) मला खात्री आहे—की सर्व काही ठीक होईल.

रोमेन: काळजी करू नकोस.

मेह्यू: व्होल, तुम्ही कधी समजूतदार व्हाल का? आता आपण व्यवहारिक गोष्टींकडे लक्ष दिलं पाहिजे—म्हणजे वारसाहक्काच्या बाबतीत.

(**मेह्यू लिओनर्डला** उजवीकडे खाली नेतात आणि दोघे मंद आवाजात बोलतात. **सर विल्फ्रिड** आणि **रोमेन** मात्र एकमेकांकडे पाहत उभे राहतात.)

सर विल्फ्रिड: तुमच्या माहितीसाठी सांगतो, आपण पहिल्यांदा भेटलो तेव्हाच मी तुमचा अंदाज घेतला होता. त्याच क्षणी मी ठरवलं की तुमच्या खेळात तुम्हाला हरवायचं—आणि देवाशपथ, मी ते केलं. तुमच्या विरोधात असूनही मी त्याला निर्दोष ठरवलं.

रोमेन: माझ्या विरोधात असूनही...

सर विल्फ्रिड: तुम्ही नाकारत नाही ना, की तुम्ही त्याला फाशी चढवण्यासाठी पुरेपूर प्रयत्न केला?

रोमेन: जर मी सांगितलं असतं की त्या रात्री तो माझ्याबरोबर घरी होता, बाहेर गेला नाही—तर लोकांनी माझ्यावर विश्वास ठेवला असता का? ठेवला असता?

सर विल्फ्रिड : (थोडे अस्वस्थ होत) का नाही?

रोमेन: कारण त्यांनी असं म्हटलं असतं—ही बाई या माणसावर प्रेम करते, ती त्याच्यासाठी काहीही बोलेल, काहीही करेल. त्यांनी माझ्यावर सहानुभूती दाखवली असती, पण विश्वास ठेवला नसता.

सर विल्फ्रिड: जर तुम्ही खरं बोलत होतात, तर त्यांनी नक्कीच विश्वास ठेवला असता.

रोमेन: खरंच? (थोडा थांबते.) मला त्यांची सहानुभूती नको होती—मला हवं होतं की त्यांनी माझा तिरस्कार करावा, माझ्यावर अविश्वास ठेवावा, मी खोटारडी आहे असं ठामपणे मानावं. आणि मग जेव्हा माझं खोटं उघड झालं—तेव्हा त्यांनी विश्वास ठेवला... (सर विल्फ्रिडच्या ऑफिसमध्ये आलेल्या बाईच्या लंडन उच्चारात बोलत) "आता सगळी गोष्ट कळली, साहेब—मला एक किस कराल का?"

सर विल्फ्रिड : (थक्क) देवा!

रोमेन: (स्वतःच्या आवाजात) हो, तीच बाई—पत्रांची बाई. ती पत्रं मीच लिहिली. मीच ती तुमच्याकडे आणली. ती बाई मीच होते. लिओनर्डला तुम्ही नाही, मी मुक्त केलं. आणि त्याच्या बदल्यात आता मी तुरुंगात जाणार आहे. (तिचे डोळे मिटतात.) पण सगळं संपल्यावर लिओनर्ड आणि मी पुन्हा एकत्र असू—आनंदी, एकमेकांवर प्रेम करत.

सर विल्फ्रिड: (भावूक होऊन) प्रिय स्त्री... पण तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवू शकला नाहीत का? आमच्या ब्रिटिश न्यायप्रणालीवर आम्ही विश्वास ठेवतो— सत्याला जपतो. आम्ही त्याला वाचवलंच असतं.

रोमेन: मी तो धोका पत्करू शकले नाही. (हळूहळू) तुम्हाला वाटत होतं की तो निर्दोष आहे...

सर विल्फ्रिड: (चकित पण समजूतदारपणे) आणि तुम्हाला ठाऊक होतं कीतो निर्दोष आहे. समजलो.

रोमेन : पण तुम्हाला अजिबात समजलेले नाही. मला ठाऊक होतं की तो दोषी आहे.

सर विल्फ्रिड : (आश्चर्यचकित) काय म्हणालात? पण तुम्हाला भीती वाटत नाही का?

रोमेन: भीती?

सर विल्फ्रिड: एका खुन्याच्या जीवनाशी स्वतःचं आयुष्य जोडण्याची?
रोमेन: तुम्हाला कळत नाही—आम्ही एकमेकांवर प्रेम करतो.
सर विल्फ्रिड: मी पहिल्यांदा तुम्हाला पाहिलं तेव्हाच म्हटलं होतं की तुम्ही असामान्य स्त्री आहात—आणि माझं मत आजही बदललेलं नाही. (मध्यभागी वरच्या दिशेने जात बाहेर पडतो.)
कारागृह रक्षक: (मंचाच्या डाव्या बाजूला, पडद्यामागून) आत जाण्याचा काही उपयोग नाही, बाईसाहेब. सगळं संपलं आहे.
(डावीकडे वरच्या दिशेने गोंधळ ऐकू येतो आणि एक तरुण मुलगी धावत आत येते. ती खूप तरुण, फिकट पांढऱ्या केसांची आणि अतिशय उठावदार व्यक्तिमत्त्व असलेली असते. ती वकिलांच्या बाकातून **लिओनर्ड**कडे धावते.)
मुलगी: लेन, प्रिय, तू आता मुक्त झालास! (ती त्याला मिठी मारते) किती छान आहे ना? मला आत येऊ देत नव्हते. प्रिय, हे फार भयंकर होतं — मी वेडी होत चालले होते.
रोमेन : (अचानक अत्यंत कठोर आवाजात) लिओनर्ड — ही — मुलगी — कोण आहे?
मुलगी : (रोमेनकडे रोखून बघत, आव्हानात्मक सुरात) मी लेनची प्रेयसी आहे. मला सगळं माहिती आहे. तू त्याची बायको नाहीस — कधीच नव्हतीस. (ती रोमेनच्या उजव्या बाजूला जाते) तू त्याच्यापेक्षा कित्येक वर्षांनी मोठी आहेस, आणि तू त्याला फसवलंस — त्याला फाशी देण्यासाठी जेवढं शक्य होतं ते सगळं केलंस. पण आता ते सगळं संपलं. (ती लिओनर्डकडे वळते) आपण परदेशात जाऊ — जसं तू म्हणालास — त्या सुंदर क्रूझवर, त्या भव्य जागांवर. आपण किती छान वेळ घालवू!
रोमेन : हे — खरं — आहे? ही तुझी प्रेयसी आहे, लिओनार्ड ?
लिओनर्ड : (क्षणभर थांबून, पण नंतर परिस्थिती स्वीकारत) हो, तीच आहे.

(मुलगी **लिओनर्ड**च्या वरून उजव्या बाजूला येते.)

रोमेन: मी तुझ्यासाठी जे काही केलं त्यानंतर... तिच्याकडे असं काय आहे जे त्याच्या तुलनेत जास्त आहे?

लिओनार्ड: (सगळा आडपडदा झटकून, खडबडीत, क्रूर आवाजात) ती तुझ्यापेक्षा पंधरा वर्षांनी लहान आहे. (तो हसतो.)

(**रोमेन** जणू काही कोणीतरी तिला थप्पड मारली आहे अशा वेदनेने दचकते.)

(तो **रोमेन**च्या उजव्या बाजूला येतो, धमकावत.) माझ्याकडे पैसे आहेत. मी निर्दोष ठरलो आहे, आणि मला पुन्हा खटला चालवता येणार नाही. त्यामुळे तू गप्प बसलेलीच बरी आहेस, नाहीतर तू स्वतःच 'अपराधानंतरचा साथीदार' म्हणून फाशी जाशील. (तो मुलीकडे वळतो आणि तिला मिठी मारतो.)

रोमेन : (टेबलवरून चाकू उचलते. डोके उंचावून, अचानक गंभीर सन्मानाने) नाही — असं होणार नाही. मला 'अपराधानंतरची साथीदार' म्हणून दोषी ठरवले जाणार नाही. मला 'खोटं साक्ष देणे' यासाठीही दोषी ठरवले जाणार नाही. मला दोषी ठरवले जाईल 'खुनासाठी'— (ती लिओनर्डच्या पाठीवर चाकू खुपसते) — त्या एकमेव पुरुषाच्या खुनासाठी, ज्याच्यावर मी कधी प्रेम केलं होतं.

(लिओनर्ड कोसळतो. मुलगी किंचाळते. **मेह्यू लिओनर्ड**जवळ झुकतो, त्याचा नाडीचा ठोका पाहतो, आणि डोके हलवतो.)

(**रोमेन**: न्यायाधीशांच्या आसनाकडे वर बघते.)

रोमेन: मी दोषी आहे, माननीय न्यायमूर्ती.

पडदा पडतो.





वृषाली जोशी यांची गेल्या दहा वर्षांत प्रकाशित झालेली

एकोणसाठ पुस्तके








वृषाली जोशी
अमेरिकन
गुन्हे अन्वेषक कथा
भाग १

वृषाली जोशी
अमेरिकन
गुन्हे अन्वेषक कथा
भाग २


वृषाली जोशी
अमेरिकन
गुन्हे अन्वेषक कथा
संग्रह


MOBY DICK
HERMAN MELVILLE
वृषाली जोशी
मॉबी डिक


वृषाली जोशी
चार्ल्स डिकन्स


वृषाली जोशी
कहाणी दोन शहरांची
A Tale of Two Cities
CHARLES DICKENS


वृषाली जोशी
AMERICAN STORIES
अमेरिकन लघुकथा


DOWN AND OUT IN PARIS AND LONDON
GEORGE ORWELL
भाग १
पॅरिस
वृषाली जोशी


DOWN AND OUT IN PARIS AND LONDON
GEORGE ORWELL
भाग २
लंडन
वृषाली जोशी

ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)

Agatha Christie













वृषाली जोशी
AND THEN THERE WERE
NONE
आणि मग तिथे
कुणीच नव्हतं


वृषाली जोशी
Christie
लीस्टरडेल गूढकथा
भाग एक


वृषाली जोशी
AGATHA
CHRISTIE
The Listerdale
Mystery
लीस्टरडेल
गूढकथा
भाग दोन


वृषाली जोशी
राजघराण्यातील
माणकाची चोरी
POIROT


वृषाली जोशी
Christie
म्युजमधील खून


वृषाली जोशी
हर्क्युलसचे श्रम- २


Agatha
Christie
वृषाली जोशी
हर्क्युलसचे श्रम- १
THE LABORS
OF HERCULES


वृषाली जोशी
अपमानित नोकर


Agatha
वृषाली जोशी
Christie
मृत माणसाचा आरसा


वृषाली जोशी
स्टीफन झ्वाइग
बुद्धिबळाची गोष्ट


वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
The Death of
Ivan Ilych
इव्हान इलयीचचा मृत्यू


वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
लघुकथासंग्रह


कत्तल करायची मेंढी
व इतर कथा
रोआल्ड डाल
वृषाली जोशी

वृषाली जोशी
जिम कॉर्बेट
चंपावतची नरभक्षक वाघीण


वृषाली जोशी
मार्क ट्वेन
मार्क ट्वेन च्या कथा


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
लघुकथासंग्रह


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
स्टीफन लिकॉक


वृषाली जोशी
विश्वकथा १


वृषाली जोशी

वृषाली जोशी
विश्वकथा-३


वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
जॉन ओ'हारा
गुप्त सभा
व इतर कथा


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


वृषाली जोशी
THE SOUND OF MUSIC
संगीताचा नाद


वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
शेक्सपिअर च्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night

शेरलॉक होम्स
भाग १ ते ८ (५० कथा)
ज्या कव्हरवर क्लिक
कराल ते पुस्तक उघडेल















ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष आहे.

डॉ. वृषाली जोशी यांचे हे साठावे पुस्तक आहे.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे. त्यांनी आजवर ई साहित्यच्या वाचकांसाठी केलेल्या जागतिक साहित्याच्या अनुवादांची **अकरा हजाराहून अधिक पृष्ठे** प्रकाशित झाली आहेत व तो एक विक्रमच आहे. अनुवादाचा तिनशे रुपये पर पेज हा रेट धरला तरी सुमारे तीस चाळीस लाख रुपयांचे हे काम त्यांनी मराठी वाचकांसाठी विनामूल्य केले आ्हे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ

मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (५९पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी (६० पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३८), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (४), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२९), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (४), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम (११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (३), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(३),

भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत, अशोक बेंडखळे(३), सुहास साने, सुवर्णा लेले, शशिकांत कर्डेकर(५), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, अंजुषा पाटील प्रा श्रीपाद काळे(५), चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक, प्रमोद नाईकवाडॅ, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, सुरेश पंधारे, श्रेणीक सारडॅ(५) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।